# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**बुधवार दिनांक २०/०२/२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज बुधवार दिनांक २०/०२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री युवराज चैत्राम पाटील, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री.बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री.पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती.उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ७ | श्रीमती.देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ८ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ९ | श्री.मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १० | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| ११ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १२ | श्रीमती.अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १३ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ३ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ४ | श्री. एस.बी. विसपुते | ओव्हरसिअर बांधकाम |
| ५ | श्री. व्ही. डी. सरोदे | लिपीक आरोग्य विभाग |
| ६ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्य अधिकारी |
| ७ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| ८ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालयीन अधिक्षक |
| ९ | श्री.बी. एस. रनाळकर | सहा. कर मुल्य निर्धारण अधिकारी |
| १० | श्री. पराग ठाकरे | ओव्हरसिअर विद्युत विभाग |
| ११ | श्री. राजेंद्र माईनकर | भांडारपाल |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. आर. व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १३ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १४ | श्री. किशोस सुडके | बाजार विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेचया सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून श्रध्दांजलीसाठी आलेली यादी.

यादी देण्यांत येते की, दिनांक 14/2/2019 रोजी काशिमर येथील पुलगामा येथे 48 एस.आर.पी.एफ चे जवान दहशतवादी हल्यांत शहीद झाले. तसेच धुळे शहरातील नामवंत शाहीर भटू गिरमरकर यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. आपल्या शाहीरीतून व लोकगितातून त्यांनी समाज प्रबोधनाचे काम शहरात केलेले आहे. या लोककलावंताच्या दु:खद निधनानिमित्त सभागृहात श्रध्दांजली समर्पित करुन ठराव पारीत करण्यांत यावा.

**सुचक** :- श्रीमती सुरेखा चंद्रकात उगले

**अनुमोदक** :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ०१ दिनांक** 20/02/2019

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दिनांक 14/2/2019 रोजी काशिमर येथील पुलगामा येथे 48 एस.आर.पी.एफ चे जवार दहशत वादी हल्यांत शहीद झाले. तसेच धुळे शहरातील नामवंत शाहीर भटू गिरमरकर यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले

मान्यवराच्या दु:खद निधनाबद्दल या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करीत आहोत..

**सर्वानुमते मंजुर,**<br>
**सही/- X X X**<br>
**सभापती,**<br>
**स्थायी समिती,**<br>
**धुळे महानगरपालिका, धुळे**

म. सभापती — सन्मा . सदस्य यांना मी सांगू इच्छितो की, सर्वाच्या सहकार्याने आज मला सभापती पदाची संधी मिळालेली आहे. याबद्दल मी सर्वाचे आभार मानतो. स्थायी समितीच्या माध्यमातून

प्रभागातील विकास कामे करण्यासाठी सर्वांना बरोबर घेवून विकास कामे करण्यांत येतील असे आश्वासन देतो.

विषय क्रमांक :- ०२ स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमीन पटेल स्थायी समितीच्या सभेच्या बैठकीचा वार हा गुरुवार व वेळ सकाळी ११-०० वाजता निश्चित करण्यांत यावे.

म. आयुक्त नियमानुसार स्थायी समितीचा वार गुरुवार निश्चित केल्यानंतर नगरसचिव हे अजेंडा काढत असतात. नियमाप्रमाणे स्थायी समितीच्या मान्यतेसाठी असणारे प्रस्तावांची विषय पत्रिका नगरसचिव यांच्या मार्फत काढण्यांत येते. वार आणि वेळ निश्चितीनंतर बैठक आयोजनासाठी सभापती यांच्या आदेशाची गरज नसते. मात्र अत्यावश्यक किंवा तांतडीच्या प्रसंगीच सभापती यांच्या आदेशानुसार विषय पत्रिका काढण्यांत येते.

मा. सभापती सर्व उपस्थित सदस्याच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्या आदेशानुसार बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ दिनांक २०/०२/२०१९**

कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक दिनांक १८/०२/२०१९ रोजी होऊन स्थायी समिती सभापती पदी श्री. पाटील युवराज चैत्राम हे निवडून आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 महानगरपालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**स्थायी समितीचे कामकाज**

३) स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी—

अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यांत आली पाहिजे.

ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिला सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व वेळी भरवण्यात आली पाहिजे.आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे. आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे.अशी तरतूद आहे.

सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्या आदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**बुधवार दिनांक : २७/०२/२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज बुधवार दिनांक २७/०२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. **श्री युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १६ | पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ३ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ४ | श्री.नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ६ | श्री. कैलास शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्य अधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्य अधिकारी |
| ११ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालयीन अधिक्षक |
| १३ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १४ | श्री. बी.एस.रनाळकर | सहा. कर मुल्य निर्धा.अधिकारी |
| १५ | श्री. एन.के.बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १७ | श्री. राजेंद्र माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. आर. व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १९ | श्रीमती. मिना सातभाई | महिला बालकल्याण वि. प्रमुख |

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**विषय क्रमांक:- ०३ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.**

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

तद्नंतर मा. आयुक्त सो., यांचे मार्फत सन 2018-19 चे सुधारीत व सन 2019-20 चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापती यांना सादर करण्यात आले. तसेच सदर अंदाजपत्रक पुस्तीकेचे विमोचन या प्रसंगी करण्यात आले.

म. नगरसचिव — आज जागतीक मराठी भाषादिन ... कवि कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आणि या अशा मायमराठीचा उगम असलेली आमच्या खानदेशची अहीराणी भाषा.आणि या अहीराणी भाषेचा प्रचार-प्रसारासाठी सातत्याने कार्यरत असणारे आमच्या धुळे शहरातील सुप्रसिध्द अहीराणी साहित्यीक कवि सुभाष अहीरे हे आज आपल्यात उपस्थित आहेत.

धुळे महानगरपालिकेच्या सामाजिक व विधायक उपक्रमात त्यांचे मोलाचे योगदान राहीले आहे. मतदान जनजागृती, स्वच्छ भारत अभियान, व्यसन मुक्ती या सारख्या अनेक उपक्रमातुन त्यांनी आपल्या अहीराणी मायबोलीने समाज प्रबोधनाचे चांगले काम केलेले आहे. तसेच मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रक पुस्तकाच्या मलपृष्ठावर व्यसन मुक्ती व स्वच्छतेवर आधारीत समाजप्रबोधनाच्या अहीराणी कविता छापण्यात आलेल्या आहेत.त्यांचे वाचन कवि सुभाष अहीरे हे करतील.

कवि सुभाष अहीरे यांच्या योगदान व सहकार्या बद्दल धुळे महानगरपालिके मार्फत मा.स्थायी समिती सभापती व मा.आयुक्त सो.यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

म. नगरसचिव — आज मा. आयुक्त सो. यांनी धुळे महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारीत व २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर केलेले आहे. या अंदाजपत्रकावर मा. आयुक्त सो यांनी विवेचन करावे अशी मी विनंती करतो.

म. आयुक्त सो., — महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2018-19 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2019-20 चे मूळ महानगरपालिका अंदाजपत्रक आज मी स्थायी समितीसमोर सादर करत आहे. सन 1860 मध्ये स्थापन झालेल्या धुळे नगरपरिषदेची

पहिली निवडणूक 1885 मध्ये झाली. सन 2001 ची जनगणना विचारात घेऊन लोकसंख्या तीन लक्ष पेक्षा अधिक झाल्यामुळे महानगर पालिकेची स्थापना 30 जून 2003 रोजी झाली असून स्थापनेनंतर 16 वा अर्थसंकल्प व माझे कार्यकाळामध्ये दुसरा संभाव्य जमा व खर्चाचा अंदाज मी आज सादर करत आहे.

आदिमाया आदिशक्ती खान्देश कुलस्वामिनी श्री एकवीरा मातेचे मंदिर पांझरा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या आदिशक्तीची ही भूमी अनेक धार्मिक स्थळांमुळे पावन भूमी मानली जात असून या शहराचा इतिहासही खूप मोठा आहे. जयपूर व चंदीगड प्रमाणे कॅप्टन ब्रिज या जिल्हाधिकाऱ्यांनी रचनाबद्ध शहर म्हणून विकसित केलेले आहे. तथापि शहर जरी रचनाबद्ध असले तरी शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रीतीने राखण्यासाठी शहर कमी पडले आहे. शहरात आज रोजी केवळ पाच टक्के भागात भूमिगत मलनिस्सारण व्यवस्था असून शहराचा पाणीपुरवठा पुरेसा नाही. त्यातच शहरालगतची व विकास अत्यंत मर्यादित असलेली दहा खेडी 5 जानेवारी 2018 रोजी शहरात समाविष्ट होऊन हद्द वाढ झाल्याने शहराच्या विकासाला आणखी मर्यादा आलेल्या आहेत. मूलत: हे 46.46 चौरस किलोमीटर असलेले शहर 101.08 चौरस किलोमीटर झाले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत आणि उत्पन्न वाढीस पडणाऱ्या मर्यादा यामुळे अनेक विकास कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. मुंबई-पुण्यासारख्या शहरांना करांमध्ये वाढ करून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्वत:च्या असलेल्या मालमत्तांचा वाणिज्यिक विकास करून या महानगरपालिकांच्या उत्पन्नात भर पडली आहे. भौगोलिक दृष्ट्या इंदोर, औरंगाबाद किंवा नाशिक या महत्त्वाच्या शहरांचा विकास झपाट्याने झालेला आहे. शहरानजीकच्या जळगाव शहराचाही काही अंशी विकास झालेला आहे. मात्र धुळे शहर आजही अनेक समस्यांना तोंड देत आहे.

मागील वर्षी माझे कार्यकाळातील पहिला जमा व खर्चाचा अंदाज सादर करताना काही बाबी आश्वासित केल्या होत्या. त्या वेळी नमूद केल्याप्रमाणे करवसुली व नवीन कर आकारणीसाठी भरीव कार्य सन 2018-19 मध्ये करण्यात आलेले आहे. अनेक वर्ष महानगरपालिकेकडे प्राप्त अनुदान महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम वर्ग न केल्याने खर्च करता येत नव्हती. तथापि सुयोग्य नियोजन करून सर्व शासकीय योजना मार्गी लावण्यासाठी व लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या वर्षी खासकरून प्रयत्न करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून धुळे शहराची दीर्घकाळ प्रलंबित 136 कोटी रुपये किमतीची पाणीपुरवठा योजना मोठी कामे करून अंतिम टप्प्यात आली आहे. नगरोत्थान योजनेअंतर्गत रुपये चाळीस कोटी चा मंजूर प्रकल्प पूर्ण करण्यात आलेला आहे. अर्थातच या दोन्ही मोठ्या प्रकल्पांना तत्कालीन पदाधिकारी यांचे मोठे बहुमोल सहकार्य लाभले. याशिवाय नागरी दलित वस्ती योजना, नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना, रस्ता निधी अंतर्गत ची कामे, जिल्हा सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत ची कामे व अल्पसंख्यांक निधीअंतर्गत कामे यशस्वीरित्या राबविण्यात महानगरपालिकेस यश आले आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या प्रलंबित मागण्या प्राधान्याने विचारात घेऊन त्यांना सहाव्या वेतन आयोगाचा पूर्ण लाभ दिला असून पाचवा वेतन आयोगाची थकीत रक्कम लवकरच पूर्णत: अदा करणे शक्य होणार आहे.

महानगरपालिका या राज्यघटनेनुसार एक वेगळे स्थान असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था असून राज्यघटनेतील अनुसुची 12 नुसार महानगरपालिकेची कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेले आहेत. घटनात्मक तरतुदीनुसार राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यात सुधारणा केली असून त्याप्रमाणे विविध बाबींची अंमलबजावणी केली जात आहे.

दरवर्षी महानगरपालिकेचा जमा व खर्चाचा अंदाज प्रथम स्थायी समितीसमोर व नंतर महापालिका सभेसमोर सादर करून मंजूर केला जातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा असणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने सन 2018-19 चे जमा व खर्चाचे विवरण तयार करताना आभासी वाढ अंदाजपत्रकात न करण्याची विनंती करण्यात आली होती. तथापि प्रशासनाने नमूद केलेल्या या बाबीकडे दुर्लक्ष करून अंदाजपत्रकामध्ये जमा व खर्च बाजूमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली होती. प्रत्यक्षात मागील तीन वर्षाचे जमाखर्च आणि तफावत दर्शवणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रशासन तरतूद | स्था.स तरतूद | महासभा तरतूद | प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2015-16 | 17178.16 | 19780.74 | 24932.10 | 17707.30 | 11140.79 |
| 2. | 2016-17 | 26532.40 | 28065.32 | 29135.32 | 13552.40 | 11239.17 |
| 3. | 2017-18 | 12477.77 | 15127.77 | 17067.77 | 15362.37 | 12965.64 |

वास्तविक पाहता महानगरपालिकेकडे अनेक ठेकेदारांची देणे प्रलंबित असून आर्थिक दुरवस्थेमुळे या रकमा वेळच्या वेळी देण्यात महानगरपालिकेला अपयश आले आहे. वरील तक्त्यातील महसुली उत्पन्नाचे आकडेवारी लक्षात घेता प्रशासनाने सुचवलेल्या अंदाजपत्रकापेक्षा मा. स्थायी समिती व मा. महासभा यांच्याकडून तरतुदी वाढवून अर्थसंकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. अर्थातच महसुली उत्पन्न गैरवाजवी विचारात घेतल्यामुळे त्याचा परिणाम महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव निधी आणि अपंगांसाठी राखीव निधीच्या तरतुदींवर झाला असून त्याही तरतुदी जादाच्या ठेवणे भाग पडले आहे. या कारणास्तव महानगरपालिकेस विधानमंडळाच्या महिला हक्क कल्याण समितीची सामोरेही जावे लागले आहे. त्यामुळे गैरवाजवी तरतुदी होऊ नये किंवा गैरवाजवी खर्चाचा अंदाजही अंदाजपत्रकात असू नये यासाठी वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे ही काळाची गरज आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी एकत्रित मालमत्ता कर, दुकान भाडे, विकास शुल्क, पाणीपट्टी इत्यादी महत्त्वाची उत्पन्नाची साधने आहेत. वास्तविक पाहता यात वाढ करून उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना करणे बऱ्याच वेळा प्रशासनाकडून प्रस्तावित केले जाते. तथापि याही वर्षी आपण मालमत्ता कर, दुकान भाडे, विकास शुल्क आणि पाणीपट्टी यामध्ये वाढ सुचविण्यात आलेली नाही.

**"अई अर्थसंकल्पमा नवीन कोठलाई कर लायेल न्हई शे. अन् वाढ भी करेल न्हई शे."**

मात्र उत्पन्नवाढीसाठी आकारणी न झालेल्या मिळकतींना संकलित कराची आकारणी करणे, बेकायदेशीर नळकनेक्शन शोधून काढून त्यांच्यावर कारवाई करणे व नियमानुकूल करणे, दुकान गाळे भाडे पट्ट्यामध्ये सुसूत्रीकरण आणणे व वसुलीची प्रक्रिया सुलभ करणे, संकलित करा च्या आकारणीची पद्धत सुटसुटीत करून त्यात पारदर्शकता आणणे इत्यादी बाबींकडे आगामी वर्षात लक्ष केंद्रित करणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या अत्यावश्यक खर्चात सातत्याने वाढ होत असूनउपलब्ध महसुली उत्पन्नाच्या मर्यादेत खालील प्रमाणे महत्त्वाच्या आवश्यक विकास कामे इत्यादी बाबींवर तरतुदी करण्यात येत आहेत.

1) **अत्यावश्यक / बांधील खर्च**:-

म.न.पा. तील नियमित कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी/ म्यु. फंड कर्मचारी व सेवा निवृत्त कर्मचा-यांना शासनाच्या वेतन अयोगानुसार शिफारशी लागू करण्यात आल्यामुळे दरमहा वेतन, निवृत्तीवेतन, रोजंदारी वाढलेले दर यात लक्षणीय वाढ झालेली आहे. तसेच मनपा निधीतील कर्मचारी यांना माहे नोव्हेंबर 2010 पासून 5 व्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यांत आल्यामुळे दरमहा वेतनात वाढ झालेली दिसून येते.

धुळेशहरास पा.पु.करण्यासाठी घेण्यांत आलेल्या आयुर्विमा महामंडळाकडील व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून घेतलेले कर्ज/व्याज मोठया प्रमाणात थकीत झालेले आहे. तसेच पा.पु योजनेचे उच्च दाबाचे विद्युत देयक वाढलेले दिसून येते. त्यामुळे अंदाजपत्रकाचा ताळमेळ बसविणे अवघड झाल्याचे दिसून येते. या कारणामुळे विविध वाढीव विकास कामासाठी लागणा-या निधीची तरतूद या अंदाजपत्रकात करणेत आलेली नाही. शासनाच्या मान्यतेनुसार शहरातील विविध विकास कामे ही शासकीय योजनेतून/निधीतून आवश्यक त्या प्रमाणात मनपा हिस्सा वर्ग करुन केली जातील. ज्या शासकीय योजनांसाठी महानगरपालिका निधीतून स्व हिश्श्याची रक्कम भरणे शक्य होणार नाही अशा योजनांसाठी शासनाने मान्य केलेल्या संस्थांकडून कर्ज उभारणी प्रस्तावित आहे. अमृत अभियानांतर्गत मंजूर भुयारी गटार योजना व अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी या कर्जाचा वापर करता येईल.

2) **वेतन आयोग फरक :-**

धुळे मनपातील कायम कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग लागू केल्यास व मनपा निधीतील कर्मचारी यांना शासन निर्देशानुसार 5 वा वेतन आयोग शिफारसी लागू असल्याने त्यांच्या फरकापोटी रक्कम रुपये 3.5 कोटी मात्र अदा करणे बाकी असून संभाव्य जमा होणा-या महसुली उत्पन्नातून उक्त फरकाची रक्कम अदा करणे कामी रुपये 5.00 कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करणेत आलेली आहे.

धुळे महानगरपालिकेतील कायम व म्यु. फंडातील कर्मचा-यांना 5 व्या वेतनापोटी या वर्षात काही रक्कमा देण्यात आलेल्या आहेत. सदर खर्चाव्यतीरिक्त दर महिन्यास आजारपण, लग्नासाठी 5 व्या वेतनाची रक्कम देण्यात येत आहे. त्यामुळे अंदाजपत्रकी तरतुदपेक्षा जास्तीचा खर्च प्रशासनाने केलेला आहे. वास्तवीक पाहता आजपर्यंत या संपूर्ण रकमा देण्याचे नियोजन होणे आवश्यक होते. मात्र मनपाच्या आर्थिक स्थिती मुळे शक्य झालेले नाही.

3) **विकास कामांचे प्रलंबित देयके :-**

धुळे म.न.पात यापूर्वी मनपा निधीतून विविध विकास कामे करणेत आलेली आहे. परंतु निधी अभावी मोठया प्रमाणात दायीत्व/प्रलंबित देयके जवळपास रु. 20 कोटीचे दिसून येतात. त्यासाठी काही प्रमाणात अत्यावश्यक देयकांची अदायगी करणेसाठी तूर्त रुपये 1 कोटीची तरतूद करणे आलेली आहे. वास्तवीक पाहता यासाठी कालबध्द नियोजन करणे आवश्यक ठरते त्यामुळे भविष्यात प्राप्त महसुली उत्पन्नानुसार देयकांची अदायगी करण्यासाठी यात वाढ करण्यात येईल.

4) **ई-गर्व्हनन्स**:-

याअंतर्गत नागरीकाना सर्व नागरी सुविधा संगणकीय करण्याच्या माध्यमातून अचूक व विहित काळात मिळवून देण्यासाठी मनपाने निर्णय घेतलेला आहे. उदा. जन्म मत्युचे दाखले, व्यवसायाचे परवाने, घनकचरा व्यवस्थापन सुविधा, ऑनलाईन मालमत्ता कर भरणे, विवाह नोंदणी दाखले, भाडे तत्वावरील मनपाच्या सर्व मालमत्ता, Auto D.C.R, ई-टेंडर, एस.एम.एस लघुसंदेश, इ. प्रकल्प सुरु करणेत आलेले असून सदर प्रकल्पांची प्रभावी व अत्याधुनिक पध्दतीनुसार संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी करणेत येईल. यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रुपये 1.00 कोटी तरतूद करणेत आलेली आहे ई-गव्हर्नन्स साठी ठाणे व वसई-विरार महानगरपालिकेच्या धर्तीवर संकलित करा च्या वसुलीसाठी नवीन संगणकप्रणाली विकसित करणे विचाराधीन असून यासाठी बँकेचे सहकार्य घेतले जाणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेस यावर स्वत:च्या निधीतून खर्च तूर्तास करावा लागणार नाही.

5) **आपत्ती व्यवस्थापन :-**

धुळे म.न.पा क्षेत्रात विविध नैसर्गिक/मानव निर्मित आपत्ती येत असतात. उदा. पूर, घर पडणे, रासायनिक वायु दुर्घटना, चेंगराचेंगरी, अतिवृष्टी इ. प्रसंगी नागरीकांना मानवतेच्या दृष्टीकोनातून मदत करणेसाठी आपत्ती व्यवस्थापन गरजेचे आहे. तथापी आपत्ती व्यवस्थापनाकरीता अनुभवी व प्रशिक्षीत कर्मचारी नसल्याने शासनमान्य अनुभवी संस्थेकडून प्रशिक्षण घेण्याची योजना आहे. एस.आरपीएफ धुळे यांच्याकडे आपत्ती व्यवस्थापनाची संपूर्ण कपंनी असून त्यांचेही सहकार्य घेण्यात येणार आहे.

6) **नविन मिळकतींचा सर्व्हे करणे:-**

सन 2019-20 या वर्षात मालमत्ता कराकरीता मिळकतीचा सर्व्हे करण्यांत येणार आहे. त्यामध्ये चटई क्षेत्र उल्लंघन, अधिकृत/अनधिकृत बांधकामे विचारात घेवून कर आकारणी, भाडेकरी बापर, कर आकारणी नसलेल्या मिळकती व नळजोडणी संख्या व आकारमान, सोलर वॉटर हिटर वापर, विहिर/कूप नलिका इ. बाबींचा प्रामुख्याने सदर सर्व्हेक्षणात समावेश असून उक्त सर्व्हेक्षण जी.आय.एस. मॅपींग पध्दतीने करण्यात येणार असुन प्रत्येक मालमत्ता जी.आय.एस नकाशात लिंक करणेत येणार आहे. तसेच सदर सर्व्हेक्षणाचे संपूर्ण कामकाज हे संगणकीय प्रणाली व्दारे करण्याचे नियोजन आहे. शासनाच्या निर्णयानुसार व मार्गदर्शनानुसार सदर योजना राबविण्याचा मनपाचा मानस आहे. शासन निर्णयानुसार कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने विकसीत केलेली (Mai Net) या संगणक प्रणालीचा वापर मालमत्ता कर आणि पाणीपट्टीचा भरणा करण्यासाठी केला जातो. चालू वर्षी मालमत्ताकराची मागणी नोंदवही संपुर्णपणे संगणीकृत करण्यात आली आहे. यापुर्वी नागरीकांना बँकेचे चलन हा मालमत्ता कर भरल्याचा पुरावा म्हणून देण्यात येत होता. मात्र आता संगणकीय प्रणालीमुळे नागरीकांना कर भरल्याची पावती तात्काळ दिली जात आहे. त्यामुळे नागरिकांची सोय झाली आहे. सर्वेक्षणानुसार मिळकतींचे आकारणी केली जाणार असली तरी मूळ मालकाने कर आकारणी बाबत विनंती केल्यास त्याला सहा वर्षाच्या करआकारणी ऐवजी काही अंशी सवलत देणे प्रस्तावित आहे. मिळकतीमध्ये किंवा मालमत्तेमध्ये फेरबदल झालेला आहे मात्र त्याप्रमाणे कर आकारणी झालेली नाही किंवा नव्याने बांधलेल्या मिळकतीस कर आकारणी करण्यात आलेली नाही अशा प्रकरणी जर मिळकत मालकाने अर्ज केला तर प्राधान्याने त्याची कर आकारणी करण्यासाठी स्वतंत्र कक्ष यावर्षी उघडण्यात येणार आहे. या कक्षाच्या माध्यमातून कर आकारणीची प्रक्रिया गतिमान करून सात दिवसाच्या आत अर्जदाराची कर आकारणी केली जाईल व सहा वर्षाच्या कर आकारणीमध्ये आयुक्त स्तरावर अंशता सूट दिली जाईल. मात्र अशी सवलत असूनही जर

महानगरपालिकेच्या सर्वेक्षणानुसार कर आकारणी केली जाणार असेल तर अशा प्रकरणी सक्तीने वसुली प्रक्रिया राबवली जाईल.

7) **वृक्षनिधी :-**

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या अंतर्गत प्रत्येक वर्षी वृक्षनिधी साठी मनपाच्या अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक असुन जो वृक्ष कर संकलित केला जातो त्यामधुन वृक्षसंवर्धन नविन लागवड याकरीता सन 2019-20 च्या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आलेली आहे. शासनाने यावर्षी 50 कोटी वृक्ष लागवड मोहीम सुरु केली असून महानगरपालिका या मोहिमेत मोठया प्रमाणात योगदान देणार आहे.

अंदाजपत्रकामध्ये 0.5% वृक्ष लागवडीसाठी तरतूद करण्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त आहेत. त्यामुळे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी अंदाजपत्रकात योग्य ती तरतूद करण्यात आलेली आहे.

8) **राखीव निधी / महिला बालकल्याण :-**

नगरविकास विभाग शासन निर्णय दि. 17/4/1993 नुसार मनपाने वार्षिक अर्थसंकल्प तयार करतांना मनपा निधीतील बांधील खर्च वजा जाता शिल्लक रकमेच्या 5% एवढी तरतूद महिला व बालकल्याण विभागसाठी करणेचे निर्देश असल्याने व शासन निर्णय दि. 6 नोव्हेंबर 2010 मधील योजनांवर रक्कम रु.6.62 लक्ष मात्र स्वतंत्रपणे तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे धुळे मनपा क्षेत्रातील महिलांचे आरोग्य सुधारणा, स्वावलंबन विकासकामे, प्रशिक्षण इ. उद्देश साध्य होऊ शकेल.

9) **राखीव निधी (आर्थिक व दुर्बल घटक) :-**

नगरविकास विभागाकडील दि. 26/2/2001 च्या परिपत्रकानुसार मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटकांना त्यांचा सामाजिक स्तर उंचावणे करीता व शासन निर्णायतील कल्याणकारी योजना राबविण्याकरीता सन 2019-20 च्या मुळ अंदाजपत्रकात 5% या मध्ये रक्कम रुपये 6.62 लक्ष मात्रची स्वतंत्रपणे तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे काही प्रमाणात का होईना आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होणार आहे.

10) **राखीव निधी (अपंग दिव्यांग) :-**

नगरविकास विभागाकडील दि. 30/10/2010 चे परिपत्रकानुसार मनपा क्षेत्रात दिव्यांग (अपंग) नागरीकांना त्यांच्या पुर्नवसन व विकास करणेसाठी बांधील खर्च वजा जाता शिल्लक रक्कमेच्या 5% एवढा राखीव निधी रक्कम रुपये 6.62 लक्ष मात्र ठेवण्यांत आलेला असून शासन निर्णायतील उक्त निधी मधुन सदर योजना वस्तु, साहित्य इ. वर खर्च करता येऊ शकेल व त्यामुळे उक्त दिव्यांग नागरीक हे स्वावलंबी होण्यास काही प्रमाणात मदत होऊ शकेल.

सन 2018-19 व 2019-20 या वर्षात धुळे शहर विकासाच्या दृष्टीने विविध शासकीय योजना व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

1) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी पाणीपुरवठा योजना.
2) केंद्र शासनाच्या अमृत अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा राबविणे.
3) हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत विकास कामे करणे.

4) मा महापौर यांच्या संकल्पनेतून साकारलेले धूळमुक्त धुळे शहर ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे.

5) धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांकावर राहण्यात यशस्वी झाली असून माता बालसंगोपन, क्षयरोग निर्मूलन, एनयुएचएम व विविध लसीकरण यासारख्या कार्यक्रमांमध्ये भविष्यातही आघाडीवर राहण्याचा संकल्प आहे.

6) एनयुएचएम अंतर्गत नवीन दवाखाने विकसित करणे.

7) राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत महिलांच्या बचत गटांचे बळकटीकरण करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

8) सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नवीन प्रकल्पानुसार 26 रस्त्यांचे बांधकाम व बळकटीकरण करणे.

9) नागरी दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत तसेच दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व विशेष घटक योजनेचे प्रकल्प राबविणे.

10) शहरातील वितरण व्यवस्था नियोजनासाठी खासगी सल्लागार नियुक्त करून संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्याचे री-इंजीनियरिंग करणे.

11) शहरात हरित क्षेत्रांचा विकास करणे.

12) कॅन्सर सारख्या दुर्धर रोगास बळी पडणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी व्यसनमुक्तीसाठी भरीव काम करणे.

आर्य चाणक्य म्हणतात "ऋण शत्रु और रोग को समाप्त कर देना चाहिए।" आर्य चाणक्य आणखी असेही म्हणतात, "अर्थ और धर्म कर्म का आधार है। अर्थ का आधार राज्य है। शिकारपरस्त राजा धर्म और अर्थ दोनों को नष्ट कर देता है।" आर्य चाणक्यांची ही वाक्य अनेक गोष्टी सांगून जातात. शहरासाठी राज्यकर्ते आणि प्रशासन यांनी चाणक्याच्या मतानुसार योग्य नियोजन जर केले तर शहर विकासाची उंची गाठून नाशिक, इंदोर या शहरांप्रमाणे एक नामांकित शहर बनू शकते.

जॅक लिव म्हणतात, "The budget is not just a collection of numbers, but an expression of our values and aspiration."

कोणत्याही संस्थेचा अर्थसंकल्प तयार करीत असतांना चालू वर्षातील प्राप्त होणा-या महसूली व भांडवली उत्पन्नाची आकडेवारी विचारात घेऊन सर्वसाधारण नैसर्गिक वाढीसह नविन वर्षाचे उदिष्ट निश्चित करावे असे संकेत आहे. ही बाब विचारात घेऊन सन 2018-19 सुधारीत रु. 26189.29 लक्ष व सन 2019-20 चे महसूली व भांडवली रु. 28865.51 लक्ष अपेक्षित केले आहे.

मनपा अधिनियमातील सन 2018-19 चे सुधारीत अंदाज रु.26189.29 लक्ष यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. 11883.22 लक्ष यासह एकुण जमा रु.38072.51 लक्ष आणि एकूण खर्च रु.31119.01 लक्ष लक्षात घेता मनपा निधी 0.25 + शासन निधी 6953.25 लक्ष अशी एकूण 6953.50 लक्ष शिल्लकेचे सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेबरुन सादर करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मनपा अधिनियम 1949 मधील कलम 95 नुसार सन 2019-20 चे जमा/खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. 6953.50 व अपेक्षित / संभाव्य जमा रु. 28865.51 लक्ष असे एकूण रु.35819.01 लक्ष आणि अपेक्षित खर्च रु.35772.03 लक्ष विचारात घेता रु. मनपा निधी 0.09 + शासन निधी 46.89 अशी एकूण 46.98 लक्ष

शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज मा स्थायी समितीसमोर मान्यतेवरुन सादर करण्यात येत आहे. कृपया त्यास मान्यता देण्यात यावी ही विनंती.

मा. महापौर,मा.उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा. सभापती महिला व बालकल्याण, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता तसेच सर्व पक्षाचे गट नेते व सन्माननिय सदस्य यांचे सुध्दा सहकार्य मला लाभेल याचा मला पूर्ण विश्वास आहे व मी तशी आशा बाळगतो. तसेच सर्व पत्रकार बंधु,छायाचित्रकार, प्रसार माध्यमे इ. आपण सर्व महानगरपालिकेच्या लोकाभिमुख प्रकल्प व विकास योजनांना प्रसिध्दी देऊन मनपास सहकार्य कराल या अपेक्षेसह सर्वांचे आभार!

म. अमिन पटेल — या अंदाजपत्रकात नागरीकांवर कोणताही जादा कर लावलेला नाही. ही चांगली गोष्ट आहे. त्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन व्यक्त करतो. परंतु या अंदाजपत्रकात नगरसेवक निधीची तरतुद नाही. आमच्या प्रभागात नागरीकांच्या अडचणी आहेत. या बाबत तरतुद करणे आवश्यक होत.

म. आयुक्त सो. — या बाबत मी स्पष्ट करतो की, अंदाजपत्रक सादर करण्याचे तीन टप्पे आहेत.
प्रथम आयुक्त यांचे मार्फत आज स्थायी समितीला अंदाजपत्रक सादर केलेले आहे. या अंदाजपत्रकावर पुढील बैठकीत स्थायी समितीने विचार- विनीमय करुन आवश्यक त्या तरतुदी कमी - जास्त करुन अंदाजपत्रक मे. महासभेपुढे सादर केले जाते. व त्यानंतर महासभेची बैठक होऊन त्यास मंजुरी दिली जाते. नगरसेवक निधी हा महसुल उत्पन्नातुन बांधील खर्च वजा जाता शिल्लक राहणाऱ्या उत्पन्नाच्या रकमेवर2% प्रमाणे नियमाप्रमाणे विकास निधी देता येऊ शकतो. त्यामुळे याचाही विचार होणे गरजेचे आहे.

म. सभापती — मा. आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाबाबत चर्चा विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल तोपावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**धूळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०३ दिनांक २७/०२/२०१९**

मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाबाबत चर्चा विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल तोपावेतो सदर विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**मंगळवार दिनांक :- १८/०६/२०१९**
**वेळ दुपारी ४.३० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची **अर्थसंकल्पीय तहकुब सभा** आज मंगळवार दिनांक १८/०६/२०१९ रोजी दुपारी ४.३० वाजता मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती,मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती.पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. दिपकांत वाघ | उप मुख्य लेखा परिक्षक |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. मधुकर एस. पवार | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री.युवराज वाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| १४ | श्री. बी. एस. रनाळकर | सहा.कर मुल्य निर्धारण अधिकारी |
| १५ | श्री. गितेश सोनार | विद्युत विभाग |

| | | |
|---|---|---|
| १६ | श्री. राजेश गायकवाड | लेखापाल मनपा शि. मंडळ |
| १७ | श्री. राजु माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. आर. व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २१ | श्रीमती. मिना साताभाई | महिला व बालकल्याण विभाग |
| २२ | श्री. राजेश वसावे | मलेरिया पर्यवेक्षक |
| २३ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प अधिकारी |

मा. सभापती सन्मा. सदस्य मा. उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज.**

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक १८/०६/२०१९**

सन्मा. सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार व सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**सही/- x x x**

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ०३ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव — यापुर्वी दिनांक २७-२-२०१९ रोजी स्थायी समितीच्या बैठकीत मा.आयुक्त महोदयांनी सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचें अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर केलेले होते. सदर बैठकीत या अंदाजपत्रकाबाबत विवेचन व प्रस्तावना मा. आयुक्त यांनी केलेली होती. तदनंतर सदर बैठक तहकुब करण्यात आलेली होती.व त्यानुसार आज सदर तहकुब बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तत्पुर्वी प्रशासनामार्फत सादर केलेल्या अंदाजपत्रकात नवीन हद्दवाढ गावांसाठी जमीन विकास आराखडा तयार करणेसाठी रुपये २ कोटी मात्रची तरतुद करणेबाबतचा अहवाल व पत्र म. नगररचनाकार यांनी स्थायी समिती पुढे सादर केलेले आहे. तरी कृपया याबाबत नोंद घ्यावी. व बैठकीच्या चर्चेस सुरवात करावी.

म. नागसेन बोरसे — सन्मा. सभापती महोदय, या वर्षीचे अंदाजपत्रकास उशीर होत आहे. अंदाजपत्रकात तरतुद केल्याशिवाय विकास कामे करता येत नाही. मला एक विचारावयाचे आहे. गाडी दुरुस्ती व इंधन या लेखाशिर्ष खाली या अर्थिक वर्षात किती खर्च झालेला आहे याची माहिती मिळावी.

म. लेखापाल — १लाख ४५ हजार मुख्य कार्यालयासाठी खर्च झालेला आहे.

म. नागसेन बोरसे — आम्हांला एकुण सर्व विभागातील वाहनांवर झालेल्या खर्चाची माहिती मिळावी.खर्च कमी करुन आम्हांला यात नविन तरतुदी सुचवायच्या आहेत.तसेच शिक्षणमंडळातील ६० कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत वर्ग करण्यात आले आहे.त्यांचा वेतन खर्चाबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

म. मनपा शि.मं.लेखापाल — शिक्षण मंडळाचे कर्मचारी वर्ग केले असले तरी त्यांच्या बजेटची तरतुद वेगळी असते.

म. नागसेन बोरसे — बजेट पुस्तकात बेटी बचाव,बेटी पढाव हे वाक्य खुप छान लिहले आहे. परंतु आपण आतापर्यंत त्या वाक्याला अनुसरुनक काय कार्यक्रम राबविले आहेत. तुमच्या शाळेत सद्य स्थितीत किती मुली शिकतात या बाबतची माहीती मिळावी.

म. मनपा शि.मं.लेखापाल — मनपा शिक्षण मंडळ शाळेकडील विद्यार्थींना मोफत पाटी-पुस्तक वाटप करण्यात आले आहे.

म. नागसेन बोरसे — ते सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत वाटप केले जाते.आपण वेगळे काय केले ती माहिती मिळावी.

म. नागसेन बोरसे — मे. स्थायी समितीत ट्रक्टर दुरुस्ती साठी रुपये ६२,०००/- हजाराला मंजुरी देण्यात आली आहे.

म. नागसेन बोरसे — बजेटमध्ये पायखाने लेखाशिर्ष दिले आहे त्याचा नेमका अर्थ काय याबाबत माहिती मिळावी.

म. अभियंता — पायखाने लेखाशिर्ष हे सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्ती साठी आहे.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, अंदाजपत्रकात नगरसेवक निधी १० लाख मात्र ची तरतुद करण्यात आली आहे. परंतु प्रत्येक नगरसेवकांच्या वार्डात गटार दुरुस्ती साठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली नाही. तरी यासाठी तरतुद करणेत यावी. प्रभाग क्रमांक ४ मध्ये दलित वस्ती योजनेअंतर्गत १ रमाबाई आंबेडकर भागात समाज भवनाच्या ३ इमारती उभारण्यात आल्या असुन तसेच नेहरु चौक महानगरपालिकेच्या दवाखान्याचे नुतनीकरणाच्या कामाचे आदेश देण्यात आलेले आहे.सदरच्या इमारती मध्ये इलेक्ट्रीक फिटींगच्या इस्टीमेटला मा. जिल्हाधिकारी यांना मंजुरी दिलेली नाही. तरी सदरच्या अंदाजपत्रकता समाज भवन व दवाखान्याच्या लाईट फिटींगसाठी १२ लाख रुपयांची अंदाजपत्रकात तरतुद करणेत यावी. तसेच अंडाकृती गार्डन पश्चिमेबाजुस महान संत शिरोमणी रविदास महाराज यांच्यास्मारकासाठी (चबुतरा व सुशोभिकरण) यासाठी अंदाजपत्रकात १५ लाख रुपयांची तरतुद करण्यात यावी. तसेच शहरात गणेश विसर्जनासाठी तसेच आई कानुमातेच्या विसर्जनासाठी महानगरपालिकेमार्फत पांझरा नदी किनारी गणेश कुडांची निर्मीती करण्यासाठी

अंदाजपत्रकात ५० लाख रुपयांची तरतुद करणेत यावी. तसेच प्रभाग क्रमांक ४ हा आमचा प्रभाग संवेदनशील असल्याने संपुर्ण प्रभागात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यासाठी १५ लाख रुपयांची तरतुद करणेत यावी.धुळे महानगरपालिके मार्फत नविन बांधकाम परवानगी दिल्या जातात. तसेच आग्रा रोडला दुकाने व मॉल आहेत. त्यांचा वाणिज्य वापर जास्त आहे. प्रत्येक मालमत्ता धारकांकडुन १ लाखाच्या जवळपास घरपट्टी येवु शकते असा अंदाज आहे. आपल्याकडे २५ हजार रुपये घरपट्टी असलेल्या किती मालमत्ता आहेत. ते पळताडुन पाहण्यात यावे. व सदर मालमत्तांवर योग्य ती आकारणी केल्यास२५ ते ३० कोटी रुपयांची वाढ मनपा उत्पादनात होवु शकते. वसुली विभागामार्फत अश्या मालमत्ताची सर्वे व मोजनी करण्यासाठी २५ झोन व २५ टीम ची नेमणुक करण्यात यावी. सदरचे काम हे ठेकेदाराला न देता आपल्या मनपा मार्फत करुन घेण्यात यावे यामुळे अंदाजपत्रकातील तरतुदींसाठी उत्पन्न वाढुन भर निघु शकेल.

म. संतोष खताळ — सभापती महोदय, सन्मा. सदस्य श्री नागसेन बोरसे यांनी सुचविलेल्या मुद्दयाला माझे अनुमोदन आहे. परंतु थोडी दुरुस्ती मी करु इच्छितो की,नगरसेवक निधी १० लाखांत प्रभागातील कामे होवु शकत नाही ती २० लाख करण्यांत यावी. घरगुती मालमत्तांचा वापर बदलण्यात आलेला आहे. बऱ्याच ठिकाणी व्यवसायीक वापर सुरु आहे. त्यानुसार त्वरीत अशा मालमत्तांना व्यवसायीक कर आकारणी केल्यास मनपाच्या उत्पन्नांत मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे.

म. सुरेखा उगले — सभापती महोदय, धुळे शहरामधील महापालिका मालकीच्या सार्वजनिक विहिरीचा गाळ काढणे, मोटर लावणे, टाकी बसविणे,जाळी बसविणे यासाठी बजेट मध्ये २५ लाख तरतूद करणे. चितोड अमरधाम याठिकाणी ओटे नादुरुस्ती झालेले आहे ते दुरुस्त करणे , शेड उभारणे , वॉल कंपाऊंड करणे यासाठी १ कोटी तरतूद करणे. उत्पन्न म्हणून धुळे शहरामधील गल्ली नं.१ ते ७ या ठिकाणी बेसमेंट मध्ये पार्किंग करण्या ऐवजी त्याठिकाणी व्यापार करत आहे त्यांना ५ पट घरपट्टी लावणे आवश्यक आहे. तसेच SSVPS इंजिनिअरिंग कॉलेज या ठिकाणी नविन बिल्डिंगचे बांधकाम झालेले आहे. त्यांना ५ वर्षापासून व्यावसायिक घरपट्टी लागू केलेली नाही. त्यांना दंडासह घरपट्टी लागू करणेत यावी.

म. रावसाहेब पाटील — सभापती महोदय, हद्दवाढीची समस्या मोठी आहे. हद्दवाढी कडे महानगरपालिका प्रशासन पाहिजे तेवढे जातीने लक्ष देत नाही. हद्दवाढीत टॅक्स हे पुर्ण पणे वसुल केले जात आहे. परंतु त्या भागातील उपस्थित प्रश्न सुटत नाहीत.स्वच्छता, लाईटचे प्रश्न वारंवार उध्दभवतात. तक्रार करुनही लक्ष दिले जात नाही. आज ही वस्तुस्थितीही तीच आहे. आम्ही सांगु नये परंतु ते सत्य आहे आज स्वच्छतेचे अग्रदुत श्रध्देय श्री रमेशजी ओझा यांना देखील त्या मार्गात स्वच्छता निदर्शनास आली नाही. परंतु त्यांना स्वच्छता आहे असे वक्तव्य करावे लागले. स्वच्छता ही फक्त कागदावर उपयोगी नाही. हद्दवाढ झालेल्या प्रभागांकडे मुलभुत सुविधासाठी महानगरपालिका प्रशासनाने जातीने लक्ष द्यावे ही विनंती.

म. अमिन पटेल — सभापती महोदय, या वर्षाचा २८८कोटींचा बजेट सादर झालेला आहे.आपल्याकडे वेगवेगळया कांमासाठी निधी प्राप्त होत असतो. शहरातील अंबिका नगर, मिल परिसर भागात कामे झालेले नाहीत. शहरातील इतर भागात मात्र रस्ता झाल्यानंतर सुध्दा परत काही दिवसांना रस्ता तयार केला जातो. परंतु ज्या ठिकाणी रस्ते दुरुस्ती झालेलीच नाही त्या ठिकाणी कामे होत नाही. जो शहरातील बाहेरील भाग आहे त्या भागात ज्या प्रभागात कामे झालेली नाहीत, पाणी नाही, रस्ते नाहीत, स्वच्छता नाही अंबिका नगर भागात अशी परिस्थिती आहे. की गटारीचे पाणी नागरीक स्वत हाताने पाणी काढुन घेत आहेत. तसेच तसेच वडजाई रोड व चाळीसगाव रोड

तुलनात्मक दृष्टया बघता वडजाई रोडचे काम एकदाही झालेले नाही. आणि चाळीसगाव रोडचे काम २ ते ३ वेळेस करण्यात आलेले आहे. हे प्रशासनाचे नुकसान नसुन नागरिकांचे नुकसान होत आहे. त्या भागतील नागरिक ही टॅक्स भरीत असतात. तसेच बाहेरील भागांसाठी ४० ते ५० कोटींची तरतुद करुन त्या भागातील विकास आपल्याला करता येईल.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, मी विचारु इच्छितो की, आपला शिलकी बजेट कीती आहे?

म. लेखापाल — ४६ लाख रुपये आपला शिलकी बजेट आहे.

नागसेन बोरसे — सदर अंदाजपत्रक बघितल्यास १५० कोटीं रुपयांचे देणे आहे. मग आपण सन्मा. सदस्य अमिन पटेल यांनी ५० कोटी रुपये बाहेरील भागासांठी तरतुद करणे बाबत सुचीत केले आहे. तर ते ५० कोटी रुपयांची निधीची तरतुद करावयाची कशी? या साठी आपल्याला उत्पन्न वाढवावे लागेल.

म. अमिन पटेल — मी प्रश्न असा उपस्थित केला होता की, अंबिकानगर भागात नागरिक गटांरीचे पाणी हाताने काढुन घेत आहे. तर बाहेरच्या प्रभांगाना विकास कामासाठी निधी वाढवुन देण्यासाठी २५ लाख रुपयांची तरतुद करुन देण्यात यावी.

म. उपायुक्त — मागील वर्षी जे बजेट सादर झालेले होते १२१ कोटी ८१ लाख म्हणजे १२१ कोटी ८१लाख हे प्रशासकिय बजेट सभागृहात झालेले आहेत. आता प्रशासनाने जे बजेट दिलेले आहेत. ते १२५ कोटी ६१ लाख आपण १२५ कोटी ६१ लाखाची जर फोड केली तर आपल्याला उत्पन्न कसे मिळते आहे. तर ते GST माध्यमांतुन ९२ कोटी ९२ लाख म्हणजे LBT अनुदानातुन मिळत आहेत. हे शासनाचे अनुदान आहे. ते विशिष्ट बाबींवरच खर्च करता येते. मी सुचविले तरी मला खर्च करता येणार नाहीत. त्यासाठी शासनाचे मार्गदर्शक तत्वे आहेत. इतर बघीतले तर विशेष शुल्क म्हणजे रोजगार हमी कर, शिक्षण कर असे १४ ते १५ प्रकारचे कर आपण नागरिकांकडुन वसुल करतो परंतु ते शासनाला देतो या बाबतीत आपली भुमिका फक्त मध्यस्तीची भुमीका असते. या करांच्या पैश्यांवर आपला अधिकार नाही. ५ कोटी आणि ९२ कोटी असे एकुण ९७ कोटी रुपये म्हणजे बजेट चे जवळपास ९७ कोटी रुपयांची गाईडलाईन्स आहे. आणि ५ कोटी रुपये शासनाला जातात. उरतात फक्त २६ ते २७ कोटी रुपये या २६ ते २७ कोटींमध्ये साधारण गोष्टी आल्या त्यात आपले लाईट मेन्टेंनन्स, पालिकेच्या कर्मचाऱ्यांच दायीत्व या सर्वच गोष्टी आल्या. मी सन्मा. सदस्य नागसेन भाऊंचे अभिनंदन करतो. ते सतत प्रशासना सोबत असतात आजही आहेत. त्यांनी महानगरपालिका उत्पन्नवाढीचे किती तरी मार्ग त्यांनी सुचविले आहेत. वास्तवीक आपण या क्षेत्रात काम केले तर भरपुरसे उत्पन्न वाढु शकते. या सगळयांमध्ये जर आपण यशस्वी झालो.तर नक्कीच महानगरपालिकेची आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकेल. आपल्याला पायाभुत सुविधांमध्ये कामकाज करणे खुप महत्वाचे आहेत. जसे की भुयारी गटार योजना वैगरे या योजना आपल्याला पुर्ण करावयाच्या असतील तर शहरासाठी ५० ते १०० कोटींचे नियोजन आपल्याला करावे लागेल. त्यासाठी पर्यायी उत्पन्नाचे साधने वाढवुन त्यातुन उत्पन्न आपल्याला मिळवायचे आहे.आपण नगरसेवक विकास निधी साठी १० लाख २० लाख तरतुद ठेवायला हरकत नाही. आपण लाँग टर्म विचार करायचा की शॉट टम. आपण एक दोन वर्षाचा विचार केला तर या शहरासाठी योग्य ठरणार नाही. आपण ५० ते ६० वर्षाचे नियोजन केल्यास शहराचा भरभक्कम पाया होणार आहे. सर्व सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे. सगळयांनी मिळुन विचार करा तुम्ही जो निर्णय घेणार तो शेवटी प्रशासनाला मान्य असणार. परंतु प्रशासनाने खुप विचार पुर्वक बजेट सादर केलेला असतो.

सुभाष जगताप — सभापती महोदय, या वेळेस १० लाख रुपये निधी नगरसेवक विकास निधी साठी दिलेला आहे. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना, भुमिगत गटार योजना अशा भांडवली स्वरुपाच्या चांगल्या योजना आपण राबवित आहोत.मला एक छोटीशी सुचना करावीशी वाटते आपल्या अंदाजपत्रकात गटार दुरुस्ती साठी २५ लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. शहरात मोठया प्रमाणावर गटार दुरुस्तीचे काम आहे. यासाठी तरतुद वाढविण्यात यावी. तसेच नगररचना विभागाकडुन शहरात सद्या किती टावर अस्तीत्वात आहेत. आणि कीती टॉवर धारकांनी परवानगी घेतलेली आहे.याबाबतची माहीती मिळावी तसेच ज्या मालमत्ताधारकांचया मालमत्तेवर टॉवर बसविण्यात आले आहेत तसेच टॉवर धारंकाकडुन कीती दंड वसुल करणेत आलेला आहे. याबाबतची माहिती मिळावी.

म. सुरेखा उगले — सभापती महोदय, महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या सफाई कर्मचारी वर्गाला गणवेश, बुट, महिलांना साडी यांची तरतुद करण्यात यावी.तसेच महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करणेत यावा.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, धुळे शहरातील बऱ्याचश्या वसाहती अश्या आहेत ज्या ठिकाणी बांधकाम करतांना नागरीकांनी परवानगी तर घेतलीच नसले परंतु घर बांधकाम करतांना २-३ दुकाने काढली आहेत. अश्या मालमत्ता धारकांना कर आकारण्यात येवुन उत्पन्न वाढीबाबत विचार करण्यात यावा. तसेच ज्यांचे दुकाणु ३०० स्क्वेअर फुट पेक्षा कमी असतील त्यांच्या कर माफी बाबतही विचार करण्यात यावा.

म. सभापती — सदर अर्थसंकल्पात सद्यस्थितीत नगरसेवक निधी म्हणुन प्रत्येकी १० लक्ष मात्र अशी एकुण रु ८ कोटी मात्र ची तरतुद सुचविण्यात आली आहे. धुळे शहरातील पेठ भागात सी.सी.टी.व्ही बसविणे कामी २५ लक्ष मनपा हद्दवाढ गावांचा जमिन वापर नकाशा तयार करणे रु २ कोटी, मात्रची गणेशकुंड तयार करणे,चितोडरोड अमरधाम नुतनीकरण व संत रविदास पुतळा चबुतरावसविणेसाठी तरतुद सुचविण्यात आलेली आहे.तसेच उत्पन्नचे स्त्रोतदेखील प्रशासनाला सुचविण्यात आलेले असुन यात नवीन वाढीव मालमत्ता वरील कर आकारणी मुळे ६ कोटी, व्यापारी संकुल भाडे व अनामत तसेच हस्तांतरण फी द्वारे मिळणारे एकुण उत्पन्न २ कोटी, मोबाईल टॉवर दंड वसुली २५ लक्ष, व्यावसायीक मालमत्तावरील कर आकारणी मुळे २ कोटी, अनधिकृत बांधकाम दंड वसुनली २५ लक्ष, तसेच विकास शुल्कामुळे १ कोटी अशी उत्पन्नात वाढ सुचविलेली आहे. तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या सुचनांचा विचार करुन तसेच प्रशासनाशी चर्चा करुन सन २०१८ -१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे अंदाजपत्रक अंतिम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक १८/०६/२०१९**

धुळे महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे रु. ३५८.१९ कोटी मात्रचे अंदाजपत्रक प्रशासनामार्फत मा. आयुक्त साहेब यांनी सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रक संतुलीत व वास्तववादी सादर केल्याबाबत मा.आयुक्त यांनी विवेचन केलेले आहे. तथापी या अर्थसंकल्पात प्रभागातील विकास कामांसाठी कोणत्याही प्रकारची तरतुद केलेली दिसुन येत नाही. केवळ महानगरपालिकेचा अत्यावश्यक बांधिल खर्च व मनपाच्या इतर आवश्यक खर्चाचा विचार सदर अंदाजपत्रकात करण्यात आलेला आहे. वास्तविकत: शहर विकासाच्या दृष्टीने नागरीकांच्या अडीअडचणी लक्षात घेता विविध मुलभुत सेवा सुविधांच्या कामांसाठीही तरतुद करणे क्रमप्राप्त आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असले तरी त्यात सक्षमतेने व प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास त्यात निश्चीत भरीव प्रमाणात वाढ होवु

शकते. त्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची मानसिकता व प्रशासनामार्फत काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे.

**नगरसेवक निधी**:- कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, विकास कामांची प्रलंबीत देयके, अत्यावश्यक खर्च, विविध योजनांमधील मनपाचा हिस्सा याबरोबरच शहरातील मुलभुत सेवा सुविधांच्या कामांसाठीही तरतुद करणे आवश्यक असल्याने यामध्ये नगरसेवक निधी म्हणुन सद्यस्थितीत प्रत्येकी रु.१० लक्ष मात्र अशी एकुण रु. ८ कोटी मात्र तरतुद सुचविण्यात येत आहे. सुधारीत अंदाजपत्रकात उत्पन्नाचा आढावा घेवून पुनश्च प्रत्येकी १० लाख मात्र नगरसेवक निधी प्रस्तावित करण्याबाबत मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे शहरातील विविध भागात सीसीटीव्ही बसविणे:-** ज्याप्रमाणे घर अथवा कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी सीसीटीव्हीची आवश्यकता आहे, त्याप्रमाणेच सार्वजनिक जागेवर अथवा विविध ठिकाणी चोरीचे प्रकार वाढल्याने सीसीटीव्हीची आवश्यकता आहे. धुळे शहर हे संमिश्र लोकसंख्या असणारे शहर असुन काही भाग अत्यंत संवेदनशील आहेत. कोणत्याही जागेवर निगराणी ठेवणेसाठी सीसीटीव्ही आवश्यक आहेत. धुळे शहराने यापुर्वी दंगलीचा अनुभव घेतला आहे. तसेच सुरक्षित रहदारीसाठी व रहदारीवर नियंत्रण राखणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही एकप्रकारे सुरक्षा ठेवणेकामी अत्यंत आवश्यक असणारी बाब आहे. गुन्हेगारांवर वचक रहावा व शहराची सार्वजनिक शांतता धोक्यात येवु नये व सर्व प्रकारच्या सुरक्षीततेसाठी शहरातील विविध भागात व मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही बसविणे आवश्यक आहे, त्यासाठी सन 2019-20 च्या अंदाजपत्रकात रु. 25 लाख मात्र तरतुद सुचविण्यात येत आहे.

**मनपा हद्दवाढ गावांचा जमिन वापर नकाशा तयार करणे.:-** महानगरपालिकेमध्ये नव्याने हद्दवाढ झालेल्या 11 गावांचा विकास आराखडा तयार करणेकरिता आवश्यक विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व्हेक्षण करणेसाठी निविदा दरांना मान्यता देण्यांत आलेली आहे. तथापि या कामाकरिता सन 2019-20 च्या अंदाजपत्राकात तरतूद केलेली नाही. याबाबत म. नगररचनाकार यांनी दिलेल्या पत्रानुसार या कामाकरिता रु. 2 कोटी मात्र तरतूद प्रस्तावित करण्यांत येत आहे. सदरचा खर्च नविन बांधकामावर घेण्यात येणाऱ्या विकास शुल्काच्या जमा झालेल्या रकमेतुन करण्यात येणार असल्याबाबत म. नगररचनाकार यांनी पत्र सादर केलेले आहे. या कामी आलेले दर स्विकृत करण्यांत आलेले असून यापूर्वी विभागाने केलेली सर्व कार्यवाही विचारात घेता व कामाची आवश्यकता पाहता संभाव्य खर्चास आथिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**वृक्षलागवड व संगोपन** :- हरित धुळे व सुंदर धुळे या संकल्पनेसाठी शहरात व्यापक प्रमाणावर कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. प्रशासनामार्फत २० लक्ष मात्र तरतुद प्रस्तावित केलेली आहे.तथापि सदर उपक्रमांची गरज लक्षात घेता यासाठी १४ व्या वित्त आयोग योजनेतील निधी मधून याबाबत अंमलबजावणी करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**घंटागाडी भाडे**:- म.आयुक्त यांनी प्रशासनामार्फत सादर केलेल्या अंदाजपत्रकात २५,००,००० मात्र तरतुद दर्शविलेली आहे. घनकचरा व्यवस्थापन व वाहतूकी करण्याबाबतचा ठेका दिलेला असल्याने सदरची तरतूद कमी करुन फक्त टोकन तरतूद रु. ५,००,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा. सदस्यांनी सुचित केल्यानुसार चितोडरोड अमरधाम नुतनीकरण,गणेश कुंड तयार करणे,संत रविदास पुतळयासाठी चबुतरा तयार करणे, प्र.क्रं. ४ दलित वस्ती अंतर्गत समाज मंदिर दवाखाना येथे विद्युत व्यवस्था करणे, मनपा मालकीच्या विहिरीचा गाळ काढणे व

पंप बसविणे, तसेच कब्रस्तान दुरुस्ती व नुतनीकरण करणे यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यांत मान्यता देण्यांत येत आहे.

**उत्पन्नाच्या बाबी**:-धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता उत्पन्नाचे स्त्रोतही बळकट व सक्षम बनविणे आवश्यक आहे.यामध्ये खालील बाबींवर प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होवु शकते.

मनपाकडे उपलब्ध असलेल्या माहिती व सर्वेक्षणाच्या आधारे नविन व वाढीव बांधकाम झालेल्या मालमत्तांना तातडीने कर आकारणी प्रक्रिया केल्यासही उत्पन्नात वाढ होवु शकते. तसेच अनेक मालमत्तांना जुन्या दराप्रमाणे कर आकारणी आहे. तथापी सदर मालमत्तांच्या ठिकाणी मोठया प्रमाणात वापरात बदल झालेला आहे. अशा मालमत्तांची नोंद घेवुन त्यांना व्यावसायीक दराप्रमाणे कर आकारणी झाल्यास यामध्येही मोठया प्रमाणावर उत्पन्नात वाढ होणार आहे.

महानगरपालिकेमार्फत धुळे शहरातील मनपा मालकीच्या व्यापारी संकुलांना भाडे आकारणी व अनामत निश्चीत केलेली आहे. यासंदर्भात शासन स्तरावरुन सर्व महानगरपालिकांसाठी एकत्रित आदेश लवकरच निर्गमित होणार आहे. याबाबत प्रभावी कार्यवाही झाल्यास मोठया प्रमाणावर उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच सदर व्यापारी संकुलातील ४० ते ५० टक्के व्यापारी गाळे परस्पर हस्तांतरण करण्यात आलेले आहेत. त्यापासुन मिळणारे हस्तांतरण फीचे उत्पन्नही महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. यामध्ये समन्वयाने निर्णय होवुन भाडे व अनामत तसेच हस्तांतरण फी निश्चीत झाल्यास यामधुनही मोठया प्रमाणावर उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

मोबाईल टॉवरच्या दर आकारणीमध्येही मोठया प्रमाणावर तफावत असुन त्यामध्येही वाढ व सक्षमतेने आकारणी झाल्यास उत्पन्नात वाढ होणार आहे.

शहरातील अनधिकृत नळ कनेक्शनची संख्या व वसुल होणारी पाणीपटटी यामध्ये फार मोठया प्रमाणावर तफावत आहे.यासाठी अनधिकृत नळ कनेक्शन शोधुन त्यावर दंडात्मक रक्कम वसुल करुन नियमीत करावयाची कार्यवाही प्रभावीपणे झाल्यास या उत्पन्नातही मोठया प्रमाणावर वाढ होवु शकते.

मालमत्ता कराचे उत्पन्न प्रशासनामार्फत सुमारे २७ कोटी दर्शविलेले आहे. सदर उत्पन्न सरासरी ७० टक्के वसुल होईल या अपेक्षेने मालमत्ता कराचे उत्पन्न दर्शविलेले आहे. शहरातील व नवीन हद्दवाढ झालेल्या गावातील एकुण मालमत्तांची संख्या लक्षात घेता सदरचे दर्शविलेले उत्पन्न कमी वाटते.याबाबत प्रभावी वसुली व कर आकारणी झाल्यास उत्पन्नात वाढ होऊ शकेल.

प्रशासनामार्फत नवीन बांधकाम परवानगी पासून मिळणारे विकास शुल्काचे उत्पन्न रु. ५ कोटी मात्र दर्शविलेले आहे. नवीन बांधकांमाची संख्या लक्षांत घेता व शहराचा विस्तार लक्षात घेता सदर विकास शुल्क उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होऊ शकते.

अनधिकृत मोबाईल टॉवर दंड वसुली, अनधिकृत बांधकाम दंड वसूली, फायर ऑडीट व्दारे मिळणारे उत्पन्न या सारख्या बाबींच्या प्रभावी कार्यवाही मुळे मनपाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे..

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| | | **जमा बाजू** | | | |
| १ | नवीन वाढीव तसेच व्यावसायीक व वापरात बदल असलेल्या मालमत्तावरील कर आकारणी | ०० | ८,००,००,००० | ८,००,००,००० | - |
| २ | व्यापारी संकुल भाडे व अनामत तसेच हस्तांतरण फी व्दारे मिळणारे उत्पन्न | २.०५,००० | २,०,२,०५,००० | २,००,००,००० | |
| ३ | मोबाईल टॉवर दंड वसुली | ९,००,००० | ६१,००,००० | ५२,००,००० | |
| ४ | हद्दवाढ गावातील मालमत्तावरील नवीन दर आकारणी पासून मिळणारे उत्पन्न | ०० | २,००,००,००० | २,००,००,००० | |
| ५ | अनधिकृत बांधकाम दंड वसुली | २०,००,००० | ६१,००,००० | ४१,००,००० | |

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| | | **खर्च बाजू** | | | |
| १ | प्रभागातीलविकास कामांसाठी नगरसेवक निधी (प्रत्येकी १० लाख प्रमाणे) | | ७,९०,००,००० | ७,९०,००,००० | |
| २ | शहरात सुरक्षिततेसाठी सी. सी. टी. व्ही बसविणे | १,००,००० | २५,००,००० | २४,००,००० | |
| ३ | नवीन हद्दवाढ जमिन वापर नकाशा तयार करणे | ० | २,००,००,००० | २,००,००,००० | |
| ४ | चितोडरोड अमरधाम नुतनीकरण | ० | २५,००,००० | २५,००,००० | |
| ५ | गणेश कुंड तयार करणे | ० | २५,००,००० | २५,००,००० | |
| ६ | संत रविदास महाराज पुतळयासाठी चबुतरा बनविणे | ० | १५,००,००० | १५,००,००० | |
| ७ | प्र.क्रं.४ दलितवस्ती अंतर्गत असलेल्या समाज मंदिर व दवाखाना येथे विद्युत व्यवस्था करणे | १,००,००० | १३,००,००० | १२,००,००० | |
| ८ | धुळेशहरातील नवीन वसाहतीतील रस्ते तयार करणे. | ० | ३०,००,००० | ३०,००,००० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | कब्रस्तान दुरुस्ती व नुतनीकरण | १०,००,००० | २५,००,००० | १५,००,००० | |
| १० | घंटागाडी भाडे | २५,००,००० | ५,००,००० | | २०,००,००० |
| ११ | मनपा मालकीच्या विहिरीचा गाळ काढणे व इले.पंप बसविणे | ० | २०,००,००० | २०,००,००० | |

उक्त प्रमाणे सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना व प्रशासनाशी चर्चा करुन सन २०१८ – १९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे.महासभेपुढे सादर करण्याबाबत शिफारस करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**गुरुवार दिनांक २८/०२/२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक २८/०२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री युवराज चैत्राम पाटील, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री.बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री.पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री.खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती.उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती.देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती.उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री.मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती.अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ३ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ४ | श्री.नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ६ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ७ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. डॉ. बी.बी. माळी | आरोग्य अधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्य अधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्य अधिकारी |
| ११ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १५ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १६ | श्री. आर. व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १७ | श्री. किशोस सुडके | बाजार विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सुरेखा उगले — अजेंडा वरील विषय वाचण्याअगोदर मी विनंती करीते की, आजच्या सभेस उपस्थित मा. सभापती महोदय, मा.आयुक्त साहेब, सचिव साहेब, नगरसेवक व नगरसेविका, प्रेस, फोटोग्राफर, कॅमेरामॅन धुळे शहरात भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस,मंत्री महोदय श्री.गिरीश महाजन, संरक्षण राज्य मंत्री श्री सुभाषजी भामरे, धुळे जिल्हा अध्यक्ष भारतीय जनता पार्टी श्री.अनुपजी अग्रवाल,महापौर श्री.चंद्रकांत बापू सोनार,सभापती श्री.युवराज अण्णा पाटील व विशेष करुन अक्कलपाडा ते हनुमान टेकडी पाणीपुरवठा योजना करिता प्रशासनाच्या वतीने श्री. देशमुख साहेब आयुक्त, धुळे मनपा यांनी विशेष प्रयत्न करुन या योजनेस मंजुरी घेतली व तातडीने विविदा प्रसिध्द केली त्याबद्दल त्यांचे स्थायी समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.याबाबत या स्थायी समितीमध्ये अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात यावा ही विनंती.

म. सभापती — अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात येत आहे. सभागृहातील सन्मा.सदस्य व मा.सभापती यांच्या वतीने आयुक्तांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ४ दिनांक २८/०२/२०१९**

सन्मा. सदस्या सौ. सुरेखा उगले यांच्या यादीनुसार भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस,मंत्री महोदय श्री. गिरीश महाजन, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री सुभाषजी भामरे, धुळे जिल्हा अध्यक्ष भारतीय जनता पार्टी श्री.अनुपजी अग्रवाल, महापौर श्री.चंद्रकांत बापू सोनार,सभापती श्री. युवराज अण्णा पाटील व विशेष करुन अक्कलपाडा ते हनुमान टेकडी पाणीपुरवठा योजना करिता प्रशासनाच्या वतीने श्री.देशमुख साहेब आयुक्त, मनपा धुळे यांनी विशेष प्रयत्न करुन या योजनेस मंजुरी घेतली व तांतडीने निविदा प्रसिध्द केली त्याबद्दल त्यांचे स्थायी समितीच्या वतीने हार्दीक अभिनंदन करण्यात येवून अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२५/१०/२०१८, २०/२/२०१९)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक २८/०२/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक 25/10/2018 चे ठराव नंबर101 ते105 अखेर व झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक 20/2/2019 चे ठराव नंबर 1 ते 2 क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५ बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दिनांक १/८/२०१८ ते २९/९/२०१८अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी माहितीस्तव सादर

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक २८/०२/२०१९**

बांधकाम विभागाकडून निर्गमित झालेले दिनांक 01/08/2018 ते 29/9/2018 अखेर केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी माहितीस्तव सादर

| कार्यादेश | दिनांक | कामाचे नाव | निधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १/८/२०१८ | प्रभाग क्र. ३२ मध्ये राऊळवाडी येथे सिमेंट काँक्रीट गटार बांधणे. | मनपा निधी अंतर्गत | ८,४०,१२५/- |
| २ | १/८/२०१८ | प्रभाग क्र. १७ मधील परदेशी यांच्या घरापासून ते मोतीनाला पर्यंत काँक्रीट गटार करणे. | मनपा निधी अंतर्गत | ६,१९,७२९/- |
| ३ | ३/८/२०१८ | प्रभाग क्र.१९ अशोक नगर भागात रस्ते डांबरीकरण करणे. | आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत | १४,९४,३८९/- |
| ४ | ८/८/२०१८ | प्रभाग क्र.१ मध्ये सुदर्शन कॉलनीत ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | खासदार निधी अंतर्गत | ९,९५,४४२/- |
| ५ | ८/८/२०१८ | प्रभाग क्र. ३५ मधील गरीब नवाज नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे व गटार काँक्रीटीकरण करणे. | अल्पसंख्याक निधी अंतर्गत | ९,९३,०९१/- |
| ६ | ८/८/२०१८ | प्रभाग क्र.१० मधील ओम कॉलनी बर्फ कारखाना गुरुदत्त कॉलनी येथे काँक्रीट गटार करणे. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत | १४,८१,३९४/- |
| ७ | २०/८/२०१८ | प्र.क्र.५ मध्ये रेणुका नगर भागात विविध ठिकाणी गटार व रस्ते तयार करणे. | रस्ता दलीतोतर योजने अंतर्गत | २१,८७,०९०/- |
| ८ | २०/८/२०१८ | प्र.क्र.२४ मध्ये शिवाजी नगर भागात काँक्रीट गटार व रस्ते तयार करणे. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत | १४,६७,२९३/- |
| ९ | २०/८/२०१८ | प्र.क्र.२६मध्ये लक्ष्मीनगर,शिवकॉलनी, | मनपा निधी अंतर्गत | ९,९९,४९६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्वामी नारायण सोसा. भागात काँक्रीट गटार करणे. | | |
| १० | २३/८/२०१८ | धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत पॅसेजाला पी.ओ.पी.करणे बाबत. | मनपा निधी अंतर्गत | २४,५३,६७२/- |
| ११ | २३/८/२०१८ | धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत पार्किंग जवळ रूम बांधणे . | मनपा निधी अंतर्गत | १०,९८,७४६/- |
| १२ | २३/८/२०१८ | प्र.क्र.१३ पारोळा रोड ते लालबाग चौक रस्ता डांबरीकरण करणे. | जिल्हा नगरोत्थान निधी अंतर्गत | ९,२८,१६३/- |
| १३ | २३/८/२०१८ | प्र.क्र.१३ दत्तवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे (सुभाष पुतळयाजवळ) | जिल्हा नगरोत्थान निधी अंतर्गत | ७,८८,९७७/- |
| १४ | २३/८/२०१८ | प्र.क्र.१३ मधील मरिमाता चौक ग.नं.७ राणी मेडिकल ते आदर्श पुस्तकालय पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | जिल्हा नगरोत्थान निधी अंतर्गत | ७,९४,७४८/- |
| १५ | २७/८/२०१८ | प्र.क्र.३१ मध्ये रासकर नगर भागात रस्ते काँक्रीट करणे. | मनपा निधी अंतर्गत | १४,५४,१९०/- |
| १६ | २७/८/२०१८ | प्र.क्र.३० मध्ये आण्णा भाऊ साठे नगर येथे १० सीट शौचालय बांधणे. | नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत | १३,९०,२३५/- |
| १७ | २९/८/२०१८ | प्र.क्र.२८ मध्ये ड्रायव्हर सोसा.ते पप्पू गोसवाले ते फलान दरम्यान मदरसा पावेतो काँक्रीट गटार व रोड करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,९७,३४२/- |
| १८ | २९/८/२०१८ | प्र.क्र. १७ मध्ये गणेश कॉलनी व गुरुनानक भागात रस्ते काँक्रीटीकरण करणे (जयभवानी ट्रेडर्स व श्री. गुरव यांचे घरापावेतो श्री. रेलन गोरोक एजन्सी पावेतो) | नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत | २२,२९,०७९/- |
| १९ | २९/८/२०१८ | प्र.क्र. ३५ मध्ये सज्जू मनियार घर ते महमंद पेहलवान घर ते इकरा कॉलनी ते सुलतानिया मदरसा पावेतो काँक्रीट गटार करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,७१,३१५/- |
| २० | १/९/२०१८ | प्र.क्र.६ ब मध्ये देवपूर भागातील प्रमोद नगर भागात खुल्या जागेत वॉल कंपाऊंड करणे. | जिल्हा नियोजन समिती अंतर्गत | २२,३९,४८७/- |
| २१ | ६/९/२०१८ | प्र.क्र.२२ मध्ये कसाबवाडा निशांत चौक अं. रशीद दुकानापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | मनपा निधी अंतर्गत | ७,२५,२४८/- |
| २२ | ६/९/२०१८ | प्र.क्र. २२ मध्ये कसाबवाडा मस्जिद परिसरात विविध ठिकाणी काँक्रीट रस्ता करणे. | मनपा निधी अंतर्गत | ६,९४,४२४/- |
| २३ | ६/९/२०१८ | प्र.क्र.पवननगर भागातील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे बाबत. | मा.आमदार निधी अंतर्गत | १४,९३,१८१/- |
| २४ | ७/९/२०१८ | प्र.क्र.३२ मध्ये कैलास नगर ते अवधूत नगर | महाराष्ट्र सुवर्ण जयंती | १४,९४,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | नगरोत्थान अभियान अंतर्गत | |
| २५ | ७/९/२०१८ | बडगुजर प्लॉट,गुरुदत्त मंदिर परिसरातील खुल्या जागेत जॉगिंग ट्रॅक करणे व सुशोभिकरण करणे. | मा.आमदार निधी अंतर्गत | ६,९९,९१५/- |
| २६ | ७/९/२०१८ | प्र.क्र.६ मध्ये तुळशीराम नगर सर्व्हे नं.६१/१ ओपनस्पेस मध्ये जॉगिंग ट्रॅक करणे. | मनपा निधी अंतर्गत | ७,१६,९५७/- |
| २७ | १२/९/२०१८ | प्र.क्र.२०मध्येअग्रसेनपुतळा तेविनोद मितल ते भतवाल घर रस्ता डांबरीकरण करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,९६,९३५/- |
| २८ | १७/९/२०१८ | प्र.क्र.२५ मध्ये फिरदोस नगर भागात नजीर अंडेवाले व स्पेस हायस्कूल जवळ रस्ता डांबरीकरण करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,०१,३५६/- |
| २९ | १७/९/२०१८ | प्र.क्र. ६ मध्ये विनय कॉलनी येथे मातोश्री बंगला ते विश्वनव विद्यालय व मधुकर जोशी ते यथार्थ बंगला पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,९१,८५०/- |
| ३० | १७/९/२०१८ | प्र.क्र.२९ धुळे मनपा हद्दीतील वल्लभ नगर पंचक्रोशी भागात अग्रवाल नगर ते नाल्यापावेतो ड्रेनेज लाईन टाकणे. | मनपा निधी अंतर्गत | ४,४९,३१६/- |
| ३१ | १७/९/२०१८ | प्र.क्र.२९ मध्ये सुगंध नगर व कोरके नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,९८,३५२/- |
| ३२ | १७/९/२०१८ | न्यू आनंद नगर सह.गृहनिर्माण सि.स.नं.६९/१ मधील मोकळ्या जागेवर (चेनलिंक जाळी) बालोद्यान लहान खेळणी,सिमेंट बेंच जॉगिंग ट्रॅक, वृक्ष लागवड व सुशोभिकरण करणे. | आमदार निधी अंतर्गत | २२,००,१५६/- |
| ३३ | २४/९/२०१८ | प्र.क्र.२० मध्ये तहसीलदार कार्यालय जवळ सार्वजनिक शौचालय बांधणे. | १४ व्या वित्त आयोग अंतर्गत व महिला बालकल्याण ठरावानुसार | १४,१३,०८८/- |
| ३४ | २६/९/२०१८ | प्र.क्र. २८ मध्ये पुलानदरान मदरसा मिल्लतनगर अं. रऊफ खान यांचे घराजवळ रस्ता कॉंक्रीट करणे. | मनपा निधी अंतर्गत | ९,९३,६७२/- |
| ३५ | २७/९/२०१८ | प्र.क्र.४ त्रिमूर्ती नगर भागात रस्ता कॉंक्रीट करणे. | आमदार निधी अंतर्गत | ९,९४,४१८/- |
| ३६ | २८/९/२०१८ | प्र.क्र. ३० नवजीवन नगर येथे १० सीट शौचालय बांधणे. | नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत | १३,९०,२३५/- |
| ३७ | २८/९/२०१८ | प्र.क्र. १८ दलित वस्तीत भीमनगर भोरसिंग बाघ यांच्या घरापासून ते सासरबाई यांच्या | खासदार निधी अंतर्गत | ९,७३,४८६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | | |
| ३८ | २८/९/२०१८ | प्र.क्र.१५ मध्ये श्रीराम मंदिर व चर्च भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत | १०,२४,७६७/- |
| ३९ | २८/९/२०१८ | प्र.क्र. १२ मध्ये ज्ञानेश्वर मंदिर ते खुनी गणपती ग.नं. ९ ते लोटनदादा यांचे घर ते गढी किनारी ड्रेनेज लाईन टाकणे. | मनपा निधी अंतर्गत | १०,४९,६४०/- |
| ४० | २८/९/२०१८ | प्र.क्र.२४ मध्ये वयोवृद्ध नागरिकांना नमाज पढण्यासाठी अगोदर व नंतर मस्जिद समोर व्यवस्था साठी कॉंक्रीट बेंचेस बसविणे. | मनपा निधी अंतर्गत | १०,००००/- |
| ४१ | २८/९/२०१८ | प्र.क्र. ३५ स.नं.४३८/१/ब/२ अ/२ ब मध्ये शब्बीर नगर भागात कॉंक्रीट गटार करणे. | आमदार निधी अंतर्गत | ९,९९,९४४/- |
| ४२ | २८/९/२०१८ | प्र.क्र. २० मध्ये ८० फुटी रोड लोकमान्य हायस्कूल पासून ते पाटोळे चौक भारतीय गार्डन पावेतो दुतर्फा रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | खासदार निधी अंतर्गत | १४,८३,८४९/- |

या बाबत सभागृहास माहिती देवुन अवगत करण्यात आले.

**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- ६ राजीव गांधी नगर येथील १० सिट सुलभ शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी सेवा फाऊंडेशन, पुणे यांना देण्याबाबत फेर विचार करण्यासाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक २८/०२/२०१९**

राजीव गांधी नगर येथील १० सिट सुलभ शौचालय बांधण्यात आले असुन स्वच्छता अभियान अंतर्गत समिती शहरात आली असतांना तात्काळ साफसफाई व देखभाल दुरुस्तीचे काम सेवा फाऊंडेशन पुणे हे करीत असल्याने त्यांना कार्यादेश देणे बाबत पत्र सादर केले आहे.

राजीव गांधी नगर १० सिट सुलभ शौचालय स्वच्छ सर्वेक्षण २०१८ सुरु होत असल्याने त्या भागातील नागरीकांना शौचालय सुरु करणे आवश्यक असल्याने सेवा फाऊंडेशन पुणे यांना तोंडी आदेशानुसार साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आले होते. परंतु सन्मा.नगरसेवक श्री.दिपक एकनाथ शेलार यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र.२६ मधील राजीव गांधी नगर १० सिट व हमालमापाडी १० सिट सुलभ शौचालय साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी स्व.गोपालजी गोयर बेरोजगार संस्था यांना देणे बाबत पत्र सादर केले होते. माजी महापौर सौ.जयश्री कमलाकर अहिरराव यांचे दि.२४/५/२०१८ च्या पत्रानुसार राजीव गांधी नगर येथील १० सिट सुलभ शौचालय सेवा फाऊंडेशन पुणे यांना देणे बाबत पत्र सादर केले होते. त्या अनुषंगाने सुभाष नगर वार्ड स्व.निरीक्षक यांच्या अहवालानुसार स्व.गोपालजी गोयर बे.संस्था यांना हमालमापाडी १० सिट व सेवा फाऊंडेशन पुणे यांना राजीव गांधी नगर १० सिट सुलभ

शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देणेकामी मे.स्थायी समितीपुढे दि.१९/४/२०१८ ची मंजुर टिपणी सादर केली असता मे.स्थायी समिती ठराव क्र.५५ दि.५/७/२०१८ च्या ठरावान्वये राजीव गांधी नगर १० सिट सुलभ शौचालय सेवा फाऊंडेशन पुणे यांना न देता.

१) हमालमापाडी १० सिट २) राजीव गांधी नगर १० सिट सुलभ शौचालय स्व.गोपालजी गोयर यासंस्थेला देणे बाबत मंजुरी दिली होती. त्याअनुषंगाने त्यांना जा.क्र/धुमपा/आरोग्य /२४८ दि.१३/८/२०१८ च्या कार्यादेशान्वये दि.१४/८/२०१८ पासुन देण्यात आले आहे.

तरी राजीव गांधी नगर १० सिट सुलभ शौचालय यांना देणे बाबत माजी महापौर सौ. जयश्री कमलाकर अहिरराव यांनी उक्त संदर्भिय पत्र सादर केले आहे. तरी सदर शौचालय हे दि.१/१/२०१७ पासुन सेवा फाउंडेशन पुणे हे तोंडी आदेशाने काम करीत होते व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नव्हती. परंतु उक्त ठरावानुसार त्यांना मंजुरी न दिल्याने दि.१४/८/२०१८पासुन स्व.गोपालजी गोयर संस्था हे काम करीत आहे. तरी उक्त संदर्भिय पत्रानुसर सदर शौचालय हे स्व.गोपालजी गोयर यांच्याकडुन काढुन सेवा फाऊंडेशन पुणे यांना देणे बाबत सहा.आरोग्याधिकारी यांनी अहवाल सादर केला आहे.

सादर झालेला कार्यालयीन अहवाल व सेवा फाऊनडेशन या संस्थेचे काम पाहता कार्यालयीन अहवालास अधिन राहुन ०१/०१/२०१७ पासुन ते १३/०८/२०१८ अखेर सदर संस्थेने केलेल्या कामांचे कार्यादेश व देयके अदा करणेस कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. व सदरचे काम मे. गोपालजी गोयर संस्थे ऐवजी मे. सेवा फाऊडेंशन पुणे यांना देखभाल दुरुस्ती साठी देणेस मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर.**

**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- ७ प्रभाग क्र.३४ मधील बी.एस.एन.एल.ऑफीस जवळ २०सिट सुलभ शौचालय माहे जाने-२०१७ पासुन सेवा फाऊंडेशन,पुणे यांना साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांत आलेले असून प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ८ दिनांक २८/०२/२०१९**

प्रभाग क्र.३४ मधील बी.एस.एन.एल.ऑफीस जवळ २० सिट सुलभ शौचालय यापुर्वी अल्पसंख्यांक सफाई कामगार सेवाभावी संस्था यांना साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आले होते. तरी सदर संस्थेबद्दल साफसफाई बाबत तक्रार असल्याने त्यांचे काम बंद झाल्याने त्या भागातील नागरीकांची गैरसोय होवु नये म्हणुन माहे जाने-२०१७ पासुन सेवा फाऊंडेशन.पुणे यांना साफसफाई व देखभाल दुरुस्तीचे काम करीत असुन त्यांना माहे जाने-१७ पासुन बिल अदा करुन कार्यादेश देणे बाबत पत्र दिले आहे.

मोहाडी वार्ड स्व.निरीक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर शौचालय यापुर्वी साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी अल्पसंख्यांक सफाई कामगार सेवाभावी संस्था यांना देण्यात आले होते.तरी सदर संस्थेने साफसफाई व शौचालय दुरुस्ती बाबत तक्रारी असल्याने त्यांच्याकडुन उक्त शौचालयाचे काम काढुन शौचालय बंद करण्यात आले होते.तरी सदर शौचालय दुरुस्त झाल्याने स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१७ सुरु असल्याने शहर हगणदारी मुक्त

होणेकामी केंद्र शासनामार्फत क्यु.सी.आय.समिती दाखल होत असल्याने त्या भागातील नागरीकांना शौचालयाची गैरसोय होवु नये म्हणुन सेवा फाऊंडेशन पुणे यांना माहे जाने.२०१७ पासुन साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी तोंडी आदेशाने काम दिले आहे. परंतु सदर संस्थेला अद्याप पावेतो कार्यादेश दिलेला नाही व कोणत्याही प्रकारचे बिल अदा केलेले नाही. तरी उक्त सन्मा.नगरसेवक यांच्या पत्रानुसार सदर सेवा फाऊंडेश, पुणे यांनी माहे जाने.२०१७ पासुन उक्त शौचालयाचे त्या तारखेपासुन बिल अदा करणेस व साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देणेस कार्योत्तर मंजुरी कामी मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यत आलेला असून त्याबाबत खालील प्रमाणेफेर अहवाल सादर झालेला आहे.

बांधकाम विभागामार्फत २००८ मध्ये शहरातील बांधण्यात आलेले सुलभ शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत मे.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.२०/१२/२००७ अन्वये सेवा फाऊंडेशन पुणे यांना देणे बाबत मंजुरी दिली आहे व ज्या संस्थेची शौचालय साफसफाई बाबत तक्रार असल्यास सदर शौचालयाचे काम काढुन सेवा फाऊडेशन पुणे यांना देणे बाबत मे.स्थायी समिती ठराव क्र.७४ दि.१४/२/१८ अन्वये मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने उक्त शौचालयाची साफसफाई बाबत तक्रार असल्याने सदर शौचालयात नेमण्यात आलेले संस्थेचे काम बंद करुन सदर शौचालयाची दुरुस्ती होवुन स्वच्छ सर्व्हेक्षण २०१७अंतर्गत केंद्र शासनामार्फत क्यु.सी.आय.पथक शहरात दाखल होत असल्यामुळे सदर शौचालय त्वरीत सुरु करणे आवश्यक होते.

तरी माहे जाने-२०१७ पासुन सेवा फाऊंडेशन पुणे यांना देण्यात आले असुन सदर संस्थेला कामाचा आदेश दिला नसल्यामुळे सन्मा.नगासेवक यांच्या पत्रानुसार माहे जाने-२०१७ पासुन कामाचे आदेश देवुन बिल अदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी करीता अहवाल ठेवण्यात आलेला आहे.

कार्यालयीन अहवाल लक्षात घेता सादर झालेल्या कायाल्रयीन प्रस्तावास आधीन राहुन प्रभाग क्रमांक ३४ मधील २० सीट सुलभ शौचालय देखभाल दुरुस्तीचे काम सेवा फांऊडेशन पुणे हे जानेवारी २०१७पासुन करीत असुन त्यांना सदर कामाचे कार्यादेश देणेस व त्यांनी केलेल्या कामाचे देयकी अदा करणेस कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांकः- ८ — तापी पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनी वरील विविध ठिकाणचे लिकेजेस काढणेकामी आलेल्या रु.७१९२१/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. अमीन पटेल — आज मागील ३ वर्षापासुन महासभेमध्ये तापी पाणी पुरवठा पाईपलाईन लिकेजेस बाबत बोलत आहेत.तापी पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन वांरवांर फुटत असते.आजच्या सभेतही लिकेजेस बाबत कार्योत्तर मंजुरी साठी विषय आलेला आहे. तापी पणीपुरवठा योजनेवरुन ७०% पाणी मिळते.आमच्या भागात १० ते १२ दिवसांनी पाणी मिळते. तापी पाणीपुरवठाच्या योजनेसाठी नविन पाईपलाईन टाकणेबाबत मागणी केली आहे. अक्कलपाडा पाईपलाईन साठी १०० कोटी रुपयाचा निधी मिळाली आहे. तर तापी पाणीपुरवठा साठी आपल्याला निधी मिळविला पाहीजे.

म. आयुक्त सो. आपली अक्कलपाडाची पाईपलाईन त्यासाठीच आहे. या योजनेत फिल्टर स्टेशन वनवीन पंप बसविणेचा समावेश आहे.तसेच तापी पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईनला इपॉक्सीपेन्ट (कलरिंगसाठी) अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेच्या निधी मध्ये ११ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे.तापी पाणीपुरवठा योजनेपेक्षा अक्कलपाडा योजनेपेक्षा मेंटेनन्स कमी आहे.म्हणुन आपण अक्कलपाडा योजना घेतली आहे.अक्कलपाडा योजनेतून ग्रायव्हटीने पाणी मिळणार असल्याने शहराच्या सुमारे 60 ते 70 टक्के भागात त्यावरुन पाणीपुरवठा होणार आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे शहर तापी पाणी पुरवठा योजनेवरील लिकेजेसचे प्रमाण वाढल्याने दैनंदिन पाणी पुरवठा मध्ये व्यत्यय निर्माण होत होता वरील प्रमाणे नरढाणा येथे Raw Water पाईपलाईनला नाल्यालगत मोठी गळती असल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत होती. तसेच सोनगिर येथील जॉईट व एअर व्हाल्व मध्ये नागरिकांनी छेडछाड केल्याने पाणी लिकेजेस वाढले.

सदरील दुरुस्ती करणे करिता वर्तमान पत्रात प्रसिद्धी करवून दि.7/1/2019 रोजी पाणी पुरवठा बंद करणेत येवून सर्व दुरुस्ती कामे करणेत आली आहे. सोबत सदर कामांचे फोटो जोडले आहेत.या कामी करणेत आलेल्या कामाचे अंदाजपत्रक रु.71,921/- (१८% GST includhing) मात्र आहे. सदर काम तातडीची बाब असल्याने विना निविदा मे. आकाश एंटर प्रायजेस यांचे कडून करून घेण्यात आले आहे. वरील प्रमाणे कामाकरिता व खर्च रु.71.921/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5 प्रकरण 2 (2) प्रमाणे कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- ९ मनपा हदवाढीत समाविष्ठ झालेल्या अवधान व बाळापूर येथील पाणीपुरवठा विहीरीवरील पंपसेट दुरुस्ती करणेबाबत आलेल्या रु.३४१४५/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १० दिनांक २८/०२/२०१९**

म.न.पा हद्दवाढीत समाविष्ट झालेल्या अवधान व बाळापुर येथील सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरींवरील मोटार व ओपनवेल पंपसेट नादुरुस्त झाले असल्याचे रिपोर्ट दि. 27/11/2018 रोजी अवधान म.न.पा ( ग्रामपंचायत ) कर्मचारी व दि.16/11/2018 रोजी बाळापुर म.न.पा ( ग्रामपंचायत ) कर्मचारी यांनी विभागास सादर केले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर विहिरींवरील मोटार व ओपनवेल पंपसेट नादुरुस्त झाले आहे.म.न.पा हद्दवाढीत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक पाणीपुरवठा सुरळीत ठेवनेसाठी सदरील काम अत्यंत तातडीचे व गरजेचे आहे.

करिता विविध प्रकारच्या मोटर्सची रिपेरिंग,Rewinding,Dismentling , Transportation,TPN MCB ६ A to ३२ A चे काम प्रस्तावित आहेत.सदरील कामासाठी

अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रू. ३४१४५ /-मात्र आहे.सदरील दर व खर्च मजीप्रा दरसूची / O & M /DSR and 12 % add दरसूची प्रमाणे योग्य व उचित आहे.सदरील काम अत्यंत तातडीचे व आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे अवधान व बाळापुर येथील काम दि.26 नोहेंबर 2018 रोजी तातडीने करण्यात आली आहे.सदर कामी सोबत प्रमाणे रू.34,145/-मात्र खर्च असून कंत्राटदार मे.वीज कामगार सह.संस्था धुळे यांना सदर खर्च कार्यात्तर देणेस मान्यतेस सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगपालिकाअधिनियम प्रकरण 5 कलम 2 ( 2 ) प्रमाणे प्रस्तावास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १० तापी पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीवरील विविध ठिकाणचे लिकेजेस काढणे कामी आलेल्या रु.८९६२१/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ११ दिनांक २८/०२/२०१९**

तापी पाणी पुरवठा योजनेवरील बाभळे जलशुद्धीकरण केंद्र ते नगाव दरम्यानचे लिकेजेस दुरुस्ती कामाकरिता दि.31/10/2018 रोजी पाणी पुरवठा बंद ठेवणेबाबत दि.29/10/2018 रोजी मान्यता घेण्यात आली. सदर काम तातडीचे असल्याने व अल्पवेळेत पूर्ण करणे करिता मे.के.जी.शिंदे यांना कामाचे आदेश देण्यात आले.

दि.31/10/2018 रोजी खालील प्रमाणे ठिकाणी मोठे लिकेजेस दुरुस्तीचे कामे पूर्ण करण्यात आली.

१. जलशुद्धीकरण केंद्रासमोर बाभळे फाटा – येथील T जॉईड वरील लीकेजे दुरुस्ती साठी M.S पाईप करून पाईपमध्ये तळाशी तसेच Joint वर लिकेज बंद करणेत आले.
२. जुनी हिरा हॉटेल जवळ – येथील Joint ओपन करून नवीन पकिंग व M.S नटबोल्ट सह दुरुस्ती करणेत आली.
३. सोनगीर गस गोडाऊन जवळ – सदर लिकेज भूमिगत असल्याने JCB द्वारे खोदाई करून वेल्डिंग करणेत आले.
४. जुना आग्रा रोड पोल्ट्री जवळ – सदर भूमिगत लिकेज खोदाई करून बंद करणेत आले.
५. बाभळे फाटा,स्ल्यूज व्हाल्व (Raw Water) येथील Valve च्या G.L जवळील लिकेजेस point वर वेल्डिंग करण्यात आले.

वरील प्रमाणे कामे दि.31 आक्टोबर रोजी तातडीने करण्यात आली आहे. सदर काम कंत्राटदार मे.के.जी.शिंदे नरडाण यांचेकडून करुन घेण्यांत आलेले आहे. याकामी रु.89621

/-मात्र खर्च झालेला असून त्यास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 (2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- ११ धुळे मनपा हद्दीत पाणीपुरवठा योजनेवरील विविध ठिकाणचे एअर व्हॉल बसविणेचे कामे तांतडीने करुन घेण्यांत आलेत त्यासाठी खर्च रुपये२,८५,९५१/- मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५(२)(२) नुसार मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे मनपा हद्दीत १)हनुमान टेकडी जलशुद्धीकरण ते पांझरा पंपिंग स्टेशन पावेतोची ३०० एम.एम. व्यासाची पाईप लाईन वर एअर व्हॉल नसल्याने सदरची पाईप लाईन वेळोवेळी फुटून पाण्याची नासाडी होत असल्याने जलकुंभास पाणीपुरवठा हा कमी प्रमाण होतो तसेच २)नेहरू नगर जलकुंभ ते पांझरा पंपिंग स्टेशन पावेतोचा ३०० एम.एम. पाईप लाईन सुद्धा नदी किनारी फुटल्याने नेहरू नगर जलकुंभ वरील पाणीपुरवठा बंद झालेला होता. त्यामुळे पाणीपुरवठा करणेस अडचण आलेली आहे.

तरी सदरचे दोन्ही कामे हे नागरिकांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न लक्षात घेता दोन्ही कामे करणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा श्री. संजय दगडु गायकवाड, ठेकेदार यांचे कडून करून घेणेत आलेले आहे. सदर कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.२,८५,९५१/- मात्र आलेला आहे. तरी दोन्ही कामे विना निविदा करणे कामी तसेच सदर कामी झालेला खर्च रु.२,८५,९५१/- मात्रला कार्यालयीन अहवालासअधिन राहून मनपा अधिनियम १९४९ चा प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:-१२ देवपूर अमरधाम येथे बोअरवेल करुन पंपसेट बसविणे तसेच पाण्याची टाकीची व्यवस्था करणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेतत्याबाबत झालेला खर्च रु.७९,६००/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक २८/०२/२०१९**

देवपूर अमरधाम येथे कायम स्वरुपी पाण्याची व्यवस्था नाही. येथील सद्यस्थितीत मध्ये असलेली विहीर फक्त १५फूट उंचीची असून याठिकाणी वारंवार गाळ जमा झाल्याने मोटार नादुरुस्त होत असल्याने तसेच पर्याय व्यवस्था नसल्याने नागरीकांच्या तक्रारी होत असतात व म. अभियंता सो. यांनी तात्काळ पर्याप्त व्यवस्था करण्यांचे आदेश केले होते

देवपूर अमरधाम येथे बोअरवेल करणे, १ एच.पी. सबमर्सिबल पंप बसविणे, बांधकाम करुन पाण्याची टाकी बसविणे इ कामे तांतडीने मे. जिग्नेश दिनेश चव्हाण यांच्याकडून करुन घेण्यांत आले आहे.

सदर कामी अंदाजपत्रक खर्च रु.७९६००/- (१२ टक्के जी.एस.टी. करासह) खर्च झालेला आहे. सदरचे काम विना निविदा उक्त प्रमाणे तांतडीने करुन घेण्यांत आले असून याकामी झालेल्या खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:-१३ धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ कामी देवपूर भागातील नवरंग जलकुंभ येथील निवडणूक निर्णय अधिकारीच्या कार्यालयाची दुरुस्ती करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १४ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ कामी देवपूर भागातील नवरंग जलकुंभ येथील निवडणूक निर्णय अधिकारी च्या कार्यालयाची दुरुस्ती करणेबाबत.

म.आयुक्त,म.उपायुक्त यांनी दि.१५/१०/२०१८ रोजी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयांना भेटी दिल्या त्यानुसार त्यांनी नवरंग जलकुंभ येथील कार्यालयास सुद्धा भेट दिली त्यांच्या समवेत म.उपायुक्त,म.अधियंता व मी स्वत: हजर होतो.त्यांनी सदर इमारतीची पहाणी करून तात्काळ डागडुजी व रंगरंगोटी करण्याबाबत आदेशित केले होते.त्यानुसार सदर काम करणे आवश्यक होते.

त्यानुसार सदर काम करणे बाबत ठेकेदार श्री.रोहित टकले,धुळे यांना सूचना केली असता त्यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार असल्याने त्यांना सदर काम करून घेणे बाबत सूचना करण्यात आली होती.त्यानुसार त्यांनी सदर काम करून दिलेले आहे.

सदर कामास शासकीय दरसूची सन २०१८-१९ नुसार रु.१,६२,०९९/- मात्र इतका खर्च झालेला आहे.तरी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:-१४ देवपूर भागातील जयहिंद कॉलनी मधील सोना सुपर शॉप जवळ,नकाणे रोड वरील हरदेव मेन्स पार्लर जवळ, वलवाडी भागातील धनदाई कॉलनी मध्ये व नकाणे गावातील राम मंदिराजवळ पाईपलाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १५ दिनांक २८/०२/२०१९**

देवपूर भागातील जयहिंद कॉलनी मधील सोना सुपर शॉप जवळ,नकाणे रोड वरील हरदेव मेन्स पार्लर जवळ,वलवाडी भागातील धनदाई कॉलनी मध्ये व नकाणे गावातील राम मंदिराजवळ पाईपलाईनला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत आहे.उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री.संजय गायकवाड यांना सदर काम तात्काळ करण्यास सांगितले.

त्यांनी त्यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरची पाईपलाईन दुरुस्त केली असून पाईपलाईनची गळती थांबविण्यात आली आहे.उक्त कामाचे सोबतच्या अंदाजपत्रकानुसार रु.२,७६,१३२/- इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

सदर पाईपलाईनला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांचेकडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक :-१५ — शिकाऊ उमेदवारअधिनियम १९६१अंतर्गतमहानगरपालिका आस्थापनेवर नियुक्त शिकाऊ उमेदवारांना विद्या वेतन अदा करण्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १६ दिनांक : २८/०२/२०१९**

अंशकालीन प्राचार्य मुलभूत शिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र द्वारा औ.प्र.संस्था धुळे यांचेकडील पत्र जा.क्र.बी.टी.आर.आय.धु/एटीएस/२०१८/८३ दि.७/४/२०१८ अन्वये शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत आयटी आय उत्तीर्ण उमेदवारांना अधिकचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी शिकाऊ उमेदवारी करणे(APPRENTICE **SHIP)क्रमप्राप्त** आहे व शासकीय/ निमशासकीय / खाजगी आस्थापनाना देखील प्रशिक्षण सुविधेनुसार उमेदवारांना शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक करणे बंधनकारक असल्याने www. Apprentice ship.gov.in या पोर्टलवर सुधारित नियमानुसार ऑनलाइन मनपाच्या आस्थापनेची नोंदणी करण्यात आलेली आहे.त्यानुसार शिकाऊ उमेदवारांच्या निर्धारित केलेल्या जागांसाठी महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार **I T I** उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून अर्ज मागवून अर्जांची छाननी करून गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना दि.२९/१०/२०१८ रोजी नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या शिकाऊ उमेदवारांना शासनाच्या नियमानुसार अर्धकुशल कामगाराच्या किमान वेतनाच्या ८०% इतका विद्यावेतन देय आहे. धुळे शहराचा समावेश झोन ३ मध्ये होत असल्याने महाराष्ट्र किमान वेतन दरानुसार अर्धकुशल कामगारांना किमान वेतन दर दरमहा रु.८०००/-आहे.त्यानुसार एकूण ४५ शिकाऊ उमेदवारांची नियुक्ती

केल्यास दरमहा प्रत्येकी रु.८०००/-प्रमाणे किमान वेतन दराची ८० टक्के रक्कम रु.६४००/- प्रमाणे एकूण ४५उमेदवारांना दरमहा रु. २८८०००/- मात्र विद्यावेतन अदा करावे लागणार आहे व नेशनल अप्रेंटीसशिप प्रमोशन स्कीम द्वारे प्रत्येक शिकाऊ उमेदवार रु.१५००/- प्रमाणेएकूण रु.६७५००/- दरमहा मिळणार आहेत. मनपाच्या आस्थापनेवर नियुक्त शिकाऊ उमेदवारांना महानगरपालिकेस दरमहा प्रत्येक उमेदवारास स्कीमद्वारे मिळणारी रक्कम रु.१५००/- वजाजाता रु.४९००/-प्रमाणे एकूण ४५ उमेदवारांना दरमहा रु.२२०५००/-मात्र व वार्षिक खर्च रु.२६४६०००/-मात्र खर्च येणार आहे.

तरी शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत नियुक्त केलेल्या आय टी आय उत्तीर्ण उमेदवारांना विद्यावेतन आदा करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च रु.२५ लाखापेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार खर्च रु.2646000/- मात्रलाकार्यालयीन अहवलास अधिन राहून मनपाच्या सन २०१८-१९ च्या सुधारित अंदाज पत्रकात तरतूद करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १६ — म.कामगार अधिकारी धुळे यांच्या कडील दि.८/१०/२०१८ रोजीच्या पत्रानुसार व कामगार विभागा कडील अधिसुचनेनुसार धुळे मनपातील रोजंदारी बदली कर्मचा-यांना रोजंदारी दर वाढ करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुरेखा चं. उगले — मा.सभापती सो. आयुक्त सो.कर्मचा-यांना रोजंदारी दर वाढ करण्याबाबतचा विषय मंजूर करणेत यावा व त्याच बरोबर या कर्मचा-यांनामध्ये चांगले काम करणा-या कर्मचा-यांना मनपात रिक्तअसलेल्या पदावर सामावून घेण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी तसेच धुळे महानगरपालिकेत रिक्त असलेले अधिकारी व कर्मचा-यांची पदे आहेत. त्या पदावर महापालिकेत काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना सामावून घेण्याबाबत काय कार्यवाही केली याबाबत पुढील 8 दिवसात स्थायी समितीकडे आवश्यक माहिती सादर करण्याबाबत संबंधितांनाआदेश करावे ही विनंती विषय सदरचा विषय मंजूर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी वर्ग ३ कर्मचारी (कुशल) / रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी (अकुशल) / बदली सफाई कामगार यांना सद्यस्थितीत खालील प्रमाणे रोजंदारी दरानुसार वेतन अदा केले जाते.

१.कुशल प्रमाणे - रुपये ६५७/-

२.अकुशल प्रमाणे - रुपये ५६१/-

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी कर्मचारी व आरोग्य विभागाकडील बदली सफाई कामगार यादीनुसार खालील प्रमाणे विभागात कार्यरत आहे. सोबत कर्मचाऱ्यांचे नाव, विभाग व पदनिहाय यादी सोबत सादर केलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|
| १ | लिपीक , फिटर, वाहन चालक इ. | वर्ग -३ | १२ |
| २ | बिगारी, मुकादम, शिपाई, सफाई | वर्ग-४ | ११४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कामगार, दाई इ. | | |
| ३ | बदली सफाई कामगार | वर्ग -४ | १७६ |

सद्यस्थितीत रोजंदारी वर्ग ३ कर्मचारी यांना रोजंदारी दर कुशल वर्गवारी नुसार वेतन अदा केले जाते. तसेच रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी यांना अकुशल दरानुसार वेतन अदा केले जाते.

त्या अनुषंगाने वरील तक्तात नमुद नुसार रोजंदारी वर्ग ३ कर्मचारी हे कुशल व वर्ग ४ कर्मचारी अकुशल वर्गवारी मध्ये येतात.

म.सरकारी कामगार अधिकारी यांच्या पत्रानुसार धुळे म.न.पा.कडील कुशल कर्मचारी / अर्धकुशल कर्मचारी यांना नविन रोजंदारी दर लागु केल्यास एक कर्मचाऱ्यांच्या वेतनात खालील प्रमाणे वाढ होणार आहे.

१.कुशल-रु. ६७७ नवीन रोजंदारी दर - रुपये ६५७ /- जुना रोजंदारी दर = रुपये २० वाढ.
२.अकुशल –रु.५८१ नविन रोजंदारी दर - रुपये ५६१/- जुना रोजंदारी दर = रुपये २० वाढ.सद्यस्थितीत आरोग्य विभाग व इतर विभागामंध्ये कुशल/अकुशल (वर्ग ३ व वर्ग ४ ) रोजंदारी कर्मचारी  किती कार्यरत आहे. तसेच आरोग्य विभागात बदली कामगार किती कार्यरत आहेत याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे.त्यानुसार खालील प्रमाणे रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहेत.

१.कुशल (वर्ग ३ )- १२  X  २० रुपये १ दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ  X२६ दिवस  = रु.६,२४०/- दरमहा वाढ  X १२ महिने = रु.७४,८८०/- १२ महिन्याची वाढ
२.अकुशल (वर्ग ४) -  ११४ X २० रुपये १ दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ  X २६ दिवस  = रु.५९,२८०/- दरमहा वाढ X १२ महिने  = रु.७,११,३६०/- १२ महिन्याची वाढ
३.बदली कामगार (अकुशल ) - १७६  X २० दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ X २६ दिवस  = रु.९१,५२०/-  दरमहा वाढ  X १२ महिने  = रु.१०,९८,२४०/-१२ महिन्याची वाढ

वरील प्रमाणे रोजंदारी दरवाढीबाबत खर्चाच्या तपशीलामध्ये सरासरी २६ दिवस गृहीत धरुन रोजंदारी वाढ काढण्यात आलेला आहे.

रोजंदारी दरवाढीनुसार टिपण्णीत १ ते ३ मध्ये नमूद नुसार रु.१८,८४,४८०/- मात्र वार्षिक खर्चात अंदाजे वाढ होणार आहे. तसेच सन २०१७-१८ या वर्षाचा आस्थापना खर्च असून दरवाढीमुळे अंदाजे ०.१५ ते ०.२०% वाढणार आहे तरी मनपा आर्थिक परिस्थितीनुसार स्थायी समितीची मंजुरी घेणे उचित होईल. असा अहवाल मे. स्थायी समितीसमोर निर्णयासाठी सादर झालेला आहे.

सदर कार्यालयीन अहवालस अधिन राहुन प्रस्तावात नमुद रोजंदारी व बदली कर्मचारी यांची प्रस्तावीत दरवाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.या बाबत म. उपमुख्यलेखापरीक्षक यांनी नोंदवीलेल्या अभिप्रायांची उचीत पुर्तता करण्यात यावी. **सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १७ प्रजनन व बालआरोग्य (आर.सी.एच. फेज २) कार्यक्रमातंर्गत कार्यरत कर्मचारी यांचे मानधन वाढ लागू करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक १८ दिनांक २८/०२/२०१९**

दि.१३/१२/२०१८ रोजी धुळे महानगरपालिका, धुळे येथे RCH अंतर्गत कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी मानधन वाढीबाबत मा. आयुक्त सा ो, धुळे मनपा, धुळे यांचे नावे अर्ज दिला आहे. धुळे मनपामध्ये सन २००७-२००८ पासुन RCH अंतर्गत १६ कर्मचारी कार्यरत आहे. धुळे म.न.पा. ठराव क्र.३१४ दिनांक २०-०६-२०११ नुसार सदर पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना धुळे म.न.पा. मानधन अदा करत आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत NUHM कार्यक्रम सन २०१३-१४ मध्ये सुरु झाला आहे. RCH-II व NUHM हे दोन्ही कार्यक्रम राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) मोडतात. RCH-II व NUHM या दोन्ही कार्यक्रमांतर्गत काम करणारे कर्मचारी यांचे काम व पदे सारखीच आहेत.परंतु RCH-II अंतर्गत कामकरणारे कर्मचारी यांना NUHM अंतर्गत काम करणाऱ्या व नंतर सेवेत आलेल्या कर्मचा-यांपेक्षा कमी मानधन आहे. त्यामुळे प्रजनन व बाल आरोग्य(RCH-II) कार्यक्रमांतर्गत कार्यरतकर्मचा-यांनी NUHM अंतर्गत काम करणा-या कर्मचा-यांप्रमाणे मानधन व दरवर्षी ५% मानधन वाढ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

धुळे म.न.पा.स्थायी समिती ठराव नं.९५/दि.२१/१२/२०१७ नुसार RCH-IIअधिकारी / कर्मचारी यांना सुधारित मानधन वाढ केली आहे.परंतु NUHM अंतर्गत काम करणा-या कर्मचा-यांपेक्षा तुलनेत RCH-II अधिकारी/कर्मचारी यांना कमी मानधन मिळत आहे. तसेच शासन परिपत्रकानुसार व स्थायी समिती मंजुर ठरावानुसारRCH-IIअधिकारी/कर्मचारी यांना ५% वार्षिक मानधन वाढ लागू करण्यात आलेली नाही.

RCH-II व NUHMअंतर्गत सेवेत असणारे अधिकारी/कर्मचारी हे समान पदावर एक सारखेच काम करख्द्ध असतांनाही RCH-II अधिकारी/कर्मचारी यांना NUHM अंतर्गत काम करणा-या अधिकारी/कर्मचा-यांपेक्षा कमी मानधन मिळत असल्याने RCH-II कर्मचा-यां मध्ये असंतोषाची भावना वाढीस लागत आहे.शिवाय सदर बाब निश्चितच अन्यायकारक ठरते.

तरी समान पद समान वेतन नुसार RCH-II कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना खालील नमुद तक्त्याप्रमाणे कंत्राटी NUHM अधिकारी/कर्मचारी यांच्या मानधनाप्रमाणे मानधन मिळण्यास प्रस्तावित केलेले आहे.

| अ.क्र. | पद | सद्यस्थितीत RCH-II | सद्यस्थितीत NUHM | देय सुधारित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | महिला वैद्यकिय अधिकारी | १८००० | २४००० | २४००० |
| २ | पी.एच.एन | १०८०० | १२००० | १२००० |
| ३ | ए.एन.एम | ८६४० | ८६४० | ८६४० |

मा.सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीश श्री.जगदीश सिंग खेअर आधि न्यायाधीश श्री.स.ए.बोबडे यांच्या पीठाने दि.२६ ऑक्टोंबर, २०१६ रोजी दिलेल्या निर्णयात एकाच पदावर काम करण्या-या व एकाच प्रकारची कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या वेतनात तफावत असणे हे त्या कर्मचा-यांचा आत्म सन्मान कमी करणारे पिळवणूक कारक व अन्याय कारक असल्याचे टिप्पणी केली आहे.

सद्यस्थितीतRCH-II अंतर्गत १६अधिकारी / कर्मचारी कार्यरत असुन त्यांचे मानधनासाठी म.न.पा.फंडातुन रु.१,७२,८००/-मासिक खर्च होत आहे. वरील प्रमाणे RCH-II कर्मचा-यांना NUHM कर्मचा-यांना मिळणा-या मानधनाप्रमाणे (वर नमुद तक्त्याप्रमाणे) मानधन लागु केल्यास म.न.पा.फंडातुन जास्तीचा रु.२१,६००/-मासीक खर्च होणार आहे.RCH-II अंतर्गत काम करणारे अधिकारी/कर्मचारी सन २००७ पासून (१० ते१२ वर्षापासुन) पूर्ण वेळ आरोग्य सेवा देत असुनही मानधनात कुठल्याही प्रकारची वाढ झालेली नाही.

त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत NUHM कंत्राटी अधिकारी/कर्मचाऱ्या प्रमाणे RCH-II अंतर्गत काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांना समान वेतन व वार्षिक मानधन वाढ

तसेच **NUHM** कंत्राटी अधिकारी / कर्मचाऱ्यांना ज्या ज्या वेळेस शासनाच्या मार्गदर्शक सुचनांना प्रमाणे पगारवाढ व वार्षिक मानधन वाढ वइतर सुविधा लागु होतील त्याप्रमाणे RCH-II कर्मचाऱ्यांनाही लागु करणे तसेच ब राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचे परिपत्रकानुसार दरवर्षी वार्षिक मानधन वाढ लागू करणेबाबत मंजुरी मिळणे बाबत अहवाल स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहुन प्रस्तावित दरवाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक :- १८ — धुळे मनपा प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व्यवस्था करणेकामी झालेल्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी फेर निर्णयार्थ सादर झालेल्या कार्यालयीन अहवालावर व म.उपमुख्य लेखापरीक्षक यांचे मार्फत सादर झालेल्या अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — या विषयामध्ये सदर ठेकेदारांकडुन काम करुन घेणे साठी उपमुख्य लेखापरिक्षक यांचा अहवालाचा विचार करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. लेखासंहिता नियम ७१ नुसार कारवाई करण्यात यावी. व सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

सुभाष जगताप — सभापती महोदय सदरचा विषय कामाच्या अंदाजपत्रकाच्या 60% जास्तीला शासकिय मान्यता द्यावयाची आहे. आपल्याला 10% पेक्षा जास्त प्रशासकिय खर्चाला मान्यता देता येत नाही. तरी सदर विषयाला नविन प्रशासकिय मंजुरी घ्यावी.

म. आयुक्त सो. — मी सन्मा. सदस्यांना सांगु इच्छितो की आपण सदर विषया बाबत दोन्ही गोष्टी होणार आहेत. आपण PWD ला विषय उपस्थित केला आहे. आणि त्यांची विचारणा केली आहे. PWD कडे अभियंता, कार्यकारी अभियंता अशा पध्दतीने प्रशासकिय मान्यता घेतली जाते. आपल्या कडे स्थायी समिती ही अंदाजपत्रिके मंजुरीसाठी अंतिम प्राधीकरण आहे

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेता मे.यशश्री कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या जादा वाढीव कामाचा खर्च व सुधारीत प्रशासकीय आदेश देण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय मान्यता आदेश स्वाक्षरीस्तव ठेवण्यापूर्वी सुधारीत अंदाजपत्रक करणे खात्याची जबाबदारी राहील. तसेच बिल अदायगी पूर्वी सल्लागाराकडून व त्रयस्त परिक्षण ( थर्ड पार्टी ऑडीट)करणे आवश्यक राहील व उप मुख्य लेखापरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायाची उचित पूर्तता करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक१९ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या मध्ये फर्निचर व्यवस्था करणेकामी झालेला वाढीव खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेकामी अहवाल मे. स्थायी समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत मे. स्थायी समिती ठराव नं. १०० दि. ११/१०/२०१८ अन्वये सदर प्रस्ताव तहकूब करणेत आलेला होता व या कामी म.मुख्य लेखापरीक्षक यांचा स्वयंस्पष्ट अहवाल घेण्याबाबत आदेशित करणेत आलेले होते. त्यानुसार म.उपमुख्य लेखारीक्षक यांनी जा.क्रं./धुमपा/उपमुलेप/ फर्निचर अहवाल/६०७ अ दि.२६/१०/२० व १८अन्वये अहवाल सादर केलेला होता.

धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीत फर्निचर व्यवस्था करणे कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु.2,10,58,466/- मात्र खर्चास 5.5% कमीने मे. स्थायी समिती ठराव

नं.73 दि.20/10/2016 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त नुसार कामाचा अंदाजपत्रकास म. कार्यकारी अभियंता, धुळे मनपा यांनी जा.क्र./ ता.मु. / 82 दि.24/10/2016 अन्वये तांत्रिक मंजुरी प्राप्त होती.

उक्त प्रमाणे सदर फर्निचर व्यवस्था कामासाठी दि.07/07/2017 रोजीचा दै.लोकमत व पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर ई-निविदा मागविणेत आली असता मुदतीत प्राप्त निविदात सर्वात कमी दर मे. यशश्री कन्सट्रक्शन , नाशिक यांचे आले असून त्यास मे. स्थायी समिती ठराव नं. 67 दि.28/09/2017 अन्वये मंजुरी देण्यात आलेली असता सदरचे काम करते कामी सबंधित ठेकेदार यांना इकडील जा.क्र./ बां.वि. / 25 दि. 10/10/2017 अन्वये कार्यादेश देणेत आलेला होता.

सदर कार्यादेशानुसार व अंदाजपत्रकीय बाबींनुसार प्रत्यक्षात काम सुरु झाल्यानंतर प्रत्येक ऑफिस मध्ये आवश्यक असलेले फर्निचरनुसार ठेकेदाराकडून काम करून घेण्यात आलेले आहे. तसेच ठेकेदारास श्री. योगेश ठाकरे, आर्कीटेक्ट , धुळे यांनी दिलेल्या नकाशा व्यतिरिक्त दुसऱ्या मजल्या वरील आजमितीस कार्यरत असलेले लेखा विभागामधील फर्निचर ची व्यवस्था नव्हती. सदरचे विभागात फर्निचर काम करणेत आलेले आहे.

मनपा कार्यालयात मुख्य प्रवेशद्वार अंदाजपत्रकात एकच घेण्यात आलेले होते. परंतु काम करतांना दोन ठिकाणी ठेकेदारामार्फत करून घेण्यात आलेले आहे. मंजुर अंदाजपत्रका पेक्षा झालेल्या बदलामुळे देयकात वाढ झालेली आहे. सदर कामाबाबत श्री.नरेंद्र गोटू परदेशी; नगरसेवक व श्री.रमेश जीवन माळी यांचे तक्रारी प्राप्त आहे. त्यामुळे सदर देयक थर्डपार्टी साठी म.प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन, धुळे यांना जा.क्र./579दि.05/10/2018 अन्वये पाठविणेत आलेले आहे. सदर कामास एकूण खर्च रु.2,68,03,499/-मात्र झालेला आहे. त्यात सदरची निविदा 5.5% अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमीने असल्याने रु.2,53,29,306/- मात्र होणार आहे.

सदर कामासाठी आजपावेतो ठेकेदारास रु. 1,90,59,131/- मात्र खर्च अदा केलेला आहे.मंजूर निविदा रक्कम रु. 1,99,00,250/- मात्र आहे. सदरच्या कामासाठी लेखा सहिता 1971 नियम 167 (1) (2) अन्वये कामावरील वाढीव खर्च 10% पेक्षा कमी झालेल्या खर्चास म.आयुक्त सो.,यांना अधिकार असल्याने10%रक्कम रु.19,90,025/-मिळून रु.2,18,90,275/- मात्र होणार आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा रु.34,39,031/- मात्र जास्त खर्च झालेला आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 10% पेक्षा जास्त असल्याने सदरच्या खर्चास मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवणेस पुढील आदेशास्तव सादर.

तांतडीची व आवश्यक बाब असल्याने नवीन प्रशासकीय इमारतीच्या वाढीव फर्निचर कामाच्या मंजूर रकमेच्या १०% पेक्षा जास्त रकमेस मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तरी मे. स्थायी समितीपुढे विषय घेणेच्या मान्यतेस्तव सादर. तथापि विभागाने जादा कामे यशश्री कन्स्ट्रक्शन नासिक यांचेकडूनच का करुन घ्यावे? याबाबत विस्तृत स्पष्टीकरण घेणे योग्य राहील. असे अभिप्राय म. उपायुक्त यांनी नोंदविले आहे.

उक्त बाबत सदरचे काम खुल्या निविदा पध्दतीने यशश्री कन्स्ट्रक्शन नासिक यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. ५.५%कमीने देण्यांत आलेले होते. सदर कामे मनपा मार्फत खाजगी आर्किटेक्ट श्री. योगेश ठाकरे यांचे नेमणूक करणेत आलेले आहे.

श्री. ठाकरे यांनी निविदाकरारात अंदाजपत्रकात आवश्यक जुजबी बाबींचा समावेश करुन अंदाजपत्रक तयार केले होते. तथापि प्राप्त काम करतांना मनपा मध्ये कार्यरत विभाग व त्यासाठी लागणारे आवश्यक बाबी करणे रगजेचे असल्याने प्रस्तावित फर्निचरच्या

आराखडामध्ये बदल करुन घेवून त्यात प्रामुख्याने इमारतीच्या प्रवेश व्दाराचे २ मुळ दरावाजांची वाढ झालेले आहे.B-२ निविदेतील शर्तीनुसार करणे आवश्यक होते. लेखा विभागाचा फर्निचर प्रस्तावात प्रस्तावित नसल्याने त्यात संपूर्ण इमारतीच्या B-२ विंगच्या फर्निचर मध्ये वाढ झालेली आहे. तसेच सदर इमारतीचे एकत्रित आराखडे हे चार टॉवरचे असून निधी अभावी तीन टॉवरचे बांधकाम झाल्याने यांत विरोधी पक्षनेता व महिला बालकल्याण सभापती यांच्यासाठी दालने नसल्याने प्रथम मजल्यावरील कॉन्स्फरन्स हॉल मध्ये सुधारीत आराखडे करुन फर्निचर झाल्यानंतर वरील दोन्ही लोकप्रतिनिधीच्या दालनासाठी पार्टीशन करुन कामे प्रस्तावित करावी लागली तसेच सार्वजनिक स्वच्छता गुहाचे दरवाजे व इतर फर्निचर व इतर अनुषंगिक बाबी अंदाजपत्रकात समावेश नसतांना अत्यावाश्यक असल्याने करावे लागले.

सर्व साधारणपणे सदर जास्त बाबी स्वतंत्र अंदाजपत्रक व निविदा काढून करणे आवश्यक होते. तथापि सदरचे काम एकत्रित असल्याने वेगवेगळया ठेकेदारामार्फत तथा तांत्रिक दृष्टया करता येणे शक्य नसल्याने निवीदेतील ठेकेदारामार्फत करण्यांत आलेले आहे.

उक्त बाबीमुळे मनपाचा ठेकेदार मंजूर निविदा दराप्रमाणे काम करणार असल्याने शेकडा ५.५% कमी बाबत तसेच करारनाम्यानुसार जी.एस.टी. ठेकेदाराने भरावयाची असल्याने मनपाचा १२ टक्के फायदा होणार आहे. मागील पृष्ठावरील परिच्छेदात नमूद वाढीव कामांमुळे ठेकेदाराने सादर केलेल्या बीलानुसार एकुण रक्कम रुपये ३४,३९,०३१/- मात्र कामात वाढ होणार आहे. अशा परिस्थितीत सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. सदर कामांचे सुधारीत अंदाजपत्रक एकुण २,६८,०३,४९९/- मात्रला प्रशासकीय मान्यता मिळणेकामी विषय स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर. तसेच सदर कामांचे मंजुर निविदा दरानुसार म्हणजे शेकडा ५.५% कमीने त्याच ठेकेदारामार्फत(यशश्री कन्स्ट्रक्शन नासिक) करुन घेण्यांत आल्याने कार्योत्तर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे सादर करावे असा अहवाल विभागामार्फत सादर करण्यांत आलेला आहे.

यावर म.उपायुक्त व मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार म. उप. मु. ले. प. यांनी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहे.

१) कामाची मुळ नस्ती प्रकरणासोबत सादर नाही.
२) लेखा संहिता नियमाप्रमाणे मंजूर अंदाजपत्रकातच्या पेक्षा १० टक्के जादा खर्च किंवा त्यापेक्षा जादा खर्च होणार असेल तेव्हा सक्षम प्राधिकाराची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामात जादा खर्च झाला असल्याने, कामाचेसुधारीतअंदाजपत्रक (बाब निहाय) तयार करुन दर विवरणपत्र, तुलनात्मक टिपणी इ. सक्षम तांत्रिक अधिकारी यांचे कडून मंजुर करणे क्रमप्राप्त असेल,तदनंतर सदर कामास सक्षम असलेल्या (प्राधिकरणाकडून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक व उचित ठरेल असे मत आहे.
३) वाढीव कामाबाबत संबंधित तांत्रिक सल्लागार यांची मान्यता व तसे अहवाल बांधकाम विभागास प्राप्त होतेकिंवा कसे ही बाब तपासण्याच्या अधीनच उर्वरीत कार्यवाही करणे उचित असेल.
४) मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक प्रमाणे आर्थिक तरतूद व उपलब्धता इ. बाबी तपासूनच कार्यवाही मंजूर करणे उचित असेल.
५) प्रस्तुत कामाचे यापूर्वी झालेल्या खर्चाबाबत मा. स्थायी समितीने मुख्य लेखा परीक्षक यांना तपासणी करुन अहवाल सादर करणेचे आदेशित केले आहे या

बाबत सद्यस्थितीत मु.ले.प पद रिक्त असल्याने त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून येते. सदर बाब निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

६) प्रशासकीय मान्यतेशिवाय देयक प्रदान होणार नाही. याची योग्य दक्षता घेण्यांत यावी.

७) प्रशासकीय मंजूर (सुधारीत) रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

उपरोक्त बाबींची पुर्तता करुन घेण्यांचे आधिन व नियमानुसार सर्व अभिलेखे दस्ताऐवज संबंधित विभागाने करण्यांचे अधिन प्रस्तावित कार्यवाही करणे उचित असेल. याबाबत मा.आयुक्त सो. यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

यावर प्रशासकीय मान्यता आदेश स्वाक्षरीस्तव ठेवण्यापूर्वी सुधारीत अंदाजपत्रक करणे खात्याची जबाबदारी राहील. तसेच बिल अदायगी पूर्वी सल्लागाराकडून व त्रयस्त परिक्षण ( थर्ड पार्टी ऑडीट) करणे आवश्यक राहील स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर असा अभिप्राय मा.आयुक्त सो. यांनी सादर केलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल तसेच म. उपमुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेता मे. यशश्री कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या जादा वाढीव कामाचा खर्च व सुधारीत प्रशासकीय आदेश देण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय मान्यता आदेश स्वाक्षरीस्तव ठेवण्यापूर्वी सुधारीत अंदाजपत्रक करणे खात्याची जबाबदारी राहील. तसेच बिल अदायगी पूर्वी सल्लागाराकडून व त्रयस्त परिक्षण(थर्ड पार्टी ऑडीट) करणे आवश्यक राहील व उप मुख्य लेखापरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायाची उचित पूर्तता करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय कमांक :- १९ — वाडीभोकररोड ते पिरबाबा दर्गा ते भिवसननगर ते पाटील नगर ते सुदर्शन कॉलनी ते नकाणेरोड पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करण्यांचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुभाष जगताप — सभापती महोदय विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक 19, 20 व 21 या विषयांच्या कामाच्या तिन्हीं निविदा या एकाच ठेकेदाराला मिळाल्या आहेत.बांधकामाच्या नियमानुसार कामाची बिड कॅपेसिटी तपासुन घेण्यात यावी.

म. आयुक्त — सदर विषयाबाबत तांत्रिक आक्षेप आला असता तर छाननी मध्ये तो मुद्दा आला असता. सदर मुद्यावर आक्षेप घेण्यात आला नाही.निविदा प्रक्रियेमध्ये टेक्निकल लिफाफा मध्ये अपुर्ण कागदपत्र नसल्याकारणाने कमर्शिल बीड उघडण्यात आलेली आहेत. याबाबत उपमुख्यलेखापरिक्षक यांनी सदर कामाचे ठेकेदार यांचे PWD यांचेकडील रजिस्ट्रेशन रु 90 लक्ष चे आहे. तसेच सदर तिनही कामांची निविदा वेगवेगळी काढण्यात आलेली आहे. प्रत्येक काम हे रु 90 लक्षाच्या आत मधील आहे. त्याबाबत समितीने निर्णय घ्यावा.

म सुभाष जगताप — याबाबत या तिन्ही प्रस्तावाना माझा विरोध नोंदविण्यांत यावा.

म. सभापती — सदर विषयास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २० दिनांक २८/०२/२०१९**

धुळे मनपाचा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 90 दि. 19/09/2018 अन्वये वाडीभोकर रोड ते पिरबाबा दर्गा व भिवसन नगर ते पाटील नगर ते सुदर्शन कॉलनी ते नकाणे रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे रु. 75,79,985/-मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई-निविदा क्र. 501 दि.06/09/2018 अन्वये दि. 07/09/2018 रोजीचा दै. राजरंग टाईम्स / दिव्य मराठी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.19/10/2018 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | **श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** | **शे 14.99% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | समर्थ कन्सट्रक्शन | शे 12.43% कमीने | |
| 3 | गायत्री कन्सट्रक्शन | शे 9.77% कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री / **मे. श्री. स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय 14.99% कमी आहे व त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

वरील प्रमाणे आलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार श्री / मे.**श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय 14.99 % कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. या प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री सुभाष जगताप यांनी विरोध नोंदविलेला असुन त्यांचा विरोध नोंदवुन सरद प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**
सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २० साई बाबा मंगल कार्यालय ते रुपा माई शाळा ते शिवप्रताप यांचे घराच्या कॉर्नर पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करण्यांचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सदर विषयास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे मनपाचा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 90 दि. 19/09/2018 अन्वये साईबाबा मंगल कार्यलय ते रूपामाई हायस्कूल ते शिवप्रताप यांचे घराचा कॉर्नर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे रु.69,39,502/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्र. 501 दि.06/09/2018 अन्वये दि. 07/09/2018रोजीचा दै. राजरंग टाईम्स/दिव्य मराठी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि. 19/10/2018अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | अमृत डी. पाटील | शे 3.51% कमीने | |
| 2. | **श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** | **शे 14.99% कमीने** | **सर्वात कमी दर** |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | समर्थ कन्सट्रक्शन | शे 12.28% कमीने | |
| 4. | गायत्री कन्सट्रक्शन | शे 9.77% कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे. श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय 14.99 % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार श्री/ मे **श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय 14.99 % कमी दराने आलेल्या दरास मान्यता देण्यांत येत आहे.नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

या प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री सुभाष जगताप यांनी विरोध नोंदविलेला असुन त्यांचा विरोध नोंदवुन सरद प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**
सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २१ गोंदूररोड ते परिवहन कॉलनी ते साने गुरुजी कॉलनी ते योगिता प्रोव्हीजन घरापावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करण्यांचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सदर विषयास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २२ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे मनपाचा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 90 दि. 19/09/2018 अन्वये गोंदूर रोड ते परिवहन कॉलनी ते सानेगुरुजी ते योगिता प्रोव्हिजन पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे रु.63,85,559/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्र. 501 दि.06/09/2018 अन्वये दि.07/09/2018 रोजीचा दै. राजरंग टाईम्स / दिव्य मराठी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.19/10/2018 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | **शे 14.99% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २. | समर्थ कन्सट्रक्शन | शे 13.07% कमीने | |
| ३. | गायत्री कन्सट्रक्शन | शे 9.77% कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मेश्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय 14.99% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार श्री/मे श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय 14.99 % कमी दराने आलेल्या दरास मान्यता देण्यांत येत आहे.नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

या प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री सुभाष जगताप यांनी विरोध नोंदविलेला असुन त्यांचा विरोध नोंदवुन सरद प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**
सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २२ जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रभाग क्रं.३१ मध्ये आहिल्यादेवीनगर ते खळगे मेडिकल ते स्वराज्य जिमखाना पावेतो रस्ता कॉंक्रीटकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २३ दिनांक २८/०२/२०१९**

प्रभाग क्र 31 मध्ये नगरोत्थान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत जुना प्रभाग क्र. 31 मध्ये अहिल्यादेवी नगर ते खळगे मेडिकल ते स्वराज्य जिमखान्या पावेतो रस्ता कॉंक्रीटकरण निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे

उपरोक्त विषयानुसार कळविणेत येते कि, धुळे मनपा ठराव नं. 85 दि 28/11/2017 अन्वये प्रभाग क्र 31 मध्ये नगरोत्थान ( जिल्हास्तर ) योजने अंतर्गत जुना प्रभाग क्र. 31 मध्ये अहिल्यादेवी नगर ते खळगे मेडिकल ते स्वराज्य जिमखान्या पावेतो रस्ता कॉंक्रीटकरण करणे रु.38,26,872/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्र. 77(674) दि.17/02/2018 अन्वये दि. 18/12/2018 रोजीचा दै. लोकमत देशदूत या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.07/01/2019 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे. 1% कमीने | सर्वात कमी दर |
| 2 | सुकन्या एस. चौधरी | शे. 5% जास्तीने | |
| 3 | अे.के. सैफी | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री /मे. गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय 1% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून सबब कंत्राटदार मे.गायत्री कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.1% कमीने आलेल्या दरास मान्यता देण्यांत येतआहे.नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर**
सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे.**

विषय क्रमांक:- २३ जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रभाग क्रं.३० मध्ये विमलनगर कॉलनी बोर्डापासून तेअशोक कोरे पहेलवान यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २४ दिनांक : २८/०२/२०१९**

धुळे मनपा ठराव नं. 85 दि.28/11/2017अन्वये प्रभाग क्र 30 मध्ये नगरोत्थान ( जिल्हास्तर ) योजने अंतर्गत जुना प्रभाग क्र. 30 मध्ये विमल नगर कॉलनी बोर्ड पासून ते अशोक कोरे पेहलवान यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे रु.28,21,799/- मात्र खर्चास मंजुरीप्राप्त नुसार सदरचे कामाचे अंदाजपत्रकास म.शहर अभियंता यांच्या पत्र क्र.536 दि. 6/10/2018 अन्वये तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. सदर कामाची ई- निविदा क्र. 77(674) दि.17/12/2018 अन्वये दि. 18/12/2018 रोजीचा दै. लोकमत , देशदूत या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.10/01/2019 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | आस्था स्वयं रोजगार सेवा संस्था | शे. 2% जास्तीने | |
| 2 | मे.आदर्श कन्सट्रक्शन | शे. 14.99% कमीने | सर्वात कमी दर |
| 3 | जिग्नेश डी चव्हाण | शे. 10% कमीने | |
| 4 | अे के सैफी | अंदाजपत्रकीय दराने | |
| 5 | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे. 1% कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.आदर्श कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय 14.99% कमी आहे व त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे. आदर्श कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय 14.99% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मान्यता देण्यांत येतआहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:-२४ धुळे शहराच्या नवीन हद्दवाढ झालेल्या वाढीव क्षेत्राच्या जमीन वापर नकाशा तयार करण्यासाठी खाजगी संस्थेकडून ई निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २५ दिनांक २८/०२/२०१९**

तत्कालीन धुळे नगरपालिकेची स्थापना १८६० साली झाली असून धुळे मनपाची स्थापना ३० जून २००३ रोजी झालेली आहे.त्यात धुळे मनपाचे क्षेत्र ४६.४६ चौ. कि. मी. इतके आहे. तसेच २०११ चे जनगणनेनुसार ३,७५,०७६ इतकी लोकसंख्या आहे.

धुळे शहराची नवीन हद्दवाढ शासनाचे राजपत्र दि.०५/०१/२०१८ रोजी मंजूर झाली असून त्यात खालील प्रमाणे ११ गावाचे एकुण क्षेत्रफळ ५४.६२ चौ.कि.मी.समाविष्ट झालेले आहे.

तसेच धुळे शहराची विकास योजना ही शासनाचे निर्णय क्रं.डिपीएस १०१२/५२६ (न) पुर्नबांधणी क्रं. ६२/प्र.क्र.१०६/१२/नवि-९ दि.२८/१२/२०१२ अन्वये भागश: मंजूर केली असून तसेच प्रारुप विकास योजना धुळे (दुसरी सुधारीत)ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१)अन्वये शासन निर्णय क्र. टि पी.एस.२०१२/५२६(न) पुर्नबांधण क्रं.६२/प्र.क्र. १०६ नवि ९ दि.३ जुलै २०१५ उक्त नुसार धुळे शहराची नव्याने झालेली हद्दीवाढीतील गावाचे क्षेत्राचा विकास योजना आराखडा तयार करणे आवश्यक आहे. परंतु याआधी नव्याने हद्दीवाढ झालेल्या गांवाचा Existing land use चे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्यातील रहिवास क्षेत्र व वाणिज्य क्षेत्र झाले. निम सार्व. क्षेत्र इत्यादीचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. सदरचे कार्यवाही हे खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने धुळे मनपा वाढीव क्षेत्राचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५अन्वये अस्तित्वातील जमीन वापर नकाशा ( Existing land use) तयार करुन विद्यमान जमीन वापर नकाशा नगररचना विभागाकडून मंजुरी मिळविणे व क्षेत्रफळाचे तपशील सादर करणे तसेच रस्त्याचे जमीन योजना भूमिअभिलेख कार्यालय धुळे कडून प्रमाणित करणे व त्याबाबतचे प्रस्तावित नकाशे उपलब्ध करुन देणे यासाठी सन २०१८-१९ या वार्षिक अंदाजपत्रकात २ कोटी करण्यांत आलेली आहे.

जमीन वापर नकाशा तयार करण्याकामी ई निविदा क्रं.४१ २०१८-१९ दि. २६/७/२०१८ रोजी ई निविदा मागविली होती. सदर निविदाची अंतिम तारीख दि. २८/८/२०१८ पर्यत होती. त्याअनुषंगाने विहीत मुदतीत प्रसिध्द ई निविदानुसार प्राप्त झालेल्या ई निविदाची इकडील कार्यालयीन पत्र क्रं. धुमपा/नर/४५५दि. २९/८/२०१८ अन्वये तांत्रिक लिफाफा उघडण्याबाबत विनंती केली असता त्यास मान्यता देण्यांत आली त्यानुषंगाने दि.१/९/२०१८ राजी तांत्रिक लिफाफा उघडण्याबाबत कार्यवाही केली असता एकुण ५ ई निविदा प्राप्त झाल्या असून त्यांची नांवे खालील प्रमाणे ...

१) आरोटे योगेश डी.
२) अक्षय इंजिनिअर्स
३) अक्षय एस. पवार
४) एच.टी. जाधव ॲण्ड असोस.
५) गुंजाळ ॲण्ड असोस.

उपरोक्त ई निविदेतील नमूद तांत्रिक लिफाप-यातील १ ते १८ मुद्दयात नमूद मुद्दयाबाबत छाननी केली असता गुंजाळ ॲण्ड असोस. व एच.टी. जाधव ॲण्ड असोसि. या निविदाधारकांचे कागदपत्राची पूर्तता झालेली नाही.

त्यानुसार दोन निविदा धारक यांना अपात्र ठरविणेत आलेले असून तसेच ३ निविदाधारक पात्र असून त्यांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१) आरोटे योगेश डी.
२) अक्षय एस. पवार

३) अक्षय इंजिनिअर्स

प्रस्तुत प्रकरणात दि.२६/१०/२०१८ रोजी पात्र ३ निविदाधारकांचे वाणिज्य निविदा उघडण्या असता पात्र ३ निविदाधारकांचे खालील प्रमाणे टेंडर रक्कम भरलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| १) अक्षय इंजिनिअर्स | - २,१३,६९,२२०.०० रुपये |
| २) योगेश आरोटे | - १,९९,७७,७५०.०० रुपये |
| ३) अक्षय एस. पवार | - २,२१,६९,८००.०० रुपये |

इकडील कार्यालयीन पत्र जा.क्रं. धुपा/नर/६०६ दि. ३०/१०/२०१८ अन्वये सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. योगेश आरोटे रा. नाशिक यांनी त्यांनी सादर केलेले दरात तडजोड करण्यासाठी दि.३०/१०/२०१८रोजी उपस्थित राहणेबाबत कळविले होते. त्यानुसार श्री.योगेश आरोटे यांनी दि. ३०/१०/२०१८ रोजी मा.आयुक्त सा ो.यांचे दालनात समक्ष चर्चा करुन चर्चेअंती त्यांनी दर कमी करुन दि.३०/१०/२०१८ रोजी पत्र दिलेले आहेत त्यात खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| | योगेश आरोटे यांचे दर | डी.एस.आर (शासकीय दरसूची) |
|---|---|---|
| १) रहिवासी क्षेत्रासाठी | १५,३००/- | १६,८३३ |
| २) खुली जागा शेतीसाठी मोकळी जागा व इतर संलग्न वापर | २२८५/- | ४२०८/- |
| ३) जमीन योजना प्रामणिकृत करण्यासाठी ( रस्ते) | ९५००/- | २९१६९/- |

इतर महानगरपालिकांच्या दरांची तुलना केली असता श्री.योगेश आरोटे यांनी आज रोजी दिलेला सरासरी दर ३२५५.५०/-प्रमाणे सर्वात कमी दर आहेत.त्यामुळे सदर दर मंजुरीबाबत सदरचा विषय मे.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव व येणा-या संभाव्य खर्चास मंजुरीसाठी ठेवण्यात निर्णयास्तव सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त सादर झालेला कार्यालयीन अहवाल पाहता श्री योगेश आरोटे यांचे सर्वात कमी आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

कार्यादेश देण्यापुर्वी म. उपमुख्यलेखापरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रयानुसार उचीत पुर्तता करावी. तसेच जो पर्यंत नियमीत अथवा पुर्नयोजनाने या कामासाठी तरतुद केली जात नाही. तो पर्यंत काम सुरु करु नये.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २५ — १४ व्या वित्तआयोग योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या वाहनावर जी.पी.एस. प्रणाली कार्यान्वीत करणेबाबतआलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २६ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे महानगरपालिका उक्त शासन निर्णय दि.१० नोव्हें. २०१७ अन्वये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रक्कम रु.२५.८५१५ कोटी किमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय दि.३/८/२०१५ अन्वये १४ वा वित्त आयोगाच्या अंतर्गत प्राप्त निधी करीता विनियोजनाच्या बाबत निर्देश दिलेले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद (३) १अ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेकरीता प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आयुक्त महानगरपालिका प्रदान करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद II (I) ब मधील नमुद तरतुदीनुसार किमान ५०% खर्च II (I) अ मधील तरतुदीकरीता ५०% खर्च करणे अपेक्षीत आहे.

१४ वा केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत खालील प्रमाणे धुळे महानगरपालिकेकरीता आर्थिक वर्षनिहाय निधी प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त निधी | ५०% घनकचऱ्यासाठी खर्च |
|---|---|---|---|
| १ | सन २०१५-१६ | १०३८८२८२० | ५१९४१४१० |
| २ | सन २०१६-१७ | १४०३२२१८४ | ७०१६१०९२ |
| ३ | सन २०१७-१८ | ८०७५१२७३ | ४०३७५६३८ |
| ४ | सन २०१८-१९ | ३४४६०६४५८ | १७२३०३२२९ |
| | एकुण :- | ६६९५६२७३५ | ३३४७८१३६९ |

धुळे महानगरपालिकेस आरोग्य विभागाअंतर्गत शासन निर्णय दि.३/८/२०१५ मधील परिच्छेद II (I) अ तरतुदीनुसार रक्कम रु.११,७५,८४,३६९/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता अदा करण्यात आलेली आहे.

धुळे महानगरपालिकेस उक्त शासन निर्णय दि.१० नोव्हें.२०१७ मधील प्रशासकीय मान्यता आदेशानुसार ॲटो टिपर्स संख्या ७९ तसेच यापुर्वी मनपाने खरेदी केलेल्या १० अश्या एकुण ८९ वाहनांकरीता बाह्य यंत्रणेमार्फत कचरा संकलन व वाहतुकीसाठी निविदा प्रक्रिया करण्यात येऊन अंतिम टप्पयात आहे सदर वाहनांकरीता प्रत्याक्षिक देखरेख (रियल टाईम मॉनिटरींग)करणेसाठी जी.पी.एस. प्रणालीची आवश्यकता असल्याने व केंद्र शासनाच्या आदेशानुसारजी.पी.एस.प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता बी.एस.एन.एल विभागाने उक्त पत्र दि.५/१/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले दरानुसार रक्कम रु.१८,९०,३६०/-एका वर्षाकरीता खर्च रक्कम रु.१८,९०,३६०/-खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर खर्च हा शासनाच्या निर्देशानुसार विना निविदा करुन बी.एस.एन.एल. दुरसंचारविभाग धुळे यांच्यामार्फत जी.पी.एस.प्रणाली कार्यान्वीत करण्यात येणार आहे. त्याकरीता सदरची रक्कम करारनाम्यानुसार (अग्रीम) आगाऊ देणे आवश्यक आहे.

तरी सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) २ अन्वये कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २६ धुळे मनपा हदीतील घनकचरा संकलन व वाहतूक व व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन करुन वाहतूक करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २७ दिनांक : २८/०२/२०१९**

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्व.म.अ.-2017/प्र.क्र.106/नवि-34 दि. 10 नोव्हे 2017 अन्वये धुळे महानगरपालिकेच्या रक्कम रु. 25.8515 कोटी किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.महाराष्ट्र जिवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्प जा.क्र./मुअ/ नाशिक/ता.शा-3/ता.मा/995/2017 दि.26/5/2017 अन्वये अटी व शर्ती नमुद करुन रक्कम रु. 25,85,15,237/-करीता तांत्रिक मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय दि. 10नोव्हेंबर 2017 मध्ये नमुद केलेल्या विवरणपत्रात चार चाकी ॲटो टिप्पर्स संख्या-79 करीता रक्कम रु. 4,93,75,000/- करीता मान्यता दिलेली आहे. धुळे महानगरपालिका घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पाच्या मंजुर घनकचरा संकलन व वाहन करीता वाहनाचे काम वाहय यंत्रणेमार्फत 3 वर्षाकरीता महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 72 ब अन्वये मे. महासभा दि. 19/10/2018 ठराव क्र. 146 अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदरची निविदा 168 TPDकचरा शहरात निर्माण होईल असा अंदाज करुन 3 वर्षाकरीता रक्कम रु.17,79,16,914/- करीता ई-निविदेव्दारे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतूक व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वाहन कामाची ई-निविदा सुचना क्र. 80/2018-19 प्रसिध्द करण्यात आली असता सदर निविदेत एकुण 3 निविदा धारकांनी भाग घेवून त्यांचे तांत्रीक लिफाफा उघडुन दि. 6/2/2019 रोजी वित्तीय लिफाफा (दरपत्रक) उघडण्यात आला असता त्यात खालील प्रति मे. टन प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | निविदा धाकाचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | वॉटरग्रेस प्रोडक्टस नाशिक | 918.00 |
| 2. | रिलायबल एजन्सी | 1071.49 |
| 3. | भारत विकास ग्रुप कंपनी | 1550.00 |

तरी उक्त प्राप्त झालेल्या निविदा दरापैकी सर्वात कमी दर वॉटरग्रेस प्रॉडक्टस यांचे प्रति मे.टन रु. 918.00/- प्राप्त झाले असुन सदर दर हे निविदा स्पर्धेतील कमी दराचे असल्याने सदर दर मंजुर करुन मे. स्थायी समितीपुढे सादर करण्याबाबत अहवाल सादर केला असता त्यावर मुख्य लेखा अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केला असता लेखापाल यांनी सहा. सार्व. आरोग्य अधिकारी यांनी अहवालात नमूद केल्याप्रमाणे आलेल्या दरांमध्ये वॉटरग्रेस प्रॉडक्टस यांचे दर न्यूनतम असल्याने त्यांचे दर मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर करण्याबाबत शिफारस केलेली आहे. तसेच मुख्य लेखा अधिकारी यांनी लेखापाल यांच्या शिफारशीशी सहमती दर्शवून वॉटरग्रेस प्रॉडक्टस यांचे सर्वात कमी दर रक्कम रु.918 मंजुर

करण्यास हरकत नाही व तसा करारनामा करतांना समितीची मान्यता घेणे उचित राहील असा अहवाल स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम कलम ७३अन्वये प्राप्त निविदा पैकी बॉटरग्रेस प्रोडक्टस् यांची सर्वात कमी दराच्या आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत म.उपमुख्य लेखापरीक्षक यांनी दिलेल्या अधिप्रायांची उचीत पुर्तता संबंधीत विभागाने करावी.संबंधित संस्थेकडून नियमानुसार योग्य तो अटी शर्तीचा लेखी करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- २७ धुळे महानगरपालिकेस स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील आवश्यक असलेली 1)Waste Receiving , Pre-sorting Area & Windrow Pad 2) Leachate Holding Tank 3) Sheds for Compost Plant and Materialrecovery facility 4)Drainage Works 5) Office 6)Toilets 7) Weigh Bridge 8)Rest Room तदनुषंगिक कामे करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक २८ दिनांक २८/०२/२०१९**

धुळे महानगरपालिकेस स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील आवश्यक असलेली 1) Waste Receiving ,Pre-sorting Area & Windrow Pad 2)Leachate Holding Tank 3)Sheds forCompost Plant and Materialrecovery facility 4)Drainage Works 5)Office 6)Toilets 7)Weigh Bridge 8)Rest Room तदनुषंगिक कामे करणेबाबत.

महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.स्वमअ-2017/प्र.क्र.106/नवि-34 दि.10 नोव्हेंबर 2017अन्वये महानगरपालिकेच्या रुपये 25.8515 कोटी किमतीच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेनुसार रुपये 25.8515 कोटी खर्चाच्या कामांना मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

उक्त प्रकल्पातील कामांपैकी स्थापत्य 8 कामेअसलेली (1)Waste Receiving, Pre-sorting Area & Windrow Pad2)Leachate Holding Tank3) Sheds for Compost Plant and Material recovery facility4)Drainage Works5)Office 6) Toilets7)Weigh Bridge8)Rest Room) कामांची ई-निविदा सूचना क्र.38 नुसार दि.13/07/2018 रोजी दै.वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.04/09/2018 रोजी उघडण्यात आला त्यात 3 निविदा विहित मुदतीत प्राप्त झाल्या होत्या. वरील 3 पैकी ठेकेदार समीर इंटरप्रायझेस यांनी Professional Tax Certificate, Audit Report व Litigation प्रमाणपत्र जोडलेले नाही. उक्त काम शासन निर्णयानुसार तात्काळ सुरु करणे आवश्यक आहे.

तीनही निविदा धारक यांना धुळे महानगरपालिका पत्र जाक्र.धुमपा/बां.वि/472/दि. 05/10/2018 नुसार सदर निविदेच्या तांत्रिक लिफाफा मधील कागदपत्रांचे हरकत नोंदविण्याबाबत दि.08/10/2018 रोजी सकाळी 11.00 वाजेपावेतो कळविण्यात आले होते.तथापि कोणीही हरकत नोंदविलेली नसल्याने दि.दि.15/10/2018 रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आला.

उक्त B2 निविदापद्धतीत खालीलप्रमाणे 3 निविदाधारकांनी दर नमूद केलेले आहेत.

1) श्री.मिलिंद मुडावदकर- 30289737.75- L1 (कमीने 13%)
2) मे.समीरइंटरप्रायझेस - 31228005.17 – L2 (कमीने 10.30%)
3) मे.गायत्री कन्स. - 32124389.05 – L3 (कमीने7.73%)

उपरोक्त निविदेत श्री.मिलिंद मुडावदकर यांची सर्वात कमी रक्कमेची निविदा असून सदर निविदा दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अन्वये मान्यता देण्यात येत आहे.याबाबत यांचेकडून आवश्यक तो करारनामा करुन घेण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-**x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक : ०१/०३/२०१९**
**वेळ सकाळी ११-३० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शुक्रवार दिनांक ०१/०३/२०१९ रोजी सकाळी ११-३० वाजता मा. **श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमतीपाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल बसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्रीमती. अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ३ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. सुभाष सुकलाल जगताप यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक ०१/०३/२०१९**

सन्मा. सदस्य श्री.सुभाष सुकलाल जगताप यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- २९ — अमृत अभियांनाअंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्रं.1 साठी प्राप्त दराचा विचार करुन मे. एन.पी. पटेल आणि कंपनी, यांचा देकार 6.99% जादा दराने स्विकारुन मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, अमृत अभियाना अंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्रमांक १ साठी निविदा दर मंजुरी साठी विषय आलेला आहे. यापुर्वी या कामासाठी याचिका दाखल करणेत आलेली होती. नंतर सदर याचिका काढुन घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाची माहिती जिवन प्राधिकरणाकडे आहे. फक्त या विषयाची टिपणी या ठिकाणी आलेली आहे. सदर प्रकल्पात कामाची काय काय माहिती आहे. इस्टीमेट काय आहे या बाबतची माहिती या ठिकाणी उपलब्ध नाही. सदर निविदा ही ६.९९ % जादा दराने म्हणजे जवळ-जवळ ७ कोटी रुपये जास्तीचे द्यावे लागणार आहेत. आम्हाला या विषयाची माहिती घेणेसाठी पुरेसा वेळ मिळावा तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

म. सुरेखा उगले — सदरचा मलनिस्सारण योजनेचा विषय धुळे शहरासाठी आवश्यक आहे.तो मंजुर करणेत यावा.

म. अमीन पटेल — अमृत योजनेमध्ये भुमिगत गटार योजनेच्या विषयाला मान्यता मिळालेली असुन पहिल्या टप्पयाला कामाची सुरवात होणार आहे.आपली जे १३६ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना आहे. त्या योजनेमधुन पेठ भागात काम झालेले नाही. मग दोन्ही योजनेचे काम आमच्या भागात होणार की नाही . माझ्या भागात अजुनपर्यंत गटारीचे काम झालेले नाही. आम्हाला या याबाबत स्पष्टीकरण मिळावे. तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

म. नागसेन बोरसे — अमृत योजने अंतर्गत भुमिगत गटारीची योजना शासनाने पुर्ण शहरासाठी मंजुर केली असुन ती पुर्ण शहरासाठी राबविली जाणार आहे. सदर योजनेचे काम पहिल्या टप्पयात देवपुर भागात काम होणार असुन आणि दुसऱ्या टप्यामध्ये शहरासाठी ही योजना राबविली जाणार आहे. सदर योजनेची मला माहिती व अभ्यास करणेसाठी हा विषय तहकुब ठेवणेत यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या मागणी नुसार सदरचा प्रस्ताव व सभा तहकुब ठेवणेत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**शनिवार दिनांक : ०२/०३/२०१९**
**वेळ संध्याकाळी ५-००  वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा क्रमांक ६आज शनिवार दिनांक ०२/०३/२०१९ रोजी संध्याकाळी ५.00 वाजता मा.श्री युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १५ | पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री  शिवशंकर निकम | कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. जळगाव |
| ३ | श्री.  विजयकुमार सुर्यवंशी | उपविभागीय अभियंता म.जी.प्रा.धुळे |
| ४ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

मा. सभापती सन्मा. सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज

सन्मा.सदस्य श्री. सुभाष सुकलाल जगताप यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक ०२/०३/२०१९**

सन्मा. सदस्य श्री.सुभाष सुकलाल जगताप यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- 29 अमृत अभियांनाअंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्रं.१साठी प्राप्त दराचा विचार करुन मे.एन.पी. पटेल आणि कंपनी,यांचा देकार ६.९९% जादा दराने स्विकारुन मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुरेखा उगले सभापती महोदय सदर भुमिगत गटारीची जी योजना शहराच्या दृष्टीने महत्वाची आहे. आम्ही सभागृहातील नविन सदस्य आहोत या साठी योजनेबाबतची माहिती सभागृहात देण्यात यावी.

म. सुर्यवंशी साहेब धुळे शहराची भुमिगत गटार योजना या याजनेचे अंदाजपत्रक हे सन 2016 आणि 2017 या DSR रेट वर आपण मंजुरी दिलेली आहे. हे जे टेंडर काढलेले आहे. हे 6.99 % जादा दर त्या DSR रेट नुसार आलेला आहे. आलेले निविदा दर 133.38 कोटी सन 2016-17 या टेंडर रेट वर आहे. भुयारी गटार योजना अमृत योजनेतुन मंजुर झालेली आहे या जोजने अंतर्गत देवपूर भाग आणि धुळे असे म्हणजे एक उत्तर झोन आणि दक्षिण झेन या आपल्या पहिल्या टप्पयामध्ये उत्तर झोन घेतला आहे. देवपुर भाग आहे. देवपूर भागाची सर्व कनेक्शन सिस्टिम आणि दक्षिण जो भाग आहे. या दक्षिण भागाची जी जुनी ड्रेनेज सिस्टिम टाकलेली आहे त्या ड्रेनेज सिस्टिमला 1 मेनलाईन असे करुन आपण ऑक्सीडेशन पॉईट त्या ठिकाणी दोन इस्टीमेट पॉईट आपण तयार करणार आहोत. एक देवपुर भागासाठी आणि एक जुन्या धुळयासाठी एक असे तयार करणेत येणार आहे.

म. नागसेन बोरसे आपण हा विषय प्रस्तावाची माहिती नसल्याने तहकुब केला होता. या कामी 6.99 % जास्तीने दर आलेले आहेत. सदर दर 2016-17 च्या डी.एस.आर रेट प्रमाणे आहेत. आजच्या

तुलनेत ते 12.40% कमीने आहे. हा विषय बघितला तर 24 कोटी 20 लाख रुपयांचा मनपा चा आर्थिक फायदा आहे. विषय मंजुर करणेस हरकत नाही.

म. संतोष खताळ — भुयारी गटारी योजनेचा हा विषय धुळे शहराच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन महत्वाचा आहे. या कामाची निविदा 6.99 % जास्तीने आलेले आहे. आत पर्यंत कामाच्या निविदा ह्या कमी दराने येत होत्या तरी या बाबत खुलासा करणेत यावा.

म. सुरेखा उगले — भुयारी गटार योजना म.जी. प्रा. ने तयार केली आहे. आज सदर कामाचे निविदा दर 6.99 % जास्तीने आले आहे. याबाबत म.जी.प्रा. चे अधिकारी यांनी खुलासा करावा.

म. अमीन पटेल — भुमिगत गटारी योजनेचे निविदा दर 6.99% जास्तीने आलेले आहेत. भविष्यात आम्हा नगरसेवकांवर कोणत्याही प्रकारची रिकव्हरी व्हायला नको. सदर विषय मंजुर करावा.

म. सुर्यवंशी साहेब — तुलनात्मक दृष्टया मे. एन. पी. पटेल अँड कंपनी यांचे 6.99% जादाचे दर सर्वात कमी आहेत. प्राप्त दरानुसार निविदा रक्कम रुपये 133,38,03,404./- इतकी येत असून हि रक्कम मूळ रकमेपेक्षा रुपये 8,71,41,656/- इतकी जास्त आहे.प्राप्त दर 6.99% जादाचे सन 2016 च्या दरसूचीनुसार असून आजच्या दर सूचीनुसार हे दर 12.10% कमीचे येतात.

म. आयुक्त सो. — आपण भुयारी गटारीच्या योजने मधुन नदीच्या दोन्ही बाजुस पाईपलाईन टाकणार आहोत. याच टप्यात नाला अँरेंज करुन ते घान पाणी जे नदीत मिसळत होते ते बंद होणार आहे. ते घाण पाणी पुढे फिल्टरेशन पॉईंट पर्यंत जाईल आणि या मुळे नदीचे प्रदुषण थांबणार आहे. एकुण 350 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. सदर योजनेचे काम फेज वाईज मंजुरी दिली आहे. पहिला टप्पा पुर्ण झाल्यावर पुढील काम होणार आहे.

म. अमीन पटेल — शहरात व आमच्या भागात नाल्याचे पाणी निचत नाही. तरी या योजनेमध्ये सुविधा मिळावी.

म. आयुक्त — या योजनेत सदरचे काम समाविष्ट नसुन दुसऱ्या फेज मध्ये होणार आहे.

म. नागसेन बोरसे — हा विषय शहराच्या दृष्टीने महत्वाचा आहे. या कामाचे निविदा दर 6.99 % जास्तीने आले असले तरी आजच्या DSR रेट प्रमाणे 12.10% ने कमीने आहे. या मध्ये महानगरपालिकेचा फायदा आहे. सदर विषय मंजुर करणेस हरकत नाही.

म. सभापती — सदर योजना ही महत्वपुर्ण योजना आहे. यासुळे शहराच्या सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नाबरोबरच शहराचा विकास होणार आहे. तसेच सदर योजना मुदतीत पुर्ण झाल्यास दुसऱ्या टप्यासाठी निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे यास तातडीने मान्यता देणे गरजेचे आहे. सद्यस्थितीतील डीएसआर दरांचा विचार करता आलेले दर हे तुलनात्मकदृष्टया योग्य असल्याबाबत प्रशासनामार्फत कळविले आहे. तरी सदर विषयास प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीनुसार व सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक ०२/०३/२०१९

अमृत अभियानाअंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्रमांक १ साठी प्राप्त दराचा विचार करून निविदा मंजुरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्राप्त प्रस्तावानुसार मा. आयुक्त, धुळे

महानगरपालिका यांनी त्यांचे दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ च्या पत्राने दर मंजुरीसाठी विशेष सभा बोलावण्याची विनंती केली होती.

प्राप्त प्रस्तावावर प्रथमतः दिनांक १ मार्च २०१९ रोजी निर्णय घेण्यासाठी सभा बोलावण्यात आली होती. सदस्यांना पुरेसा तपशील उपलब्ध होऊ न शकल्यामुळे ही सभा तहकूब करण्यात आली होती. आज बोलाविलेल्या या सभेमध्ये या विषयावर सांगोपांग चर्चा झाली. योजनेतील उपांगे व योजनेचे अंदाजपत्रक याबाबत सविस्तर तपशिलाची सदस्यांकडून मागणी करण्यात आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता, जळगाव श्री एस. सी.निकम व उप अभियंता, धुळे श्री. विजयकुमार सूर्यवंशी यांनी योजनेबाबत व प्राप्त दराबाबत सविस्तर विश्लेषण केले.

धुळे महानगरपालिकेची भूमिगत मलनिस्सारण योजना टप्पा क्रमांक १ हा रुपये १३५,४८,१८,०००/-मंजूर असून मंजूर योजनेनुसार रक्कम रुपये.१२४,६६,६१,७४८/- साठी दिनांक २५/०१/२०१९ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली होती. फेर निविदा मागविण्यात आली असता खालील प्रमाणे पाच निविदा व दर प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे / ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | खिलारी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १५.००% जादा |
| २ | प्रगती कान्ष्ट्रक्षण | १४.००% जादा |
| ३ | एन पी पटेल & कंपनी | ६.९९% जादा |
| ४ | ड्रीम कान्ष्ट्रक्षण | ८.८६% जादा |
| ५ | एल. सी. इन्फ्रा. प्रोजेक्ट्स प्रा. लि. | १३.९९% जादा |

तुलनात्मकदृष्ट्या अनुक्रमांक तीन वरील मे. एन. पी. पटेल अँड कंपनी यांचे ६.९९% जादाचे दर सर्वात कमी आहेत. प्राप्त दरानुसार निविदा रक्कम रुपये. १३३,३८,०३,४०४/- इतकी येत असून हि रक्कम मूळ रकमेपेक्षा रुपये. ८,७१,४१,६५६/- इतकी जास्त आहे.

प्राप्त दर६.९९%जादाचे सन २०१६च्या दरसूचीनुसार असून आजच्या दर सूचीनुसार हे दर१२.१०% कमीचे येतात. त्यामुळे ते मंजूर करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक व अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने विनंती केल्याने सदरच्या दरास स्थायी समितीची मंजुरी देण्यात येत आहे. आयुक्तांनी ठरावानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास व शासनास अवगत करून शासनाच्या तांत्रिक समितीच्या मंजुरीसाठी कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कळवावे.

सर्वानुमते मंजुर

**सही/-x x x**

सभापती

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका धुळे

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**शनिवार दिनांक : ०२/०३/२०१९**
**वेळ संध्याकाळी ५-३० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा क्रमांक ७ आज शनिवार दिनांक ०२/०३/२०१९ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता **मा. श्री युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती. बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती. देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती. उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्रीमती. अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री शिवशंकर निकम | कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. जळगाव |
| ३ | श्री. विजयकुमार सुर्यवंशी | उपविभागीय अभियंता म.जी.प्रा.धुळे |
| ४ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

मा. सभापती सन्मा. सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेस कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरवातीस सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज** सन्मा. सदस्य श्री. सुभाष जगताप यांनी आजच्या सभेस उपस्थित राहु शकत नसल्याने रजा मंजुर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रमांक ३२ दिनांक ०२/०३/२०१९**

सन्मा.सदस्य श्री. सुभाष जगताप यांनी आजच्या सभेस उपस्थित राहु शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यात येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- ३० अमृत अभियानाअंतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहर पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त निविदा दरांचा विचार करुन निर्णय घेणे

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. आयुक्त सो., सभापती महोदय, सन्मा. सदस्य, आजची ही दुसरी विशेष सभा आयुक्तांच्या विनंतीनुसार बोलविण्यात आलेली आहे. आणि प्रथम जी निविदा १८ तारखेला पबलिश केलेली होती त्याची मुदत २७ तारखेला संपली होती. आणि २८ तारखेला आपण निविदा उघडणार होतो. परंतु २७ तारखेला आपल्या लक्षात आले की, दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. म्हणुन आपण त्याला दोन दिवसांची मुदतवाढ दिल्यामुळे २८ तारखेला त्या निविदा उघडता आलेल्या नाहीत. निविदेला मुदतवाढ दिल्यानंतर आपण कालावधीत त्याची मुदतवाढ दिलेली होती, आणि आपण दुपारी निविदा उघडून सभेपुढे ठेवणार होतो अशा प्रकारचे आपले नियोजन होते. तरी सुध्दा दोनच निविदा आलेल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका निर्णयानुसार त्या निविदा उघडता येतात असा निर्णय मंत्रालयातुन प्राप्त झालेला आहे. तथापी काल ई-टेंडरची वेबसाईट मध्ये अडचणी आल्यामुळे सर्व ज्या राज्य शासनाच्या वेबसाईटवरचे सर्व टेंडरची शेवटची तारीख होती. त्यांना एक दिवस वाढवून दिल्यामुळे आपल्या टेंडरची जेमतेमच मुदत वाढली होती. ती आज दुपारी १ वाजता संपली उदया दुपारी आपल्याला टेंडर उघडता आले असते. परंतु उदया सार्वजनिक सुट्टी अल्यामुळे ४ तारखेला दुपारी १ वाजता टेंडर उघडता येईल. त्यामुळे आजच्या सभेला दर सादर करता येणार नाही आणि आज सादर करता येत नसल्यामुळे अक्कलपाडा योजने संदभा्रत स्थायी समितीत निर्णय घेता येणार नाही तरीसुध्दा ४ तारखेला जरी सुट्टी असली तरी त्यादिवशी आपण निविदा उघडणार आहोत त्यादिवशी तांत्रिक लिफाफ्याच्या आधारावरुन छाननी करुन लगेच दुसऱ्या दिवशी ५ तारखेला सकाळी १० वाजता आपण लिफाफे उघडणार आहोत. माझी सभापती आणि सभागृहाला विनंती आहे आयुक्तांच्या विनंती वरुन ही सभा बोलविली आहे. ही सभा दिनांक०५/०३/२०१९ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करावी आणि पुन्हा भरवावी.

म. सभापती निविदेबाबतची प्रक्रिया सुरु असल्याने मा.आयुकत सो. यांच्या निवेदनानुसार सदर सभा दिनांक ०५/०३/२०१९ पर्यंत सकाळी ११.०० वाजेपावेतो तहकुब करण्यात येत आहे.सदर सभा मंगळवारी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**मंगळवार दिनांक : 05/03/2019**
**वेळ सकाळी 11-00 वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा क्रमांक 7 आज मंगळवार दिनांक 05/03/2019 रोजी सकाळी 11-00 वाजता **मा.श्री युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्रीमती. बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्रीमती. उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ७ | श्रीमती. देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ८ | श्रीमती. उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ९ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १० | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ११ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १२ | श्रीमती. अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १३ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ३ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. आयुक्त — अमृत अभियाना अंतर्गत अक्कलपाडा योजनेबाबत विनंती वरुन आजची सभा बोलविण्यात आली होती. परंतु आज पर्यंत निविदे बाबतची पुर्ण प्रक्रिया न करता आल्यामुळे स्थायी समिती सभे पुढे संपुर्ण तपशील सादर करता येऊ शकत नाही. या निविदा प्रक्रियेतील तांत्रिक व आर्थिक लिफाफे उघडण्यात आलेले आहेत.त्यावर अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करुन संपुर्ण परिपुर्ण प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करावयाचा आहे.यास विलंब लागणार असुन यासाठी आजची सभा दुपार पर्यंत तहकुब करणेस विनंती आहे.

म. सभापती निविदेबाबतची प्रक्रिया सुरु असल्याने मा.आयुक्त सो.यांच्या निवेदनानुसार सदर सभा दुपारी 5.00 वाजे पावेतो तहकुब करण्यात येत आहे. सदर तहकुब सभा 5.00 वाजता घेण्यात येईल.

सही/-X X X
सभापती
स्थायी समिती
धुळे महानगरपालिका धुळे.

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात धुळे**
**मंगळवार दिनांक : 05/03/2019**
**वेळ दुपारी 5-00 वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा क्रमांक 7 आज मंगळवार दिनांक 05/03/2019 रोजी दुपारी 5.00 वाजता मा. श्री युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती.पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री.बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री.पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती.बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री.खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती.उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती.देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती.उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | श्री.भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री.मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती.शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती.अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री शिवशंकर निकम | कार्यकारी अभियंता |
| ३ | श्री. विजयकुमार सुर्यवंशी | उपविभागीय अभियंता |
| ४ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ५ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- ३० — अमृत अभियानाअंतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहर पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त निविदा दरांचा विचार करुन निर्णय घेणे.

| | |
|---|---|
| म. नगरसचिव | म.नगरसचिव यांनी प्रशासनामार्फत प्राप्त कार्यालयीन अहवालाचे वाचन केले. |
| म. सुभाष जगताप | सन्मा.सभापती महोदय सदर विषयाबावत आम्ही सदस्य अनभिज्ञ आहोत.सदर विषया बाबतच्या टिपणीचे वाचन करण्यात आले आहे. सदर कामाची दर सुची कोणत्या वर्षाची आहे. 14% जास्तीने देता येईल का ? याबाबत माहिती देण्यात यावी. |
| म. आयुक्त सो. | अक्कलपाडयाची योजना शासनाने प्रकल्प मंजुर करुन करुन 14 तारखेला प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. ही मान्यता प्राप्त झाल्यानंतर आपण 16 तारखेला निविदा प्रसिध्द केली होती. ती निविदा प्रसिध्द करतांना शासनाच्या सर्वच योजनांच्या बाबतीमध्ये पाईपच्या दरा बद्दल राजय पातळीवर चर्चा झाली याच्यामध्ये पाईपचे दर मोठया प्रमाणावर वाढल्याची बाब निदर्शनास आली त्यात 10 ते 15 % दर जी.आय. पाईपचे दर वाढलेले आहेत. म्हणुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने 25 फेब्रुवारी 2019 रोजी एक ऑर्डर काढली आहे. त्या अनुषंगाने जे दर निश्चित करुन जे डी.एस.आर दर आहे त्या पेक्षा 10 ते 15 % पेक्षा जास्तीने आलेला दर नमुद करुन 8 जानेवारी 2019 पर्यंत विचारात घ्यावा. अशा प्रकारच्या त्यांच्या मुख्यकार्यालयाने सुचना पुर्ण महाराष्ट्रभर दिलेल्या आहेत. हे जे टेंडर काढले होते ते 119 कोटीचे टेंडर होते त्यात GST धरला नव्हता GST वेगळा केला होता. एकुण 119 कोटीचे ऐस्टीमेट आपण रिव्हाईज केले आणि ते 127 कोटीचे झालेले आहे.मुळ जे ऐस्टीमेंट आहे त्याच्याप्रमाणे आपल्याला 7 % जास्तीने निविदा प्राप्त झाली आहेत. पण नविन पाईपचे दर आपण जिवन प्राधिकरणाने ठरविले आहे. त्याचा विचार केला तर त्या दराप्रमाणे 127 कोटी रुपये त्याच्या अनुषंगाने 7 % जादा दराने येतात. म्हणुन हा प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे. आणि याच्यामध्ये हे 7% दर नमुद केले होत. ते कमी करण्याबाबत प्रशासनाने निविदा धारकाला बिनंती केलेली होती. ठेकेदाराने पाईपलाईनचे जे काम आहे त्यात फक्त पाईप खरेदी चे 90 कोटी चे काम आहे. आणी जी आय पाईप आहे. त्याचे दर कमी करता येणार नाही. असे कळविले आहे. जी. आय पाईपच्या गुणवत्तेत तडजोड करता येणे शक्य नाही. त्यामुळे या दरापेक्षा कमी दराने काम करता येणार नाही. . याच्यामध्ये ते जे दर दिलेले आहेत त्याप्रमाणे मंजुर करावे अशी विनंती केली आहे. त्यामुळे सदर विषय स्थायी समिती समोर आलेला आहे. यामध्ये स्थायी समितीने जरी आज दर मंजुर केले तरी सदर दर राज्यस्तरीय तांत्रिक समितीपुढे अंतिम मंजुरीसाठी सादर होणार आहेत. या समितीचे नगरविकास विभागाचे सचिव हे अध्यक्ष असतात व जिवन प्राधिकरणाचे सचिव व महानगरपालिका आयुक्त हे सदस्य असतात. त्याशिवाय इतरही सदस्य आहेत. या समितीची मंजुरी झाल्यानंतर कार्यदेशाची कार्यवाही करता येईल. |
| म. सुभाष जगताप | म.जी.प्रा. च्या नियमानुसार किती % पर्यंत जादा दराने निविदा देऊ शकतात. |
| म. आयुक्त सो. | आज पर्यत सर्वसाधारण पणे शासनाने अंदाजपत्रिय दरापेक्षा 8 ते 8.50 % जादा दराने निविदा दर मंजुर केलेले आहेत. आलेले पाईपचे दर हे सुधारीत दरानुसार 7% जादा दराने होत आहेत. |
| म. सुभाष जगताप | या कामी निगोशिएशन् केलेले आहे का? |
| म. आयुक्त सो. | निगोशिएशन् झालेले आहे. आज आपण दर उघडले |
| म. सुभाष जगताप | आलेले दर व मार्केटचे दर याचा तुलनात्मक विचार तथा पृथ्थकरण केलेले आहे का ? |
| म. आयुक्त सो. | तुलनात्मक विचार केलेला आहे. या आधी आपले 119 कोटीचे एस्टिमेंट होते ते आता 127 कोटी झालेले आहे. |
| म. सुभाष जगताप | याबाबत जादा दराच्या मंजुरी मुळे सदस्यांना त्रास होता कामा नये. व कोणत्याही स्वरुपाची रिकव्हरी निघु नये याबाबत दक्षता घ्यावी. |
| म. आयुक्त सो. | याबाबत नियमानुसार कार्यवाही व प्रक्रिया करण्यात येत आहे. |

म. सुभाष जगताप — जर या कामी दराचे पृथ्थकरण योग्य रित्या झाले असेल व आपल्या अहवालानुसार ते योग्य असतील तर मान्यता देण्यास हरकत नाही.

म. आयुक्त सो. — याबाबत अहवालात सर्व बाबी नमुद केलेल्या आहेत. सदर योजना ही अमृतअभियाना अंतर्गत असल्याने यात स्थायी समितीची मान्यता अंतिम नाही जर शासनाला दर मान्य नसतील तर शासन फेर निविदा काढण्याचा निर्णय सुध्दा घेऊ शकते. अंतिम मान्यता शासन स्तरावर होणार आहे.

म. सुभाष जगताप — या कामी दोनच निविदा प्राप्त आहेत. व 7% बाढीव दराने सदर निविदा दर आलेले आहेत. तथापी कार्यालयीन अहवालात या दोन्हींबाबींचे स्पष्टीकरण तथा खुलासा दिलेला आहे. त्यामुळे कार्यालयीन अहवालानुसार आलेल्या दरास मान्यता देण्यास आमची हारकत नाही.

म. संतोष खताळ — सदर योजना ही महत्वाची योजना आहे.आमच्या भाजप पक्षाच्या वचन नाम्यात आम्ही या योजनेच्या पुर्ततेसाठी वचन दिलेले होते.या योजनेमध्ये कोणत्या बाबींचा समावेश आहे. या बाबत खुलासा करावा.

म. आयुक्त सो. — ही योजना अक्कलपाडा उगम धरणापासुनची योजना आहे. याच्यामध्ये ९ मी. व्यासाच्या दोन जॅकवेल आहेत.त्याच्या मधुन पाणी येणार आहे.एरीगेशन चा जो भाग आहे त्या भागात फिल्टरेशन् प्लॅन्ट करवायाचा असल्याने त्या ठिकाणी महामंडळाने जागेला मंजुरी दिलेली आहे. आणि साधारण पणे १४०० mm व्यासाची पाईपलाईन तेथुन सुरु होऊन ती हनुमान टेकडी पर्यंत येणार आहे. आणि ती चक्करबर्डी पाण्याच्या टाकीपर्यंत जाणार आहे. हनुमान टेकडी ते चक्करबर्डी पाईपलाईन आपण या पुर्वीच टाकलेली आहे. ती पाईपलाईन योजनेसाठी वापरण्यात येणार आहे. आणि हनुमान टेकडी च्या अगोदर जो नगावंबारी कडे बायपास गेला आहे. त्या ठिकाणी जो एम.बी.आर वरुन आपल्या सर्व पाण्याच्या टाक्यांना पाणीपुरवठा होणार आहे.आणि शहरामधील सर्व टाक्यांमध्ये पाणी भरता येईल. आपल्या कडे अक्कलपाडया पासुन शहरापर्यंत उतार असल्यामुळे आपल्याला सर्व ठिकाणी ग्रॅव्हीटी ने पाणी मिळणार आहे.आणि त्यामुळे विज बीलात कमी होण्यास मदत होणार आहे.एकुण अक्कलपाडा योजनेचा ७० एम.एल.डी चा प्लॅन आहे.आपल्याला तापीच्या दिड पट पाणी अक्कलपाडा योजनेतुन मिळणार आहे.

म.अमिन पटेल — सदर योजनेचे काम श्री.घुले यांना देण्यात येणार आहे. तथापी त्यांनी यापुर्वी 136 कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अयोग्य केले असल्याने त्यांच्याबाबत मोठया प्रमाणावर तक्रारी झाल्या होत्या त्यामुळे सदरचे काम योग्य रितीने व्हावे याबाबत दक्षता घेण्यात यावी. आमच्या प्रभागात पाईप लाईन टाकण्यात आलेल्या आहेत. तथापी सदर पाईपलाईन जोडल्या न गेल्याने नागरीकांच्या मोठया प्रमाणावर तक्रारी आहेत. त्यामुळे या कामाच्या गुणवत्ते बाबत दक्षता घ्यावी.तसेच आपल्या शहरास तापी योजनेद्वारे पाणीपुरवठा होतो. परंतु सदर पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन कालबाह्य झाल्याने वांरवांर लिकेजेस व पाणी गळती होऊन पाणी पुरवठात व्यत्यय निर्माण होता.परिणामी ६-६ दिवस नागरिकांना पाणी मिळत नाही. तसेच जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढविणे व शिरपुर सारख्या ठिकाणी असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राप्रमाणे व्यवस्था करणे या साठी या योजनेत समावेश करुन कार्यवाही करावी.

म. नागसेन बोरसे — निवडणुक काळात आमच्या भाजप पक्षामार्फत नागरिकांना रोज पाणीपुरवठा करणेसाठी व यासाठी अक्कलपाडा ते हनुमान टेकडी पाईपलाईन टाकण्याच्या कामासाठी वचन नाम्यात जाहिर केलेले होते. त्या दृष्टीने या कामाच्या पुर्ततेकडे वाटचाल सुरु आहे. याचा आम्हाला आनंद आहे. या कामासाठी मा. मुख्यमंत्री साहेब, आपले संरक्षण राज्य मंत्री डॉ. सुभाषबाबा

भामरे तसेच जलसंपदा मंत्री मा.ना. गिरीषजी महाजन तसेच मा.ना. जयकुमारजी रावल आपले महानगर अध्यक्ष श्री अनुपभाई अग्रवाल यांनी सातत्याने पाठपुरावा करुन ही योजना अत्यंत कमी कालावधीत मंजुर करुन आणली यासाठी आयुक्त साहेबांचेही मोठे योगदान आहे. त्यांनी ही या कामी समक्ष पाठपुरावा करुन या कामास गती दिलेली आहे. अशी ही योजना आज मान्यतेसाठी सभागृहापुढे आलेली आहे.धुळे शहराचा पाण्याचा बिकट प्रश्न लक्षात घेता कार्यालयीन अहवालानुसार प्राप्त निविदा दरांना मान्यता द्यावी ही विनंती.

म. सभापती — अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना ही धुळे शहरासाठी अत्यंत महत्वपुर्ण योजना असुन या योजनेमुळे धुळे शहराचा पुढील ५० वर्षातील पाण्याचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर वीज बिलातील बचतीमुळे धुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा देखील होणार आहे. धुळे महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर आम्ही आमच्या वचननाम्यात धुळेकरांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत तातडीने कार्यवाही करणार असे जाहीर केले होते,त्यानुसार या महत्वाच्या कामासाठी तातडीने मा मुख्यमंत्री महोदय तसेच आपल्या धुळयाचे संरक्षण राज्यमंत्री मा.ना.सुभाषबाबा भामरे तसेच मा.ना.गिरीशभाऊ महाजन, आपले महानगराध्यक्ष मा.अनुपजी अग्रवाल व आपले महानगरपालिका आयुक्त श्री.सुधाकरजी देशमुख साहेब यांच्या प्रयत्नाने आज ही योजना सुरु होणार आहे. या योजनेसाठी आलेल्या निविदा दर हे 14.99 टक्के जास्तीने आहे. तथापी कार्यालयीन अहवालात नमुद केले नुसार नवीन पाईपलाईनच्या सुधारीत दराची तुलना करता ७ % जास्तीने आहे. शहराच्या दृष्टीने व भविष्याचा विचार करता सदर आलेल्या निविदा दरांना सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक ०५/०३/२०१९**

धुळे शहराच्या पाणीपुरवठा साठी केंद्र शासन पुरस्कृत शासन निर्णय क्र. बैठक- २०१९ / प्र.क्र. ६३ / नवि-३३ दि. १४/०२/२०१९ नुसार अमृत अभियाना अंतर्गत अक्कलपाडा धरण ते हनुमान टेकडी पावेतो पाईप लाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणे कामी प्रशासकीय मान्यता खर्च रु.१५३.१३ कोटी मात्र खर्चास शासनाकडून मंजुरी देण्यात आलेली आहे.

**केंद्र शासन निधी ५०%, राज्य शासन निधी २५% व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा हिस्सा) २५% असा योजनेचा आकृतीबंध आहे.**

सदरचे कामाचे अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग ( PMC ) मार्फत तयार करणेत आलेले आहे.सदर कामाचा अंदाजपत्रकास म. मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,नाशिक यांनी ता.मा.क्र./१६दि.०७/०२/२०१९ नुसार देण्यात आला आहे.

सदर कामाची ई- निविदा जा.क्र. ९३ दि.१७/०२/२०१९ नुसार दि. १८/०२/२०१९ रोजीचा दै.Hindustan Timesदै.लोकमत व दै. दिव्य मराठी ( राज्यस्तरीय ) या अंकात प्रसिद्ध केली आहे.

दि.०१/०३/२०१९ रोजी तपासणी केली असता फक्त दोनच निविदा धारकांनी भाग घेतल्या बाबत आढळून आले. उक्त दोन निविदा प्रथम निविदेच्या वेळी दोन प्राप्त निविदा असल्यास त्या उघडता येतील या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि. २९/०१/२०१९ च्या परिपत्रका नुसार स्पष्ट निर्देश असल्याने दोन निविदा उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

तांत्रिक लिफाफा दि.०४/०३/२०१९ रोजी उघडण्यात आला असून PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत तपासणी केलेली आहे. प्राप्त निविदांपैकी दोन्ही निविदा

धारकांची आवश्यक कागदपत्रे म.जी.प्रा. व मनपा मार्फत तपासण्यात आलेली आहे. कागदपत्र पूर्ण असल्याने दोन्ही निविदा धारक पात्र झाले असून त्यांचे व्यापारी लिफाफे दि.०५/०२/२०१९ रोजी उघडण्यात आले असून खालील तुलनात्मक तक्त्यात त्यांचे दर सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | निविदा रक्कम | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | आर.ए. घुले – पालघर | रु.११९३८०२८१३/- | रु.१३६६७८४७१६.३५/- | १४.४९% जास्तीने |
| २ | तेजस कन्सट्रक्शन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे | रु.११९३८०२८१३/- | रु.१५९८५०१८२१.२९/- | ३३.९०% जास्तीने |

तसेच तेजस कन्सट्रक्शन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांनी MEMORANDUM मधील दर भरतांना ३१.७०% दर भरले असून BOQ मध्ये रु.१५९८५०१८२१.२९/- म्हणजेच ३३.९०%जास्तीचे दर भरलेले आहे. त्यामुळे सदरचे दर ३३.९०%जास्तीचेच गृहीत धरलेले आहे.

सदरचे निविदा दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडील डी.एस.आर. नुसार असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे मुख्य अभियंता यांनी ठाणे(मुंबई) कार्यालयामार्फत दि.२५/०२/२०१९रोजी शुद्धीपत्रक काढून डी.आय. K-7पाईप चे सुधारित दर कळविलेले आहे.

सदर सुधारित दरा नुसार उक्त निविदेची मुल्यांकित किंमत रु. १२७६७२१५७९/- मात्र आलेली आहे.

वरील प्राप्त निविदा दरातील सर्वात कमी दराची निविदा श्री.आर.ए.घुले रु.१३६६७८४७१६.३५/- शे.१४.४९% जास्तीचे बाबत तुलना करता सदरचे दर मुल्यांकित किमती प्रमाणे शे.७% जास्तीचे आहेत.

उक्त प्रमाणे सदर कामासाठी सर्वात आलेले दर श्री. आर.ए.घुले, ठेकेदार, पालघर यांना वाटाघाटी साठी पा.पु.जा.क्र. / ८४९ दि. ०५/०३/२०१९ अन्वये पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार सदर ठेकेदाराने वाटाघाटी अंती निविदेत नमूद दर न्युनतम असून ते आणखी कमी करू शकत नसल्याबाबत व निविदेतील दर मान्य करणेची विनंती पत्र क्र. आरएजी / १०७५/ २०१९ दि. ०५/०३/२०१९ दिलेले आहे. सदरचे निर्णयार्थ स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहेत. स्थायी समितीच्या मंजुरी नंतर सदरचे दर मंजुरीसाठी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मंजुरी घेवून कार्यादेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.असा अहवाल स्थायी समिती समोर सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त सादर झालेला कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व सुचना लक्षात घेता सदर योजना ही धुळे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण योजना असून धुळे शहराचा पुढील ५० वर्षाचा पाण्याचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्याच बरोबर वीज बिलातील बचतीमुळे मनपाचाही आर्थिक फायदा होणार आहे. त्यामुळे या कामी आलेले श्री.आर.ए. घुले,पालघर यांचे आलेले निविदा दर १४.४९% जास्तीने असून याबाबत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडीलआलेल्या शुध्दीपत्रकातील डी.आय.K-7 पाईपचे दर सुधारीत केलेले आहेत. पाईपच्या वाढीव दरांचा विचार करुन तयार केलेल्या निविदेच्या मुल्यांकित किमतीचा विचार केल्यास प्राप्त निविदा दर शे.७% जादाचे आहेत. यामुळे श्री. आर.ए. घुले पालघर यांच्या सर्वात कमी आलेल्या निविदा दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

योजनेचे महत्व विचारात घेवुन तातडीने निर्णय घेण्यात आलेलाअसला तरी जर राज्य स्तरीय तांत्रिक समितीने तडजोडीने आणखी दर कमी केल्यास त्यानुसार आयुक्तांनी कार्यवाही करावी.

याकामी सदरचे दर अंतिम मंजुरीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी तांतडीने सादर करावे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक ८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृह, धुळे**
**दिनांक : ०८/०३/२०१९**
**वेळ:- दुपारी १२-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शुक्रवार दिनांक ०८/०३/२०१९ रोजी दुपारी १२-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | उदासी कशीश गुलशन | सदस्य |
| ११ | भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | अन्सारी सईदा.म इकबाल | सदस्या |
| १६ | पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ३ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ४ | श्री. गितेश सोनार | विद्युत अभियंता (करीता) |

मा. सभापती — सन्मा. सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**विषय क्रमांक:-३१ महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र जा.क्रं.अमृत 2019/प्र.क्र. 91/नवि33 दि. 7 मार्च 2019 च्याअनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत धुळे शहर (अक्कलपाडा) पाणीपुरवठा योजनेच्या निविदा दर मंजुरीबाबतचा ठराव क्रं. 33 दि.5/3/2019 चा विचार करुन निर्णय घेणे .**

म. नगरसचिव म. नगरसचिव सो. यांनी विषयाचे वाचन केले.

म. आयुक्त सो. धुळे शहरासाठी अत्यंत महत्वकांक्षी असलेला प्रकल्प अक्कलपाडा धरणातुन पाणीपुरवठा योजना धुळे करांचे खऱ्या अर्थाने स्वप्न आहे. आणि त्या स्वप्न पुर्ती साठी आपण सर्व मिळुन यासाठी खास प्रयत्न आणि धावपळ सुध्दा केलेली आहे. ते करत असतांना आपल्याला अगोदरची विकास कामी पुर्ण करण्याच्या अगोदर सदरची निविदा निघावी. शक्यतोवर याच्या आधी त्याचे कार्यादेश दिले जावे. अशा प्रकारचे आपण सर्वांनी प्रयत्न केले त्याच्यात महापालिका सभा असेल आपले सर्व पदाधिकारी नेते ही मंडळी असतील यांनी सर्वांनी याच्यामध्ये खास प्रयत्न करुन आपण याच्यासाठी प्रकल्प भुमिपुजन करण्यासाठी यशस्वी ठरलो आणि आपण 16 तारखेला या प्रकल्पाचे भुमिपुजन केलेले आहे. 18 तारखेला आपण निविदा मागविल्या निविदा मागवितांना आपल्याला शासनाने खासकरुन 10 दिवसाची मुदत दिली होती. 18 तारखेला निविदा उघडण्याआधी आपण दोन दिवसाची मुदत वाढ दिली या मुदत वाढीमध्ये आपल्या दोन निविदांमध्ये भर पडली नाही. सिस्टमला आपण एक दिवस वाढ करुन म्हणजे आपण 3 दिवसाची मुदतवाढ वाढवली. मात्र त्यामुळे एकही निविदा वाढलेली नाही. त्यामुळे जे 29 जानेवारी 2019 जे PWD चे सरक्युलर आहे आणि त्या मध्ये केंद्रीय रस्ता आयोगाच्या सुचना आहेत या दोन पाच निविदेचे जे उदाहरण आहे. अशा सुचना आल्यामुळे आपण त्या निविदा उघडल्या. त्या निविदा उघडल्यानंतर त्याच मुल्यांकन आपण केले होते. मुल्यांकन तातडीने करुन 5 तारखेला आपण स्थायी समिती समोर हा विषय ठेवला होता आणि स्थायी समिती समोर विषय ठेवल्यानंतर आपल्याला त्याचे अवलोकन केल्यानंतर आपल्याला आजच्या स्थायीच्या दारात वाढीव दराचा विचार करुन आपल्याला 20% याच्यामध्ये जरी 14.49 % जादा दर किमान दराच्या निविदेचे असले तर ते नविन पाईपच्या दरानुसार 7 % जास्त होतात अशा प्रकारचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने त्याच्यां मुल्यांकन अहवालात दिसुन येते. आणि आपल्याला याप्रमाणे स्थानिक अहवालात् अन्य दराबाबत प्रशासकिय मान्यता सुधारीत केली. पण आपण हा प्रस्ताव शासनाकडे सादर लगेचच केला असता शासनाने स्थानिक सदस्य सचिव महाराष्ट्रजिवन प्राधिकरण यांना पत्र दिले आहे. खरेतर आपल्याला पत्र दिलेले आहे. आपण त्याची प्रत दिलेली आहे. त्यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला असे लिहले आहे. उक्त विषयाच्या संदर्भात आयुक्त धुळे महानगरपालिका यांचे दि. 05/03/2019 चे पत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी अमृत अभियानाची PDMC म्हणुन संबधित लघुत्तम निविदाकाराशी राजयस्तरीय तांत्रिक समितीच्या वतीने वाटाघाटी करुन त्याबाबतचा अहवाल तसेच PDMC म्हणुन आपल्या अहवालासह सदर प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीसमोर सादर करण्यासाठी या विभागाकडे पाठवावा ही विनंती. त्यांना जे पत्र दिले आहे. त्याची प्रत आपल्याला दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे उपरोक्त दिनांक 5 मार्च 2019 च्या पत्रान्वये आपण पाठवलेल्या प्रस्तावासोबतच्या महानगरपालिकेच्या ठरावाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये निविदा किंमतीपेक्षा जादा भरावी लागणारी रक्कम महानगरपालिका कशी उभारणार याबाबत कोणताही उल्लेख दिसुन येत नाही. आपण या साठी उल्लेख केलेला नव्हता की पाईपलाईन वाढीचा खर्च आहे तो आपण स्विकारु शकत नाही. ती आपली क्षमता ही नाही असे तीन प्रश्न आपल्यासमोर होते आपण ती जबाबदारी

घेतली नव्हती पुढचे जे वाक्य टाकले आहे अशा या परिस्थितीत या योजनेच्या प्रशासकीय मंजुरीच्या आदेशामध्ये नमूद केल्यानुसार सदर भार महानगरपालिका स्विकारणार अशी धारणा आहे, ती कृपया राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीपुढे पक्की करावी. म्हणजे त्यांचे असे म्हणणे आहे की, 14.49% पुर्ण जी रक्कम आहे. त्याची पुर्ण जबाबदारी महानगरपालिका स्वता:च्या खर्चातुन स्विकारणार आहे. अर्थात यामुळे जवळ-जवळ 22 कोटीचा आपल्या भार पडणार आहे. 22 पैकी 12 कोटी एवढी 7% जास्तीच्या दराचे आणि 10 कोटी पाईपलाईन किमती च्या वाढीचे आणि आपण 10 कोटीचा विनाकारण भार फक्त 2 महिने आधी कार्यरत होण्यासाठी मागील 200 कोटीचा महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचा भार अशा परिस्थितीत विचार करुन आपल्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाही आणि म्हणुन आपण ही सभा बोलविली आहे. की जेणेकरुन आपण जर ही निविदा प्रक्रिया रद्द केली तर पुढे महाराष्ट्र प्राधिकरणाला पुन्हा ऐस्टिमेट करावे लागते. परत ते एस्टिमेट शासनाकडे मंजुरीला जाते तरच सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळेल आणि सुधारीत प्रशासकिय मान्यते प्रमाणे आपल्याला PMC ला पाठवायची आहे. त्यावेळी आपली अल्पमुदतीची निविदा होती. दिर्घ मुदतीच्या निविदेत वाढ झालेली आहे अशा परिस्थितीमध्ये हा भार आपण उचलु शकत नाही म्हणुन ही सभा बोलविण्यात आली आहे अशा परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी हा विषय स्थायी समिती समोर ठेवलेला आहे.

म. सुभाष जगताप — सभापती महोदय स्थायी समितीत जी माहिती दिली ती योग्य आहे. आणि सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत प्रशासकिय मंजुरी घेणे हेच उचित राहील. आणि जो डीएसआर असतो तो पुढच्या ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये बदल होत असतो. त्याच्यामुळे नविन दरात जो काही बदल होवुन प्रक्रिया लांबली तरी महिने-दोन महिने तरी त्यात आपल्याला काही जास्त दर द्यावा लागणार नाही. म्हणुन आपण सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत प्रशासकिय मान्यता घेणे उचित राहील.

म. अमिन पटेल — सभापती महोदय अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेबाबत निविदा दर 14.49% जास्तीचे होते. शासनाने हा वाढीव भार महानगरपालिके कडे टाकत आहे. अगोदरच महानगरपालिकेवर 150 कोटीचा बोजा आहे. वाढीव भार सोसण्याचमहानगरपालिकेची आर्थिक क्षमता नाही. हे आलेले टेंडर रद्द करुन फेर टेंडर काढण्यात यावे.

म. संतोष खताळ — अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेबाबत निविदा दराचा ठराव करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता जो निविदा दर 14.49% जास्तीने आलेला होता. तो रद्द करुन फेर निविदा काढणेस मंजुरी देण्यात यावी.

म. सुरेखा उगले — अक्कलपाडा योजना ही धुळे शहराच्या दृष्टीने व भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी महत्वाची योजना होती. धुळे महानगर पालिकेवर भाजपाची सत्ता आल्यानंतर या शहरातील नागरिकांना रोज व नियमित पाणी पुरवठा करण्याचे अभिवचन आम्ही दिलेले होते व त्या दृष्टीनेच या योजनेसाठी नामदार सुभाष बाबा भामरे तसेच महानगराध्यक्ष श्री अनुपजी अग्रवाल व शासनाच्या सहकार्याने ही योजना मंजूर करून आणली या योजनेचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू होते त्याच अनुषंगाने या कामासाठी ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

सदर आलेल्या जादाच्या निविदा मुळे महानगरपालिकेवर सुमारे 20 ते 22 कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर बोजा सहन करणे शक्य होणार नाही. तसेच पुनश्च निविदा प्रक्रिया केल्यानंतर सुद्धा नियमाप्रमाणे कोणीही ठेकेदार यात भाग घेऊ शकतो निकृष्ट काम करणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास या शहराच्या अशा महत्त्वपूर्ण योजनेचे काम देण्याची आमची व पक्षाची कोणतीही भूमिका नाही. त्यामुळे याबाबत मनपाच्या आर्थिक स्थितीचा

विचार करून सदरचा जादा दरामुळे येणारा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही. त्यामुळे सदरची निविदा रद्द करून फेर निविदा करावी ही विनंती.

म. नागसेन बोरसे सभापती महोदय दिनांक 5/03/2019 राजी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेच्या जास्तीच्या निविदा दरास मंजुरी देण्यात आली होती. त्यावेळेस वृत्तपत्रातुन श्री घुले यांची जादा दराची निविदा मंजुर केले असल्याचे वृत्तप्रसिध्द झाले आहे. वृत्तपत्रातुन सदर ठेकेदाराला संपुर्ण रक्कम आजच अदा करुन टाकली अशा स्वरुपाच्या विपर्यास करणा-या बातम्या प्रसिध्द झाल्या.

म. आयुक्त सो. वृत्तपत्राने काय छापावे हे त्यांचे वयक्तिक मत असते. परंतु त्यावेळेस आपल्याकडे कुठलाही पर्याय नव्हता. आपल्या समोर ज्या निविदा आलेल्या होत्या किमान दराच्या निविदेबाबत आपल्याला विचार करावा लागतो. राज्यशासनाच्या स्तरावरुन 8.50% दरापर्यंत निविदा विचारात घेतल्या जातात. आपण जर निविदा नाकारली असती तरी न्यायालयीन प्रक्रियेत प्रकरणे उद्भवतात अशा परिस्थितीत आपल्याला जो ठेकेदार आलेला आहे. व तो कसा आहे याच्यावर विचार करण्याची संधी आपल्याला मिळाली नव्हती. आणि तो ठेकेदारा बद्दल सर्वांचे मत अत्यंत वाईट आहे. त्या ठेकेदाराला आज पर्यंत ब्लॅकलिस्ट ठरला म्हणुन आपल्याला बाजुला ठेवता येत नाही. म्हणुन आपले दुर्दैव म्हणुन त्याची निविदा मंजुर झाली होती. असे आपण म्हणु तरी सुध्दा शासनाने आपल्यावर जी बंधने लादली आहेत ती बंधने आपल्याला स्विकारता येत नाही. असा कुठलाही स्थायी समितीने निर्णय घेतांना विचारपुर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

म. नागसेन बोरसे ही खुली निविदा होती या खुल्या निविदेत जे MJP चे निकष आहेत. या खुल्या निविदेमध्ये कोणीही निविदा भरु शकतो. यामध्ये जी काही पात्रता आहे त्या पात्रतेमध्ये बसणारा उमेदवार निविदा भरु शकतो. या मध्ये पक्षाचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे केलेले आरोप व आक्षेप हे तथ्यहीन आहेत. यापुर्वी या ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट कामाबाबत आम्ही आवाज उठविला होता. आणि आजही तेच आहे. जर ठेकेदाराने गुणवत्ता पुर्ण काम केले नाही. तर आम्ही निश्चितच आवाज उठवु. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना ही धुळे शहराच्या जिव्हाळयाची योजना आहे. यामध्ये भविष्यातील 50 वर्षाच्या पाण्याच्या समस्येचा विचार करुन योजना तयार करण्यात आलेली आहे. भविष्यातील लोकसंख्येचा विचार करुन पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे याबाबत सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेरनिविदा करावी.

**म.. सभापती** अक्कलपाडा योजनाही धुळे शहराच्या दृष्टीने व भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करावा लागु नये यासाठी महत्वाची योजना होती धुळे महानगरपालिकेवर भाजपाची सत्ता आल्यानंतर या शहरातील नागरीकांना दररोज व नियमीत पाणी पुरवठा करण्याचे अभिवचन आम्ही दिलेले होते व त्यादृष्टीनेच या योजनेसाठी माननीय नामदार सुभाषबाबा भामरे, माननीय नामदार श्री. गिरीशभाऊ महाजन, तसेच महानगराध्यक्ष श्री. अनुपभैय्या अग्रवाल यांच्या माध्यमातुन माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या व माननीय प्रधानसचिव मनिषा म्हैसकर मॅडम यांच्या सहकार्याने ही योजना मंजुर करुन आणली या योजनेचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु होते. त्याच अनुषंगाने या कामासाठी ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली सदर प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शीपणे नियमाप्रमाणे करण्यात आली यात दोन वेळा निविदा वेळा प्रसिध्द करुनही दोनच ठेकेदारांनी सहभाग नोंदविला यात ३३ टक्के व १४ टक्के अशी दरांची तफावत होती. या परिस्थितीत सर्वात कमी दराने आलेल्या ठेकेदाराचे दर विचारात घेणे आवश्यक होते अन्यथा पुढील अन्य तांत्रिक व कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागले असते. यात मागील पाणी पुरवठा योजनेचे ठेकेदार श्री. घुले यांनी सर्वात कमी दर नमुद केल्याने केवळ एक प्रक्रिया म्हणुन या आलेल्या निविदा दरांना प्राथमिक स्वरुपात स्थायी समिती मार्फत मान्यता देण्यात आली. याबाबतचा अंतिम निर्णय राज्यस्तरीय तांत्रिक समितीमार्फतच घेण्यात येणार होता. सदर आलेल्या जादाच्या निविदेमुळे महानगरपालिकेवर सुमारे २० ते २२ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर बोजा सहन करणे शक्य होणार नाही. तसेच पुनश्च निविदा प्रक्रिया केल्यानंतर सुध्दा नियमाप्रमाणे कोणीही ठेकेदार यात

भाग घेवु शकतो नित्कृष्ट काम करणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास या शहराच्या अशा महत्वपुर्ण योजनेचे काम देण्याची आमची व पक्षाची कोणतीही भुमिका नाही. यापुर्वीच्या धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचे काम यापुर्वीच्या राष्ट्रवादी व काँग्रेस आघाडीची काळात सुरु झालेले होते. सदरच्या कामाबाबत योग्य ती दक्षता न घेतल्याने कामाची गुणवत्ता अत्यंत वाईट झालेली होती. आमच्या पक्षाची सत्ता आल्यावर याबाबत सातत्याने मजीप्रा सोबत बैठका घेवुन पाणी पुरवठा योजनेतील जलकुंभांचे काम प्रगतीपथावर आलेले आहे.गुणवत्तेबाबत आमच्या कार्यकाळात कोणत्याही प्रकारची तडजोड स्विकारली जाणार नाही. यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता सदरच्या जादा दरामुळे होणारा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही.

अक्कलपाडा धरणातून पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त निविदा दरांचा विचार करून किमान दराची निविदा ठराव क्रमांक ३३ दिनांक ५ मार्च २०१९ रोजी मंजूर करण्यात आली होती. सदरच्या ठरावानुसार शासनास प्रस्ताव पाठविला असता ज्यादा चे निविदा दर म्हणजेच १४.४९ % चा भार महानगरपालिका सोसणार आहे अशी धारणा पक्की करावी अशा प्रकारचे शासनाने दिनांक ७ मार्च २०१९ च्या पत्राने कळविले आहे. वास्तविक पाहता पाईपचे दर वाढल्याने अंदाजपत्रकी दरात वाढ होत असून वाढीव दराचा भार महानगरपालिकेने सोसणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता परवडु शकत नाही. पाईपच्या वाढलेल्या किमतीमुळे वाढणारी दायित्व ९ कोटीच्या वर असून एकूण दायित्व २२ कोटी वाढणार आहे. धुळे महानगरपालिकेच्या अर्थव्यवस्थेत हे परवडणारे नाही. त्यामुळे वाढीव दरांचा विचार करून प्रकल्प व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊनच फेर निविदा प्रक्रिया राबविणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे. त्यामुळे यापूर्वी घेतलेला निविदा मंजूरीचा निर्णय रद्द करून याकामी सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारित दराने फेरनिविदा मागविणेस मंजुरी देण्यात येत आहे.याप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक ०८/०३/२०१९**

धुळे शहराच्या पाणीपुरवठा साठी केंद्र शासन पुरस्कृत शासन निर्णय क्र. बैठक- २०१९/ प्र.क्र. ६३ / नवि-३३ दि. १४/०२/२०१९ नुसार अमृत अभियाना अंतर्गत अक्कलपाडा धरण ते हनुमान टेकडी पावेतो पाईप लाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणे कामी प्रशासकीय मान्यता खर्च रु.१५३.१३ कोटी मात्र खर्चास शासनाकडुन मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामाची ई- निविदा जा.क्र. ९३ दि.१७/०२/२०१९ नुसार दि.१८/०२/२०१९ रोजीचा दै.Hindustan Times दै. लोकमत व दै. दिव्य मराठी ( राज्यस्तरीय ) या अंकात प्रसिद्ध केली आहे.

दि.०१/०३/२०१९ रोजी तपासणी केली असता फक्त दोनच निविदा धारकांनी भाग घेतल्या बाबत आढळुन आले.उक्त दोन निविदा प्रथम निविदेच्या वेळी दोन प्राप्त निविदा असल्यास त्या उघडता येतील या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि. २९/०१/२०१९ च्या परिपत्रका नुसार स्पष्ट निर्देश असल्याने दोन निविदा उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

प्राप्त निविदांपैकी दोन्ही निविदा धारकांची आवश्यक कागदपत्रे म.जी.प्रा. व मनपा मार्फत तपासण्यात आलेली आहे. कागदपत्र पूर्ण असल्याने दोन्ही निविदा धारक पात्र झाले असून त्यांचे व्यापारी लिफाफे दि.०५/०२/२०१९ रोजी उघडण्यात आले असून त्यात प्राप्त निविदा दरातील सर्वात कमी दराची निविदा श्री. आर.ए.घुले रु.१३६६७८४७१६.३५/- शे.१४.४९% जास्तीचे या निविदा दराच्या स्विकृतीस धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. ३३ दि. ५/३/२०१९ अन्वये मान्यता देण्यांत येवून सदरचा प्रस्ताव राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यांत आला होता.

याबाबत मा. सह सचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रं. अमृत २०१९ / प्र.क्र.९१/ नवि ३३ यांचेकडील दिनांक ७ मार्च २०१९ च्या पत्रानुसार प्रस्तावासोबत महानगरपालिका ठरावाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये निविदा किंमती पेक्षा जास्त भरावी लागणारी रक्कम महानगरपालिका कशी उभारणार याबाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही. या परिस्थितीत या योजनेच्या प्रशासकीय मंजूरीच्या आदेशात नमूद केल्यानुसार सदरचा जादाचा भार महानगरपालिका स्विकारणार अशी शासनाची धारणा असून ती पक्की करावी असे नमूद केले आहे. त्यानुसार शासनाचे पत्र व अधिकच्या भाराची रक्कम भरावी किंवा कसे याबाबत स्थायी समिती समोर सदरचा प्रस्ताव निर्णयासाठी सादर करण्यांत आला.

उक्त प्रस्ताव व मा.आयुक्त सो यांनी केलेले विवेचन व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अक्कलपाडा धरणातून पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त निविदा दरांचा विचार करून किमान दराची निविदा ठराव क्रमांक ३३ दिनांक ५ मार्च २०१९ रोजी मंजूर करण्यात आली होती. सदरच्या ठरावानुसार शासनास प्रस्ताव पाठविला असता ज्यादा चे निविदा दर म्हणजेच १४.४९ % चा भार महानगरपालिका सोसणार आहे अशी धारणा पक्की करावी अशा प्रकारचे शासनाने दिनांक ७ मार्च २०१९ च्या पत्राने कळविले आहे. वास्तविक पाहता पाईपचे दर वाढल्याने अंदाजपत्रकी दरात वाढ होत असून वाढीव दराचा भार महानगरपालिकेने सोसणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता परवडू शकत नाही. पाईपच्या वाढलेल्या किमतीमुळे वाढणारी दायित्व ९ कोटीच्या वर असून एकूण दायित्व २२कोटी वाढणार आहे.धुळे महानगरपालिकेच्या अर्थव्यवस्थेत हे परवडणारे नाही. त्यामुळे वाढीव दरांचा विचार करून प्रकल्प व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊनच फेर निविदा प्रक्रिया राबविणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे. त्यामुळे यापूर्वी घेतलेला निविदा मंजुरीचा निर्णय रद्द करून याकामी सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारित दराने फेरनिविदा मागविणेस मंजुरी देण्यात येत आहे.याप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ३०/०५/२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ३०/०५/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती,मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर देशमुख | आयुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ३ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. मधुकर एस. पवार | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| ११ | श्री. युवराज बाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| १२ | श्री. गितेश सोनार | विद्युत विभाग |
| १३ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मं |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक ३०/०५/२०१९**

सन्मा. सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :-३२ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
( दि. २७/२/२०१९, २८/२/२०१९, १/३/२०१९, २/३/२०१९, ५/३/२०१९, ८/३/२०१९)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त कायम करण्यात यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक ३०/०५/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २७/२/२०१९चे स्थायी समिती ठराव नंबर ०३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक २८/२/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ०४ ते २८ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक १/३/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर २९ व सदस्यांनी केलेल्या चर्चा क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक २/३/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ३० ते ३२ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक ५/३/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ३३ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक ८/३/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ३४ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :-३३ धुळे मनपा अंतर्गत नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.18 मध्ये राजू सिकलकर ते छोटा जमनागिरी नाला पावेतो संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक ३०/०५/२०१९**

धुळे मनपा अंतर्गत नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जा.क्र./क/कक्ष-५/ नपाप्र/ कावि/७७९/२०१८ दि.२५/१०/२०१८अन्वये प्र.क्र.१८ मध्ये राजू सिकलकर ते छोटा जमनागिरी नाला पावेतो संरक्षण भिंत बांधणे या कामास रु.५३,२७,२२४/- मात्र खर्चास मंजुरी प्राप्त नुसार सदरचे कामाचे ई-निविदा क्र.४६/दि.१८/१२/२०१८अन्वये दि.१८/१२/२०१८ रोजीच्या दैनिक दिव्य मराठी/मर्दर या अंकात प्रसिद्ध केली असता दि.१५/०१/२०१९ रोजी अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांनी निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अंबिका इन्फोस्ट्रक्चर | शे.१%जास्तीने | |
| २ | समर्थ कन्सट्रक्शन | शे.२%जास्तीने | |
| ३ | श्री.जिग्नेश किशोर खैरनार | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.जिग्नेश किशोर खैरनार यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यलयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार श्री.जिग्नेश किशोर खैरनार यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय कमांक:- ३४ अतिक्रमण विभागाकरिता म.न.पा.आरोग्य विभागाकडील बंद स्थितीत असलेले ट्रक्टर क्रं.एमएच18/ जी २०१८ तात्काळ दुरुस्ती करणेत आलेली असून त्यासाठी झालेला खर्च रु.66031/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक ३०/०५/२०१९**

अतिक्रमण निमूर्लनाची कार्यवाही करण्यासाठी वाहनाची वारवांर गरज पडते. त्याकरिता अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी वाहनाची मागणी केल्यानुसार सद्या बंद स्थितीत असलेले आरोग्य विभागाकडील ट्रॅक्टर व ट्रॉली उपलब्ध असून सदरच्या विभागाने म.आयुक्त सो . यांच्याकडेस अतिक्रमण विभागाने मागणी केले असता म. आयुक्त सो. यांनी त्वरीत वाहन उपलब्ध करुन द्यावे असे सूचित केल्यानुसार आरोग्य विभागाकडील बंद स्थितीत असलेले ट्रॅक्टर दुरुस्ती करुन सदरच्या विभागास वाहन दुरुस्ती करुन देणे करिता मॅकेनिक वाहनाची तपासणी करुन येणारा खर्च रु. 66031/- मात्र अपेक्षित असून त्यानुसार सदरे कामे तांतडीने अत्यावश्यक सेवा म्हणून पुरवठादार मक्तेदार निश्चित करुन करुन घेण्यांत आले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालस अधिन राहून मनपा अधिनियम अनूसूची ड मधील प्रकरण 5 (2)(2) अन्वये सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ३५ — आरोग्य विभागाकडील रुग्णवाहिका एमएच-18/ जी 140 वाहनास नवीन बॅटरी खरेदीबाबत वझालेला खर्च रुपये7820/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक ३०/०५/२०१९**

धुळे म.न.पा. आरोग्य विभागाकडील रुग्णवाहिका एमएच 18/ जी 140 वाहनाची बॅटरी खराब झाली असून त्यामुळे वाहन सेल स्टार्ट होत नसून धक्का झाले आहे. सदर वाहन चालवितांनाअडचणी येत आहे.सदर वाहनाव्दारे मुंबई पुणे व ई. ठिकाणी पेशंट पोहचविणे कामी जावे लागते सदर वाहनामध्ये पेशंट असता वाहन रस्त्यात बंद पडल्यास त्रासदायक होऊ शकते. त्यामुळे वाहनाची बॅटरी तपासणी करणे जरुरीचे असल्यामुळे सबंधित वाहन चालक व मॅकेनिक यांनी मा. आरोग्यअधिकारी यांचे मार्फत भांडार विभागास रिपोट सादर केला आहे. मनपा भांडार विभाग जा.क्रं 138/ दि. 26/11/2018 ने धुळे जिल्हयाचे टाटा मोटर्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा.लि. धुळे यांना लेखी स्वरुपाचे पत्रा देवून कंपनी अभियंता यांचे मार्फत वाहनाची बॅटरी तपासणी केली असता बॅटरी निकामी असल्याचे दिसून आले त्यामुळे नवीन बॅटरी टाकणेत आलेली असून सदरची रिपेअरींग कामे इव्हाईस नं.1819010402 दि. 27/11/2018 ने कंपनी कडून करण्यांत आलेली असून त्यांचे बील रुपये 7820/-प्राप्त झाले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.टाटा मोटार्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.धुळे यांचेकडून आले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 5 (2) (2) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ३६ तापी पाणीपुरवठा योजनेवरील विविध ठिकाणी लिकेजेस दुरुस्तीच्या कामासाठी झालेला खर्चरुपये3,88,512/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक ३०/०५/२०१९**

तापी पाणी पुरवठा योजनेवरील विविध लिकेजेस दुरुस्ती बाबत. सविस्तर अहवाल म. अभियंता यांचे मार्फत सादर करून सदरचे कामे अत्यंत तातडीने असल्याने दुरुती कामे करणे करिता म. आयुक्त सो. यांनी दि. 1/4/2019 रोजी मान्यता दिली. या अनुषंगाने दि.8/9/2019 रोजी तापी पाणी पुरवठा योजनेवरील दुरुस्ती कामे करणे करिता कार्यालयीन आदेश तसेच कंत्राटदारास आदेश देण्यात आले आहेत. खालील तपशीलानुसार तापी पाणी पुरवठा मुख्य वाहिनीवरील लिकेजेस दुरुस्तीचे कामे अत्यंत तातडीने करून घेण्यात आली आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | कंत्राटदाराचे नाव | खर्च/बिल रक्कम |
|---|---|---|---|
| अ) | 1) सोनगीर जुना हायवे, बोहरी चुना फाक्टरी जवळ<br>2) सोनगीर जुना हायवे, जुनी हिरा हॉटेल जवळ<br>3) देवभाने, मुळचंद्र सिंधी यांचे शेताजवळ<br>4) सोनगीर एअर व्हाल्व, जुनी हिरा हॉटेल जवळ<br>5)सोनगीर जुना हायवे,मंदिरा पासून200मी. अंतरावर<br>6) सोनगीर जामफळ धारणा जवळ | आकाश एटरप्रायझेस | 1,37,470 |
| ब) | 1) नरडाणा रेल्वे पुलाजवळ, जुनी डेअरी<br>2) नरडाणा गावाच्या पश्चिमेस, ग्रा.प.विहिरी जवळ<br>3) गोराणे फाटा व्हाल्व<br>4) रा.महामार्ग, बाबाजी हॉटेल जवळ | के.जी.शिंदे | 1,12,395 |
| क) | 1) बाभळे पा.पु. केंद्र येथील सम जवळ<br>2) क्लरी फक्युलेटरचे रंग काम करणे<br>3) बाभळे फाटावरील टी जॉईट | चेअरमन विज कामगार सह, सोसा, धुळे | 1,38,647 |
| | | एकूण | 3,88,512/- |

सोबत सदर कामाचे, स्थळानुसार फोटो सादर आहेत. तसेच कार्यालयीन टिप्पणी अंदाजपत्रके (कार्यात्तर) जोडले आहेत.

सन 2019-20 या आर्थिक वर्षाकरिता पाणी पुरवठा केंद्रावरील निगा व दुरुस्ती करिता रु.200 लक्ष तरतूद आहे. ता तरतूद अंतर्गत वरील प्रमाणे कामे, कामाची निकड व तातडीची आवश्यकतानुसार करून घेण्यात आली आहेत.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेल्या खर्च रु. ३,८८,५१२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5 प्रकरण 2 (2) प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ३७ — तापी पाणी पुरवठा रॉ वाटर पाईप लाईन दुरुस्ती करणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आले, त्यासाठी झालेला खर्च रुपये 35280/- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक ३०/०५/२०१९

दि. 4/2/2019 रोजी पहाटे तापी पाणी पुरवठा योजनेच्या रॉ वाटर पाईप लाईनला दभाशी फाटा येथे मोठ्या प्रमाणात गळती सुरु झाली. याबाबत पाहणी केली असता पाईप लाईन वरील मेनहोल उरवडलेले आढळून आले. सोबत छायाचित्र जोडले आहेत. लिकेजेस मुळे शेतामध्ये पाणी शिरले.या ठिकाणी पाईप लाईन भूमिगत आहे. सदर लिकेजेमुळे शहरातील पाणी पुरवठा बंद पडल्याने हे काम तातडीने करून घेण्यात आले.

उक्त प्रमाणे लिकेजेस दुरुस्तीचे अंदाजपत्रक रु.35280/-मात्र चे काम मे.के.जी.शिंदे यांचेकडून करणेत आले आहे.सदर काम तातडीचे असल्याने याकामी झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 कलम 2(2) प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ३८ — महास्वचछता अभियानकामी भाडयाने लावणेत ३ जे.सी.बी.चे भाडे व डिझेलसाठी झालेला खर्च रु.4,74,900/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक ३०/०५/२०१९

दि. १ फेब्रुवारी २०१९ पासुन धुळे शहरात शिव छत्रपती महास्वच्छता अभियान राबविणे बाबत सुचना दिली असता सदर अभियान शहरात संपुर्ण साफसफाई गटार सफाई,

नाले सफाई, काटेरी झाडे इ.सर्व साफसफाई संबधीत कामे नळाचे लिकेज, डागडुगीकरण कामे करावयाची आहे. सद्यस्थितीत मनपाकडे एकच जेसीबी मशिन असुन ते नादुरुस्त असल्यामुळे १ महिन्याकरीता भाडयाचे ३ जेसीबी लावणेकरीता मा. महापौर सो. यांनी निर्देश दिले होते. तरी या कामी एक जेसीबीचे एका महिन्याकरीता ७६,७००/- या दराप्रमाणे ३ जेसीबीचे एका महिन्याचे भाडे २,३०,१००/- व जेसीबीला डिझेल टाकणेकामी एकुण २,४४,८००/- असे एकुण ४,७४,९००/- खर्च होणार आहे. सदरचा खर्च एक महिन्याचा कालावधीचा आहे. सदर महास्वच्छता अभियान हे दिनांक १ फेब्रुवारी २०१९ ते दि. ३१ मार्च २०१९ या कालावधीत सुरु होते. सदर कालावधीत झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२)(२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक - ३९ — घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत जमा झालेल्या कचऱ्याचे वजन करणे कामी मे.न्यु भारत वे ब्रिज यांच्या दरास मान्यता देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सदर वजन काटा किती दिवसासाठी भाडयाने लावणेत आलेला आहे?

म. आयुक्त — आपल्या शहरात दोनच वजन काटे आहेत. त्यापैकी में. भारत वे ब्रिज यांचा वजनकाटा तुलनात्मकदृष्टया योग्य वाटतो. आपण त्यांना दर कमी करण्याबाबतही कळविले आहे. सद्य स्थितीत त्यांचे कडुन वजन करणेत येत आहे. आपल्या घनकचराव्यवस्थापना अंतर्गत सदर वजन काटा बसविण्याचे कामाची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे. सदरचे काम पुर्ण करणेबाबत संबधीत ठेकेदाराला समक्ष आदेशीत केलेले आहे. सदरचे काम एक महिन्याच्या आत पुर्ण होण्याची शक्यता आहे. त्या कालावधीत वजन करणेसाठी सदर प्रस्ताव सादर झालेला आहे. सदर वजनाच्या ठिकाणी आपले नियत्रंन राहावे यासाठी तेथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्याचे नियत्रन आयुक्त व उपायुक्त कार्यालयातुन होत असते.

म. नागसेन बोरसे — सदरचे काम एक महिन्यात पुर्ण करावे.एक महिन्यासाठी आमची मान्यता आहे. पदाधिकाऱ्यांचे नियंत्रण आवश्यक असल्याने सदर सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रन महापौर यांच्या कार्यालयातही ठेवण्यात यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीनअहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक ३०/०५/२०१९**

यापुर्वी न्यु भारत वे ब्रिज यांना जा.क्र./धुमपा/आरोग्य/७० दि.६/५/२०१९ अन्वये धुळे मनपा हद्दीतील घनकचरा वाहतुक व्यवस्थापक अंतर्गत संकलन करण्यासाठी वॉटर ग्रेस प्रॉडक्टस यांना काम दिल्याने त्यांनी दि.६/५/२०१९ पासुन मनपा मालकीचे ७९ ऑटो टिपर व १० ४०७ घंटागाड्या शहरातील कचरा उचलुन व घरस्तरावरील कचरा जमा करुन कंपोस्ट डेपोवर व गांडुळखत प्रकल्पावर टाकण्यात येणार असल्याने सदर वाहनामधील कचऱ्याचे वजन करणेकामी खालील दराने काम देण्यात आले होते.

| अ.क्र. | वाहनाचे नांव | प्रती वाहन दर |
|---|---|---|
| १ | ४०७ घंटागाडी व ट्रॅक्टर | ५० |
| २ | टाटा ऑटो टिप्पर | २० |

सद्यस्थितीत मनपाकडे वजन काटा अस्तित्तवात नसल्यामुळे उक्त् वजन करण्याचे काम देवुन मनपा मार्फत खर्च करण्यात येणार होता.

परंतु उक्त संदर्भिय पत्रान्वये उक्त वजन काटा धारक यांनी बिलाचा खर्च संबंधीत कंपनीकडुन घेण्याचे ठरविल्याप्रमाणे सदर कंपनीने दरमहा मासिक खर्च संबंधीतांना रोख अदा करुन त्याचा मासिक खर्च बिलात अधिक लावणे बाबत पत्र दिले आहे.

तरी सद्यस्थितीत होत असलेले काम पाहता खालील प्रमाणे वाहनांचा वजनाचा खर्च अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | वाहनाचे नांव | एकुण् वाहन संख्या | प्रती वाहन दर | एकुण ट्रिपा | एका दिवसाचा खर्च | एकुण मासिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०७ घंटागाडी | १० | ५० | १० | ५०० | १५००० |
| २ | ट्रॅक्टर | २० | ५० | ४० | २००० | ६०००० |
| ३ | टाटा ऑटो टिप्पर | ७९ | २० | १५८ | ३१६० | ९४८०० |
| | एकुण :- | | | | ५६६० | १६९८०० |

(टिप उक्त वाहनाद्वारे काम कमी किंवा जादाचे झाल्यास सदर खर्चात बदल होऊ शकतो.)

तरी उक्त वजन काट्याचा खर्च मनपामार्फत वजन काटा तयार होईपावेतो वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या मागणी बिलात अधिक लावणे बाबतअहवाल सादर केला असता त्यावर मा. आयुक्तसो. यांनी वजन काटे नसल्याने शहरात स्पर्धात्मक दर प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन वरील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहे. त्या अनुषगाने उक्त वजन काटयाचे मासिक अंदाजे दर मनपाचा वजन काटा तयार होई पावेतो वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या मागणी बिलात अधिक लावुन बिल अदा करणेस महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ४० मा. पंतप्रधान महोदय यांच्या दिनांक16/2/2019 रोजी असलेल्या धुळे दौ-याप्रसंगी करण्यांत आलेला खर्च रु.40,240/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक ३०/०५/२०१९**

अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना व भुमीगत गटार योजना या कामाचा शुभांरभ कार्यक्रम आयोजीत करणेत आला होता तरी या कार्यक्रमा करिता शॉर्ट फिल्म बनविणेत आलेली होती. या कामाचे बिल में. द्वारका कम्युनिकेशन धुळे व प्रफुल्ल कुळकर्णी धुळे यांनी पुढील प्रमाणे बिल सादर करणेत आले आहे.

तसेच मा. पंतप्रधान महोदयांना मानपत्र देणे करिता मानपत्र तयार करणे करिता श्री जगदीश मनोहर सापे धुळे यांना सुचित केलयानुसार त्यांचे कडुन मानपत्र घेण्यात आले आहे. तरी त्यानुसार त्यांनी बिल सादर केलेले असुन खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | खर्च रक्कम | पुरवठादार |
|---|---|---|---|
| १. | Shoot film with editing<br>भुमिगत गटार व अक्कलपाडा योजना अंतर्गत शॉर्टफिल्म. | १८०००/-<br>Cgst १६२०/-<br>Sgst १६२०/-<br>**२१२४०/-** | द्वारका कम्युनिकेशन्स |
| २. | १) "अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना" या योजनेची Audio रेकॉर्डींग स्त्री/ पुरुष आवाजात तयार केली.<br>२) या योजनेची सुधारीत Audio रेकॉर्डींग पुन्हा स्त्री/ पुरुष आवाजात तयार केली.<br>३) "भुयारी गटार योजना" या योजनेची Audio रेकॉर्डींग स्त्री/ पुरुष आवाजात तयार केली. | २५००/-<br>२५००/-<br>२५००/-<br>**७५००/-** | श्री.प्रफुल्ल कुळकर्णी |
| ३. | सन्मानपत्र (२८x ३६) size -१ नग<br>फोटो प्रिंट लॅमीनेशन पॅकींग सह - २ नग | ११३००/-<br>२००/-<br>**११५००/-** | श्री.जगदीश मनोहर सापे |

तरी वरील प्रमाणे काम करुन घेण्यात आले तरी त्यासाठी एकुण खर्च रु. ४०,२४०/- मात्र करण्यात आलेला असुन सदरचा खर्च अदा करणेसाठी महानगरपालिका अधिनियम ५ (२)२ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ४१ धुळे मनपाच्या विविध जलकुंभावरील व भागातील व्हॉल दुरुस्ती करणे व नवीन टाकणे कामी झालेला खर्च रु.6,05,796/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ३०/०५/२०१९**

धुळे मनपा हद्दीत खालील प्रमाणे जलकुंभ वितरण झोनवरील व भागातील व्हॉल दुरुस्ती करणे व नवीन टाकणे आवश्यक आहे.

1)चक्करबर्डी जलकुंभ येथील 600 एम.एम. चे स्लुईस व्हॉल नवीन टाकणे.
2)भाईजी नगर चौकातील 300 एम.एम. चे दोन स्लुईस व्हॉल दुरुस्ती करणे.
3)भाईजी नगर चौकातील 200 एम.एम. चे स्लुईस व्हॉल दुरुस्ती करणे.
4)अशोक नगर जलकुंभ येथील 300 एम.एम. चा स्लुईस व्हॉल दुरुस्ती करणे.
5)100 फुटी रोड वरील 150 एम.एम. चा स्लुईस व्हॉल नवीन टाकणे.
6)शासकीय दुध डेअरी जवळील 150 एम.एम. स्लुईस व्हॉल नवीन टाकणे.
7)गोकुळ नगर येथे 150 एम.एम. स्लुईस व्हॉल नवीन टाकणे.

तरी वरील प्रमाणे 1 ते 7 ठिकाणील पाईप लाईन व जलकुंभ वरून पाणी वितरणास व जलकुंभ भरण्यास अडचण येत असल्याने सदरचा भागात पाणीपुरवठा करणे ही बाब नागरिकांचा पाणी प्रश्नाचा लक्षात घेता अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु. 6,05,796/- मात्र येणार आहे. तरी सदरचे काम हे तातडीचे असल्याने व भागाचा पाणीपुरवठा बंद पडू नये म्हणून सदरचे काम श्री. संजय गायकवाड, ठेकेदार यांचेकडून विना निविदा करून घेण्यात आलेली असल्याने महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण 5 मधील (2)(2) नुसार कामाचा खर्च रु. 6,05,796/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ४२ — नवीन प्रशासकीय इमारत येथे अंडर ग्राउंड केबल लाईनसाठी एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणे बाबत झालेला खर्च रु.47,910/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक ३०/०५/२०१९**

नवीन प्रशासकीय इमारत येथे अंडर ग्राउंड केबल लाईनसाठी एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने सदर ठिकाणी पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.४७,९१०/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम विना निविदा श्री.संजय दगडू गायकवाड, ठेकेदार ,धुळे यांचे कडुन करून घेण्यास सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास व तदर्थ झालेला खर्च रु.४७,९१०/-मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक १० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०६/०६/२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०६/०६/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती,मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमतीपाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १० | श्रीमती उदासी कर्शीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ५ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. मधुकर एस. पवार | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण् पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| १० | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. युवराज वाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| १२ | श्री. एन.के. बागुल् | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. भट् महानर | भांडार लिपीक |
| १४ | कु. कल्पना बा. जाधव | लिपीक अभिलेखा विभाग |
| १५ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १७ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ०६/०६/२०१९**

सन्मा. सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :-४३ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.( दि. ३०/०५/२०१९)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त कायम करण्यात यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ०६/०६/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ३०/०५/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ३५ ते ४६ तसेच सदस्यांनी केलेल्या चर्चा क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

**विषय क्रमांक:- ४४** — तापी पाणीपुरवठा योजनेवरील ९६० एम.एम. पी.एस.सी. पाईप लाईन दुरुस्तीचे काम तांतडीने मे.गायत्री कन्सस्ट्रशन धुळे यांचेकडून करुन घेण्यांत आलेत. त्यासाठी झालेला खर्च रुपये ४,३५,१०१/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5(2)(2)अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ०६/०६/२०१९**

धुळे मनपाचा तापी पाणी पुरवठा योजनावरील ९६० एम.एम-पी.एस.सी. मेन पाईप लाईन ही नगाव गावाजवळ ६ ठिकाणी फुटल्यामुळे सदर योजनेवरील पाणीपुरवठा बंद झाला होता सदर पाणीपुरवठा सुरु करणे तातडीचे असल्याने सदर ठिकाणील ९६० एम.एम.ची पाईप लाईन दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.४,३५,१०१/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा मे.गायत्री कन्सट्रक्शन, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदर कामी झालेला खर्च रु.४,३५,१०१/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२) (२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक ४५ — धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास व सन २०१६ मध्ये शासन मान्य सेवा प्रवेश नियमावलीस मंजुरी देण्यात आली आहे. सदर मंजुर सेवा नियमावलीस व मंजुर आकृतीबंधास फेरबदलासह मंजुरी मिळणेस्तव महासभेपुढे व शासनाकडेस शिफारस करणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. संतोष खताळ — मा. सभापती महोदय मला विषय क्रमांक बाबत सविस्तर खुलासा करणेत यावा.

म. नागसेन बोरसे — मा. सभापती महोदय, आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधाचा जो विषय आहे. त्या सेवा प्रवेश नियमावलीत १ ते १३ पदांचा समावेश करणेत यावा. तसेच त्या नियमावलीत अनुसुचीत जाती व जमाती प्रवर्गाचे योग्य वर्गीकरण केले आहे काय याची तपासणी करुन घेण्यात यावी. तसेच तात्पुरता स्वरुपात का होईन उपमुख्य लेखा परिक्षक यांचे कडेस मुख्य लेखा परिक्षक पदाचा कार्यभार देवुन कामकाज करुन घेणेत यावे.

म. उपायुक्त — धुळे महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियम २०१६ यांस दि. १६ फेब्रुवारी २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली असुन सदर आपल्या सर्वांना माहीत आहे. ७ ते ८ वर्षापासुन या आकृती बंधाच्या बाबतीत महापालीकेचा व्याप लक्षात घेता पद नसल्यामुळे शासनाला सादर केलेला अंतीम आकृती बंध शासनाने नियमावली मान्यता दिलेली होती. परंतु त्यात प्रशासनाला काही अडचणी, त्रुटी जाणविल्या धुळे मनपा मध्ये २५ ते ३० वर्षापासुन कर्मचारी एकाचा पदावर कार्यरत आहेत परंतु त्यांना कुठलीही पदोन्नती मिळालेली नाही. मा. आयुक्त महोदयांनी सुधारणा करण्यासाठीचे दोन प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेले आहे.आपली परिपुर्ण कार्यप्रणाली च्या अनुषंगाने हा प्रस्ताव आपल्यापुढे सादर केला आहे. मे. स्थायी समितीने यावर निर्णय घ्यावा. व महासभेची मान्यता घेवुन सदर प्रस्ताव शासनाकडेस सादर करुन सदर प्रस्तावास मान्यता घ्यावी. ही प्रशासकीय बाब आहे. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव ठेवला आहे. यावर निर्णय घ्यावा.

म. नागसेन — सदरची पदे मंजुर झाल्यानंतर परत त्या पदांना आस्थापना खर्चाची अडचण येईल. या साठी शासनाकडुन पदांचे अनुदान मिळवणेसाठी महासभेचा ठराव करुन शासनाकडुन अनुदानाची मागणी करावी. व सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

| | |
|---|---|
| म. श्रीमती उगले | सदरचा प्रस्ताव हा धुळे महानगरपालिकेच्या कर्मचारी अधिकाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रस्ताव आहे. धुळे महानगरपालिकेत वर्षानुवर्षे अधिकारी व कर्मचारी आपली सेवा या शहरासाठी देत आहे. भविष्यात त्यांना प्रमोशन मिळणे ही आवश्यक बाब आहे. यापूर्वी झालेली सेवा प्रवेश नियमावली व आकृतिबंधात बर्याच त्रुटी होत्या त्यामुळे कर्मचाऱ्यांना आवश्यक तो लाभ मिळू शकत नव्हता. त्यामुळे या प्रस्तावात नमूद बदल होणे गरजेचे आहे. यासाठी हा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करावा अशी विनंती करीत आहे. तसेच स्थायी समितीच्या शिफारशीने सदर प्रस्ताव महासभेपुढे सादर होणार आहे व त्यानंतर यास शासनाची मान्यता लागणार आहे. त्यामुळे सदर विषयावर प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी. |
| म. उपायुक्त | आस्थापना विभागाने उपमुख्य लेखापरिक्षकांच्या संदर्भात सन्मा. सदस्यांनी केलेल्या मागणी बद्दल पडताळणी करुन प्रस्ताव सादर करावा. व आस्थापना खर्चाच्या बाबतीत शासनाकडेस पत्रा व्यवहार करावा. |
| म.सभापती | कार्यालयीन अहवालानुसार सादर झालेल्या प्रस्तावास मान्यता देऊन सदर प्रस्ताव मे. महासभेकडेस शिफारस करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक ०६/०६/२०१९**

धुळे महापालिकेच्या सेवा प्रवेश (सेवा प्रवेश व संवांचे वर्गीकरण) नियम २०१६ यांस दि १६ फेब्रुवारी २०१६ अन्वयें मान्यता देण्यात आली असून सदर नियमास महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४ ब मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यात अ क्र १ ते १५२ च्या पदांचे सेवा नियम परिशिष्ठ २ मध्ये करण्यात येवून सदर सेवा प्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर सेवा प्रवेश नियमावलीत फक्त मंजूर एका पदासाठी नामनिदेशनाने व पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने भरतीसाठी पदे दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये सेवा प्रवेश नियमावलीतील अ. क्र. ८,९, १२, ३१, ३२,३३,४८, ४९, ५२, १०६,१०७, ११४, ११५,१३० या पदांचा समावेश आहे, तसेच पुढील पदांचा सेवा प्रवेश नियमावलीत समावेश नाही.

१ फील्ट्रेशन इंजीन ड्रायव्हर २ विकृतीशास्त्रतज्ञ ३ शहर क्षयरोग अधिकारी ४ असि. मेकॅनिक ५ मिस्तरी ६ गवंडी ७ सुतार ८ हेड शिपाई ९ अटेंडंट १० अभियंता जुने पद ११ सचिव जुने पद १२ ड्रेसर १३ मॅकेनिक

सदर बाबतीत परिशिष्ट २ मध्ये व ३ मध्ये बदलांचे विवरणपत्र सोबत सादर करण्यात येत आहे.त्यात आवश्यक ते बदल सादर करण्यात येत आहे. सदर पदांसाठी नांदेड व नवी मुंबई महा पालिकेच्या मंजुर सेवा प्रवेश नियमावलीवरुन नेमणुकीची / पदोन्नतीची अर्हता व तरतुद घेण्यात आली आहे.

तसेच धुळे महापालिकेच्याआस्थापना पदांच्या सुधारीत आकृतीबंधास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक धुमपा/ १०१०/ प्र क्र १०३ / नवी २५ दि ४/३/२०१६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदर पदांच्या आकृतीबंधात वेतन श्रेणी व ग्रेड पे दर्शविण्यात आलेली नाही.

सदर बाबतसुधारीत आकृतीबंधात परिशिष्ठ ब मध्ये सुधारीत पदे व वेतनश्रेणी दर्शविण्यात आलेली आहे.

तसेच परिशिष्ठ अ व ब मधील विवरण पत्र सुधारीत पदे व वेतनश्रेणी परिशिष्ठ ३ मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यात परिशिष्ठ ३ मध्ये पुढील पदांच्या वेतनश्रेण्या धुळे महापालिकेला नाही.सदर वेतनश्रेणी नांदेड व नवी मुंबईच्या आकृतीबंधातील वेतनश्रेणीत घेण्यात आलेल्या आहेत, पुढील पदांच्या वेतनश्रेण्या इकडील कार्यालयास उपलब्ध नाहीत.

१ जीवशास्त्रज्ञ २ किटक संहाक ३ रोड रोलर चालक ४ फीटर / मजुर ५ सहा अभियंता (स्थापत्य) ६ सहा.अभियंता (बी. ई. इले.) ७ लघुलेखक उच्च श्रेणी ८ लघुलेखक निम्न श्रेणी ९ स्विय सहायक १० प्रभाग अधिकारी ११ उप अधीक्षक १२ अंतर्गत लेखा परीक्षक १३ उपनगर सचिव १४ कॅमेरामन १५ शाखा अभियंता (यांत्रीकी) १६ कनिष्ठ अभीयंता (यांत्रीकी) १७ कनिष्ठ अभियंता (विदयुत) १८ अभीयांत्रीकी सहायक (यांत्रीकी) १९ भांडार लिपीक २० फील्ट्रेशन इंजीन ड्रायव्हर २१ उप अभियंता (विदयुत) २२ शाखा अभियंता (विदयुत) २३ कनिष्ठ अभियंता (विदयुत) २४ अभीयंता अतिक्रमण २५ कनिष्ठ अभियंता अतिक्रमण २६ उदयान निरीक्षक २७ उदयान मजुर २८ सिस्टीम अॅनेलिस्ट २९ नेटवर्किंग अॅडमिनीस्ट्रेटर ३० संगणक प्रोग्रॅमर ३१ जनसंपर्क अधिकारी ३२ टेलिफोन ऑपरेटर ३३ सहा. विधी अधिकारी ३४ पशु वैदयकीय अधिकारी ३५ आरोग्याधीकारी जुने पद ३६ वैदयक शास्त्रतज्ञ ३७ बधीरीकरण तज्ञ ३८ बालरोग तज्ञ ३९ विकृतीशास्त्र तज्ञ ४० स्त्रीरोग तज्ञ ४१ अन्न निरीक्षक ४२औषध भांडारपाल ४३ऑक्झलरी नर्स मिडवाईफ ४४सहा. भांडारपाल ४५ लॅब टेक्नीशीयन ४६ रेकॉर्ड अभीलेखापाल

वरील ४६ पदांसाठी नांदेड व नवी मुंबई महापालिकेच्या वेतनश्रेण्या नमुद करण्यात आल्या आहेत. सदरच्या सुधारीत प्रपत्र २ व ३ मध्ये नमुद करण्यात आलेले आकृती बंधातील व सेवा प्रवेश नियमावलीतील सुधारणा ह्या मे. स्थायी समिती व मे. मा. महासभा यांच्या मंजुरीनंतर शासनाकडेस मंजुरीसाठी सादर करण्यांत येणार आहे.

सदर कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार प्रस्तावात सादर परिशिष्ट २ व ३ मध्ये नमूद आकृतिबध व सेवा प्रवेश नियमावलीत आवश्यक ते बदल तथा सुधारणा करण्यांस व परिशिष्ट ३ मधील नवीन वेतनश्रेण्या सुधारीत करण्यांस तसेच प्रस्तावात नमूद नवीन पदांच्या वेतनश्रेण्या समाविष्ट करण्यास मान्यता देण्यांत येत असून मे. महासभेपुढे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ ते ५४ नुसार शिफारस करण्यांत येत आहे.

तसेच याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करुन शासनाकडेस प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ११ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०४/०७/२०१९**
**वेळ दुपारी १-३० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०४/०७/२०१९ रोजी दुपारी १-३० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा,धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| ४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| २ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ३ | श्री. मधुकर एस. पवार | आरोग्याधिकारी |
| ४ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ५ | श्री. लक्ष्मण् पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. युवराज वाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| ७ | श्री. एन.के. बागुल् | विद्युत अभियंता |
| ८ | श्री. भदु महानर | भांडार लिपीक |
| ९ | कु. कल्पना बा. जाधव | लिपीक अभिलेखा विभाग |
| १० | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| ११ | श्री.रा.र.गायकवाड | मुख्य लिपीक मनपा शि.मं. |
| १२ | श्री. अमोल तारगे | बाजार विभाग |
| १३ | श्री. राजेश वसाव | मलेरिया पर्यवेक्षक |

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म नगरसचिव आज मा.महापौर साहेब यांनी वृक्ष् लागवड करणेसंदर्भात सन्मा.सदस्य व वृक्ष समिती सदस्य तसेच सेवाभावी संस्था यांची सकाळी ११-०० वाजतां बैठक सभागृहात आयोजित केली असल्याने स्थायी समितीची सभा सुरु होणेस उशीर झाला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण २ स्थायी समितीचे कामकाज ३ मधील (ड) मध्ये पुढील प्रमाणे तरतुदी आहे. स्थायी समितीच्या सभेत त्या सभेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत निदान पाच सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज उरकता कामा नये अशी तरतूद आहे. तथापि आज सभागृहात मा. सभापती याच्या सह ४ सदस्य उपस्थित आहेत. याबाबत मा. सभापती यांनी नोंद घ्यावी व पुढील आदेश करावे.

म. सभापती स्थायी समितीच्या सभेचे कामकाज सुरु करणेसाठी कमीत कमी ५ सदस्य उपस्थित असणे आवश्यकआहे सभागृहात फक्त ४ सदस्यच उपस्थित असल्याने सदर सभा रद्द करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक १२ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९**
**वेळ सकाळी १०-०० वाजता.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड प्रकरण २ नियम ३ (क) नुसार** धुळे महानगरपालिका स्थायी समितीची तांतडीची विशेष सभा आज शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९ रोजी सकाळी१०-०० वाजता मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती.शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ३ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ४ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ५ | श्री. मधुकर एस. पवार | आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| ७ | श्री. युवराज वाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| ८ | श्री. बी. एस. रनाळकर | सहा कर मूल्य निर्धारण अधिकारी |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म.इकबाल व श्री. जगताप सुभाष सुकलाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक ०५/०७/२०१९**

सन्मा. सदस्या श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल श्री.जगताप सुभाष सुकलाल यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-४६ — मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडील पत्र जा.क्रं. धुमपा/नर/२३३ दि. ०४/०७/२०१९ चे पत्रानुसार धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे क्रं.४३६/३ या जागेच्या जमीन भुसंपादनापोटी तडजोडी अंती निश्चित केलेली मोबदला रक्कम अदा करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम४८१(एच) अन्वये आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — आज स्थायी समिती सभा क्रमांक १२ विषय क्रमांक ४६ मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांचे कडील पत्र जा क्र./धुमपा/नर/२३३ दिनांक ०४/०७/२०१९ च्या पत्रा नुसार धुळे मनपा हद्दीतील सर्व क्रमांक ४३६/३ या जागेच्या जमिन भुसंपादनापोटी तडजोडी अंती निश्चित केलेली मोबदला रक्कम अदा करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४८१ H अन्वये प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. सदर प्रस्ताव तातडीने निर्णय घेणे. अपेक्षित असल्याने मा. आयुक्त साहेबांनी या संदर्भात पत्र सादर केल्याने बैठक आयोजीत केलेली आहे.या प्रस्तावाबाबत मा. नगररचनाकार साहेबांना विनंती करतो की, या प्रस्तावाची पार्श्वभुमी व कायदेशिर बाबी सभागृहासमोर मांडाव्यात.

म. नगररचनाकार — धुळे महानगरपालिका हद्दीतील मेहमुद शेख सुभान यांची धुळे महानगरपालिका हद्दीतील स.क्र.४३६/३ पै.जमिन खेळाचे मैदान व विकास योजना रस्ता यासाठी संपादित करणेत आली होती. त्यावर वाढीव मोबदल्यासाठी दाखल दाव्यात धुळे येथील मे. दिवाणी न्यायालयाने एलएआर८२/२००९ मध्ये दि.१६/०७/२०१८ रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे. मात्र सदर न्यायनिर्णयात देण्यातआलेल्या मोबदल्याची रक्कम जास्त असल्याने त्याविरुध्द मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठात अपील दाखल केले होते.

त्यावर मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठाने दि.०८/०३/२०१९ चे आदेशान्वये ८ आठवडयाचे आत खालील न्यायालयाने न्यायनिर्णयात सुचविलेली मोबदला रक्कम जमा करण्याचे आदेशित केले आहे. तसेच धुळे येथील २ रे दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर यांनी दि. ०२/०३/२०१९ रोजी जप्ती वारंट दिले होते. त्यात एकुण मोबदला रक्कम २,९०,७७,००५/-

+ व्याजाची रकमेकरीता सदर वारंट देण्यात आले होते. सदर मिळकतीचा आजचा रेडीरेकनरचा दर रुपये ३६३०/- असुन एकुण ९७७४ चौ.मी. क्षेत्रासाठी शासकीय मुल्य रुपये **३,५४,७९,६२०/-** याप्रमाणे आहे. तसेच भुसंपदान अधिनियम १८९४चे कलम १८ अन्वये दाखल दाव्याचे निकाला नुसार देय रक्कम रुपये **३,१८,२७,०६४/-** आहे.

सदर प्रकरणी मा.जिल्हाधिकारी,धुळे तथा आयुक्त (प्र),धुळे महानगरपालिका धुळे यांचे दालनात मुळ जागा मालक श्री.मेहमुद शे. सुभान यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार तसेच वरील रकमेबाबत झालेल्या तडजोडीअंती मेहमुद शे. सुभान यांनी दि. २९/६/२०१९ रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांना जर दि.५/७/२०१९ रोजी किंवा तत्पुर्वी एलएआर ८२/२००९ नुसार हुकुमनाम्यापोटी एक रकमी रक्कम रुपये २,५०,००,०००/- अदा केले तर सदर रक्कम तडजोड रक्कम म्हणुन स्विकारण्यास व त्याबदल्यात हुकुमनाम्याची अंमलबजाणी व्हावी म्हणुन दाखल दरखास्त तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रकरण काढुन घेणेबाबत तयारी दर्शविलेली आहे व भविष्यात याबाबत कोणतेही न्यायसंदर्भ करणार नाही असे नमुद केले आहे. तरी सदर बाबत तडजोडीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (एच) नुसार कार्यवाही करता येईल.

वरील प्रकरणी या कार्यालयाने दि.०१/०६/२०१९ चे पत्रान्वये मे. उच्च न्यायालयात दि. ०८/०३/२०१९ चे निर्देशानुसार किती रकमेचा भरणा न्यायालयात करावा याबाबत मनपा अभियोक्ता यांना विचारणा केली असता त्यांनी त्याचे दि. ०५/०६/२०१९ चे ईमेलद्वारे पाठविलेल्या पत्रात रक्कम रुपये ३,१८,९२,२८०/- चा भरणा मे. उच्च न्यायालयात त्वरीत करणेबाबत कळविले आहे.

तरी एलएआर८२/२००९ नुसार मुळ जागा मालकास भुसंपादन अधिनियम १८९४अंतर्गत रक्कम रुपये ३,१८,२७,०६४/- मोबदला देय आहे. तसेच रेडी रेकनर नुसार सदर जागेची शासकीय किंमत रुपये ३,५४,७९,६२०/- असल्याने मुळ जागा मालकाने वरीलप्रमाणे तडजोडअंती अपेक्षिलेली रक्कम रुपये२,५०,००,०००/- देणेस योग्य राहील असे मत आहे.

म. नागसेन बोरसे — सदर प्रस्तावानुसार तडजोडी अंती निश्चित केलेली रक्कम रु २.५०कोटी देणे हे मनपाच्या आर्थिक हिताचे आहे.त्यामुळे मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने सदर प्रस्तावास मान्यता द्यावी.

म. अमिन पटेल — सदर प्रस्ताव हा मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने गरजेचा आहे. यास आमचा विरोध नाही तथापी कोळवले विहीरी जवळील ८०फुटी रस्त्यालगत असलेली जागा दवाखान्यासाठी भुसंपादन करावी यासाठी बऱ्याच वर्षापासुन प्रस्ताव सादर आहे. सदर जागा ही मोक्याची जागा असुन सदर ठिकाणी भुसंपादन करुन दवाखाना झाल्यास अल्प उत्पन्नगटातील नागरीकांना लाभ होणार आहे. कृपया आपण याचाही विचार करावा व जागा तातडीने भुसंपादन करावी. स्थायी समिती समोर सादर झालेला प्रस्ताव योग्य आहे. अन्यथा नाहक महानगरपालिकेला जादाचा आर्थिक बोजा सहन करावा लागेल त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता द्यावी. परंतु जागा ताब्यात घेवुन तातडीने सदर जागेस वॉलकंपाऊंन्ड करणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. जेणेकरुन त्या ठीकाणी अतिक्रमण होणार नाही.

म. संतोष खताळ — महत्वाचा प्रस्ताव आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

म. सुरेखा उगले — आदरणीय आयुक्त साहेबांनी आज अत्यंत महत्वाचा व मनपाच्या आर्थिक हिताचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवलेला आहे. सदर जागेच्या भूसंपादन पोटी मे. उच्च नयायालयाच्या निर्णयाप्रमाणे आज महानगरपलिकेस ३ कोटी १८ लाख मात्र भरणा करावा लागणार आहे. तथापि मनपाचे आर्थक हित लक्षात घेऊन संबंधित जमीन मालकाशी तडजोड करुन २.५

कोटी मात्र रक्कम मोबदला पोटी देण्याचे मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी निश्चित केलेले आहे.त्यामुळे महानगरपालिकेचा जवळपास ७० ते ७५ लाखाचा आर्थिक फायदा होणार आहे. सदर रक्कम तात्काळ भरली न गेल्यास पुनश्च दरमहा १५% व्याज संबंधित जमीन मालकास अदा करावी लागतील. त्यामुळे सदर प्रकरणी तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहेत. मा. आयुक्त साहेब यांच्यामार्फत आलेल्या प्रस्तावास मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने सर्वानुमते मान्यता देणे हिताचे राहील. तसेच सदर रक्कम मुदतीत न भरली गेल्यास किंवा जमीन मालकास न दिल्यास महानगरपालिकेच्या मालमत्तेवर ही टाच येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वानुमते प्रस्तावास मान्यता द्यावी ही विनंती.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व मा. आयुक्त साहेब यांच्या प्रस्तावाचा विचार करुन मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने मा. जिल्हाधिकारी यांनी जागा मोबदल्यापोटी तडजोडी अंती निश्चित केलेली रक्कम रु.२.५० कोटी मात्र अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच सदर जागा ताब्यात घेतल्यानंतर जागेस तातडीने वॉल कंपाऊंन्ड बांधणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक ०५/०७/२०१९**

कार्यालयीन अहवालानुसार मेहमुद शेख सुभान यांची धुळे महानगरपालिका हद्दीतील स.क्र.४३६/३ पै. जमिन खेळाचे मैदान व विकास योजना रस्ता यासाठी संपादित करणेत आली होती. त्यावर वाढीव मोबदल्यासाठी दाखल दाव्यात धुळे येथील मे. दिवाणी न्यायालयाने एलएआर ८२/२००९ मध्ये दि.१६/०७/२०१८ रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे.मात्र सदर न्यायनिर्णयातदेण्यात आलेल्या मोबदल्याची रक्कम जास्त असल्याने त्याविरुध्द मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठात अपील दाखल केले होते.

त्यावर मे.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपिठाने दि.०८/०३/२०१९ चे आदेशान्वये ८ आठवडयाचे आत खालील न्यायालयाने न्यायनिर्णयात सुचविलेली मोबदला रक्कम जमा करण्याचे आदेशित केले आहे. तसेच धुळे येथील २ रे दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर यांनी दि. ०२/०३/२०१९ रोजी जप्ती वारंट दिले होते. त्यात एकुण मोबदला रक्कम २,९०,७७,००५/- + व्याजाची रकमेकरीता सदर वारंट देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने वरील रकमेबाबत सादर करणेत येते की,

भुसंपादीत क्षेत्र (9774 चौ.मी.) X न्यायालयाने दिलेला दर (रुपये ८५५/-) = ८३,५६,७७०/- ( एकुण मोबदला )

भुसंपादन कायद्यानुसार देण्यात येणारी दिलासा रक्कम (मोबदल्याचे ३०%) = २५,०७,०३१/-

| | |
|---|---|
| कंम्पोनंट १२% (दि. १८/११/२००४ ते १७/११/२००७) | = ३०,०८,४३७/ |
| एकुण मोबदला | = १,३८,७२,२३८/- |
| यापूर्वी दिलेली मोबदला रक्कम | = ३६,३३,९४५/- |
| दिलेला मोबदला वजा जाता उर्वरित देय रक्कम | = १,०२,३८,२९२/- |
| प्रथमवर्षासाठी व्याजाची रक्कम(दि.१८/११/२००४ ते१७/११/२००५) | = ९,२१,४४६/- |
| त्यानंतर व्याजाची रक्कम (एकुण ४९१२ दिवसांकरीता) | = २,०६,६७,३२५/- |

**एकुण देय रक्कम (दि. ३०/४/२०१९ पर्यंत ) = ३,१८,२७,०६४/-**

सदर मिळकतीचा आजचा रेडीरेकनरचा दर रुपये ३६३०/- असुन एकुण ९७७४ चौ.मी. क्षेत्रासाठी शासकीय मुल्य रुपये **३,५४,७९,६२०/-** याप्रमाणे आहे. तसेच भुसंपादान अधिनियम १८९४चे कलम १८ अन्वये दाखल दाव्याचे निकाला नुसार देय रक्कम रुपये **३,१८,२७,०६४/-** आहे.

सदरप्रकरणी मा.जिल्हाधिकारी,धुळे तथा आयुक्त (प्र), धुळे महानगरपालिका ,धुळे यांचे दालनात मुळ जागा मालक श्री. मेहमुद शे. सुभान यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार तसेच वरील रकमेबाबत झालेल्या तडजोडीअंती मेहमुद शे. सुभान यांनी दि. २९/६/२०१९ रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांना जर दि. ५/७/२०१९ रोजी किंवा तत्पुर्वी एलएआर८२/२००९नुसार हुकुमनाम्यापोटी एक रकमी रक्कम रुपये२,५०,००,०००/- अदा केले तर सदर रक्कम तडजोड रक्कम म्हणुन स्विकारण्यास व त्याबदल्यात हुकुमनाम्याची अंमलबजाणी व्हावी म्हणुन दाखल दरखास्त तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रकरण काढुन घेणेबाबत तयारी दर्शविलेली आहे व भविष्यात याबाबत कोणतेही न्यायसंदर्भ करणार नाही असे नमुद केले आहे.

वरील प्रकरणी या कार्यालयाने दि.०१/०६/२०१९ चे पत्रान्वये मे. उच्च न्यायालयात दि. ०८/०३/२०१९ चे निर्देशानुसार किती रकमेचा भरणा न्यायालयात करावा याबाबत मनपा अभियोक्ता यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे दि. ०५/०६/२०१९ चे ईमेलद्वारे पाठविलेल्या पत्रात रक्कम रुपये ३,१८,९२,२८०/- चा भरणा मे. उच्च न्यायालयात त्वरीत करणेतबाबत कळविले आहे.

तरी एलएआर ८२/२००९ नुसार मुळ जागा मालकास भुसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत रक्कम रुपये ३,१८,२७,०६४/-मोबदला देय आहे. मनपा अभियोक्ता यांनी रक्कम रुपये ३,१८,९२,२८०/- चा भरणा मे. उच्च न्यायालयात त्वरीत करणेतबाबत कळविले आहे. तसेच रेडीरेकनरनुसार सदर जागेची शासकीय किंमत रुपये ३,५४,७९,६२०/- असल्याने मुळ जागा मालकाने वरीलप्रमाणे तडजोडअंती अपेक्षिलेली रक्कम रुपये २,५०,००,०००/- देणेस योग्य राहील असे मत आहे.

तसेच याबाबत दि. २९/६/२०१९ रोजी झालेल्या मे. महासभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ के अन्वये प्रस्ताव मे. महासभेच्या विषयपटलावर घेण्यात आलेला आहे. तरी सदर बाबत तडजोडीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (एच) नुसार कार्यवाही करता येईल.

याबाबत कालमर्यादा व महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेता तडजोडीअंती निश्चिीत झालेली रक्कम देणे बाबत मे.स्थायी समितीची मान्यता मिळावी यासाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर करणे योग्य राहील. असा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी धुळे यांच्या मार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची ड प्रकरण २ नियम ३ (क) नुसार सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व मा.आयुक्त साहेब यांच्या प्रस्तावाचा विचार करुन मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने मा.जिल्हाधिकारी यांनी जागा मोबदल्यापोटी तडजोडी अंती निश्चित केलेली रक्कम रु.२.५० कोटी मात्र अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर जागा ताब्यात घेतल्यानंतर जागेस तातडीने वॉलकंपाऊंन्ड बांधणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ११ जुलै २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ११/०७/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री. युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार तथा प्र.अभियंता |
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ५ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. रजमान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| ७ | श्री. युवराज वाघ | परवाना विभाग अधिक्षक |
| ८ | श्री. गितेश सोनार | विद्युत विभाग |
| ९ | श्री.रा.र. गायकवाड | मुख्य लिपीक मनपा शिक्षण मं |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| ११ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १२ | श्री. अमोल तारगे | बाजार लिपीक |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्य श्री. पाटील रावसाहेब आनंदराव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक ११/०७/२०१९**

सन्मा.सदस्य श्री.पाटील रावसाहेब आनंदराव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-४७ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(दिनांक०६/०६/२०१९, ०४/०७/२०१९,०५/०७/२०१९)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक ११/०७/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ६/६/२०१९ चे ठराव नंबर ४७ ते ५० अखेर व सन्मा. सदस्यांनी चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्देश क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक ४/७/२०१९ व दिनांक ५/७/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ५३ ते ५४अखेर व सन्मा.सदस्यांनी चर्चा व त्यावरील सभापतीनी दिलेले निर्देश क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-xxx**
**सभापती**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-४८ — धुळे महानगरपालिका कडील विविध विभागाकरीता तातडीने कार्यालयीन कामकाजासाठी डिजीटल बॅनर तयार करुन लावण्यांत आलेले आहेत.त्यासाठी झालेला खर्च रु.**२,१५,२७५/-** मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अनुसुची ड मधील प्रकरण ५(२)(२) नुसार कार्यात्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — डिजीटल बॅर्नर तयार करणेचे सरकारी दर काय आहेत यांची माहिती द्यावी.

म. उपायुक्त — डिजीटल बॅर्नर तयार करणेचे सरकारी सदर १४.५० रुपये आहे. मात्र सदर एजन्सी आपणास बॅर्नर तयार करुन नियोजित ठिकाणी लावून देते म्हणून त्यांचे दर वाहतूक खर्चासह १९.५०रु असे आलेले आहेत.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक११/०७/२०१९**

धुळे महानगरपालिकेकडील आरोग्य विभागाकडील विषयाकरीता म.विरोधी पक्ष नेते यांचे दालनात व म.आयुक्त सो यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार डेग्यु रूग्णामध्ये वाढ होत असल्याने त्यावर आळा बसविणे कामी नागरीकामध्ये जनजागृती करणे करीता बोर्ड तयार करणेत आलेलआहे.तरी त्याकरीता येणारा खर्च **७७,३१४/-** मात्र आहे.

तसेच गोवर रूबेला मोहिम संदर्भात शहरात जनजागृतीसाठी होर्डीग व बॅनर लावणे करीता बोर्ड तयार करणेत आले आहे.तरी त्याकरीता येणारा खर्च **४१,४१८/-** मात्र आहे.

तरी धुळे म.न.पा बाजार विभागाकडील सर्व शॉपींग सेंटर मधील दुकान भोगवट धारकांना माहितीपर बॅनर तयार करणेत आले आहे. तरी त्याकरीता येणारा खर्च **५५,१६७/-** मात्र आहे.

तसेच धुळे महानगरपालिका मालमत्ता कर विभाग व लोक न्यायालय यांचे संयुक्त विदयमाने थकबाकी खटल्याबाबत सुनवणी करीता शहरात बॅनर तयार करणेत आले आहे. तरी त्याकरीता येणारा खर्च **१३,७९२/-** मात्र आहे.

तसेच मालमत्ता कर विभागा मार्फत शास्ती माफ करणे बाबत मान्यता मिळाल्यानुसार शहरामध्ये जनजागृती करीता डिजीटल बोर्ड लावणे करीता येणारा खर्च **२७,५८४/-** मात्र आहे.

सदर कार्यालयीन टिपणी वर म.उप.मु.ले.प सो.,यांनी म.मु.ले.अ यांचे अभिप्रायनुसार कार्यवाही करणेस शिफारस करता येईल असे नमुद केल्यानुसार सदरचे अधिकार म.आयुक्त सो. यांचे कक्षेत असुन त्यानुसार अनुसुची ड मधील प्रकरण ५(२)(२) मध्ये नमुद नुसार सदरचा खर्च रु.**२,१५,२७५/-** मात्र अदा करणेस तसेच झालेल्या कामास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-xxx**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-४९ — मानधनावरील संगणक प्रोग्रामर यांची एकत्रित मानधनावरील नियुक्तीस म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सौ. सुरेखा देवरे — सदर विषय नामंजूर करुन नव्याने जाहिरात प्रसिध्दी करुन नियुक्ती प्रक्रिया राबविण्यांत यावी.

म.संतोष खताळ — तांत्रिक व आवश्यक मनुष्यबळासाठी बाहय यंत्रणेव्दारे निविदा मागविणेबाबत प्रस्तावित आहे. त्यामुळे सदर मुदतवाढ देणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदरचा विषय नामंजूर करण्यांत यावा.

म. उपायुक्त — सदर कर्मचारी याची स्वच्छ सेर्व्हेक्षण कार्यक्रमातंर्गत आवश्यकता असून कामाचे स्वरुप लक्षात घेता सदर कर्मचा-यास मुदतवाढ देण्यांत यावी अशी प्रशासनाची शिफारस आहे.

म. सभापती — प्रशासनाच्या शिफारसीनुसार सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक११/०७/२०१९**

दिनांक २५/०७/२०१७ रोजी दैनिक लोकमत व पथयात्री या वृत्तपत्रात संगणक प्रोगोमर या पदांसाठी जाहिरत प्रसिध्द करण्यात आलेली होती.त्यानुसार पात्र उमेदवारांची दिनांक ०१/०९/२०१७ रोजी थेट मुलाखती घेण्यात आलेली होती. त्यानुसार निवड समिती ने श्री. मोहम्मद जुनैद मो. इम्रान यांची संगणक प्रोग्रॅमर या पदांसाठी निवड करण्यात आलेली होती. त्यांना जा.क्र. धुमपा/आस्था/९८४ दिनांक १६/१०/२०१८ अन्वये सहा महिन्याकरिता रुपये १५०००/- मात्र एकत्रीत मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती.

तदनंतर सहाय्यक सार्वजनिक आरोग्यधिकारी यांनी मोहम्मद जुनैद मो. इम्रान यांच्या कामाची निकड पाहता त्यांना कंत्राटी तत्वावर (मानधनावर) ०६ महिने कालावधी करिता फेरनियुक्ती देण्याबाबत शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरुपातील कार्यरत कर्मचाऱ्यांना मुदतवाढ/फेरनियुक्ती देतंना मे. स्थायी समितीची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असल्याबाबत नमुद केलेले आहे.

श्री. मोहम्मद जुनैद मो. इम्रान यांना जा.क्र. धुमपा/आस्था/ १४३ दिनांक १७/०५/२०१९ अन्वये ०६ महिन्याकरीता मे. स्थायी समितीच्या मंजुरीस अधीन राहुन फेर नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तरी श्री. मोहम्मद जुनैद मो.इम्रान यांच्या फेर नियुक्तीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार कार्यत्तर मंजुरी साठी प्रस्ताव सादर झालेला आहे.उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार प्रशासनाच्या शिफारसीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मुदतवाढीच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-xxx**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- ५० — सि.स.नं.३०४९,३०५० आणि २९२७ के. लाल बहादूर शास्त्री भाजीपाला मार्केट, पांचकंदील धुळे येथे खाजगीकरणातून (On B.O.L.T.Basis) व्यापारी संकुल बांधणेचे कामाबाबत मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षते खालील समितीने बैठकीत घेतलेल्या निर्णयाबाबत फेरविचार करणेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल वसंतराव सोनार मा. विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने चारही मार्केट मिळुन एकत्रित मोठा प्रकल्प राबवावा व ४५मिटर उंच टॉवर उभारावा असा निर्णय घेतलेला होता. तथापि जागेची भौगोलिक परिस्थिती वधुळे शहराची एकुण स्थिती लक्षांत घेता सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे व्यावहारीक दृष्टया व आर्थिक दृष्टया अडचणीचे आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव पुनश्च: फेर विचार करणेसाठी म. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडेस सादर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार प्रस्ताव म.विभागीय आयुक्तनाशिक यांच्याकडेस फेर निर्णयार्थ पाठविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक११/०७/२०१९**

धुळे महानगरपालिके मार्फत शहरातील अत्यंत वर्दळीच्या पाचकंदील येथील सि.स.न. ३०४९, ३०५० व २९२७ कै. लालबहादूरशास्त्री भाजीपाला मार्केट, सि.स.न ३०५२ येथील फळ मार्केट, सि.स.न. ३०५१ येथील शिवाजी मार्केट व सि.स.न. २९१३ येथील शंकर मार्केट ही अशी चारही मार्केट B.O.L.T तत्वावर विकसीत करणे प्रस्तावीत आहे. व मनपातर्फे तसे ठराव देखील पारीत करणेत आलेला आहे.

चारही मार्केट पैकी ३०४९, ३०५० व २९२७ येथील कै. लालबाहादुरशास्त्री भाजीपाला मार्केट B.O.L.T तत्वावर विकसीत करणेसाठी मनपातर्फे निवीदा प्रक्रिया राबवून विकासकास कार्यारंभ आदेश देखील देण्यांत आलेले आहेत. परंतु तेथील आस्त्विातील गाळेधारक मे. न्यायालयात गेल्याने विकासकास काम करणेसाठी जागा ताब्यात देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्प कार्यान्वीत होणेस विलंब झालेला आहे.

शासनाने शासन निर्णय क्र.धुमपा/२०१७/प्र.क्र./१२७ नवी-२४ दि. १९-०४-२०१७ रोजी पाचकंदील येथील चारही मार्केट संदर्भात अंतिम निर्णय घेणे करिता समिती गठीत केली त्यात म. विभागीय आयुक्त नाशिक, म. विधान सभा सदस्य, म. महापौर, म. जिल्हाधिकारी, म. पोलिस अधिक्षक, म. आयुक्त, म. नगररचनाकार, मनपा अशी सात सदस्यांची समितीची नेमणुक केली आहे. त्यात विभागीय आयुक्त नाशिक हे अध्यक्ष आहेत.

१. सदर समितीच्या बैठका दि. २८-०६-२०१७ व दि.२८-८-२०१७ रोजी झालेल्या आहेत.
२. दि.२८-०६-२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सुचनांनुसार धुळे महानगरपालिकेने दि. १४-०७-२०१७ व दि. २७-०७-२०१७ रोजी मनपा मार्फत सविस्तर अहवाल विभागीय आयुक्त नाशिक यांना सादर केला आहे.
३. विकासकाला कार्यादेश देवुन तसेच त्याने निविदा अटी शर्ती नुसार रक्कम भरुन सुध्दा न्यायालयीन तथा इतर बाबींमुळे प्रत्यक्ष कामास सुरवात न झाल्याने विकासकाने नुकसान भरपाई रकमेची मागणी केलेली आहे.
४. दिनांक२८-०८-२०१७ रोजीच्या सभेत म.विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार सि.स.न.३०४९,३०५० व २९२७ येथील प्रकल्प कार्यान्वीत झाला नसल्याने सदर प्रकल्प रद्द करणेत यावा. व चारही मार्केट मिळुन एकत्रीत मोठा प्रकल्प राबवावा व ४५ मीटर उंचीचा टॉवर उभारावा व त्यासाठी आवश्यक शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा. असा निर्णय समितीने घेतलेला आहे.

उक्त प्रमाणे सदरचा विषय म. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील दि. २८-०८-२०१७ बैठकीच्या इतिवृत्तानुसार कार्यवाही करणेसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार म.विभागीय आयुक्त नाशिक स्तरावरील समितीने चारही मार्केट मिळुन एकत्रित मोठा प्रकल्प राबवावा व ४५ मिटर उंच टॉवर उभारावा असा निर्णय घेतलेला होता. तथापि उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चे नुसार जागेची भौगोलिक परिस्थिती व धुळे शहराची एकुण स्थिती लक्षांत घेता सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे व्यावहारीक दृष्टया व आर्थिक दृष्टया अडचणीचे आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या टिपण्णीनुसार कै. लालबहादूरशास्त्री भाजीपाला मार्केटची B.O.L.Tतत्वावर निवीदा प्रक्रीया अंतीम होवून विकासकास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला

आहे. सद्यस्थितीत पांचकंदील परिसरातील या चारही मार्केट मध्ये एकुण १५४ ओटे व २३५ दुकाने आहेत. एकाच वेळेस चारही मार्केटचे बांधकाम करावयाचे झाल्यास हे सर्व ओटे व दुकानधारकांना व्यवसायासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे अशक्य प्राय आहे.

व्यापक जनहित तसेच स्थानिक दुकानदारांची मागणी विचारात घेता म. विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समितीचा निर्णय व्यवहार्य दिसुन येत नाही. त्यामुळे म.विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयावर फेरविचार करणेसाठी म. विभागीय आयुक्त नाशिक यांचे कडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-xxx**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५१ | आर्कीटेक्ट म्हणून मनपा पॅनलवर नियुक्ती करणे बाबत श्री.दिपेश सुशील खिलोसिया, ऑकिटेक्ट धुळे यांनी पत्र सादर केले आहे.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक ११/०७/२०१९**

श्री.दिपेश सुशील खिलोसिया आर्कीटेक्ट म्हणून सुमारे 5 वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभाग.पीडब्ल्यूडी व खाजगी काम करीत आहे तसेच कामात अनुभव असून अद्यापपावेतो कोणतीही तक्रार नाही. व डी.एस.के.नावाची आर्कीटेक्ट फर्म आहे.तरी मला आपल्या महानगरपालिकेत आर्कीटेक्ट म्हणून काम करण्यास तयार आहे. तरी मनपाच्या पॅनल वर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्ती होणे बाबत कळविले आहे.

तरी धुळे मनपाची हद्दवाढ लक्षात घेता व शासनाकडील सद्यस्थितीत पर्यटन विभागामार्फत रु.12 कोटी व विशेष अनुदान योजनेत रु.5.00 कोटीचा योजनेसाठी विकास कामांची प्रस्ताव तयार करणे व शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे कामी आर्कीटेक्टची आवश्यकता असल्याने श्री.दिपेश सुशील खिलोसिया; आर्कीटेक्ट यांची शासनाकडील मंजूर दरानुसार मनपा पॅनल वर नियुक्ती करणे आवश्यक आहे.

याबाबत मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी साहेब यांच्या अभिप्रायानुसार श्री. दिपेश सुशील खिलोसिया आर्किटेक्ट धुळे यांना धुळे महानगरपालिकेमार्फत पर्यटन विकास निधी तसेच महाराष्ट्र नागरी मुलभूत सेवा सुविधा विकास कामे व शासन तथा मनपा अंतर्गत असणारी कामे व अन्य विकास कामांचा प्रकल्प आराखडा व अहवाल तयार करणे तसेच शासनाकडेस मंजुरीसाठी सादर करणे या कामासाठी आर्किटेक्ट नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. महाराष्ट्र शासनाकडील दिनांक 4 जून 2018 च्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व अन्यअनुज्ञेय फी अदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-xxx**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०८ ऑगस्ट२०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०८/०८/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| ९ | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ११ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १२ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १३ | श्री. के. आर चव्हाण | लिपीक अभिलेख विभाग |
| १४ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १५ | श्री. प्रमोद बोरसे | अति. विभाग लिपीक |
| १६ | श्री. रमजान अन्सारी | प्. आस्थापना प्रमुख |

मा. सभापती सन्मा.सदस्य मा. उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

यादी देण्यांत येते की, दिल्लींच्या माजी मुख्यमंत्री, तसेच माजी परराष्ट मंत्री लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्या ७ वेळेस संसदेच्या आणि ३ वेळेस विधी मंडळाचे नेतृत्व करण-या मा. सुषमा स्वराज यांचे दुदैवी निधन झाले. एक कणखर महिला नेतृत्वाला आज देशाने गमावले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजलीचा ठराव पारीत करावा ही विनंती.

सूचक :- सौ. सुरेखा चंद्रकांत उगले

अनुमोदक :- सौ. कशीश गुलशन उदासी

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक ०८/०८/२०१९**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार दिल्लींच्या माजी मुख्यमंत्री,तसेच माजी परराष्ट्र मंत्री लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्या ७ वेळेस संसदेच्या आणि ३ वेळेस विधी मंडळाचे नेतृत्व करण-या मा.सुषमा स्वराज यांचे दुदैवी निधन झाले. एक कणखर महिला नेतृत्वाला आज देशाने गमावले आहे.

श्रीमती सुषमा स्वराज यांच्या अकाली दुख:द निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे निधनानिमित्त दोन मिनिट मौन राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी**

यादी देण्यात येते कि,जम्मू काश्मीर मध्ये कलम ३७० व ३५अ हटवले. आता जम्मू काश्मीर विशेष राज्य राहिले नाही. आता जम्मू काश्मीर मध्ये दुहेरी नागरीत्व राहिले नाही.आता एकच तिरंगा झेंडा संपूर्ण भारतात फडकेल.

भारत सरकारच्या या निर्णयाने श्री.नरेंद्र मोदीजी पंतप्रधान व संरक्षण मंत्री श्री.अमितजी शहा यांचा अभिनंदनाचा ठराव या बैठकीत करावा हि विनंती.

सूचक :- सौ. सुरेखा चंद्रकांत उगले

अनुमोदक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेब व संरक्षण मंत्री श्री. अमितजी शहा साहेब यांनी जम्मू काश्मीर मधील कलम 370 व 35 अ हटविण्यांचा धाडसी निर्णय घेतल्याबद्दल दोन्ही नेत्यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक ०८/०८/२०१९**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार जम्मू काश्मीर मध्ये कलम ३७० व ३५ अ हटवले. आता जम्मू काश्मीर विशेष राज्य राहिले नाही. आता जम्मू काश्मीर मध्ये दुहेरी नागरीत्व राहिले नाही.आता एकच तिरंगा झेंडा संपूर्ण भारतात फडकेल.

भारत सरकारच्या या निर्णयाचे तसेच श्री.नरेंद्र मोदीजी पंतप्रधान व संरक्षण मंत्री श्री.अमितजी शहा यांचा अभिनंदनाचा आजच्या सभेत अभिनंदन करण्यांत येत आहे व तसा अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५२ प्राथमिक शिक्षण निधी गठीत करुन आकस्मिक खर्च व इतर खर्चासाठी रक्कम १४,५०,०००/- मात्र निधी स्थापीत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे सभापती महोदय, आपला हा विषय माहीती साठी आलेला आहे. तसेच काही वसुली संदर्भातील जे विषय आहेत ऑडीटमध्ये या विषयी सर्व संबधीत विभागांना विचारण्यात यावे हा आर्थिक विषय होता म्हणुन आमच्या कडे आलेला आहे. तसेच आर्थिक विषय जे वसुली संबंधीत आहेत त्यांचे अनुपालन का झालेले नाही. याची माहिती मागविण्यात यावी. तसेच ठेकेदारांकडुन वसुली बाबत कार्यवाही झाली आहे का?,

म.मुख्य लेखाधिकारी लेखापरिक्षणातील लेखाआक्षेपावरील अनुपालनाबाबत संबंधीत विभागांना कळविण्यात आलेले आहे. परंतु त्या विभागांकडुन अनुपालनाबाबत माहिती प्रलंबीत आहे.

म. उपायुक्त पुनश्च: संबंधीत विभागांना कळविण्यात येवुन अनुपालनाबाबतची कार्यवाही करुन घेण्यात येईल.

म. नागसेन बोरसे सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक ०८/०८/२०१९**

म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे कार्यालयास स्थानिक निधी लेखा उपविभाग-३ औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखा आक्षेप क्रं.३ अन्वये प्राथमिक शिक्षण निधी गठीत न केल्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला असून सदर आक्षेपामध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ नियम ४४ नुसार प्रत्येक महानगरपालिकेचे प्राथमिक शिक्षणनिधी ठेवणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण निधीत राज्य शासन व महानगरपालिका यांची अनुदाने फीच्या व दंडाच्या रक्कमा, प्राथमिक शिक्षणासाठी वेळोवेळी मिळतील अशा इतर रकमा यांचा समावेश करणे अभिप्रेत आहे.

मुंबई प्राथमिक शिक्षणअधिनियम१९४७ नियम ४५नुसार सदर निधी प्राथमिक शिक्षण मंडळाच्या नावे ठेवून या अधिनियमाच्या तरतुदीनुसार खर्च करणे आवश्यक आहे.म.

सहाय्यक संचालक सो. स्थानिक निधी लेखापरिक्षा उपविभाग-३ औरंगाबाद यांनी सन २०१४-१५ या वर्षाचे लेखापरिक्षरण केले असता आक्षेप क्रमांक ३ अन्वये आक्षेप नोंदविला आहे.

सन २०१४-२०१५ च्या लेखापरिक्षरणातील आक्षेप क्रमांक ३ वगळण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रक्कम रुपये १४,५०,०००/- निधीची आवश्यकता आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील ४४,४५व ४६ च्या अधिनियमानुसार निधी ठेवण्यासाठी मान्यता देण्यांत देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५३ | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यास मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | २०१८-१९ वित्तीय वर्षाचे वार्षीक लेख्यांबाबत माझी शंका आहे.कॅबीन जागा भाडे ०० असे दाखविण्यात आले आहे. तसेच जाहिरात जागा भाडे म्हणजे काय आहे याबाबत माहिती देण्यात यावी. गाडया, सरकारी इमारतींवर जाहिरातींचे पोस्टर चिटकविलेले असतात. त्या पासुन आपल्याला काय उत्पन्न मिळाले ? यात उत्पन्नाची अपेक्षा ०० दाखविण्यात आलेली आहे. |
| म. मुख्यलेखाधिकारी | याबाबत विभागाने कोणतीही तरतुद केलेली नाही. त्याबाबत उत्पन्न अपेक्षित आहे. |
| म. नागसेन बोरसे | तरतुद केलेली नाही असे कसे होणार आहे. आपल्याला अपेक्षित असलेल्या उत्पन्ना बाबत आपण तरतुद करतो आपण उत्पन्न दाखवीत नाही तर खर्च कसा काय दाखवीत आहे. जागा भोडे पासुन आपल्याला काय उत्पन्न अपेक्षित आहे. |
| म. उपायुक्त | जाहिरात कर वसुली बाबत स्वतंत्र विभाग आहे. जागा कर हा आपण वसुल करतो. जाहिरात हा एक वेगळा विभाग आहे. त्यात आपण काही कर वसुल करतो.हे Extra हेड आलेले आहेत. |
| नागसेन बोरसे | extra हेड का दाखविण्यात आला नाही. |
| म. उपायुक्त | अनु.क्र. ४ ला हेड बाबत माहिती आहे. |
| म. नागसेन बोरसे | हा आपण केलेला खर्च आहे. |
| म. उपायुक्त | खर्चा बाबत नसुन जमा झालेले आहे. |
| म. सहा.आयुक्त | १४ लाख रु. तरतुद आहे. |
| म. नागसेन बोरसे | नवीन नळ कनेक्शन व मिटर फिटींग काय आहे? |
| म. सहा आयुक्त | "व" चुकुन टाईप झाला आहे. तिथे व शब्द टाईप करायचा नको होता. |
| म. नागसेन बोरसे | व आल्यामुळे नळकनेक्शन हा एक वेगळा भाग होतो आणि मिटर फिटींग वेगळा भाग होतो. यात उत्पन्न आणि खर्च दोघी दाखवायला पाहिजे होते ते दाखविलेले नाही. तसेच शहरात हद्दवाढी नंतर किती दवाखाने नोंदणी झालेले आहेत. त्यांची फी किती आकारण्यात आलेली आहे. त्यांची रजिस्ट्रेशन फी घेण्यात येते का? |
| म. नगरसचिव | दवाखाना रजिस्ट्रेशन फी आकारण्यात येते. |
| म. नागसेन बोरसे | यामध्ये ०० असे दाखविण्यात आले आहे. माझ्या माहिती प्रमाणे ८ ते १० दवाखाने नवीन नोंदणी झाले त्यापासुन मिळणारे उत्पन्न उत्पन्नाची बाजु आहे. तसेच अ.न.७ ला ५ व्या ६ व्या आयोगाचा फरक २ कोटी दाखविण्यात आला आहे. त्यावर खर्च का दाखविण्यात आला नाही. |

| | |
|---|---|
| म.मुख्य लेखाधिकारी | खर्च वेतनाच्या रेग्युलर हेड ला वर्ग झाला आहे. वेतनावर खर्च करण्यात आला आहे. |
| म. नागसेन बोरसे | वेतनासाठी मुळ अनुदान प्राप्त झाले आहे. ते वेतनाच्या हेड मधुन कसे खर्च करण्यात आले. २ कोटीचा विषय आहे. हेड मधुन extra खर्च आस्थापना खर्चात केला आहे असे दाखविण्यात आले |
| म. उपायुक्त | सदरचा खर्च आलेल्या अनुदानातुन करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी ०० तरतुद तक्त्यात दर्शविलेली आहे. पुर्नविनीयोजन करण्यासाठीच सदर लेखे सादर झाले आहे. |
| म. नागसेन बोरसे | कलामंदीर भाडे दर्शविलेले आहे. तथापी सदर भाडयापोटी तसेच संभाजी गार्डन यापासुन नगरपालिकेस किती उत्पन्न प्राप्त झाले याचा बोध होत नाही. याबाबत खुलासा करावा. |
| म. अभियंता | शाहु महाराज नाटयगृह हे श्रीकृष्ण खांडसरी मिल यांना चालविण्यासाठी दिलेले आहे. त्यांची मुदत संपलेली आहे. याबाबत ३ वेळा निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. परंतु प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच त्यांनी याबाबत बँक गॅरन्टी दिलेली असुन कराराप्रमाणे त्यांनी भाडे भरावयाचे आहे. सदरचे भाडे लेखा विभागात जमा होते. याबाबत माहिती घेवुन कळविण्यात येईल. तसेच स्थायी समितीने आदेश दिल्यास शाहु महाराज नाटयगृह व संभाजी गार्डन हे पुनश्च: देखभाल दुरुस्तीसाठी देणेबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| म. नागसेन बोरसे | विषयास मान्यता देण्यात यावी. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे लेखे यास महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९४ अ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक ०८/०८/२०१९**

धुळे महानगरपालिकेचे सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९४ अ नुसार व लेखा संहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रं.२८ नुसार तयार करण्यांत आलेले असून सदर लेखे प्रमाणित करुन सादर करण्यांत आलेले आहे .

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे लेखे यास महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९४ अ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५४ | सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक ०८/०८/२०१९**

सन२०१८-१९चे वार्षिक लेखे तयार करून मे.स्थायी समितीपुढे मंजूर कार्यालयीन अहवालानुसार मंजूरीसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर वार्षिक लेखे सोबत

जोडलेला तक्ता नमुना क्र १० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकूण रक्कम रूपये ९५४.२२ लक्ष चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३अन्वये मंजूर झालेल्या अर्थसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौणशिर्षाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पुर्ण नियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील. त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्यानुसार शिल्लक रक्कम रूपये ९६१.०४ लक्ष मधून भागविण्याकरीता उक्त कार्यवाहीत महानगरपालिका अस्तित्वात असल्याने मे.स्थायी समिती पुढे ठराव होणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षात वर्ग करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५५ पाणीपुरवठा विभागाकडील मानधन तत्वावरील तांत्रीक कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमिन पटेल — या प्रस्तावात सुमारे ४० कर्मचाऱ्यांना मुदतवाढ द्यावयाची आहे. परंतु त्यांची नावे या प्रस्तावासोबत दिलेली नाही. सदर नावांची यादी देणे आवश्यक होते. तसेच सदरचे कर्मचारी हे फक्त ५००० रु मानधनावर काम करीत आहेत. आजच्या परिस्थितीत सदरचा दर फारच कमी आहे. तरी सदरचे मानधन वाढवुन देण्यात यावे. तसेच आमच्या भागातील स्वच्छतेची परिस्थीती पाहता भागात स्वच्छतेसाठी कर्मचारी कमी असल्याने. स्वच्छतेसाठी मानधनावर कर्मचारी वाढवुन द्यावेत. याबाबत तरतुद तपासुन त्वरीत कार्यवाही करावी.

म. उपायुक्त — याबाबत आम्ही नियोजन करीत आहोत. मानधनावर कर्मचारी लावणेबाबत नियम तपासुन व मा. आयुक्त साहेब यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

म. नागसेन बोरसे — सदर अहवालात सदरचे कर्मचाऱ्यांना दि. १६/६/२०१९ पासुन मुदतवाढ देणे असे नमुद आहे. त्याप्रमाणे मुदतवाढ देता येवु शकेल का याबाबत खुलासा करणेत यावा.

म. काया्रलयीन अधि. — सदर प्रस्तावास आपणांस कार्योत्तर मंजुरी द्यावयाची आहे. सदरचे कर्मचारी सद्यस्थितीत काम करीत आहेत. आपणांस पुर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्यासाठी सदरचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

म. नागसेन बोरसे — याबाबत काही लेखाआक्षेप निघाल्यास संबंधीत अधिकारी जबाबदार राहतील याबाबत नोंद करावी. व विषय मंजुर करावा.

म. नगरसचिव — यासंदभार्त म. उपमुख्यलेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) नुसार तरतुद असुन त्या तरतुदीकडे सभागृहाचे लक्ष वेधुन त्याबाबत माहिती द्यावी. असे कळविलेले आहे. त्यानुसार सदर तरतुदीचे वाचन करीत आहे. आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही. (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या)कोणत्याही

नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. या प्रमाणे तरतुद आहे.

म. उप.मु.ले. प. — उक्त तरतुदीनुसार मुदतवाढ देणे बाबत निर्णय घ्यावा.

म. नागसेन बोरसे — उक्त तरतुद पाहता आपण मुदतवाढ देवु शकतो किंवा कसे याबाबत प्रशासनाने खात्री करावी व सदर कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप व कामाची आवश्यकता लक्षात घेता कार्यालयीन अहवालास अधिन राहुन प्रस्तावास मान्यता द्यावी.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून विभागामार्फत दिलेल्या अभिप्रायानुसार सदरच्या प्रस्तावास पूर्वलक्ष प्रभावाने कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक ०८/०८/२०१९**

धुळे महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागात रिक्त असलेले पद पंप ऑपरेटर , फील्टर ऑपरेटर , फील्टर इन्स्पेक्टर , विजतंत्री , व व्हॉलमन भरणेबाबत स्थानिक वृत्तपत्रात संक्षिप्त व मनपाच्या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननीची प्रक्रिया पूर्ण होवून खालीलप्रमाणे पात्र ठरलेल्या पदनिहाय उमेदवारांची रु.५०००/- मात्र एकत्रित मानधनावर फक्त ६ महिनेकरीता नियुक्ती करण्यात आली होती. व कामाची निकड लक्षात घेता सदर कर्मचा-यांना त्यांची सेवा खंडीत करुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

| **अ क्र** | **पद** | **कर्मचारी संख्या** |
|---|---|---|
| १ | पंप ऑपरेटर | ११ |
| २ | फील्टर ऑपरेटर | ०६ |
| ३ | फील्टर इन्स्पेक्टर | ०१ |
| ४ | विजतंत्री | ०५ |
| ५ | व्हॉलमन | १६ |
| | **एकुण** | **३९** |

वरील प्रमाणे एकुण ३९ मानधनावरील कंत्राटी उमेदवारांची मुदत दिनांक ४/६/२०१९ रोजी संपुष्ठात आलेली आहे. पाणीपुरवठा विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांच्या अहवालानुसार पाणीपुरवठा ही तातडीची सेवा असल्याकारणाने वरील कर्मचारी मुदत संपल्यानंतरही कार्यरत असल्याने सदर कर्मचा-यांना मुदतवाढ न दिल्यास पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. तरी त्यांची सेवा खंडीत करुन दिनांक १६/०६/२०१९ पासून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरुपातील कार्यरत कर्मचा-यांना मुदतवाढ /फेर नियुक्ती देताना मे स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असल्याबाबत नमूद आहे.

तरी वरील १ ते ३९ कर्मचा-यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार फेर नियुक्ती देणेबाबत सादर झालेला आहे.

सदर कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप व कामाची आवश्यकता लक्षात घेता सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून विभागामार्फत दिलेल्या अभिप्रायानुसार सदरच्या प्रस्तावास पूर्वलक्ष प्रभावाने कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५६ — धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीचा बाजूस असलेले व्यापारी संकुल बांधणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कशीश गुलशन — सभापती महोदय, मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजुस असलेले व्यापारी संकुल लवकरात लवकर बांधकाम करुन समाजबाधंवांना उपलब्ध करुन देणेबाबत आश्वासीत केले होते. परंतु ६ महिन्यांचा कालावधी होवुनही कार्यवाही झालेली नाही. तरी लवकरात लवकर व्यापारी संकुलाचे बांधकाम करुन व्यापारी बांधवांचे पुनर्वसन करण्यात यावे. आणि सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ दिनांक ०८/०८/२०१९**

धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीचा बाजूस असलेले व्यापारी संकुल बांधणे कामी मे.स्थायी समिती ठराव नं.19 दि.28/02/2018 अन्वये मंजुरी दिली असता सदरचे मंजुरीनुसार व्यापारी संकुल बांधणे कामाच्या अंदाजपत्रकीय खर्च रु.2,84,50,434/- मात्रला तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे.

तरी व्यापारी संकुल बांधणे कामी ई- निविदा क्र./पा.पु.वि./ 205 दि.16/6/2019 अन्वये (फेर तिसरी वेळ ) दै. नवभारत व खान्देश मैदान या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.25/06/2019 अखेर दोनच निविदा धारकांनी भाग घेतला असून व सदरची निविदा ही 3री वेळ असल्याने उक्त दोन्ही निविदा धारकांचे खालीलप्रमाणे दर आलेले आहे

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 व | **मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी** | **शे. 5% जास्तीने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | बोरसे ब्रदर्स इंजि. ॲन्ड कन्सट्रक्शन प्रा.लि. | शे.10% जास्तीने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी** , धुळे यांचे शे. 5% जास्तीने दर आलेले आहे. तरी उक्त **मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी, धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./ 310 दि. 30/07/2019 अन्वये दरवाटाघाटीस सदर ठेकेदार यांनी म. जिल्हाधिकारी सो., यांचे समक्ष सदरचे काम शे. 5% जास्तीने ऐवजी शे. 1% जास्तीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी, धुळे** यांनी दि.30/07/2019 रोजी दिलेले पत्रानुसार दर शे. 1% जास्तीने करणेस संमती दर्शविलेली आहे.

तथापि सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केलेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** देणेच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

नुसार मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो लेखी करारनामा करुन घेण्यंत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ५७ धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीचा आवरात श्री.संत नरहरी महाराज पुतळा उभारणे व चबुतरा उभारणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे सदर विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सुनिल सोनार सदर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रसतावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक ०८/०८/२०१९**

धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीचा आवरात श्री.संत नरहरी महाराज पुतळा उभारणे व चबुतरा उभारणे कामास धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.102 दि.21/03/2018 अन्वये म. आयुक्त सो., यांचे दि. 13/03/2018 नुसार अंदाजपत्रकीय खर्च रु.28,53,642/- मंजुरी दिली असता सदरचे मंजुरीनुसार श्री.संत नरहरी महाराज पुतळा उभारणे कामी ई-निविदा क्र./पा.पु.वि./ 181 दि.04/6/2019 दै. श्रमराज्य व आपला महाराष्ट्र या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.27/06/2019 पावेतो खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | **एकविरा कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | भूषण एल. चौधरी | शे 3% जास्तीने | |
| 3 | चेअरमन, गौरव मजूर सह. सोसा., निशाने | शे 2% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून त्यात श्री./**एकविरा कन्सट्रक्शन** यांचे सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे.

तरी सदरचे काम करणे कामी आलेले सर्वात कमी **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे अंदाजपत्रकीय दराने देणेसच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो लेखी करारनामा करुन घेण्यंत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २९ ऑगस्ट २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक २९/०८/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल बसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ९ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १० | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ११ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १२ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १३ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १४ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री.शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. राजेश गायकवाड | लेखाधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १५ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १६ | श्री. के. आर. चव्हाण | लिपीक अभिलेख विभाग |
| १७ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग लिपीक |
| १९ | श्री. रमजान अन्सारी | प्र. आस्थापना प्रमुख |
| २० | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |
| २१ | श्री. बी. जी. जगदाळे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |

मा. सभापती सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

यादी देण्यांत येते की, माजी परराष्ट मंत्री तसेच राजकारणातील सौज्वळ व्यक्तीम्हत्व मा. सुषमा स्वराज तसेच माजी केंद्रीय अर्थमंत्री व कायदे तज्ञ मा. अरुणजी जेटली व स्थायी समितीच्या सदस्या सौ. सुरेखा उगले यांचे सासरे माधवराव पाटीलबुवा उगले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले या दिवगंत मान्यवरांना आजच्या बैठकीत श्रध्दांजली अर्पण करुन ठराव करावा ही विनंती.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री. संतोष खताळ, श्री. सुनिल वसंतराव सोनार

**म. सभापती** सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६९ दिनांक २९/०८/२०१९**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार माजी परराष्ट मंत्री तसेच राजकारणातील सौज्वळ व्यक्तीमत्व मा.सुषमा स्वराज तसेच माजी केंद्रीय अर्थमंत्री व कायदे तश्र मा.अरुणजी जेटली व स्थायी समितीच्या सदस्या सौ.सुरेखा उगले यांचे सासरे माधवराव पाटीलबुवा उगले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे.

वरील मान्यवरांच्या अकाली दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे निधनानिमित्त दोन मिनिट मौन राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेला रजेचा अर्ज**

सन्मा. सदस्या सौ. देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या स्थायी समिती सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेस विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७० दिनांक २९/०८/२०१९**

सन्मा. सदस्या सौ. देवरे सुरेखा भागवत यांनी आजच्या स्थायी समिती सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेस विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने आंबेडकर पुतळा व परिसर दुरुस्ती तसेच अन्य अनुषंगिक कामे मे.मनुदेवी कन्स्ट्रक्शन ठेकेदार यांचेकडून विना निविदा तांतडीने करून घेण्यात आलेली असल्याने महानगरपालिका अधिनियम कलम अनुसूची ड मधील प्रकरण 5 मधील (2) (2) नुसार कामाचा खर्च रु.35,840/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. संतोष खताळ | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक २९/०८/२०१९**

धुळे मनपा हद्दीत दि 14/04/2019 रोजी मा .डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार असल्याने धुळे शहरातील जेल रोड वरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळ्यास कलरिंग व पॉलिश करणे तसेच किरकोळ स्टील रॅलिंग दुरुस्ती व स्टील दरवाजा नविन बसविणे आवश्यक आहे असे कळविले आहे .

दि.14/ 04/2019 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरातील संपूर्ण दलित बांधवांचा डॉ .बाबासाहेब आंबेडकरांची मिरवणूक जेलरोड येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे समाप्त होत असल्याने सदरचा पुतळ्यास पॉलिश करणे व पावडर स्प्रे, वारनिशी व सिहांस सिल्व्हर कोट पॉलिश करून स्टील रॉलिंग दुरुस्ती व स्टील दरवाजा नविन बसविणे चे काम मे.मनुदेवी कन्स्ट्रक्शन ठेकेदार यांचेकडून विना निविदा करून घेण्यात आलेली असल्याने महानगरपालिका अधिनियम कलम अनुसूची ड मधील प्रकरण 5 मधील ( 2)(2)नुसार सदर कामी झालेला खर्च रु.35,840/-मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-५९ | तापी पाणीपुरवठा मुख्य जलवाहिनी वरील सोनगीर बारी जवळ जामफळ तलाव भाग येथील व बांभळे फाटा येथे लिकेज दुरुस्ती करणेचे काम तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आलेत.यासाठी झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण् 2 (2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. संतोष खताळ | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७२ दिनांक २९/०८/२०१९**

दि.2 जुलै 2019 रोजी सायंकाळी तापी पाणी पुरवठा पाईपलाईनला जामफळ तलाव जवळ जुनी हिरा हॉटेल येथे आकस्मित मोठी गळती लागली या ठीकाणी भूमिगत पाईप लाईन फुटल्यामुळे पाणी पुरवठा बंद पडला.याबाबत म.प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी महोदय यांना याबाबत तात्काळ अवगत करणेत आले. लिकेजेस बाबत प्रत्यक्ष शुटींग म. आयुक्त सो. यांना सादर करणेत आली. म.आयुक्त व जिल्हाधिकारी सो. यांना सदर काम तातडीने करणे बाबत म. अभियंता यांना आदेश केले.

दि.2जुलै रात्री पासून सदर काम करणेत आले. या ठिकाणी भूमिगत पाईप लाईन मोकळी करून कांक्रीट तोडणे जीर्ण झालेला पाईपचा हिस्सा कापून नवीन पाईपचा पच मारणे इ. कामे सलग दोन दिवस करणेत आली. या कामी म.सभापती सो.स्थायी समिती यांनी तसेच सन्मा. नगरसेवक यांनी भेट देवून कामाची पाहणी केली.मा.युवराज पाटील सभापती सो.श्री. नागसेन बोरसे श्री. सुनील बैसाणे, श्री.भिकन आण्पा वराडे यांनी कामावर भेट देवून सूचना केल्या. सदर काम पूर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत चालू करणेत आला. सदर काम आकस्मित उद्भवल्यामुळे व प्रभारी आयुक्त सो. तथा जिल्हाधिकारी सो. यांचे आदेशाने सदर काम तातडीने विना निविदा के.जी.शिंदे. कंत्राटदार नरढाना यांचेकडून करून घेण्यात आले आहे. सदर कामी सोबत अंदाजपत्रक व प्राथमिक देयक खर्च नुसार खर्च रु.122502/- मात्र आहे. तसेच दि.17/7/2019 रोजी बाभळे पाणी पुरवठा केंद्रासमोरील क्रॉस कनेक्शन पाईप जवळ अचानक गळती झाली. याबाबत म.अभियंता सो. यांनी म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो.यांना बाबत अवगत केले. सदरचे काम तातडीने के.जी.शिंदे यांचे कडून करून घेण्यात आले आहे.सदर कामी खर्च रु.32118/- आहे.

वरील प्रमाणे दोन्हीकामे तातडीने करून घेण्यात आली आहे. सदर कामास व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण2(2) अन्वयेकार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६० — धुळे मनपा आरोग्य विभागाकडील वाहन टाटा 407 घंटागाडी, नग 10 व टाटा 1613 एसई. झुला गाडी 01 असे एकुण 11 वाहने दुरुस्ती करणेचे बिल3,30,472/- मात् खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुरेखा उगले — सदर वाहने कोणामार्फत व कोणत्या एजन्सी मार्फत दुरुस्त करण्यांत आली. तसेच याबाबत करारनाम्यातील अटी शर्ती काय आहेत याचा खुलासा करावा.

म. भांडारपाल — सदर वाहने ही नादुरुस्त होती. त्यामुळे तत्कालीन आयुक्त श्री. सुधाकर देखमुख साहेब यांच्या आदेशानुसार खाजगी कंपनी मे.निलेश ऑटो पार्टस यांच्याकडून बाजार भावाप्रमाणे तांतडीने दुरुस्त करुन घेण्यांत आलेली आहेत.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक २९/०८/२०१९**

धुळे म.न.पा आरोग्यविभाग मार्फत दैनंदिन घनकचरा उचलणे व वाहतुक करणे कामी वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांना जा.नं/धु.म.पा/आरोग्य /६५९ दि.०६/०३/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यास आलेला आहे. त्यामुळे त्याकामी त्यांनी धुळे म.न.पा कडील नविन वाहन ७९ घंटा गाडी ताब्यात देण्यात आलेल्या आहे. तरी त्यांना म.न.पा कडील TATA ४०७

घंटागाडी,नग १० व TATA १६१३ SE, झुला गाडी ०१ असे एकुण ११ वाहने सुस्थीतीत करून मिळणेस बाबत उक्त संदर्भिय पत्र सादर केले आहे. TATA ४०७ घंटागाडी,नग १० व TATA १६१३ SE, झुला गाडी ०१ असे एकुण ११ वाहनेसुस्थितीत दुरूस्त करून करून सदरचे वाहन वॉटर ग्रेस प्रॉडक्टस यांना देण्यासाठी म.सहाय्यक आरोग्य अधिकारी सो. तसेच म.उपायुक्त सो यांनी कार्यालयी टिपणी स्टोअर विभागाकडेस सादर केलेली आहे.

तरी त्याकरीता येणारा खर्च ३,३०,४७२/-मात्र आहे. सदरचे वाहने दुरूस्ती करणे करीता धुळे म.न.पा कडील मॅकनीक यांनी वाहनांची तपासणी करून सदरचे काम करणे आवश्यक असुन म.आयुक्त सो.यांच्या सुचने नुसार वाहन दुरूस्ती करून घेण्यात आले आहे.

तरी सदरचे खर्च करण्याकरीता कार्यात्तर मंजुरी करीता प्रकरण सादर केले असता. म. उप.मु.ले.प यांचे अभिप्रायानुसार पुर्तता करणेचे अधीन राहुन सदरचे काम म.आयुक्त सो., यांचे अधिकार कक्षेत आहेत. तरी सदरकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५ (२) (२) मध्ये नमुद नुसार झालेला खर्चास ३,३०,४७२/- मात्रला कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-६१ — मालेगांव रोड पाणी पुरवठा केंद्र येथील 300 KVA ट्रान्स्फार्मर दुरुस्ती करणेसाठी झालेला खर्च रु.1,10,883/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. संतोष खताळ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक २९/०८/२०१९**

दि.10/4/2019 रोजी संध्याकाळी 5 वाजेच्या सुमारात मालेगाव रोड पाणी पुरवठा केंद्र येथील ट्रान्सफार्मर आकस्मित रित्या ढासळ्याने येथील 300 KVA ट्रान्सफार्मर जमिनीवर कोसळला दि.10/4/2019 रोजी सदरील ट्रान्सफार्मर हायड्रोच्या मदतीने उचलण्यात आला. ट्रान्सफार्मर पडल्याने त्याचे ऑईल वाहिले L.V.Coil /H.V.Coil ला धक्का लागला त्यामुळे ट्रान्सफार्मर Continutiy shoot दर्शवित असल्याने तपासणी करून दुरुस्ती साठी मे. रेंडीऐंस इलेक्ट्रिकल्स यांचेकडे पाठविणेत आला.

उक्त प्रमाणे 300 KVA ट्रान्सफार्मर ओव्हरोलिंग करणे, ऑईल टाप अप करणे, ट्रान्सफार्मर लोडिंग, अपलोडिंग व वाहतूक, इ.कामाकरिता खर्च रु.110833% (18% GST सह) आहे. सदरील ट्रान्सफार्मर तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने उक्त प्रमाणे मे. रेंडीऐंस इलेक्ट्रिकल्स यांचेकडून करून घेण्यात आले आहे.

सन 2019-20 च्या अर्थसंकल्प तरतुदीनुसार पाणी पुरवठा केंद्र देखभाल दुरुस्ती कामा करिता रु.200 लक्ष तरतूद आहे. या तरतुदी अंतर्गत मे. रेंडीऐंस इलेक्ट्रिकल्स यांचे सदर 300 KVA ट्रान्सफार्मर दुरुस्ती करिता रु.1,10833% चे खर्च बिल योग्य व उचित असल्याने सदर

कार्योत्तर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5(2)(2) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ६२ | धुळे म.न.पा क्षेत्रात LED पथदिवे बसविणे कामी EESL कंपनीशी supply mode वर करारनामा करणे व याकामी (Erecting) कंत्राटदार नेमणे करीता दर करार करणे करीत निविदा कार्यवाही करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले व या प्रस्तावासंदर्भात म.विद्युत अभियंता यांनी प्रथम माहिती द्यावी असे सूचित केले. |
| म. विद्युत अभियंता | धुळे शहरासाठी संपूर्ण एलईडी पथदिवे बदलणेचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास महासभेने मंजुरी दिलेली आहे.महासभेच्या मान्यतेप्रमाणे ईईएसएल कंपनी कडून सप्लाय मोडवर एलईडी घेणे व ते मनपा मार्फत बसविणेची कार्यवाही करणेसाठी मान्यता आहे. याप्रमाणे ईईएसएल कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या एलईडी बसविणेसाठी ठेकेदार नेमणूक करणे व त्यानुसार त्या विभागामध्ये जुने पथदिवे काढुन नविन एलईडी पथदिवे बसविणेसाठी निविदा प्रसिध्द करणेचा प्रस्ताव सादर आहे. यासाठी एकत्रीत अंदाजपत्रक सादर आहे. मे. महासभेने दिलेल्या मान्यतेप्रमाणे ईईएसल कंपनी कडुन पथदिवे सप्लाय मोडवर घेतल्यानंतर त्यांची पाच वर्षाकरीता रिप्लेसमेंन्ट गॅरन्टीं आहे. त्यानुसार आवश्यक एलईडी व्यतिरिक्त १०% जास्तीचे एलईडी कंपनीकडुन घ्यावयाचे असुन नादुरुस्त एलईडी बदलणेसाठी त्यांचा वापर होणार आहे. यापुर्वीच्या प्रस्तावामध्ये ईईएसल कडुन प्राप्त प्रस्तावानुसार प्रकल्प खर्च ८.५ कोटी व त्यावरील व्याज अशी एकुण रक्कम ७ वर्षामध्ये परत करावयाची होती. म्हणुन या ऐवजी सप्लाय मोड वर एलईडी घेणे व ते मनपा स्तरावर बसविणेसाठी मे. महासभेने दिलेल्या मान्यतेनुसार सदरचा प्रस्ताव एलईडी पथदिवे बसविण्यासाठी च्या अंदाजपत्रकीय मंजुरी साठी सादर आहे. |
| म. नागसेन बोरसे | १२ टक्के म्हणजे १७०० लाईट आपल्याला एक्स्ट्रा भेटणार आहेत. ग्रामीण भागामध्ये ६ मी. ते ९ मी. रस्ते आहेत. तर ६ मी. ला ३५ व्हॅटचा लाईट लावणार आहोत. त्यांचे अंतर किती आहे? |
| म. विद्युत अभियंता | शहरामध्ये ९९ % स्ट्रक्चर हे MSCB ने केलेले आहे. याठिकाणी ३५ मीटर ते ५० मीटरचे पोल चे अंतर असेल पोलचे स्टॅन्ड MSCB ने केलेले आहेत. ते आपल्या मालकीचे नाही. |
| म. नागसेन बोरसे | जर ३५ व्हॅटचा लाईट ५० मी.ला लावला तर उजेड पडेल का? लांबी किती आहे. लांबीचे काय करणार आहेत. |
| म. विद्युत अभियंता | आपण EESL कंपनीच ते LED घेणार आहे. तुमचे जे म्हणणे आहे. कि २ पोल मध्ये शॅडो निर्माण होईल गॅप तयार होईल. |
| म. नागसेन बोरसे | यामुळे खुपच जास्त शॅडोनिर्माण होईल.१५० ते २०० फुटावर लाईट लावले तर किती खर्च येईल. |
| म. विद्युत अभियंता | काम करत असतांना आपल्या निदर्शनास येईल. त्याप्रमाणे पोल उभे करावे लागतील. त्यासाठी नवीन पोल उभे करावे लागतील. |
| म. नागसेन बोरसे | सतरा हजार लाईटांना कमीत-कमी ४ हजार पोल टाकावे लागतील. मी माझ्या प्रभागाबाबत बोलत नाही. माझ्या प्रभागात मी १५ मी. वर पोल उभारले आहेत. ग्रामीण भागात काही ठिकाणी २०० फुटावर पोल आहेत. आणि ६ ते ९ मी. वर ५० आणि ३५ व्हॅट चा लाईट काय उपयोगत येईल. |

| | |
|---|---|
| म. विद्युत अभियंता | त्या बाबत सर्व्हे करण्यात येणार आहे. ESEL कंपनीकडुन केलेल्या सर्व्हेनुसार ज्या ठिकाणी पोल टाकणे आवश्यक आहे त्या बाबतचा प्रस्ताव आपण सादर करणार आहोत. |
| म. नागसेन बोरसे | त्या बाबत तरतुद झालेली आहे. तो विषय नाही. नविन आपल्याला कमीत-कमी १०० पर्यंत पोल टाकावे लागतील. मग १००० पोल कोण टाकुण देईल आपल्याला त्याबाबत अर्थसंकल्पात अशी काही तरतुद केली आहे का? त्याची काही तरतुद केली आहे का तशी. |
| म. विद्युत अभियंता | ESEL कंपनीकडुन जो सर्व्हे होईल त्यातुन ते करण्यात येईल. |
| म. नागसेन बोरसे | त्यासाठी काही वेगळी तरतुद करुन ठेवली आहे का? |
| म. विद्युत अभियंता | तरतुद करावी लागेल. सुधारीत बजेट मध्ये तरतुद करुन घेण्यात येईल. |
| म. नागसेन बोरसे | यासाठी एक वर्ष वाट बघायची का? ऑगस्ट महिना आला तरी अजुन मार्च चा बजेट तयार नाही तर पुढच्या बजेटची काय वाट बघावी. |
| म. अमिन पटेल | सभापती महोदय, यामध्ये दिलेले आहे. कि जर लाईट बंद पडला तर त्या जागी १५ दिवसात नविन लाईट बसविण्यात येईल. पण याची जबाबदारी कोण घेणार आहे. |
| म. विद्युत अभियंता | जर कंपनीकडुन १५ दिवसात बंद लाईट बदलवुन नविन लाईट बसविण्यात आला नाही तर त्यांना दंड लावण्यात येणार आहे. |
| म.अमिन पटेल | याबाबत अडचण यायला नको५वर्षाची गॅरेन्टी असते लाईट बंद होवुन ५-६ महिने ओलांडतात तरी रिप्लेस होत नाही. ३०% रक्कम जमा मनपा कडे जमा पाहिजे. प्रभागातील लाईटही बदलण्यात येणार आहेत का? एकुण लाईट सतरा हजार बसविण्यात येणार आहेत का? |
| म. विद्युत अभियंता | सुरक्षा रक्कम मनपा कडे जमा असते. सतरा हजार लाईंटचे इस्टीमेट आहे. परंतु त्यात कमी जास्त होऊ शकते. |
| म. अमिन पटेल | ८० फुटी रोड भागात लाईट बंद आहेत. पण रिप्लेस झालेले नाहीत. अश्या तक्रारी नागरीकांकडुन यायला नको. |
| म. विद्युत अभियंता | ESEL ही शासनाने सुचविलेले कंपनी आहे. या कंपनी कडुन काम करतांना येणाऱ्या अडचणींचीं शक्यता कमी आहे. |
| म. उपायुक्त | याप्रमाणे माहिती घेवून करारनाम्यातील अटी शर्ती मध्ये आवश्यक तो बदल करण्यांत येईल. |
| म. सभापती | कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करुन प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५ दिनांक २९/०८/२०१९**

म.न.पा धुळे महासभा ठराव नं.41 दि.29/06/2019 नुसार धुळे शहर (हद्दवाढसह) क्षेत्रात LED पथदिवे बसविणे करीता EESL कंपनीशी सप्लाय मोड वर LED पथदिवे घेणे करिता करारनामा करणे, EESL कंपनी कडून आवश्यक सर्वक्षण करून घेणे, सदर LED बसविणे करिता म.न.पा स्थरावर कंत्राटदार नेमणूकीकरीत दर करार करणे करीता निविदा करणे, मीटर संस्था कमी करणे, टायमर पनल बसविणे व आवश्यक सुधारणा कामे करणे करीता मंजुरी प्राप्त आहे.

म.महापौर सो श्री.चंद्रकांत सोनार यांनी या ठरावाअन्वये तातडीने कार्यवाही करणे बाबत सूचना दिल्या आहेत.EESL कंपनीचे प्रतिनिधी अधिकारी श्री. भानु प्रकाश यांनी दि.5/07/2019 रोजी म. महापौर सो.यांचे दालनात Supply mode प्रस्तावाबाबत समक्ष चर्चा केली. या चर्चेनुसार EESL कंपनी कडून चर्चेनुसार खालील प्रमाणे म.न.पा कडील शर्थीस त्यांनी स्वीकार केला आहे.

1) पूर्ण शहरात फक्त एकच कंपनीचे LED पुरवठा केले जातील त्यात प्रामुख्याने ब्रॅन्डेड (फिलीप्स) कंपनीचे LED असतील.

2) या LED ची 5 वर्ष करिता Replacement हमी EESL कंपनीची असेल.

3) म.न.पा निर्देशानुसार आवश्यक सर्वेक्षण EESL कंपनी करेल.

4) EESL कंपनीशी होणाऱ्या दर करार निश्चिती नुसार पुरवठा केला जाईल. व 30% सुरक्षा रक्कम त्यांच्या देयकातून म.न.पा कपात करेल. यापैकी 5% सुरक्षा रक्कम १ वर्ष मुदतीनंतर व उर्वरित 25% रक्कम 5 वर्ष मुदतीनंतर म.न.पा कडून परतावा करणेत येईल.

5) आवश्यक पुरवठा व्यतिरिक्त 10% जास्तीचे LED स्ट्रीटलाईट मनपास पुरवठा करणेत येतील.

6) दुरुस्तीसाठी काढलेले LED 15 दिवसात EESL कंपनीकडून दुरुस्त किंवा Replace करून दिला जाईल.

(अ) यानुसार चर्चेच्या प्राथमिक बाबींनुसार व म.न.पा ठरावानुसार मान्यता प्राप्त असल्याने EESL कंपनीला SUPPLY MODE बाबत करारनामा करणे व उक्त प्रमाणे शर्थी मान्य असेल बाबत लेखी स्वरूपात हमी देणे बाबत कळविणेस्तव स. सादर आहे.

(ब) मनपा ठराव नं. 41 दि. 29/06/2019 नुसार EESLकंपनी कडून LED स्ट्रीटलाईट घेणे करिता मान्यता असून सदर स्ट्रीटलाईट म.न.पा स्थरावर लावणे करिता कंत्राटदार नेमणे आवश्यक असून या कामी कार्यवाही करणेस मान्यता प्राप्त आहे.

या ठरावानुसार पूर्वीचे मनपा क्षेत्र सह हद्दवाढ क्षेत्रासह संपूर्ण शहरात रिक्त पोलसह LEDपथदिवे बसविणे करिता शासन दरसूची/सा.बा./वि./2018-2019 नुसार अंदाजपत्रक सादरअसून खर्च रक्कम रु.90,69,602/-(12% GST व १०% contingency सह) मात्र आहे.

सन 2019-20 चे मंजूर अर्थसंकल्प तरतूद नुसार EESL कंपनी कडून LED STREET LIGHT घेणे करिता रु.1 कोटी व अन्य दुरुस्ती कामे व सदर LED STREET LIGHT बसविणे करीत रु.1 कोटी मात्र तरतूद आहे.

उक्त प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 90,69,602/- करिता मंजुरी होणेस तसेच सदर काम तातडीने शहरात विविध भाग सुरु करणे आवश्यक असल्याने या कामाची प्रभाग क्र. 1 ते 5, प्रभाग क्र.6 ते 10, प्रभाग क्र.11 ते 15 व प्रभाग क्र.16 ते 19 या विभागात विभागणी करणे व त्याप्रमाणे 4 भागात ई - निविदा प्रसिध्द करून दर करार करणे कार्यवाही करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिति,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ६३ | मा. महापौर सो यांच्याकडील दिनांक 26/08/2019 रोजीच्या पत्रानुसार महात्मा गांधी चौक येथे ध्वजस्तंभ व ध्वज उभारण्यांच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले तसेच या प्रस्तावा संदर्भात मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने सादर झालेल्या सुधारीत टिपणीचे अवलोकन करावे अशी विनंती केली. |
| म. नागसेन बोरसे | सदरचा विषय शहराच्या सौदर्यीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.यामुळे शहराची वेगळी ओळख निर्माण होणार आहे. याच बरोबर महात्मा गांधी पुतळा समोरील देवपूर भागात जाणा-या मोठया पुलाच्या जवळ प्रवेशव्दार उभारणे आवश्यक आहे. या खर्चासही मान्यता देण्यांत यावी. तसेच एकविरादेवी मंदिराकडे जाणा-या रस्त्यांच्या प्रारंभी प्रवेश व्दार उभारावे. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक २९/०८/२०१९**

धुळे शहरातील महात्मा गांधी पुतळा चौक हा मध्यवर्ती चौक असून या ठिकाणी मोठया प्रमाणात वर्दळ असते. तसेच देवपूर विभागाला जोडणारा मोठा पुल या चौकातूनच जातो. धुळे शहरामध्ये महात्मा गांधी पुतळा येथे मध्यवर्ती आयलँड असून याठिकाणी अतिउंच ४५ मीटर क्षमतेचा पोल उभारणी करणे व त्यावर भव्यदिव्य तिरंगा लावण्याचा मानस आहे. यामुळे धुळे शहरामध्ये देशाभिमान वाढविण्याचे तसेच शहराच्या सौदर्यीकरणात निश्चितच भर पडणार आहे.

उक्त प्रस्तावाबाबत गांधी पुतळा चौक येथे ४५ मीटर उंचीचा पोल व त्यावर तिरंगा ध्वज बसविणे बाबत बाजार भाव दर तपासणी केली असता यश इलेक्ट्रीकल्स इंजिनिअरर्स पुणे यांनी बजेटरी ऑफर रक्कम रुपये ४८,७४,४००/- मात्रची दिलेली आहे. ज्यामध्ये संपुर्ण पोल उभारणे त्यावर ३२x४८ आकाराचा तिरंगा ध्वज असेल तसेच यासाठी २४ तास विद्युत पुरवठा सोय करणे आवश्यक असल्याने ५०KVA जनरेटर सेट बॅकअप असेल. सदरचे दर हे बजाज कंपनीसाठी दिलेले आहेत तथापी प्रत्यक्ष इ निविदेमध्ये सदरचे संभाव्य खर्चामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. सदरचे काम राष्ट्रीय राष्ट्रध्वज संहिता व निकषा नुसार करणे बंधनकारक आहे. याबाबत प्रस्ताव सादर असुन मा. आयुक्त सो यांनी सदर ठिकाणी समक्ष पाहणी केलेली आहे. व गांधी पुतळा मोठा पुल देवपुर कडे जाण्याऱ्या ठिकाणी प्रवेशद्वार उभारणे व ध्वजस्तंभ उभारणे यासाठी मे. स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी ध्वजस्तंभ उभारणे व प्रवेशद्वार उभारण्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर.**

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ६४ | धुळे मनपातील मानधन तत्तवावरील ओव्हरसिअर यांना पुढील 6 महिन्यांकरिता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.अमीन पटेल | सदरचे कर्मचारी हे चांगले काम करीत आहेत. त्यांना मुदतवाढ देण्यांत यावी. |
| म. सुभाष जगताप | मनपा मध्ये अभियंता ४ -५ आहेत. आणि जे कंत्राटी अभियंता आहेत यांच्यामुळे आपले बरेच पेंडीग कामे होत असतात. या कंत्राटी अभियंताना कामाचा अनुभव असल्याने जो पर्यंत नविन निविदा होत नाही. तोपर्येत मुदतवाढ देण्यास हरकत नाही. यामुळे आपले कामे मार्गी लागतील. या विषयास मंजुरी देण्यात यावी. |
| म. नागसेन बोरसे | मुदतवाढ देण्यांचा प्रस्ताव मंजुर करावा. |
| म. संतोष खताळ | सदर मानधनावरील कर्मचारी चांगले काम करीत आहेत. मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| म. रावसाहेब पाटील | सदर कर्मचा-यांचे काम चांगले असल्याने संबंधितांना ठरावाच्या दिनाकापासून मुदतवाढ देणयांत यावी. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कर्मचा-यांना ठरावाच्या दिनाकापासून मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक २९/०८/२०१९**

म.अभियंता यांनी दि.13/08/2019 रोजी अहवाल सादर करून 1 ते11 कंत्राटी सिव्हील व विद्युत ओव्हरसियर यांना भरतीप्रक्रिया पूर्ण होई पावेतो मुदतवाढ देणेबाबत नमूद केले आहे.उक्तबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

सदर कर्मचाऱ्यांना इकडील जा.क्र/धुमपा/आस्था/1404 दि.12/02/2019 अन्वये म.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने 1 ते11 सिव्हील व विद्युत ओव्हरसियर यांना 6 महिन्याकरिता

20000/- मात्र एकत्रित मानधन (कंत्राटी) तत्वावर नियुक्ती देण्यात आली होती.सदरचे 1 ते 11 कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत=

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | पाटील वर्षा गंगाधर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 2 | कु.चंदाबी.शेख.जाफर शेख | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 3 | शिंदे प्रणव किशोर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 4 | मयूर राजेंद्र निकम | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 5 | टकले निखील अशोक | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 6 | भूषण मनोज ढवळे | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 7 | मोहनीश दिलीप पाटील | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 8 | स्वप्नील सुनील थोरात | कनिष्ठ अभियंता | बांधकाम व पा पु विभाग |
| 9 | पाटील अक्षय राजेंद्र | कनिष्ठ अभियंता | पाणीपुरवठा विभागातील पाईपलाईन लिकेज |
| 10 | ठाकरे पराग प्रदीप | कनिष्ठ अभियंता | विद्युत विभाग |
| 11 | गीतेश दिलीप सोनार | कनिष्ठ अभियंता | विद्युत विभाग |

सदरचे 1 ते 11 सिव्हीलओव्हरसियर व विद्युत ओव्हरसियर यांची कामाची मुदत दि.13/8/2019रोजी संपुष्ठात आलेली आहे.सदरचे ओव्हरसियर हे बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग,नगररचना विभाग व विद्युतविभागात कार्यरत असून त्यांच्याकडून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे,आपत्ती व्यवस्थापन,सार्व.शौचालय दुरुस्ती तसेच शासकीय निधी अंतर्गत होणाऱ्या व मनपा निधी अंतर्गत होणाऱ्या कामांचे अंदाजपत्रक तयार करणे,साईट सुपरविजन करणे,पाणीपुरवठा बाबतची विविध कामे तसेच अतिक्रमणाची पाहणी करणे व अतिक्रमण निष्कासीत करत असतांना प्रत्यक्ष जागेवर थांबणे व विद्युत विभागात अंदाजपत्रक तयार करणे अशी महत्वाची कामे या कर्मचाऱ्याकडून करून घेण्यात येत आहे.

सदर कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्ठात येवून त्यांना पुनश्च 06 महिन्याकरिता मुदतवाढ देणे अत्यावश्यक आहे. तसेच धुळे मनपा आस्थापना विभागामार्फत नवीन मानधना वरील ओव्हरसियर यांची भरती प्रक्रिया सुरु असून या प्रक्रियेस विलंब लागू शकतो तसेच उक्त आदेशात नमूद अटी व शर्ती क्र.9 नुसार कंत्राटी पद्धतीने सिव्हील व विद्युत ओव्हरसियर पदाची भरती प्रक्रिया पूर्ण होईपावतो नेमणूक देणे उचित राहील. त्यानुसार 1 ते 11 कंत्राटी सिव्हील व विद्युत ओव्हरसियर यांना पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होईपावतो मानधन ( कंत्राटी ) तत्वावर रु. 20000 /- मात्र एकत्रित मानधनावर किमान 6 महिन्याकरिता किंवा भरती प्रकिया पूर्ण होईपावतो मुदतवाढ देणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) नुसार मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर करण्यांत आला असता यावर मा.आयुक्त साहेब यांनी उक्त कर्मचा-यांचा कामाचा प्रगती अहवाल सादर करणेबाबत अभिप्राय दिलेला असून त्यानुसार म.अभियंता यांनी उक्त कर्मचा-यांचा प्रगती अहवाल सादर केलेला असून संबंधितांना मुदतवाढ देणेबाबत सहमती दर्शविली आहे. त्यानुसार कार्यालयीन अहवालास अधिन सदर कर्मचा-यांना ठरावाच्या दिनाकापासून मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६५ मा.आयुक्त सो. यांनी महाराष्ट्र महानगरपालिका कलम ६९ (२) अन्वये कलम ७३ व ७४ करीता उपायुक्त धुळे महानगरपालिका यांना प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकाराकरीता प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्त्व तथा अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. रावसाहेब पाटील म.उपायुक्त साहेब यांना दिलेल्या अधिकाराच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

म.सुभाष जगताप मनपा निधी मधील कामाच्या तांत्रिक मंजुरीसाठी जळगांव येथे प्रस्ताव पाठवावे विलंब होत आहे. त्यासाठी मनपा स्तरावर हे तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यांत यावे.

म.नागसेन बोरसे म.न.पा फंडातील कामाचे तांत्रिक मंजुरीसाठी मनपाचा पैसा खर्च होत असतो. व कामास विलंब होत असते. तरी म.अभियंता यांना मनपा फंडातील कामांना तांत्रिक मान्यता देण्यांचे अधिकार देण्याबाबत विचार करावा.

म. सभापती. कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक २९/०८/२०१९**

महाराष्ट्र महानगरपालिनका अधिनियमातील कलम ६९ (२) अन्वये कलम ७३ व ७४ करीता उपायुक्त धुळे महानगरपालिका यांना प्रत्यावर्तीत केलेल्याअधिकाराकरीता प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी तथा आवलोकनार्थ सादरकरणेबाबत पत्र सादर केलेले आहे.

## सुधारीत प्रत्यायोजन आदेश

ज्या अर्थी, उक्त अधिनियमातील कलम ६९ नुसार महानगरपालिका उप-आयुक्त यांनी, आयुक्त आपले अधिकार व कर्तव्यापैकी वेळोवेळी त्यांच्याकडे सोपविला अशा अधिकाराचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत,

ज्या अर्थी, उप-आयुक्त (प्रशासन) व उपआयुक्त (कर) धुळे महानगरपालिका यांना आयुक्तांचे नियंत्रण पुर्नानरीक्षणाच्या अधिन राहून पुढे दर्शविल्याप्रमाणे आयुक्तांचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्रं | अधिकारांचे वर्णन |
|---|---|
| १. | मनपा आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांच्या बाबत कलम ५३, ५४ व ५६ मधील आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांअतर्गत प्राप्त झालेले अधिकार प्रत्यावर्तीत करण्यात येत आहे. मात्र अश्या प्रकरणांना मा.आयुक्त यांनी पुर्ननिरिक्षण करणे किंवा पुर्नविलोकन करुन त्यावर अंतिम निर्णय घेणे इत्यादीचे अधिकार राखून ठेवलेले आहेत. |
| २. | सफाई कर्मचारी यांचे संदर्भातील वारस हक्क करीता लाड व पागे समितीच्या शिफारशीनुसार संपुर्ण कार्यवाही उपायुक्त यांनी करावी. मात्र, संबंधितांना द्यावयाची अंतिम नियुक्ती द्यावयाचे प्रकरण व सेवानिवृत्त प्रकरण मंजुर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना पुर्वीप्रमाणे असतील. |
| ३. | अधिकारी व कर्मचारी (स्थायी/अस्थायी व मनपा निधी) यांचे दरमहा वेतन व भत्ते, फरक रक्कम महागाई भत्ता वाढ, भनिनि अग्रीम, सण अग्रीम, वेतन निश्चिती करणे इत्यादी मान्यता देणे व रक्कमा प्रदान करणे. |
| ४. | सेवानिवृत्त कर्मचारी यांचे मासिक निवृत्तीवेतन व महागाई भत्ता अदा करण्याचे संपुर्ण अधिकार असतील. (शिक्षण मंडळ कार्यालयासह) |
| ५. | कार्यालयीन खर्च, सभा खर्च , इंधन खर्च, कर्मचारी प्रवास भत्ते, मानधन खर्च, अतिथ्य भत्ता खर्च, स्टेशनरी लेखन साहित्य खरेदी करणे तसेच शासकीय सर्व देणी, मनपाचे सर्व विद्युत देयके,अधिकारी पदाधिकारी वाहन प्रतिपुर्ती भत्ता देयक इत्यादी बाबत सर्व प्रकरण मान्यता देणे व रक्कम प्रदान करणे. मात्र अश्या प्रकरणांना मा.आयुक्त यांनी पुर्ननिरिक्षण करणे किंवा पुर्नविलोकन करुन त्यावर अंतिम निर्णय घेणे इत्यादीचे अधिकार राखून ठेवलेले आहेत. |
| ६. | महानगरपालिकेकरीता अत्याआवश्यक सेवा तसेच तातडीने करावयाच्या कामांबाबत प्रकरण ५ मधील कलम २(२) अन्वये कार्योत्तर मंजुरीसाठी (रु. ३ लक्षपर्यंत करीता) उपायुक्त यांना विहित पध्दतीने मे. स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर करण्याचे व त्यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार असतील तथापी रु. ३ लक्ष |

| | |
|---|---|
| | पेक्षा जादा खर्च प्रस्तावांना मा. स्थायी समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने करणे आवश्यक असेल. मात्र अश्या कामांना त्या त्या वेळी प्रत्यक्ष चर्चा अथवा आदेश प्राप्त करुन घेणे संबंधित विभागाची जबाबदारी असेल. |
| ७. | दि. ९/७/२०१९ रोजी तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी कायोत्र मंजुरीची प्रकरणे सादर करुन नयेत असे आदेशित केले होते त्यास नवनियुक्त आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी कायम केले आहेत. यामुळे दि. ९/७/२०१९ पुर्वी झालेली कामे तथापी मान्यतेअभावी प्रलंबित प्रकरणी अंतिम निर्णय मा. आयुक्त यांच्या मान्यतेने घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ८. | मा. खासदार/मा.आमदार महोदयांचे विकास निधीअंतर्गतची ची कामे तसेच अमृत, बिएसयुपी, पीएमएवाय, जेएनएनयुआरएम, नगरोत्थान, भुसंपादन, एसबीएम, एनयुएलएम, मा. खासदार, मा.आमदार निधी, १४ वा वित्त आयोग, नागरी दलित वस्ती, नागरी दलित्तोर वस्ती, रस्ता अनुदान, व इतर अनुषंगीक शासकीय सर्व योजना करीताचा निधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांच्या प्राप्त अधिकाराअंतर्गत प्रशासकीय मान्यता देणे तसेच कलम ७३ व ७४ अन्वये प्राप्त अधिकाराअंतर्गत उक्त नमूद निधीतील कामांची निविदा मागविणे, विहित पध्दतीने निविदा मंजुर करणे, मंजुर निविदा धारकांसोबत करारनामा करणे, कामाचे आदेश देणे तसेच आवश्यकतेनुसार वेळोवेळी कामास मुदतवाढ देणे. याबाबत कलम ६९ (२) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून अधिकार प्रत्यावर्तीत करण्यात येत आहे. तसेच उक्त नमूद केलेल्या योजनांचे कलम ८४ अन्वये संपूर्ण रक्कमेचे देयके मंजुर करणे तसेच प्रदानासाठी धनादेशावर स्वाक्षरी करणे(मात्र म. स्थायी समितीकडे सादर होणारे उक्त नमूद केलेले आर्थिक मर्यादेव्यतिरिक्त सर्व प्रस्तावास आयुक्त यांची मंजूरी घेणे बंधनकारक राहील) |
| ९. | मनपा निधी मधील प्रकरणांसाठी रु.३.०० लक्ष पर्यंत करिताचे सर्व अधिकार उपायुक्त यांना असतील (नियमानुसार कार्यवाही करुन) त्यापेक्षा जादा रक्कमेचे प्रस्तावाबाबत मा.आयुक्त यांची मान्यता घेऊनच पुढील कार्यवाह उपायुक्त यांनी करावी. |
| १०. | सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षातील या दिनांकापुर्वी मा. आयुक्त यांची मान्यता झालेली सर्व खर्च मागणी प्रकरणे (मनपा निधी व शासकीय निधीसह) जी प्रदानाअभावी प्रलंबित आहेत अशी प्रकरणी प्रदान करण्यापुर्वी मा. आयुक्त यांची मान्यता घेणे ही लेखा विभागाची जबाबदारी असेल. त्यानंतर अशा मान्यता प्रकरणांचे धनादेश उपायुक्त यांच्या स्वाक्षरीने प्रदान होतील. |
| ११. | सन-२०१८-१९ व त्यापुर्वी मान्यता झालेली सर्व खर्च मागणी प्रकरणे बाबत देयक प्रदान करण्यापुर्वी अ.क्र. ९ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीने कार्यवाही करावी. |
| १२. | महानगरपालिका अधिनियम कलम ८१ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांबाबत भाडे वसुली व विहित अनुषंगीक कार्यवाही करण्याकरीता आयुक्त म्हणून प्राप्त अधिकार प्रत्यावर्तीत करण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे संबंधित उपआयुक्त (प्रशासन) व उपायुक्त (कर) या दोन्ही पदांचा कार्यभार श्री. गणेश गिरी यांच्याकडे सुपुर्द केल्यामुळे त्यांनी आपल्या पदावधीत व त्या पदांच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, हया सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

संदर्भिय (वाचा) आदेश क्रं. १ ते ५ अधिक्रमीत करुन आदेश क्रमांक ६ मध्ये वरील प्रमाणे सुधारीत आदेश लागु करण्यात येत आहेत यांत आवश्यकतेप्रमाणे योग्य ते सुधारीत आदेश करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो. यांना असतील.

उक्त प्रमाणे सदर कार्यालयीन प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच मनपा निधी मधील कामांना तांत्रिक मंजुरी देण्यांचे अधिकार स्थानिक मनपा अधिका-यांना प्रत्यावर्तीत करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०५ सप्टेंबर २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०५/०९/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १५ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरिक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| ११ | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निधारण अधिकरी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. भटू महानर | लिपीक भांडार विभाग |
| १७ | श्री. के. आर चव्हाण | लिपीक अभिलेख विभाग |
| १८ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १९ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग लिपीक |
| २० | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |
| २१ | श्री. विशाल निंबाळकर | वृक्ष प्राधिकरण विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

विषय क्रमांक :- ६६ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.( दि.११/०७/२०१९ ०८/०८/२०१९)

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, इतिवृत्त वाचुन कायम करणे हा जो विषय विषयपत्रीकेवर आला आहे. मागिल सभेतील विषय क्रमांक ६६ याबाबत सभपती साहेबांनी व सदस्यांनी सभागृहात ठरावच्या दिनांका पासुन मुदतवाढ देण्यात यावी. परंतु तसे न करता प्रशासनाने जी टिपणी पाठविली तशीच्या तशी ती मंजुर करण्यात आलेली आहे. तरी ती ठरावाच्या दिनांकापासुनच मंजुर करण्यात यावी. तशी दुरुस्ती करण्यात यावी.

म. सहा. आयुक्त — आपल्या म्हणण्यानुसार ठरावच्या दिनांका पासुन देण्यात यावे. तरी मी सभागृहाला विनंती करतो. ही पदे जी आहेत पंप ऑपरेटर, वॉलमन हे अत्यावश्यक पदे आहेत. पंप ऑपरेटर व वॉलमन या कर्मचाऱ्यांकडुन आम्हांला परत परत विचारणा करणेत येत होती की, आम्हांला मुदतवाढ मिळले का? तसेच ते दरमहा ५०००/- मात्र एवढया मानधनावर काम करत असतात. आपल्या कडे त्यासाठी स्वतंत्र असा कर्मचारी वर्ग नाही. तसेच आपल्याला पाणी पुरवठा विभाग बंद करता येणार नाही ते आवश्यक विभाग आहेत. म्हणुन त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक होते.आम्ही त्यांना वेळो वेळी तसे आश्वासीत केले होते म्हणुन ते मुदत संपल्यानंतरही काम करत होते. तरी सभापती साहेब आणि सभागृह यांचा निर्णय अंतिम राहील आणि आम्हांला बंधनकारक असेन आणि आम्ही ते करु.

म. नागसेन बोरसे — एकुण कर्मचारी किती ? त्यांचे नाव आधार कार्ड नंबर यांची लेखी मला पाहिजे. त्यांचा विमा आहे का ? याविषयी संपुर्ण माहिती पाहिजे. तसेच श्रीमती. द्वारका सिंधु नगराळे या कर्मचाऱ्यांकडुन सेवा पुर्ण झाल्या नंतर २६ दिवस काम करुन घेतले आहे. त्यांचा पगार कोण देईल? त्याची जबाबदारी कुणाची. याविषयी २६/०६/२०१९ चा अर्ज आहे हा यावर काय कार्यवाही करण्यात आली. कर्मचाऱ्यांची मुदत संपल्यावर असे पत्र का दिले जात नाही. तरी

| | |
|---|---|
| | कर्मचाऱ्यांकडुन काम का करुन घेतले जाते. तुम्हांला माहित असते ६ महिन्यांची मुदत संपणार आहे. तुम्ही दोन महिन्यांनंतर टिपणी ठेवता आणि आम्हांला मंजुर करायला सांगतात हा कुठला न्याय आहे. असे ठराव कसे काय मंजुर करावे. तीन दिवसांत टिपणी मंजुर होते ते टेंडर नाही की त्याला सहा ते आठ दिवसाचा कालावधी लागेल. मुदतवाढ ची टिपणी ठेवा काही हरकत नाही आमची पण कार्यवाही वेळेवर का होत नाही. |
| म.कार्या. अधिक्षक | पाणी पुरवठा विभागाकडुन माहिती अहवाल वेळेत न दिल्यामुळे मुदवाढ देण्याला उशिर झाला. |
| म. विद्युत अभियंता | मुदत संपण्याच्या दिड महिने आधी कळविले होते. |
| म. नागसेन बोरसे | पाणीपुरवठा विभागकडुन पत्र आल्यानंतर काय कार्यवाही केली?.दिड महिने आगोदर त्यांनी कळविले आहे मग कार्यवाही का झाली नाही का झाले असे? योग्य ती माहिती दिली जात नाही. फक्त उत्तर दिले जाते. बघुन सांगु, करुन घेवु. जाकिर च्या आस्था प्रकरणामध्ये ही तसेच झाले आज अहवाल ठेवण्यात येणार होता परंतु अहवाल ठेवण्यात आला नाही. एका वर्षाचे बिल २ कोटी रु. दिलेले आहे त्याला मला या कामाची माहिती मला भेटली आहे. चवदा महिन्यांचे बिल एकायाच्यात शौचालयाचे काम होत आहे. आणि दुसऱ्या कामात २ कोटी रु. बिल दिलेले आहे. आणि उत्तर देतांना सांगावयाचे नाही की प्रिंट मिस्टेक झालेली आहे. जबाबदारीने उत्तर देण्यात यावे. याबाबत चंद्रकांत जाधव साहेबांना प्रश्न आहे माझा तुम्हांला शौचालयाची माहिती मागितली आहे. तुम्ही सांगतात की फक्त २२ नंबर मागितले आहे. त्यात संपुर्ण माहिती आहे. मी या माहिती बाबत पत्र ही दिलेले आहे. ते वाचुन दाखविण्यात यावे. |
| म. आरोग्याधिकरी | सन्मा. सदस्य नागसेन बोरसे यांनी आस्था संस्थेला कामगार पुरवीणे बाबत जो ठेका देण्यात आला होता त्या बाबत माहिती मागविली होती. त्याबाबतची संपुर्ण नस्तीची छायांकित प्रत मिळणेबाबत विभागास पत्र दिले होते. |
| म. नागसेन बोरसे | दुसरे पत्र आहे. शौचालयाबाबत ते ही वाचुन दाखविण्यात यावे. |
| म. आरोग्याधिकारी | शौचालयाबाबतची माहिती आमच्या विभागाशी संबंधीत नाही. ती माहिती सहा. आरोग्य अधिकारी लक्ष्मण पाटील यांच्याकडे आहे. |
| म. नागसेन बोरसे | त्यात मी विमा आणि पी.एफ. रुल मागविले आहे. ज्या वेळेस ठेकेदाराकडुन ठराव केलेला आहे त्या वेळेस अटी शर्ती मध्ये म्हटले आहे. कामगारांचा विमा काढणे, त्यांचे पी.एफ अकाऊन्टं काढणे, त्यांचे आधारकार्ड घेणे आणि त्याची शासनाला त्यांची यादी देणे म्हणजे संबंधीत पदावर हे कर्मचारी लावलेले आहेत. यासंदर्भात कुठलीही माहिती पुरवीली गेलेली नाही. आता पर्यंत बील स्वरुपात अडीच कोटी रु. वर्ष ते सव्वा वर्षात अदा झालेले आहेत. याबाबत मी माहिती मिळवीली आहे. कामगार पुरविण्यासांदर्भात एका वर्षाचे जवळपास एक कोटी रु. बील अदा केलेले आहे. उदा. साठी सांगतो ०३/०३/२०१८ ते ३१/०३/२०१९ हे २७ दिवसांचे १२२ कर्मचारीयांचे बिल दिलेले आहे. तीन लाख अठ्ठेचाळीस हजार ऐक्यांऐंशी रु. त्याच्यानंतर एप्रिल-मे २०१८ मध्ये ११३ कर्मचाऱ्यांचे बिल दिले आहे. १२,८७,८६४/- रु. तोच कर्मचारी तोच ठेकेदार सगळे तेच मग बिल इतके कसे काय दाखविले टिपणी मध्ये? तसेच मे महिन्यामध्ये १३० कर्मचारी त्यांचे बिल १३,८६,६७०/- जर १२२ लोकांचे बिल ३,४८,०००/- होतात तर १२२ लोकांचे बील १२,८७,८६४/- कसे होतात. २,२३,१९,०८४/- रुपये बील दिले आहे १४ महिन्याचे. |
| म. सहा. आयुक्त | आपल्याकडे यापुर्वी आपल्याला माहित आहे की, लेबर पुरविण्यचे काम या संस्थेकडे आपण काम दिलेले आहे. आपण वाहन त्या खाजगी संस्थेकडुन आणि लेबर म्हणुन काही संस्था |

| | |
|---|---|
| | असतात त्या संस्थेमार्फत घेतो. दर महिन्याला जे काही लेबर आपल्याला लागत होती त्या लेबरच्या अनुषंगाने बिल काढले असेल. मला वाटत नाही ते बिल चुकीचे असेल असे. |
| म. नागसेन बोरसे | साहेब माहिती च्या वर दिलेले आहे.आरोग्य विभागामार्फत दैनंदिन साफ-सफाई कागमार पुरविणे बाबत खालील मंजुर दर ३७७ रु. प्रती कामगार प्रती दिवस देण्यात आलेला आहे. तर एका महिन्यांचे ११३ लोकांचे बिल १२ लाख कसे झाले ? १२२ लोकांना तुम्ही ३ लाख ८४ हजार देतात. |
| म. सहा. आयुक्त | नागसेन भाऊ देयक अदा होताना देयक विभाग ऑडीट तपासुन देते, अकाऊंन्ट तपासुन देते. त्या नंतर आमच्या कडे येते. |
| म. नागसेन बोरसे | आपण सांगीतलेले सगळे ठिक आहे. |
| म. सहा. आयुक्त | पण त्याविषयी माहिती काही चुकीचे दिली असेल तर ते गंभीर आहे. त्यांनी माहिती तपासुन द्यायला पाहिजे होती. |
| म. नागसेन बोरसे | ३ लाख ४८ हजार १२२ लोकांना लागतात त्याच्या १ महिन्या अगोदर मग ११३ लोकांना १२ लाख रुपये कसे काय लागतात? |
| म. सहा. आयुक्त | त्यांनी माहिती चुकीची दिले असेल पण याचा अर्थ असा होत नाही की देयक चुकीचे अदा झाले असे नाही म्हणता येणार. ती माहिती काय ते तपासुन घ्यावे लागेल. |
| म. नागसेन बोरसे | त्यांनी तर देयका वरुन माहिती काढली आहे ना? आणि ४-५ ठिकाणी कसे चुकीचे होवु शकते. एका ठिकाणी होवु शकते. |
| म. आरोग्याधिकारी | माहिती घेतांना त्यात एखादे बिल सुटले असेल. |
| म. नागसेन बोरसे | सुटले नसेल. मग २ कोटी २३ लाख अदा केलेत आपण ठिक आहे ३ लाख ४८ हजारात १० लाख कमी झाले समजा मग १३ लाख जर मिळवीले तरी काही मोठा फरक पडत नाही. पण अर्डीच कोटींचा रु.? तुम्ही मजुर कुठेही पुरवा त्याच्या मला काही घेणे नाही. आकडे सांगतात १२२ मजुरांना एवढे पैसे दिले. तर ११३ लोकांना एवढे पैसे कसे काय गेले.? हा माझा प्रश्न आहे. अडीच - अडीच कोटी कसे काय देतात तुम्ही? |
| म. सहा. आयुक्त | हा विभाग तुमच्या कडे आहे का? जर तुमच्या कडे नसेल तर तुम्ही माहिती का दिली ? प्रशासन महिती देईल आस्थापना देईल. ती माहिती जर सहा. आरोग्याधिकारी लक्ष्मण पाटील साहेबांशी संबधीत आहे तर तुम्ही परस्पर माहिती का दिली. |
| म. नागसेन बोरसे | तुम्ही आस्थापनेचा विषय काढला म्हणुन विचारतो या कर्मचाऱ्यांना पगार कोण देईल. |
| म. सहा. आयुक्त | माझ्या कडे द्या मी माहिती घेतो. आणि त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची काळजी मी घेतो. |
| म. नागसेन बोरसे | आणि या विषयी योग्य ती जबाबदारी ही निश्चित करा. |
| म. सहा. आयुक्त | जबाबदारी निश्चित करण्यात येईल. |
| म. नगरसचिव | सन्मा. सदस्य नागसेन भाऊ आपण या स्थायी समिती इतिवृत्तामधील दोन विषय सांगितले त्या विषयी काय निर्णय घ्यावयाचे ? |
| म. नागसेन बोरसे | सभापती साहेब निर्णय घेतील. |
| म. नगरसचिव | सभागृहाने निर्णय दिला तर सभापती निर्णय देतील. |
| म. नागसेन बोरसे | माझे वैयक्तीक मत नोंदवुण घ्या माझा विरोध आहे. आणि आम्हांला ठरावाच्या दिनांकापासुन पाहिजे आहे. त्यांनी जे जास्तीचे काम केले आहे. त्याचा पगार संबंधीत अधिकाऱ्यांच्या पगारातुन वसुल करण्यात यावे. आणि ठराव मंजुर करण्यात यावा. |
| म. अमिन पटेल | सदर कर्मचाऱ्यांनी काम केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या बाबतीत सहानुभुतीपुर्वक निर्णय घ्यावा. |

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्याच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश वाचून बदलासह कायम करण्यांत येत आहे.तसेच ठराव नंबर ६६ बाबत सन्मा.सदस्यांनी दाखल केलेल्या आक्षेपानुसार बदल करुन इतिवृत्त कायम करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक ०५/०९/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ११/०७/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ५५ ते ६० क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक ०८/०८/२०१९ चे स्थायी समिती ठराव नंबर ६१ ते ६५ क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच ठराव नंबर ६६ बाबत सन्मा. सदस्यांनी आक्षेप घेतल्याने सदर ठरावात नमूद करण्यांत आलेली पूर्वलक्षी प्रभवाने देण्यांत आलेली मान्यता यामध्ये बदल करुन ठरावाच्या दिनांकापासून म्हणजे दि. ८/८/२०१९ पासून सदर तांत्रिक कर्मचा-यांना मुदतवाढ देण्यात येत आहे. असा बदल करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर बदलाची नोंद घेवून ठराव नं.६६ ते ६८ अखेर तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चा क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ६७ — देवपूर भागातील सुशीनाल्या वरील पाईप लाईन दुरुस्त करणे व कानुश्री विद्यालया जवळ पाईपलाईन दुरुस्त करणेबाबतचे काम करुन घेण्यांत आलेत.त्यासाठी झालेला खर्च रु. 65769/-मात्रला कार्योततर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती — सर्व सन्मा. सादस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक ०५/०९/२०१९**

धुळे शहरातील देवपूर भागातील देवपूर भागातील सुशीनाल्या वरील पाईपलाईन दुरुस्त करणेव कानुश्री विद्यालयाजवळ पाईपलाईनला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत आहे. उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री.संजय गायकवाड यांना सदर काम तात्काळ करण्यास सांगितले.

सदर ठेकेदार यांना थोंडी सूचना दिल्यानुसार सदरची पाईपलाईन दुरुस्त केली असून पाईपलाईनची गळती थांबविण्यात आली आहे. उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्चरु.65,769/- मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

उक्त काम हे पाईपलाईनला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5(2)(2)अन्वये विना निविदा करण्यास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-६८ | धुळे शहरातील विविध ठिकाणी पाईपलाईन दुरुस्त व नवीन व्हॉल टाकणचे काम तांतडीने टाकणेचे काम करुन घेण्यांत आलेत. त्यासाठी झालेला खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.<br>यात तीन कामे आहेत.<br>१. जुनी मनपा हद्दीतील जुन्या वडजाई रोड पुलाजवळील पाईपलाईन शिफ्टिंग करणे — १,८८,६०८/-<br>२. धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरात पाईपलाईन जोडणे व चक्करबर्डी जलकुंभ येथे व कालिका देवी मंदिर येथील पुलाजवळील पाईपलाईन दुरुस्ती करणे. — २,८१,६६९/-<br>३. धुळे मनपाचा शहर पाणीपुरवठा योजनेवरील डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्र येथुन मोहाडी पिराची टेकडी जवळील ३०० एम.एम.ची पाईपलाईन व व्हॉल दुरुस्त करणे. — १,५७,९४९/- |
| म. नागसेन बोरसे | सभापती महोदय, मला याविषयी शंका आहे. व्हॉल दुरुस्त केले आहेत की बदल केले आहेत. |
| म. सुनिल सोनार | विषय तहकुब ठेवा नंतर बघु. |
| म. अमिन पटेल | यामध्ये एक माझ्या विभागाचे काम ते मंजुर करा बाकी तहकुब ठेवा. |
| म. नागसेन बोरसे | आमचे एक म्हणणे आहे जास्त बील आले कसे काय. एका व्हॉलची किंमत किती एका पाईपची किंमत किती हे सगळ तपासुन बघा. यात नविन पाईप टाकला की दुरुस्त केला याबाबत काहीच माहिती दिलेली नाही. |
| म. सुनिल सोनार | कामाची निविदा रितसर काढली गेली पाहिजे. |
| म. अभियंता | महाशय सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, वडजाई रोड येथे पुलाचे काम चालु होते याठीकाणी आपली जुनी पाईपलाईन होती ती पुर्णत: पाईपलाईन आपण बदललेली आहे. ते काम दोन वेळा आपल्याला करावे लागले होते. दुसरे चक्करबर्डी जलकुंभ व कालिका देवी मंदिर अशोक नगर असे कामे होती येथे नविन व्हॉल आणि पाईप आपण टाकले आहेत. मोहाडी पाईपलाईन आहे त्याठीकाणी अवधान गावासाठी आणि मेडीकल कॉलेजसाठी जी पाईपलाईन गेली आहे तेथील व्हॉल खराब झाला होता तेथे नविन व्हॉल टाकुन दुरुस्ती केलेली आहे. यासाठी सभागृहाने जो निर्णय घेतला तो आम्हांला मंजुर राहील. |
| म. नागसेन बोरसे | या कामांमध्ये किती व्हॉल बदलण्यात आले? |
| म. अभियंता | आता तरी लगेच माहिती देवु शकत नाही.१० ते १५ दिवसात संबंधीत अभियंताकडुन माहिती मागवुन लेखी स्वरुपात सभागृहात माहिती उपलब्ध करण्यात येईल.ज्या व्हॉलचा स्ट्रीटलेट खराब झाला असेल दुरुस्ती होण्यासारखा असेल तर दुरुस्ती केली जाते. दुरुस्ती होत नसेल तर नविन व्हॉल टाकण्यात येतो. |
| म. नागसेन बोरसे | कोणता व्हॉल दुरुस्त करता येवु शकतो किंवा नाही याबाबत माहिती मिळावी. |
| म. अभियंता | आपल्याकडे जे फिटर आहेत त्यांच्याकडुन माहिती आल्यानंतर अभियंता तपासणी करुन आवश्यक असेल त्या ठिकाणी दुरुस्ती किंवा नविन व्हॉल टाकण्यात येतात. |
| म. नागसेन बोरसे | मला याबाबत सविस्तर माहिती पाहिजे. |
| म. अभियंता | पुढच्या बैठकीत संबंधीत अधिकाऱ्यांन कडुन सविस्तर माहिती देण्यात येईल.तो पर्यंत सभागृहाला जो निर्णय घ्यावयाचा असेल तो आम्हांला मान्य आहे. |
| म. नागसेन बोरसे | संबंधीत अधिकारी यांना योग्य माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेशीत करावे. |

म. सुनील सोनार — जो पर्यंत या विषयाबाबत संबधीत अधिकाऱ्यांकडुन सविस्तर माहिती येत नाही तो पर्यंत विषय तहकुब ठेवावा.

म. नागसेन बोरसे — साहेबांनी खुलासा केल्याप्रमाणे एका पाईपलाईनचे दोनदा काम केले गेले ते का केले याबाबत माहिती मिळावी.

म. अभियंता — या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागकडुन पुलाचे काम होते ते काम जरी दोनदा केले असले तरी त्याबाबत एकाच कामचे पैसे देण्यात आलेले आहेत.

म. नागसेन बोरसे — या कामांमध्ये गॅप किती दिवसांचा होता.

म. अभियंता — जवळ जवळ २ महिने गॅप होता.

म. अमिन पटेल — सभापती महोदय, ज्या भागात व्हॉल दुरुस्ती, पाईपलाईनचे काम होत असेल त्या प्रभागतील नगरसेवकांच्या समक्ष ते काम करुन घ्यावे आणि ते काम होत असतांना साक्ष म्हणुन काम होत असलेल्या प्रभागातील नागरीकांची स्वाक्षरी ही घेण्यात यावी असे केल तर शंका राहणार नाही

म. नगरसचिव — सदरचा विषय तहकुब ठेवण्यात यावा का याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक ०५/०९/२०१९**

धुळे शहरातील विविध ठिकाणी पाईपलाईन दुरुस्त व नवीन व्हॉल टाकणेचे काम तांतडीने टाकणेचे काम करुन घेण्यांत आलेत.त्यासाठी झालेला खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत सभागृहासमोर आला आहे. याबाबत सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६९ — ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत ग्रीन आर्मी सदस्य नोंदणीच्या कामाची रक्कम अदा करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती — सर्व सन्मा. सादस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक ०५/०९/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत ग्रीन आर्मी सदस्य नोंदणी करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने श्रीराम एंटरप्राईजेस धुळे यांना जा.क्र./ धुमपा/ भांडार /२४१ दि. २९/०३/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानुसार त्यांनी संदर्भिय पत्रान्वये ८०००/- सदस्य ग्रीन आर्मी पोर्टल वर नोंदणी केल्याचे कळले आहे. व शासनाच्या ग्रीन आर्मी पोर्टवर ८०००/- सदस्य नोंदणी झाल्याचे दिसुन येत आहे.

धुळे मनपा मालमत्ता धारकांकडुन वृक्ष संवर्धन कर वसुल करित असुन सदर कर मा. आयुक्त सो. याच्या मान्यतेने वृक्ष समिती कडेस वर्ग करण्यात आलेला आहे. सदर संस्थेने प्रती ३ रु.प्रमाणे ८०००/- सदस्य नोंदणी शुल्क रक्कम रु.२४०००/- मात्र झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5(2)(2)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ७० ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत धुळे मनपा साठी लागवड कामाचा सुक्ष्म आराखडा तयार करणे व त्या संबधी प्रशिक्षणाबाबत संमत्रक सेवा पुरविणेकामी झालेला खर्च २३,६००/- मात्र ला कार्योत्तर मंजुरी देणबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती सर्व सन्मा. सादस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक ०५/०९/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत धुळे शहरास १,२६,४०० वृक्ष लागवडीचे लक्ष देण्यात आले होते.

सदर वृक्षलागवडीकरीता सुक्ष्म आराखडा सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ धुळे यांच्यामार्फत करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांअंतर्गत धुळे मनपा साठी वृक्ष लागवड कामाचा सुक्ष्म आराखडा ५ प्रतीत तयार करण्याबाबत. | १५०० |
| २ | वृक्ष लागवडीचे अभिलेखे ठेवणे, सनियंत्रण करणेबाबत कर्मचाऱ्यांचे १ दिवसाचे प्रशिक्षण घेणे. | ५००० |
| ३ | एकुण शुल्क | २०००० |
| ४ | शुल्कावर वस्तु व सेवा कर कायद्याअंतर्गत १८% कर ते अतिरिक्त | ३६०० |
| ५ | एकुण एकंदर (३+४) | २३६०० |

धुळे महानगरपालिका मालमत्ता धारकांकडून वृक्षसंवर्धन कर वसुल केला जातो तो कर मा. आयुक्त सो.यांच्या मान्यतेने वृक्षसमिती साठी वर्ग करण्यात आलेला आहे.

उक्त तपशिलानुसार रक्कम रु.२३,६००/- मात्र वृक्ष संवर्धन करातुन सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ धुळे शाखा यांना अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5(2)(2)अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७१ प्रभाग क्र.११ ट्रान्सपोर्ट नगर अभय कॉलेज जवळील परीसरात पाईप लाईन नसल्याने सदर ठिकाणी तांतडीने बोरींग करून मोटार व टाकी बसविणेत आली. त्यासाठी झालेला खर्च रु. 79600/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती सर्व सन्मा. सादस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक ०५/०९/२०१९**

धुळे शहरातील प्रभाग क्र.११ ट्रान्सपोर्ट नगर अभय कॉलेज जवळील परीसरात पाणी पुरवठयाची पाईपलाईन नसल्यामुळे तेथील नागरीकांना पाण्यासाठी भटकावे लागत असल्यामुळे तेथे तातडीने व त्वरीत काम लागणार असून उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री.आदर्श कन्स्ट्रक्शन धुळे सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.७९६००मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.सदरचे काम विना निविदा आदर्श कंन्स्ट्रक्शन यांचा कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5(2)(2)अन्वये विना निविदा करण्यास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमंक:- ७२ — धुळे शहरात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत (एन.यु.एच.एम.) मनपा शाळा कं. 28 चितोडरोड राऊळवाडी येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र )दवाखाना) बांधणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत. त्यात हिंद कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीने आल्याने त्यास मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुरेखा उगले — सभापती महोदय, एन.यु.एच.एम अंतर्गत धुळे शहरातील मिल परिसर भागात सर्व सोयी नुसार नवीन दवाखाना दर मंजुरी साठी आजच्या स्थायी समितीत विषय आलेला आहे. सदर विषय मंजुरी नंतर चांगल्या प्रतीचा दवाखाना मिल परिसरातील प्रभाग क्र. १७ चा पुर्ण भाग, प्रभाग क्र. १४,१५,१६ व १८ या प्रभागातील २५% ते ५०% भाग असे एकूण साधारणत: ५०,००० नागरिकांसाठी या दवाखान्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे सदरचा विषय मंजुर करावा हि विनंती. सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा. श्री. गिरीषजी महाजन साहेब, श्री. जयकुमार रावल साहेब, धुळे शहराचे खासदार मा. श्री. सुभाषजी भामरे व म. महापौर श्री. चंद्रकांत सोनार, धुळे शहराचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल व सभापती श्री. युवराज आण्णा पाटील यांचे सदर विषय मंजुरी करिता मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल प्रभाग क्र. १७ चे नगरसेवक श्री. शितल भाऊ नवले, बंटी मासुळे व मी स्वत: यांचे सर्वांचे आभार मानते. सदर दवाखान्यात प्रसुतीची व्यवस्था करणेत यावी. याबाबत संबंधितांना दवाखाना पुर्ण होईपावेतो डॉक्टर महिला व नर्सची व्यवस्था करावी. तरी कृपया सदरचा विषय सर्वानुमते मंजूर करावा ही विनंती.

म. संतोष खताळ — सभापती महोदय, एन.यु.एच.एम अंतर्गत धुळे शहरातील मिल परिसर भागात नविन दवाखाना उभारणेकामी आता पर्यंत अनेक लोकांनी प्रयत्न केले आहेत. माजी. महापौर मोहन नवले, तसेच मा. श्री. गिरीषजी महाजन साहेब, श्री. जयकुमार रावल साहेब, धुळे शहराचे खासदार मा. श्री. सुभाषजी भामरे व म. महापौर श्री. चंद्रकांत सोनार, धुळे शहराचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री. अनुपजी अग्रवाल व सभापती श्री. युवराज आण्णा पाटील तसेच सन्मा. सदस्या. सौ. सुरेखा उगले, सौ. वंदना मराठे या सर्वांचे मी जाहीर आभार व्यक्त करतो. सदरचा विषय मंजुर करावाच पण ताबडतोब मार्गी लावण्यात यावा. याबाबत ताबडतोब टेंडर काढण्यात येवुन विषय मार्गी लावण्याची कार्यवाही करण्यात यावी. आणि सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सादस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक ०५/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत चितोड रोड शाळा नं.28 राऊळवाडी समोरील भागात धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 31 दि. 28/02/2019 अन्वये धुळे शहरात राष्ट्रीय आरोग्य अभियान ) एन.यु.एच.एम.) अंतर्गत मनपा शाळा क्रं. 28 चितोडरोड शाळा नं. 28 राऊळवाडी समोरील भागात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र ( दवाखाना) बांधणे रु. 73,83,120/- मात्र खर्चास मंजुरी प्राप्त नुसार सदरचे कामाचे ई- निविदा क्रं.16(296) दि.22/07/2019अन्वये दि. 23/07/2019 रोजीचा दै. श्रमराज्य / लोकमत या अंकात प्रसिध्द केली असता मुदतीत दि. 19/08/2019 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.नं. | कंत्राटदारा/ठेकेदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | हिंद कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| 2 | श्री. स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | शे. 5% जास्तीने | |
| 3 | जयप्रकाश महाले | शे. 10% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री. हिंद कंस्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आले आहे.व त्यांनी नियमाप्रमाणे ऑन लाईन बयाणा/ रक्कम भरलेली आहे.सबब कत्राटदार श्री.हिंद कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दरास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक १२/०९/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अर्मान अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामर | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. युवराज बाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निधारण अधिकरी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १७ | श्री. रमजान अन्सारी | आस्थापना प्रमुख |
| १८ | श्री. विशाल निंबाळकर | वृक्ष प्राधिकरण विभाग |
| १९ | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

सभेच्यासुरुवातीस सन्मा.सदस्या सौ.सुरेखा उगले यांनी धुळे मनपाच्या कर्मचा-यांना ७वा वेतन आयोग लागू करण्यासाठी सर्व सन्मा.पदाधिकारी, सर्व नगरसेवक बंधु भगिंनी विशेषत: सदस्य श्री. नागसेनजी बोरसे,श्री.शितल नवले यांनी आग्रही भुमिका घेवून प्रस्तावास मान्यता दिली. याबद्दल या सर्वाच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या बैठकीत पारीत करण्यांत यावा ही विनंती.

म. नगरसचिव — धुळे मनपाच्या इतिहासातील हा महत्वाचा निर्णय आहे.आणि यासाठी सर्व सन्मा. पदाधिकारी, महापौरचंद्रकांतजी सोनार,भाजपा महानगराध्यक्ष श्री.अनुपभैय्या अग्रवाल, तसेच सर्व नगरसेवक, व नागसेनजी बोरसे, शितल नवले सौ. सुरेखाताई उगले व आपण सर्वांनी यास एकमताने मान्यता दिली तसेच हा प्रस्ताव महासभेपुढे आणण्यासाठी जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.गंगाथरन साहेब,मा.उपायुक्त श्री. गणेश गिरी, सहा. आयुक्त श्री. शांताराम गोसावी,उपमुख्य लेखापरिक्षक श्री.दिपकांतजी बाघ, मुख्यलेखाधिकारी श्री. नामदेवजी भामरे यांनी सकारात्मकता दर्शवून सहकार्य केले याबद्दल सर्व धुळे मनपाचे अधिकारी व कर्मचारी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

म. सभापती — अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक १२/०९/२०१९**

धुळे मनपाच्या कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यासाठी सर्व सन्मा. पदाधिकारी, सर्व नगरसेवक बंधु भगिंनी विशेषत: सदस्य श्री. नागसेनजी बोरसे,श्री. शितल नवले यांनी आग्रही भुमिका घेवून प्रस्तावास मान्यता दिली.

धुळे मनपाच्या इतिहासातील हा महत्वाचा निर्णय आहे.आणि यासाठी सर्व सन्मा. पदाधिकारी, महापौर चंद्रकांतजी सोनार, भाजपा महानगराध्यक्ष श्री.अनुपभैय्या अग्रवाल, तसेच सर्व नगरसेवक,व नागसेनजी बोरसे, शितल नवले सौ. सुरेखाताई उगले व आपण सर्वांनी यास एकमताने मान्यता दिली तसेच हा प्रस्ताव महासभेपुढे आणण्यासाठी जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.गंगाथरन साहेब, मा.उपायुक्त श्री.गणेश गिरी,सहा.आयुक्त श्री. शांताराम गोसावी, उपमुख्य लेखापरीक्षक श्री.दिपकांतजी बाघ,मुख्यलेखाधिकारी श्री.नामदेवजी भामरे यांनी सकारात्मकता दर्शवून सहकार्य केले याबद्दल सर्वाचे अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ७३ स्वच्छ भारत नागरी अभियान अंतर्गत घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत बायोमाईनींग प्रक्रिया करणेबाबतच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालाचा विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुरेखा उगल सभापती महोदय, स्वच्छ भारत नागरी अभियान अंतर्गत बायोमाईनींग प्रक्रिये बाबतसविस्तर माहिती द्यावी.

म. सहा. आयुक्त सभापती महोदय यांच्या वतीने खुलासा करतो की, आपल्या कडे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जवळपास २५ कोटी च्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. यात जी लॅन्ड आहे यासाठी असलेली ही वेगवेगळी प्रक्रिया आहे यातकचरा गोळा करणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणे बाबतचे काम त्यात आहेत. वरखेडी रस्त्यालगत आपली जी १० हेक्टर जागा आहे त्याठीकाणी वर्षानु वर्ष तेथे कचरा जमा होत होता त्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन ती जागा कचरा मुक्त करण्याचा प्रस्ताव या बायोमाईनींग मध्ये आहे. यामध्ये पहिले जो कचरा आहे त्याचे मोजमपा होणार त्यानंतर वेगवेगळे स्कीनर, म्हणजे जे मशीन आहेत त्याच्याकडुन बायोमायनींग होईल त्यानंतर त्यावर प्रकिया करणे शक्य असेल तर प्रक्रिया केली जाईल. जी जागा आहे ती पुर्ण बायफॅर्गोशन मध्ये राहील याचा जो काही इस्टीमेट आहे त्या इस्टीमेट नुसार करण्यात येणार आहे. ही संपुर्ण प्रक्रिया सांयटीफीक आहे. यात पुर्ण जागा कचरा मुक्त करण्यासाठी १२ महिन्याचा कालावधी लागणार आहे.

म. सुरेखा उगले या कामासाठी कोणता निधी वापरण्यात येणार आहे?

म. सहा. आयुक्त या कामासाठी स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत जी काही निधी प्राप्त आहे. त्याचा वापर करणार आहोत.

म. नागसेन बोरसे संपुर्ण प्रक्रिये मध्ये आपल्याला किती जागा अपेक्षीत आहे?

म. उपायुक्त ८०% जागा अपेक्षित आहे.

म. नागसेन बोरसे शासनाचे काही नियम असतील किती % व्हायला पाहिजे याबाबत.

म. सहा. आयुक्त पुर्ण १००% जागा स्वच्छ करण्याचे यात दिलेले आहे.

म. उपायुक्त यामध्ये जे इस्टीमेट आहे आणि जो अस्त व्यस्त पडलेला कचरा पडला आहे त्याचे मोठे —मोठे ठिग करतील. त्यानंतर सर्व्हे करतील यामध्ये पुर्ण शुटींग होईल आणि नंतर ते ठिग करतील आणि त्याचे बांधकाम विभागामार्फत मोजमाप होईल या ठिगची लांबी, रुंदी, उंची म्हणजे किती मिटरचा एक ठिग झाला असे ते मोजमाप होईल आणि त्यानंतर ते ८९००० मी एवढी कॉनंटीटी तेथुन डिस्पोझ होईल.

म. नागसेन बोरसे बायोमायनींग मध्ये टक्केवारी असते.मग आपण केलेले आहे का की ८०% व्हायला पाहिजे असे इस्टीमेट तयार केले आहे का?

म. सहा. आयुक्त इस्टीमेट तयार आहे त्याला तांत्रीक मान्यता घेतलेली आहे. व डी.पी.आर. नुसार काम होणार आहे.

म. नागसेन बोरसे बायोमायनींग मध्येजे काही नियम असतील त्यांचे पालन करुन सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. सुभाष जगताप सभापती महोदय, हा जो बायोमायनींग चा विषय आलेला आहे त्याला आमचा विरोध नाही. परंतु मला याची माहिती अशी पाहिजे की ही जी ई.बी. इनव्हरो बायोटेक प्रा. लि. सर्वात कमी दर आहेत का आहे.

म. नगरसचिव टिपणी मध्ये दिसत आहे. १० % कमीने म्हटलेले आहे.

म.सुभाष जगताप हे जे दर असतात अंदाजपत्रकाच्या १०% कमी दराने किंवा अंदाजपत्रकाच्या १०% जास्त दराने असे दिलेले असते. माझ्या माहिती प्रमाणे गुरुकृपा ऐन्टरप्राईजेस सर्वात कमी दराने निविदा दर दिलेले आहेत. म्हणजे तो ००.००% आलेले आहे. म्हणजे इस्टीमेट दर आहे. यामध्ये अंदाज पत्रक दराने किंवा इस्टीमेट दराने लिहायला पाहिजे होते.

म.उपायुक्त सदरचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमीने आलेले आहेत. ते दर इतर निविदा धारकांनी नमुद केलेल्या दरापेक्षा सर्वात कमी आहे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक १२/०९/२०१९**

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्व न.अ-2017/प्र.क्र. 106/ नवि 34 दिनांक 10 नोव्हेंबर 2017अन्वये रक्कम रु.25,85,15,237=06 किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच उक्त प्रस्तावास म. मुख्य अभियंता , महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग नाशिक यांनी रक्कम रु. 24,50,73,567/- मात्र किंमतीस त्यांचे कडील पत्र क्रं. तांत्रिक शाख-2/कामा/3060/2018 दिनांक 27/12/2018 अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.त्यात बायोमाईनींगच्या कामास रु.3,78,25,000/-मात्र करिता मान्यता दिलेली आहे. त्या अंतर्गत सदर कामाची ई निविदा सुचना क्रं. 12/019-2020 (तिसरी निविदा) दिनांक 12/1/2019 रोजी काढण्यांत आली असता एकुण पात्र 4 निविदा धारकांनी निविदा दर खालील प्रमाणे भरलेले आहेत.

| अ.नं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | ई.बी. इनव्हरो बायोटेक प्रा.लि. | - 10.00 % | सर्वात कमी दर |
| 2 | झा.पी. अॅण्ड कंपनी | -.99% | |
| 3 | कविराज एम.बी. बी. वेस्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि. | -4.59% | |
| 4 | गुरुकृपा ऐन्टरप्राईजेस | 0.00% | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ई.बी. इनव्हरो बायोटेक प्रा.लि.यांनी दिलेले दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा - 10.00 %( कमीने) दर असून त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार ई.बी. इनव्हरो बायोटेक प्रा.लि.यांची –10%(कमीने) दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच शासन निर्णयातील अटी शर्ती व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच उपमुख्य लेखापरीक्षक यांनी नमूद केलेल्या अभिप्रायाची आवश्यक ती योग्य कार्यवाही प्रशासनाने करावी. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ७४ — धुळे मनपा हद्दीत महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेअतर्गत १२६४०० वृक्ष लागवड करणेबाबत रोप वाहतुक करणेसाठी झालेला खर्च रु.९९३७८४/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८दिनांक १२/०९/२०१९

महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेतंर्गत धुळे मनपा हद्दीत १,२६,४००/- वृक्षलागवड करणेबाबतचे उदिष्ट देणेत आलेले होते.

त्या अनुषंगाने मा.महापौर सो. यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार मा. उपवनसंरक्षक धुळे वनविभाग यांचे कडुन वृक्षरोपे मोफत होणे व त्या वृक्षांची लागवड लोकसहभागातुन करणेचे नियोजन करणेत आलेले होते.

त्यानुसार मा.उपवनसंरक्षक धुळे यांना इकडील कार्यालयीन जा.क्र/धुमपा/ वृ.स/ १०६ दि.२८/६/२०१९, जा.क्र./११७दि.४/७/२०१९ व जा.क्र १२२दि.८/७/२०१९ अन्वये १,२६४००/- वृक्षरोपे पुरवठा करणे बाबत मागणीपत्र देणेत आलेले होते.

त्याअनुषगांने वनविभाग धुळे यांचे कडील जा.क्र.१४८१दि.२८/६/२०१९ जा.क्र.१५९२ दि.४/७/२०१९ व जाक्र १६२५ दि.९/७/२०१९ अन्वये प्रत्येकी ३०,००० रोपे त्यांचे मौजे गरताड/ बोरविहिर, मौजे वडोल व मौजे लामकानी येथील रोप वाटिकेतुन एकुण९०,०००/-रोपे म.न.पा.स

पुरवठा करणेत आलेली असुन ३६४०० वृक्षरोप पुरवठा होणे बाकी आहे.त्यानुसार सदरच्या वृक्ष रोपांची वाहतुक करणे आवश्यक होते.

तसेच मनपा मालकिच्या सर्व्हे नं.४७४/१ व सर्व्हे नं.६४४/१ अ शिंदेनगर व प्रतापनगर मालेगांव रोड धुळे या जागेवरील बेकायदेशीर अनधिकृत रित्या असलेल्या रोपवाटिका संदर्भात तक्रार प्राप्त झालेली असल्याने मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो. धुळै (तत्कालिन) यांचे तोडी आदेशान्वये सदरच्या अनधिकृत रोप वाटिकेतुन वृक्ष रोपे जप्त करुन मनपा मालकिच्या मालेगांव रोड जलकुंभच्या आवारात व मनपा मुख्य कार्यालयाच्या आवारात ठेवण्याचे नियोजन करणेत आलेले होते.

त्यानुसार उक्त आदेशाप्रमाणे व वृक्ष लागवड करणे काम तातडीचे व मुदतीत पुर्ण करने आवश्यक असल्याने अत्यावश्यक बाब म्हणुन सदर कामाचा ठेका न काढता खाजगी ठेकेदार मार्फत वन विभागाकडील९०००० रोपे व शिंदेनगर व प्रतापनगर येथील रोप वाटिकेतील २००००असे एकुण १,१०,०००वृक्ष रोपे वाहतुक करणेत आलेली होती. त्याप्रमाणे ९०००० रोपे हे प्रभाग निहाय वाटप करणेत आलेली होती व २०,००० रोपे शिंदेनगर प्रतानगर येथुन मालेगांव रोड जलकुंभ व मनपा मुख्य कार्यालय येथे वाहतुक करुन ठेवणेत आलेली होती व मालेगांव रोडजलकुंभ येथुन काही प्रभागात वृक्ष रोपांचे वाटप करणेत आलेली होती.

त्या अनुषंगाने सदरचे ट्रॅक्टर वाहतुक व मजुर पुरवठा करणेचे काम श्री.भुषण लक्ष्मण चौधरी यांनी केलेले असुन उक्त कामाचा मोबदला मिळणेबाबत त्यांनी पत्र सादर केलेले आहे.

त्यानुसार वाहतुकदार यांनी एकुण ४९१ खेपा केलेल्या असुन शासनदरानुसार २०२४X ४९१= ९,९३,७८४/- मात्र खर्च झालेला आहे.

तरी उक्त वृक्ष वाहतुक व वाटप करणेकामी आलेला शासन परिपत्रकानुसार खर्च रु.९९३७८४/- मात्र ला आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत असून उक्त कार्यवाही झालेली असल्यामुळे शासन दरानुसार वाहतुकीचे देयक अदा करण्यासाठी ५(२) २ नुसार सदरच्या प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ७५ — धुळे शहरातील विविध ठिकाणी पाईपलाईन दुरुस्त व नवीन व्हॉल टाकणचे काम तांतडीने टाकणेचे काम करुन घेण्यांत आलेत.त्यासाठी झालेला खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. सदस्यांच्या मागणीवरुन आणि सभापती साहेबांच्या आदेशाने हा विषय परत अजेंड्यावर घेण्यात आलेला आहे.यावर सदस्यांनी योग्य ती चर्चा करावी.

म. अमिन पटेल — सभापती महोदय,१०महिने पहिले माझ्या प्रभागतील पाईपलाईन फुटली होती ते काम मी स्वत: उभे राहुन करुन घेतले आहे. मी फक्त माझ्या प्रभागातील विषया बाबत बोलत आहे.

म. सुनिल सोनार — दहा ते पंधरा हजाराच्या वर व्हॉल चे काम होत नाही.

म. अमिन पटेल — योग्य ती चौकशी करुनच विषय मंजुर करा.

म. सुनिल सोनर — फक्त या विषयातील सन्मा.सदस्य अमिन पटेल यांच्या कामाच्या बिलाला मंजुरी द्या बाकी तहकुब ठेवा.

म. नगरसचिव — तुमच्या मते धुळे मनपा हद्दीतील जुन्या वडजाई रोड पुलाजवळील पाईपलाईन शिफ्टिंग करणे १,८८,६०८/- या कामाला मान्यता द्यावी बाकी तहकुब ठेवण्यात यावेत.

म. नागसेन बोरसे — सभापती साहेब आपण मागच्या वेळेस बोललो होतो. गिरी साहेबांच्या कार्यालयात बागुल सरांसमवेत चर्चा झाली होती. हे काम चालु असतांना महापौर साहेबांनी आढावा बैठक घेतली होती. त्या बैठकीत आमच्या भागात जे व्हॉल, बोअरवेल आहेत त्या बोअरवेल रिपेअरींग बाबत तोंडी सुचना केल्या होत्या. त्या तोंडी सुचना होत्या म्हणुन कदाचीत मान्य झाल्या नसतील असे मला वाटते. पण महापौरांनी सुचना करुन सुध्दा माझ्या प्रभागातील कामे झाली नाहीत. पण त्यातली एक दुरुस्ती अति महत्वाची होती म्हणुन मी पैसे देवुन करुन घेतली. यांचे असे म्हणने आहे की, डी.एस.आर मंजुर नाही. डि.एस.आर.

प्रमाणे रेट नाहीत. या कामांना ४ महिने लागतात ते का लागतात याचा खुलासा करावा. कारण धुळे शहरात पाण्याचा प्रश्न फार गंभीर आहे. सर्व सन्मा.सदस्यांनी त्यांच्या विभागातील कामे सांगीतले होते एका ही सदस्याचे काम झालेली नाही.

म. उपायुक्त — याबाबत बोलने झाले आहे. डी.एस.आर रेट भुगर्भ शासन डिपार्टमेंन्ट कडुन मागविले आहेत. त्यांच्याकडे नसतील तर जिल्हापरिषद कडुन मागविणार आहोत.त्यांची यादी आपण मागविली आहे. आणि त्यानुसार आपण काम करणार आहोत.

म. नागसेन बोरसे — किती सदस्यांनी सांगीतले होते आमच्या प्रभागात पाण्याची समस्या आहे ती सोडवा. आणि माझी विनंती आहे अक्कलपाडा धरणाचे टेंडर झालेले आहे ते लवकरात लवकर उघडुन मे. स्थायी समिती सभागृहापुढे ते सादर करावे जेणे करुन आम्हांला केलेल्या कामाचे श्रेय भारतीय जनता पार्टीला घेता येईल. आता आचर संहिता लागणार आहेत त्यापुर्वी तो विषय यायाला पाहिजे एवढी विनंती करतो आणि या विषयाला माझा विरोध आहे. जो पर्यंत सविस्तर माहिती दिली जात नाही तो पर्यंत विषयाला माझा विरोध आहे.

म. सुनिल सोनार — आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

म. नागसेन बोरसे — बाहेर चर्चा केली जाते की, एका सदस्यांने विरोध केल्यामुळे विषय तहकुब केला जातो पण सभापतींनी त्यावर निर्णय घ्यायचा. सभापतींना वाटत असेल सन्मा. सदस्यांचा विरोध योग्य आहे तर ते थांबवु शकतात वाटत असेल विरोध चुकीचा आहे तर मान्य करु शकतात. परंतु सदर विषयाला माझा विरोध आहे.

म. सुनिल सोनार — मागच्या सभेत तुम्ही सांगितले होते कि पुढच्या सभेत खुलासा करणेत येईल.

म. नगरसचिव — या विषयासंदर्भात मागच्या सभेत सन्मा.सदस्यांनी विचारणा केली होती की, झालेले काम योग्य आहे किंवा कसे याबाबत खुलासा करावा. हे काम योग्य आहे का याबाबत म. अभियंता यांना विनंती करतो की खुलासा करावा आणि याबाबत जे फोटोग्राफ सांगितले होते ते संबंधीत विभागाने पाठविले आहेत. यात कामाचे झालेले फोटोग्राफ व इतर सर्व पुरावे स्वाक्षरीसह जोडलेले आहेत.

म. सुनिल सोनार — सभापतींना विषय मंजुर करावयाचा असेल तर कारावा. परंतु आमचा विरोध नोंदवुन घेण्यात यावा.

म. अमिन पटेल — सदरचे गेल्या ८ महिन्यापूर्वीचे काम आहे. संबंधित ठिकाणी कामे झाल्याचे फोटो नस्तीत जोडलेले आहे. तरी सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सदर कामांच्या संदर्भात सन्मा.सदस्य श्री. नागसेन बोरसे व श्री.सुनिल सोनार यांनी विरोध नोंदविला आहे. सन्मा.सदस्यांचा विरोधाची नोंद घेवून सदर विषयास कार्यालयीन अहवालास अधिन राहून बहुमताने कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक १२/०९/२०१९**

धुळे शहरातील खालील ठिकाणी पाणीपुरवठा करण्यास अडचण येत असल्याने सदरचे कामे ठेकेदार श्री.संजय गायकवाड यांच्या कडून पूर्ण करून घेण्यात आले आहे.

| **कामाचे नाव** | **रक्कम** |
|---|---|
| 1)धुळे मनपा हद्दीतील जुन्या वडजाई रोड पुलाजवळील पाईपलाईन शिफ्टिंगकरणे. | रु.1,88,608/- |
| 2)धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरात पाईपलाईन जोडणे व चक्करबर्डी जलकुंभ येथे वकालिका देवी मंदिर येथील पुलाजवळील पाईपलाईन दुरुस्ती करणे. | रु.2,81,669/- |
| 3)धुळे मनपाचा शहर पाणीपुरवठा योजनेवरील डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्र येथून मोहाडी पिराची टेकडी जवळील 300 एम.एम ची पाईपलाईन व व्हॉल दुरुस्त करणे. | रु.1,57,949/- |

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार त्यांनी उक्त प्रमाणे कामे पूर्ण करून दिली आहेत. सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम 5(2)(2) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सभा पटलावर ठेवले असता उपस्थित सदस्यांपैकी श्री. नागसेन बोरसे व श्री. सुनिल सोनार या सदस्यांनी सदर प्रस्तावास विरोध दर्शविला असल्याने त्यांच्या विरोधाची नोंद घेवून सदर कामे हे तांतडीने करण्यांत आलेली असल्याने कार्यालयीन अहवालाच्या अधिन राहून सदर प्रस्तावास बहुमताने कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **बहुमताने मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय कमांक :- ७६ — धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात साईबाबा मंगल कार्यालय ते रूपामाई शाळा ते शिवप्रताप यांचे घराचा कॉर्नर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामाचे सुधारित (रिव्हाईज)अंदाजपत्रकासमंजुरी मिळणे बाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुभाष जगताप — सभापती महोदय, सदरचे अंदाजपत्रकात फेर बदल कसा झाला आणि दुसरे असे की,रक्कम तिच आहे. परंतु कशात बदल केलेला आहे याबाबत सभागृहाला अवगत करुन देण्यात यावे.

म. अभियंता — विषय क्रमांक ७६ बाबत पुर्वीच्या अंदाजपत्रकामध्ये जे प्रस्तावित केले होते ते काम प्रत्यक्ष सुरु केल्यावर आपण सर्व्हे केला. सर्व्हे केल्यानंतर आपल्याला नदीकडे जे पाणी काढावयाचे आहे साधारणत: ७ ते ८ फुटापर्यंत खोल गटार करावी लागणार होती. आणि आपल्या अंदाजपत्रकात प्रस्तावित गटार करणे योग्य नव्हती ती गटार कढायला तीची साफ-सफाई करायला योग्य नव्हती म्हणुन त्याठिकाणी आपण बंदीस्त पाईपाची गटार करणार होतो. फक्त हाच बदल अंदाजपत्रकात केला आहे.

त्याच्यानंतर अंदाजपत्रक विषय क्रमांक ७७ मध्ये पुर्वीचा जो रस्ता होता त्याच्या मध्ये व्ही.व्ही.एम चा समावेश नव्हता. त्यामुळे त्यात व्ही.व्ही.एम चा समावेश करुन आपण रस्त्याचे सुधारीत अंदाजपत्रक केलेले आहे.आपण असे म्हटलेले आहे की या सुधारीत अंदाजपत्रकात सुधारीत मंजुरी सुध्दा धुळे महापालिकेकडुन नाही कारण या आधीही तांत्रीक मंजुरी आपण शासनाकडुनच घेतली आहे. आपल्याला तांत्रीक मंजुरी घेणे आवश्यक आहे. याच्यात जर काही शंका असेल तर आपण मे. स्थायी समिती सदस्य समक्ष भेट दिल्या नंतर अंदाजपत्रकाला मंजुरी दिली तरी त्याला आमची, प्रशासनाची काही हरकत राहणार नाही. पण मी सर्वांना लक्षात आणुन देतो की, रुपामाई शाळा समोरचा जो रस्ता आहे त्याला खुप खड्डे पडले आहेत आणि पाणी साचु नये याबाबत प्रभागातील सन्मा. सदस्य सांगतील. वाटल्यास सन्मा. सदस्य नागसेन बोरसे, सन्मा. सदस्य सुनिल सोनार, सन्मा. सदस्य सुभाष जगताप यांनी समक्ष पाहणी करुन योग्य वाटले तर मंजुर करावे.अयोग्य वाटल्यास मंजुरी देवु नये. ही निविदा शासनाकडुन मंजुर झालेली आहे. यात मनपाचे हित आहे.कारण मागच्या वर्षाचे दर यात घेण्यात आले आहेत.

म. सुभाष जगताप — म.अभियंता यांच्या खुलासा नंतर कामाच्या अहवालात बदल होत असेल परंतु अंदाजपत्रकाच्या दरामध्ये बदल झालेला नाही. मागच्या दरानेच आणि अटींना अधीन राहुन प्रशासनाच्या वाढीव बाबी असतील त्या मंजुर करण्याचा प्रस्तावित दरामध्ये ७००असेल तर त्या दरामध्येच ते करावे लागते. याला सुधारीत मंजुरी देवुन पुढील कार्यवाही करावी.

म. रावसाहेब पाटील — सभापती महोदय, या रस्त्याचे ज्या वेळेस इस्टीमेट तयार करणेत आले त्यावेळेस ती व्ही.व्ही.एम ची प्रासेस घेतली नव्हती का? पहिल्या पासुनच तो रस्ता खराब आहे. जे झाले असेल ते जाऊ द्या पण आता लवकरात लवकर कार्यवाही करा. रस्त्याची अवस्था खुप खराब झालेली आहे. सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म.नागसेन बोरसे — रस्त्यांच्या लांबी व रुंदीमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता तसेच प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या मान्यतेमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता विषयास मंजुरी देणेस हरकत नाही.

म. सुनिल सोनार — म. अभियंता यांचा खुलासा योग्य आहे. सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना विचार करुन सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक १२/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात साईबाबा मंगल कार्यालय ते रूपामाई शाळा ते शिवप्रताप यांचे घराचा कॉर्नर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामास खर्च रु.69,39,502/- मात्रला म. आयुक्त सो., यांचा दि.14/08/2018 रोजीचा टिपणी मंजुरीनुसार धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 90 दि.19/09/2019 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली होती. त्यानुसार सदरचे काम करणे कामी दि.07/09/2018 रोजीचा दै. राजरंग टाईम्स/ दिव्य मराठी या वृत्तपत्रात जाहीर ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत आलेल्या निविदा दरात सर्वात कमी दर श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे शे. 14.99% कमीने आलेले होते त्याचा दरास मे. स्थायी समिती ठराव नं. 21 दि.28/02/2019 ने मंजुरी दिली असता श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन, ठेकेदार यांना इकडील जा.क्र./बां.वि./278 दि.06/03/2019 अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

सदरचे अंदाजपत्रक तयार करून सुमारे 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सदरचा रस्ता हा जास्त प्रमाणात नादुरुस्त व खड्डेयुक्त झालेला आहे. सदरचा रस्ता हा सुस्थितीत व व्यवस्थित होणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकात काही बाबी सुधारणा करून सदरचा कामाचे सुधारित (रिव्हाईज) अंदाजपत्रकास रु.69,39,502/- मात्रचे करणेत आलेले आहे. अंदाजपत्रकात कोणतीही वाढ झालेली नाही. सदरचा विषयाचे अंदाजपत्रक रु.25 लक्ष च्या वरती असल्यामुळे याअगोदर स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंजुरी देण्यात आली होती. सदरचे सुधारित अंदाजपत्रक हे सुद्धा स्थायी समिती सक्षम प्राधिकरण असल्यामुळे स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

कार्यालयीन अहवाल तसेच सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व प्रशासनाच्या अभिप्रायानुसार तसेच सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार रस्त्यांच्या लांबी व रुंदीमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता तसेच प्रशासकीय मान्यतेच्याअंदाजपत्रकीय रकमेच्या मान्यतेमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता सदर रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामाचे सुधारित (रिव्हाईज) अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय कमांक :- ७७ — धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात वाडीभोकर रोड ते पिरबाबा दर्गा व भिवसन नगर ते पाटील ते सुदर्शन कॉलनी ते नकाणे रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामाचे सुधारित (रिव्हाईज) अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना विचार करुन सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक १२/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत वलवाडी भागात वाडीभोकर रोड ते पिरबाबा दर्गा व भिवसन नगर ते पाटील ते सुदर्शन कॉलनी ते नकाणे रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामास खर्च रु.75,79,985/- मात्रला म. आयुक्त सो., यांचा दि.14/08/2018 रोजीचा टिपणी मंजुरीनुसार धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 90 दि.19/09/2019 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आलेली होती. त्यानुसार सदरचे काम करणे कामी दि.07/09/2018 रोजीचा दै. राजरंग टाईम्स/ दिव्य मराठी या वृत्तपत्रात जाहीर ई- निविदा प्रसिद्ध केली असता मुदतीत आलेल्या निविदा दरात सर्वात कमी दर श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे शे.14.99% कमीने आलेले होते त्याचा दरास मे. स्थायी समिती ठराव नं. 20 दि.28/02/2019 ने मंजुरी दिली. श्री. स्वामी समर्थ कन्सट्रक्शन, ठेकेदार यांना इकडीलजा.क्र./बां.वि./279 दि.06/03/2019 अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

सदरचे अंदाजपत्रक तयार करून सुमारे 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सदरचा रस्ता हा जास्त प्रमाणात नादुरुस्त व खड्डेयुक्त झालेला आहे. सदरचा रस्ता हा सुस्थितीत व व्यवस्थित होणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकात काही बाबी सुधारणा करून सदरचा कामाचे सुधारित (रिव्हाईज ) अंदाजपत्रकास रु.75,79,985/-मात्रचे करणेत आलेले आहे. अंदाजपत्रकात कोणतीही वाढ झालेली नाही. सदरचा विषयाचे अंदाजपत्रक रु.25 लक्षच्या वरती असल्यामुळे याअगोदर स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंजुरी देण्यात आली होती. सदरचे सुधारित अंदाजपत्रक हे सुद्धा स्थायी समिती सक्षम प्राधिकरण असल्यामुळे स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

कार्यालयीन अहवाल तसेच सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व प्रशासनाच्या अभिप्रायानुसार रस्त्यांच्या लांबी व रुंदीमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता तसेच प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकीयरकमेच्या मान्यतेमध्ये कुठल्याही प्रकारचे बदल न करता सदर रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे कामाचे सुधारित (रिव्हाईज) अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक १८ सप्टेंबर २०१९**
**वेळ:- दुपारी ३-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज बुधवार दिनांक १८/०९/२०१९ रोजी दुपारी ३-०० वाजता **मा. श्री. युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजिज शेख | आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ७ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ८ | श्री. नामदेव भामर | मुख्य लेखाधिकारी |
| ९ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १४ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निधारण अधिकरी |
| १५ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. सी.एम. उगले | पा.पु. अभियंता |
| १७ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १८ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेख लिपीक |
| २० | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| २२ | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

बैठकीच्या प्रारंभी नवनियुक्त आयुक्त श्री अजिज शेख यांचे स्थायी समितीच्या वतीने सभापती श्री. युवराज पाटील व सन्मा.सदस्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले. तसेच मुस्लीम प्रभागातील अल्पसंख्याक निधी अंतर्गत असलेल्या जामच्या मळा येथील जलकुंभाचे काम सुरु केल्याबद्दल सर्व पदाधिकारी व अधिका-यांचे अभिनंदन सन्मा. नगरसेवक श्री. अमिन पटेल यांनी केले.

विषय क्रमांक:-७८ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचुन कायम करणे. (दि. २९/८/२०१९)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक १८/०९/२०१९**

मागील स्थायी समिती सभा ठराव नंबर ६९ ते ७८ अखेर व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-७९ — धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दि. **१/१०/२०१८ ते ३१/०८/२०१९** अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समितीपुढे सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुभाष जगताप	बांधकाम विभागाकडील कार्यादेशातील दिलेल्या तारखा चुकल्या आहेत. तया दुरुस्त करुन घेण्यांत याव्यात.

म.नगरसचिव	कार्यादेशातील तारखेत वर्ष चुकले आहे. ते दुरुस्त करुन घेण्यांत येत आहे.

म. सभापती	यादीचे वाचन करुन माहिती देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दि. **१/१०/२०१८ ते ३१/०८/२०१९** अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादीचे वाचन करुन माहिती देण्यांत आली.

| कार्यादेश क्रं. | दिनांक | कामाचे नाव | निधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 8/3/18 | धुळे शहरातील विविध रस्त्यावर रबलींग स्ट्रीप टाकणे, नामफलक बसविणे, पांढरे पट्टे ओढणे. | रस्ता अनुदान अंतर्गत | 7,73,930/- |
| 2 | 31/10/18 | पेठ ग नं. 4,5,6,7ते मच्छीबाजार पावेतो चा रस्त्यावरील खड्डे कॉंक्रिटीकरणाने बुजविणे. | | 13,96,074/- |
| 3 | 31/10/18 | प्रभाग क्रमांक 28 मध्ये कामगार नगर ते मिल्लत नगर येथे रस्ते कॉन्क्रीट करणे. | गरीब नागरी योजना | 9,75,400/- |
| 4 | 21/12/18 | प्रभाग क्रमांक 18 भिम नगर येथे खुल्या जागेत संरक्षण भिंत बांधणे. | नागरी दलित वस्ती | 23,49,263/- |
| 5 | 2/2/19 | वलवाडी सर्वे नंबर138भिवसेन नगर येथे सामाजिक सभागृह बांधणे. | खासदार निधी | 9,95,424/- |
| 6 | 12/2/19 | प्रभाग क्रमांक 5मध्ये श्री महाजन यांच्या घरापासून ते श्री दुबे ते श्री महाले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | नागरी दलितेत्तर | 14,68,078/- |
| 7 | 15/2/19 | पवन नगर चाळीसगाव रोड ते वैभव किराणा पावेतो रस्ता कॉन्क्रीट करणे | खासदार निधी | 9,99,490/- |
| 8 | 15/2/19 | प्रभाग क्रमांक ९ गल्ली नंबर ४ आग्रा रोड ते लोंढे नाल्या पावेतो कॉंक्रीट गटार व गल्ली नंबर ३ ची बोळ आग्रा रोड ते जामा मस्जिद पर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | नगरोत्थान निधी | 15,73,011/- |
| 9 | 15/2/19 | प्रभाग क्रमांक 30 रासकर नगर गायकवाड ते पाटील बर्फ कारखाना ते थोरात ते दगू रासकर ते सायकल मार्ट पावेतो रस्ते कॉंक्रीट करणे. | नगरोत्थान निधी | 14,69,355/- |
| 10 | 27/2/19 | धुळे मनपा नवीन प्रशासकीय इमारतीत पुढील बाजूस श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक होणारा देखाव्याची फ्रेम लावणे बाबत. | | 10,25,163/- |
| 11 | 2/3/19 | प्रभाग क्रमांक १८ मध्ये यशवंनगर मधील वर्षा पान सेंटर ते टोपे यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. | नागरी दलित वस्ती | 6,81,452/- |
| 12 | 2/3/19 | प्रभाग क्रमांक १८ मध्ये महात्मा फुले ऑफिस ते यशवंत नगर नाल्यापावेतो कॉंक्रीट गटार करणे. | नागरी दलित वस्ती | 9,13,749/- |
| 13 | 5/3/19 | प्रभाग क्रमांक १८मध्ये यशवंत नगर येथील वर्षा पानपाटील यांच्याघरापासूनते गोपेयांच्या घरापर्यंत कॉंक्रीट तयार करणे. | नागरी दलित वस्ती | 11,82,105/- |
| 14 | 5/3/19 | प्र.क्र. २६ मध्ये विश्वकर्मा सोसायटी येथे ओपन स्पेसला वॉल कंपाउंड करणे. | खासदार निधी | 8,92,755/- |
| 15 | 5/3/19 | प्रभाग क्रमांक 6 मध्ये शाहूनगर येथे खुल्या जागेवर कंपाउंड वॉल(चेनलिंक जाळी) करणे(श्रीएचडी सावंत यांच्या घराच्या | आमदार निधी | 9,98,201/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बाजूला व डॉ.वाणी यांच्या दवाखान्याच्या मागील बाजूला) | | |
| 16 | 5/3/19 | प्रभाग क्रमांक २५ मास्टर कॉलनी ते मस्जिद मसूद पावेतो चा रस्ता कॉक्रीट करणे. | नगरोत्थान निधी | 15,30,177/- |
| 17 | 6/3/19 | गौरी हाऊसिंग सोसायटी श्री अग्रवाल ते श्री प्रमोद सोनवणे घरा पावेतो भूमिगत नाला भराव करणे. | नगरोत्थान निधी | 24,99,522/- |
| 18 | 8/3/19 | गल्ली नंबर ६ जयप्रकाश चौक ते माधव पुरा चौक भागात रस्ता डांबरीकरण करणे | रस्ता अनुदान अंतर्गत | 22,42,061/- |
| 19 | 8/3/19 | गल्ली नं.७मच्छीबाजार पोलिस चौकी पासून ते सुल्तानिया चौक जे.बी.रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | रस्ता अनुदान अंतर्गत | 8,99,334/- |
| 20 | 8/3/19 | ऊस गल्ली श्री वर्पे यांच्या घरापासून ते श्री दिपक गोरे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रस्ता अनुदान अंतर्गत | 9,01,777/- |
| 21 | 8/3/19 | शिवाजी विजय व्यायाम शाळा ते अकबर चौक पावेतो रस्ता डांबरीकरण करणे | रस्ता अनुदान अंतर्गत | 16,22,841/- |
| 22 | 8/3/19 | प्रभाग क्रमांक २९ यशवंत नगर श्री नंदू रेथवानी यांचे घर ते साब्रदा यांचे घर राजरंग कॉलनी बोर्ड ते गणपती रोड मंदिरापर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | नगरोत्थान निधी | 12,20,757/- |
| 23 | 8/3/19 | ताशा गल्ली श्री विजय सातपुते यांच्या घरापासून ते कसाब वाडा मस्जिद पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | रस्ता अनुदान अंतर्गत | 15,75,724/- |
| 24 | 1/5/19 | प्रभाग क्रमांक १२ मध्ये बंटी गुरव यांच्या घरापर्यंत ते मनोज जगताप यांच्या घरापर्यंत श्री दिलीप साळवे ते श्री अजय चव्हाण यांच्या घरापर्यंत गटार करणे व कॉक्रीट रस्ता करणे | नगरोत्थान निधी | 14,89,064/- |
| 25 | 30/5/19 | प्र.क्र.११ मनमाड जीन मधील श्री भामरे यांच्या घरापासून ते श्रीसेलम यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रिट व गटार करणे. | नागरी दलित वस्ती | 12,04,852/- |
| 26 | 6/6/19 | सिग्नल चौक ते बॉम्बे लॉज आग्रा रोड येथे दोन्ही बाजूस बंदिस्त गटार करणे. | नगरोत्थान निधी | 6,84,299/- |
| 27 | 6/6/19 | प्रभाग क्रमांक १३ भांग्या मारुती मंदिर पेठ गल्ली नंबर ७ जय प्रकाश चौक दोन्ही बाजूंस बंदिस्त गटार करणे | नगरोत्थान निधी | 7,77,269/- |
| 28 | 8/8/19 | धुळे मनपा हद्दीत रेल्वे स्टेशन रोड जिल्हा न्यायालय (कोर्ट) रस्ता डांबरीकरण करणे | | 11,54,577/- |
| 29 | 8/8/19 | प्रभाग क्रमांक ३२श्री.छोटू जाधव यांच्या घरापासून ते विश्वास वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | खासदार निधी | 9,99,538/- |
| 30 | 8/8/19 | प्र.क्र.17 मधील सर्वे नं.524/2 मधील सुदर्शन कॉलनी येथील जागेवर संरक्षण भित बांधणे. | जिल्हा नियोजन समिती | 23,66,320/- |
| 31 | 8/8/19 | प्र.क्र.17 मधील चक्करबर्डी रोड सर्वे नं.525 मधील 1/7 येथील जागेवर संरक्षण भिंत बांधणे. | जिल्हा नियोजन समिती | 14,24,846/- |
| 32 | 13/8/19 | प्र.क्र.5 श्रद्धा नगर भागातील सर्वे नं.68 मधील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे | जिल्हा वार्षिक योजना | 18,66,865/- |
| 33 | 13/8/19 | प्रभाग क्र.14 व 25 पंचायत मशिदीच्या मागे हुसैनिया बिल्डिंग ते अकबर चौक हुसैनिया बिल्डिंग ते बारा पत्थर ताशा गल्ली येथे ड्रेनेज लाईन टाकने व जे बी रोड ते पावन मारुती चौक माधव पुरा येथील रस्ता कॉक्रीट करणे. | आमदार निधी | 9,99,470/- |
| 34 | 13/8/19 | प्रभाग क्र. २५ नजीर शेख अंडेवाले घरापासून ते अन्सारी | नगरोत्थान निधी | 9,77,143/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | यांच्या कारखान्यापर्यंत रस्ता कम्प्लेंट करणे. | | |
| 35 | 23/8/19 | प्र.क्र.27 आझाद नगर मध्ये शहीद हॉटेल ते उमर फारूक ते शब्बाक हाजी प्लॉट पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | नगरोत्थान निधी | 12,20,757/- |
| 36 | 20/8/19 | प्रभाग क्र. २० मधील आंबेडकर चौक भागातील श्री रमाकांत पानतावणे यांच्या घरापासून ते श्री नाना चौरे ते श्री.करंडक यांच्या घरापर्यंत रस्ते कॉन्क्रीट करणे | नागरी दलित वस्ती | 15,38,638/- |
| 37 | 21/8/19 | प्रभाग क्रमांक १७ पारिजात कॉलनी भागात गटार बांधणे (श्रीवाघ यांचे घरापासून ते किराणा स्टोअर पर्यंत) | नागरी दलित वस्ती | 12,55,540/- |
| 38 | 21/8/19 | प्र.क्र.17 समता नगर बोर्ड ते कुमार नगर अमरधाम पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | नागरी दलित वस्ती | 11,53,178/- |
| 39 | 21/8/19 | प्र.क्र.8 श्री. शंकर पवार यांच्या घरापासून ते श्री सुनील यांच्या दुकानापर्यंत धनंजय पवार ते शंकर चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | नागरी दलित वस्ती | 8,70,471/- |
| 40 | 21/8/19 | प्र.क्र. १५मोगलाई मस्जिद ते गौतम नगर पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे (तुकाराम गवळी यांच्या घरापासून ते सोनवणे यांच्या घरापर्यंत) | नागरी दलित वस्ती | 16,60,488/- |
| 41 | 21/8/19 | प्र.क्र.१५सुभाष सपकाळ यांच्या घरापासून ते पाटील शॉप पर्यंत कॉंक्रीट रोड करणे. | नागरी दलित वस्ती | 9,13,800/- |
| 42 | 21/8/19 | प्र.क्र.8 भिडेबाग परिसरातील रस्ता कॉंक्रीट करणे.(दलित वस्ती) | आमदार निधी | 17,92,737/- |
| 43 | 28/8/19 | प्र.क्र.17अरुण कुमार वैद्य नगर बोर्डापासून ते गुरुनानक एजेन्सी पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | नागरी दलित वस्ती | 8,73,526/- |
| 44 | 28/8/19 | प्र.क्र.17मधील समर्थ नगर श्री. मोरे यांच्या घरापासून ते तुळजाई प्रोव्हिजन पर्यंत (उत्कर्ष कॉलनी) रस्ता कॉंक्रिटी करण करणे. | नागरी दलित वस्ती | 22<br>,80,497/- |
| 45 | 30/8/19 | ८०फुटी रोड निळा चौक येथे श्री राजू गुजराती यांच्या घरापासून ते नंदू माने ते श्री खरात यांच्या घरा पावेतो कॉंक्रीट गटार करणे | नागरी दलित वस्ती | 17,21,732/- |
| 46 | 30/8/19 | मनोहर टॉकीज मागील आंबेडकर नगर भागात शाळा क्रमांक २०ज्या परिसरात 10 सीट शौचालय बांधणे. | नागरी दलित वस्ती | 17,48,772/- |

**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८० धुळे म.न.पा कडील मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोक अदालत आयोजनासाठी झालेला खर्च रु.४३०३०/- मात्रला कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे महानगरपालिका वसुली विभागाकडील लोक अदालत दि. १७/०३/२०१९ रोजी आयोजीत करणेत आले होते. त्यानुसार नियोजन करणे करीता म.उपायुक्त सो यांनी भांडार विभागाकडेस कार्यवाही करावी अशी टिपणी सादर केलेली आहे.

त्यानुसार नियोजन करणेत येऊन सदरचा खर्च रू.४३०३०/-मात्र मंजुरीकरीता प्रकरण सादर करणेत आले असता वसुली विभागाकडुन कुठल्याही प्रकारचे साहित्य व कामे करणेस आलेली नाही असा अभिप्राय सहा.मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी यांनी दिलेला आहे.

त्यानुसार सदरचे नोंद स्टॉक पा.नं.३वर घेण्यात आलेली आहे.म.मु.ले.अ सो यांचे कडेस प्रकरण सादर केले असता काम तातडीचे असल्याने ए.एम.डी.जी.बी.एस.यांचे कडुन काम करून घेण्यात आले असुन कार्योत्तर मंजुरी करीता पुढे सादर केले आहे.

म.मु.ले.प यांचे कडेस प्रकरण सादर केले असता खर्च मान्यते करीता शिफारस करणेत आलेली आहे.त्यानुसार प्रकरण म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो यांचे कडेस सादर केले असता तात्काळ चर्चा व लोक अदालत म.न.पा ने खर्च का केला ते स्पष्ट करा असे सुचित केले नुसार चर्चे अंती लोक अदालत मध्ये एकुण रक्कम २.६१ कोटी मात्र वसुल करणेत आले आहे असे निदर्शनास सादर केले आहे.

त्यानुसार म.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो यांनी झालेला खर्च रू ४३०३०/- मात्र कार्येत्तर मंजुरीस स्थायी समिती पुढे सादर करणेस मंजुरी दिलेली आहे.

**कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने** सदरचे प्रकरण झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५(२) (२) अन्वये कार्योतर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८१ — **प्रभाग क्र.18 मध्ये रमाई नगर भागातील यशवंत नगर घरकुल सार्व शौचालयापासून ते उत्कर्ष कॉलनी प्रशांत तिवारी यांच्या घरापर्यंत नाल्यावर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संताषे खताळ — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सुभाष जगताप — सदर विषय हे शहर विकासाच्या दृष्टीने महत्वाचे विषय आहेत व सर्व कामाचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने व त्यापेक्षा कमीने असल्याने सदर प्रस्तावाना मान्यता देण्यांत यावी.

**म. सभापती** — **कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.**

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५ दिनांक १८/०९/२०१९

प्रभाग क्र. १८ मध्ये रमाई नगर भागातील यशवंत नगर घरकुल सार्व शौचालयापासून ते उत्कर्ष कॉलनी प्रशांत तिवारी यांच्या घरापर्यंत नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे कामाबावत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. ११२ दि. २४/४/२०१८ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०२/८/२०१८ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४९,११,३१५/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. ४२४ दि.९/७/२०१८ अन्वये रक्कम रु.४९,११,३१५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./७५/२०१९ दि.१/७/२०१९ अन्वये दि.१/७/२०१९ रोजीचे दै. लोकमत/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२३/७/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे .

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | गौरवसिंग आर कौर | शे १.०० % जास्तीने | |
| ३ | हर्षल पी देवरे | शे३.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री. / मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८२ — धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत राष्ट्रवादी भवन अॅड. विसपुते ते स्टेशन रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यात यावा.
म.सुनिल सोनार — विषय मंजुर करण्यात यावा.
म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. सभापती — कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत राष्ट्रवादी भवन अॅड. विसपुते ते स्टेशन रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५(क) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५०,२६,१२२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. १०८दि.३१/०७/२०१९ अन्वये रक्कम रु. ५०,२६,१२२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.४/९/२०१९ रोजीचे दै.दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिध्द केली असता मुदतीत दि.१२/९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदाधारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | सुकन्या एस.चौधरी | शे २% जास्तीने | |
| ३ | ओमशिव कन्सट्रक्शन | शे १% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे श्री गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व **सन्मा.सदस्यांच्या सहमतीने** कंत्राटदार श्री/मे.गायत्री कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८३ धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजने अंतर्गत जुन्या महानगरपालिका इमारतीच्या मागील (खाऊगल्ली)गल्लीत हॉकर्स झोन विकसित करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यात यावा.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत जुन्या महानगरपालिका इमारतीच्या मागील (खाऊगल्ली) गल्लीत हॉकर्स झोन विकसित करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५(क) दि.२८/०२/२०१९ मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४९,९९,९२०/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. ११४ दि.३१/०७/२०१९ अन्वये रक्कम रु.४९,९९,९२०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे ०.१०% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | हिंद कन्सट्रक्शन | शे ३% जास्तीने | |
| ३ | ऋषीकेश कन्सट्रक्शन | शे २% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय ०.१०% कमीने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व **सन्मा.सदस्यांच्या सहमतीने** कंत्राटदार श्री/मे.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.०.१०% कमी दराने आलेले

असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८४ धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत प्रभाग क्र.15 मध्ये वैभव नगर भागात राणा चक्की ते इलेक्ट्रिकल डी.पी. ते सैय्यद ते अभय पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉंक्रीटकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यात यावा.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत प्रभाग क्र. १५ मध्ये वैभव नगर भागात राणा चक्की ते इलेक्ट्रिकल डी.पी.ते सैय्यद ते अभय पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉंक्रीटकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५(क) दि. २८/०२/२०१९मा.जिल्हाधिकारी,धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३०,१९,६६९/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र.१०४ दि.२६/०७/२०१९ अन्वये रक्कम रु. ३०,१९,६६९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै.दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.के.सैफी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | गायत्री कन्सट्रक्शन | शे १% जास्तीने | |
| ३ | सुकन्या एस.चौधरी | शे २% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.श्री अे.के.सैफी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार मे. अे. के. सैफी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेलेअसल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८५ जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.8 ग.नं. 2 जे बी रोड स्वामी नारायण चाळ ते गोल बिल्डींग पर्यंत कॉक्रीट गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यात यावा.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

**म. सभापती** कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक १८/०९/२०१९**

जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.८ ग.नं. २ जे बी रोड स्वामी नारायण चाळ ते गोल बिल्डींग पर्यंत कॉक्रीट गटार करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. २५(क) दि. २८/०२/२०१९मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३५,२४,५९६/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. १६२ दि.१/८/२०१९ अन्वये रक्कम रु.३५,२४,५९६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे .

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | भूषण एल चौधरी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | गौरवसिंग आर कौर | शे.१.०० % जास्तीने | |
| ३ | वृषभ सतीष खिवसरा | शे.१.०० % जास्तीने | |
| ४ | हर्षल पी देवरे | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ भूषण एल चौधरी यांचे दर अंदाजपत्रकीयदराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री/मे.भूषण एल. चौधरी यांचीअंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८६ जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.14 मध्ये राजवाडे नगर येथे श्री.उद्धव कचवे यांच्या घरापासून ते जि.बी. माहेश्वरी यांच्या घरापर्यंत व श्री.चंद्रकांत मुलमुले यांच्या घरापासून ते श्री.तारगे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यात यावा.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक १८/०९/२०१९**

जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये राजवाडे नगर येथे श्री.उद्धव कचवे यांच्या घरापासून ते जि.बी. माहेश्वरी यांच्या घरापर्यंत व श्री.चंद्रकांत मुलमुले यांच्या घरापासून ते श्री.तारगे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५(क) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३४,८६,२३१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र.१८२ दि.३१/७/२०१९ अन्वये रक्कम रु.३४,८,२३१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे .

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | ए.के.सैफी | शे.१.०० % जास्तीने | |
| ३ | सुकन्या रमेश चौधरी | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीयदराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री /मे.गायत्री कन्सट्रक्शन यांचीअंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८७ जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.14 मध्ये वल्लभ नगर ओम शांती अपार्टमेंट ते पटानी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यात यावा.

म.सुनिल सोनार विषय मंजुर करण्यात यावा.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक १८/०९/२०१९**

जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये वल्लभ नगर ओम शांती अपार्टमेंट ते पटानी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी

समिती ठराव नं.२५(क) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी,धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२८,९९,०७१/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र.१७७ दि.३१/७/२०१९ अन्वये रक्कम रु.२८,९९,०७१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.-०.१०% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | ऋषीकेश व्ही पाटील | शे.२.३० % जास्तीने | |
| ३ | हिंद कन्सट्रक्शन | शे.३.५० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीयदराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री/मे.श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८८ — धुळे शहरात स्वच्छता देखरेख प्रणाली कार्यान्वीत करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमिन पटेल — सभापती महोदय, स्वच्छता सर्वेक्षण १,७२,८४,०४०/-मात्र ची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्तावात कोण-कोणत्या कामांचा समावेश आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

म. सहा. आयुक्त — धुळे महानगरपालिकेत ८९ घंटा गाड्या कार्यान्वीत आहेत. त्या घंटागाडयांवर कंट्रोल करणेसाठी GPS आपण कार्यान्वीत करित आहोत. ही यंत्रणा अशी आहे की, ज्या भागामध्ये घंटा गाडी जाणार नाही ते ॲन्डरॉईड फोन द्वारे कळणार आहे. यात जो कोड आहे तो स्क्रीप केला तर त्या गाडीविषयी माहिती आपल्या स्क्रीन बोर्ड वर तात्काळ समजणार आहे. दुसरे असे की याबतचा बरीचशी माहिती आपल्याला गोळा करावी लागते ते GPS प्रणाली कार्यान्वीत केल्या नंतर एकाच वेळेस आपल्याला संपुर्ण माहिती मिळणार आहे. या GPS प्रणाली प्रत्येक घराला एक चिप बसविण्यात येणार आहे. तिचा दर प्रति घर २१६ रु.असणार आहे. यामध्ये सदरच्या ठेकेदाराकडे २ वर्षांचे मेंन्टनंन्स असणार आहे. यात GPS प्रणालीत काही समस्या निर्माण झाली तर त्याचे निरसण संबंधीत ठेकेदार करणार आहे. तरी सदरचा विषय मे. स्थायी समितीकडे मंजुरी साठी सादर करणेत आला आहे.

म.सुनिल सोनार — विषय मंजुर करण्यात यावा

म. सभापती — कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक १८/०९/२०१९**

जा.क्र./धुमपा/आरोग्य/६३८ दि.२८/०२/२०१८अन्वये ई –निविदा सुचना क्र. ९७ धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात मिळकतीचे सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याने आरोग्य व स्वच्छता विभागाकडुन देण्यात येणाऱ्या विविध परिणामकारक पध्दतीने राबविण्यासाठी Radio frequency Identification Tag (RFIT) प्रत्येक गटाला पुरविणेसाठी ई-निविदा प्रसिध्द केली असता.सदर निविदेत ३ निविदा धारकांनी भाग घेतला होता.

उक्त प्राप्त ई-निविदाधारकांचे टेक्नीकल बीड (तांत्रीक लिफाफा) उघडण्यात आले असता त्याचे कागदपत्रे व स्कृटीनी फॉर्म तपासुन मा. प्र.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो., यांच्या मान्यतेने दि.३१/०७/२०१९ रोजी वित्तीय (फायनान्सीयल बीड) उघडण्यात आले असता. खालील प्रमाणे उक्त कामांचे दर प्राप्त झालेले आहे.

| अ.न | निविदाधारकाचे नाव | प्राप्त दर | बीड रँक |
|---|---|---|---|
| १ | समाधान टेक्नॉलॉजिस (OPC)प्रा.लि. | १,७२,८४,०४० | L१ |
| २ | आयडीया टेक्नॉलॉजिस प्रा.लि. | २,०१,६५,०४५ | L२ |
| ३ | टेक्टालोसॅमन इंजीनियरींग प्रा.लि. | २,११,२४,५५० | L३ |

सर्वात कमी दर L१ समाधान टेक्नॉलॉजिस (OPC)प्रा.लि.यांचे दर रुपये १,७२,८४,०४०/- यांचे प्राप्त झाले असुन उक्त यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी सदरचा खर्च दि. ११/०६/२०१९ च्या टिपणीत मा.प्र.आयुक्त तथा जिल्हाधिकारी सो.यांनी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतील ५०% घनकचरा निधी मधुन खर्च करुन दर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर कंपनीने प्रति मालमत्तेसाठी रु.२१६मात्र दर नमूद केलेला आहे. त्यानुसार शहरातील अंदाजे 80 हजार मालमत्ता गृहीत धरुन १,७२,८४,०४०/- मात्र अंदाजपत्रकीय खर्च नमूद केलेला आहे. तथापि प्रत्यक्षात झालेले काम व मालमत्तांची प्रत्यक्ष संख्या यानुसार खर्च कमी अधिक होऊ शकतो.त्यामुळे प्रति मालमत्ता दर रु.२१६ मात्र निर्णयार्थ मे. स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनाचा विचार करुन याकामी सर्वात कमी दर L१ समाधान टेक्नॉलॉजिस (OPC) प्रा.लि. यांचे आलेले दर प्रति मालमत्ता प्रति २१६/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मंजुरी देण्यांत येत असून सदर कामासाठी येणारा संभाव्य खर्च १४ व्या वित्त आयोगातुन खर्च करणेस मान्यता देण्यांत येत आहे.संबंधित संस्थेकडून मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने आवश्यक तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा. तसेच तसेच L२ व L ३ यांचे निविदा दर नामंजुर झाल्याने त्यांनी भरलेली अनामत रक्कम (EMD) प्रत्येकी रुपये १,५०,०००/- परत करण्यात यावे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८९ — प्रभाग क्रं. 6 मोराणे गावात विविध ठिकाणी पाईप लाईन व व्हॉल टाकणे कामी झालेला खर्च रु. 2,96,653/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.संतोष खताळ — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे शहरातील प्रभाग क्रं. ६ हद्दवाढ भागात मोराणे गावातील जलवाहिनी फुटल्यामुळे पाणीपुरवठा बंद झाला होता. सदर पाणीपुरवठा सुरु करणेसाठी नवीन 4 इंची भागातील पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने तेथे तांतडीने व त्वरीत काम झाले असून उक्म कामी ठेकेदार श्री. हेमंत निंबा बागुल यांच्याकडून काम करुन घेण्यांत आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सुचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.२,९६,६५३/-मात्र इतका खर्च करण्यांत आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबंधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

उक्त काम हे पाईप लाईन गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.हेमंत निंबा बागुल यांच्याकडून करुन घेण्यांत आलेले असल्याने कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाती कलम 5(2)(2)अन्वये विना निविदा करण्यांस व खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक १८ सप्टेंबर २०१९**
**वेळ:- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज बुधवार दिनांक १८/०९/२०१९ रोजी दुपारी ४-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजिज शेख | आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ७ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ८ | श्री. नामदेव भामर | मुख्य लेखाधिकारी |
| ९ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १४ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निधारण अधिकरी |
| १५ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. सी.एम. उगले | पा.पु. अभियंता |
| १७ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १८ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेख लिपीक |
| २० | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| २२ | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |
| २३ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. अभियंता |

विषय क्रमांक:- ९० अमृत अभियानाअंतर्गत अक्कलपाडा धरणातून धुळे शहर पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त निविदा दरांचा विचार करुन निर्णय घेणे.

म. संतोष खताळ सदरच्या अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनाचा सविस्तर खुलास करणेत यावा. यापुर्वीच्या १३६ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेबाबत असलेले ठेकेदार श्री. घुले यांच्या कामाबद्दल शहरातुन बऱ्याच तक्रारी आलेल्या होत्या. परंतु अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेच्या कामी ठेकेदार श्री. घुले यांचीच निविदा कमी दराने आलेली आहे. हा विषय मंजुर करुन याचा प्रस्ताव शासनाला सादर करणेतयावा. तसेच अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेचा काय फायदा आहे. ते नमुद करावे.

म. अभियंता सदरच्या योजनेमध्ये अॅप्रोज चॅनल ५५० मी. लांबी, व्टीन्स जॅकवेल, अॅप्रोज ब्रिज, रॉ वॉटर, रायझिंग १८६० मी., ट्रीटमेंन्ट प्लॅन्ट ७९ एम.एल.डी. , प्युवर वॉटर ग्रॅव्हेटी मेन डी. आय. के. सेवन ४४९८५ इत्यादी कामे यामध्ये समाविष्ट आहेत. सदर योजनेमुळे धुळे शहरात जास्तीचे पाणी मिळणार आहे. त्यामुळे आज मितीस सुरु असलेल्या पाणी पुरवठ्याच्या दिवसात कपात होणार आहे. तसेच तापी योजनेचा भार सुध्दा कमी होणार आहे. व विद्युत बिलातही फार मोठया प्रमाणावर बचत होवुन मनपाचा आर्थिक फायदा होणार आहे.

म. संतोष खताळ सदरची योजना कार्यान्वीत केल्या नंतर आमच्या भागाला ४ दिवसात पाणी मिळेल का?

म. अभियंता सदरची योजना संपुर्ण कार्यान्वीत झाले नंतर ४ दिवसापेक्षा ही कमी कालावधी पाणीपुरवठा होवु शकतो.

म. सुरेखा उगले अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेत या व्यतिरिक्त कोण – कोणती कामे समाविष्ट करण्यात आली आहेत?

म. अभियंता अक्कलपाडा योजनेत तापी योजनेचे सुकवद पंपींग स्टेशन येथील पंप बदलण्यात येणार आहेत. सुकवद पंप हाऊस ते एम.बी.आर जलकुभापावेतो आलेले पाईपलाईनला इपॉक्सी पेंट

मारण्यात येणार आहे. डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्र ते मालेगाव टाकी पावेतो नविन डी.आय पाईपलाईन टाकण्यात येणार आहे.

म. अमिन पटेल — सभापती महोदय, ठेकेदार श्री. घुले यांनी याआधी ही १३३ कोटी पाणीपुरवठा योजनेचे काम केले होते. परंतु त्या कामाबाबत शहरातील नागरिकांच्या याबाबत तक्रारी होत्या. त्यांनी काम केले परंतु केलेल्या कामावर कॉंक्रीटीकरण केले नाही. आताही अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेसंदर्भात ५.३७ सर्वात कमी दराने त्यांचीच निविदा सादर झाली आहे. सदरची योजना शहरासाठी महत्वाची असुन विषय मंजुर करणेस हरकत नाही. परंतु या योजनेच्या अटी शर्ती यांचे योग्य पालन करुन योजनेचा प्रस्ताव शासनाकडेस पाठविण्यात यावा. तसेच सदरच्या योजनेच्या कामाची कालावधी किती असणार आहे?

म. अभियंता — सदरचे काम पुर्ण होण्यास १८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग हे फक्त पी.एम.सी. म्हणुन काम करणार आहे. सदर योजनेचे पुर्णत: काम महानगरपालिके मार्फत करण्यात येणार आहे.

म. अमिन पटेल — पाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे यात निकृष्ट दर्जाचे काम व्हायला नको या कडेअधिकाऱ्यांनी लक्ष देवुन कामे करुन घ्यावेत. विषय मंजुर करणेत यावा.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, सदरचा विषय यापुर्वी पण आला होता. त्यावेळेस ठेकेदार श्री. घुले यांचे १२% जास्तीने दर आले होते म्हणजेच जवळपास २० कोटी जास्तीने होते. त्यावेळेस आपण मे. स्थायी समिती मध्ये विषय आला होता आणि आपण तो विषय शासनाकडे फेरविचारार्थ पाठविला होता. शासनाने यावर सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेर निविदा काढण्यात आलेले असुन त्यानुसार आज परत तो विषय आलेला आहे. मागच्यावेळेसही असे वादळ उठले होते की, ठेकेदार श्री. घुले यांना काम देण्यात आले. सदरच्या ठेकेदाराकडुन १३६ कोटींच्या योजनेचे बारा वाजले होते त्यामुळे धुळे शहराच्या जनतेच्या मनात संताप आहे. आणि संबंधीत ठेकेदाराला काम देवु नये अशी भावना जनतेच्या मनात आहे. मागच्या वेळेस श्री. घुले यांची योग्य ती चौकशी न झाल्यामुळे व त्यांना काळया यादीत समावेश न केल्यामुळे त्यांनी या निविदेत भाग घेतलेला आहे. आणि ही ओपन निविदा आहे भारतातुन कुणीही सहभाग घेवु शकतो म्हणुन त्यांनी परत निविदा भरली आहे. आणि परत त्यांचे दर कमीने आलेले आहेत. आज जरी ही निविदा आपण रद्द करावयाचे ठरवले तरी परत फेर निविदा होईल परत तोच ठेकेदार निविदा भरेल. जो पर्यंत त्यांचा समावेश काळया यादीत होत नाही तोपर्यंत तो निविदा भरेल. परंतु जर दर जास्तीने निविदा दर आले तर आज जो आपला ७ कोटींचा फायदा होणार आहे तो होणार नाही. कारण सदरचा ठेकेदार हा शासनाच्या अटी शर्ती पुर्ण करतो. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेचे काम देतांना ठेकेदार श्री. घुले यांना काही अटी शर्तीमध्ये बांधुन घेतले पाहिजे. म्हणजे मागच्या वेळेस त्यांनी ज्या चुका केल्या आहेत त्या आता होणार नाहीत. ठेकेदार श्री. घुले यांना दर महिन्याला मे. स्थायी समिती समोर बिल सादर करतांना त्यावेळेस अहवाल सादर करणे सक्तीचे असेल.तसेच दर तिमाही अहवाल महासभेपुढे सादर करणेची अट टाकणेत यावी. तसेच आपले अधिकारी तर जागेवर पाहणी करतीलच. परंतु सदरच्या ठेकेदाराने ई-निविदा भरत असतांना डी.डी. जमा केला आहे का? जर निविदा १०% कमीने असेल तर त्यांच्याकडुन सुरक्षा अनामत घेणे गरजेचे आहे.

म. सुभाष जगताप — यामध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% कमी पर्यंत अनामत किंवा शुल्क घेण्याची नियमाप्रमाणे गरज नसते. त्यावरील कमीने दर आल्यास अनामत घेण्यात येते.

म. नागसेन बोरसे — काम गुणवत्ता पुर्ण व्हावे यासाठी करारनाम्यात आवश्यक अटी शर्तीचा समावेश करावा व या संदर्भात आलेल्या दरांना मान्यता देवुन शासनाकडेस प्रस्ताव सादर करावा.

म.सभापती

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षात घेवून अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनाही धुळे शहरासाठी वरदायिनी ठरणारी महत्वाची योजना आहे. या योजनेचे काम चांगल्यप्रकारे व्हावे यासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व मनपा नगरसेवक आग्रही आहोत. याकामाच्या निविदा दरात सर्वात कमी दर श्री. आर..ए. घुले या कंपनीचे आलेले आहे.सदर निविदा दर हे ई निविदा प्रक्रियेतून आवश्यक त्या निकर्षांची पूर्तता करुन सादर झालेले आहेत. सदर ठेकेदाराबाबत यापूर्वी तक्रारी निर्माण झालेल्या होत्या.तथापि सदर आलेले निविदा दर रद्द तथा तहकूब केल्यास याबाबत न्यायालयीन प्रक्रिया निर्माण होऊन सदर योजना प्रलंबीत राहू शकते. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करता धुळे शहराच्या हिताच्या दृष्टीने याबाबत तांतडीने निर्णय होणे आवश्यक आहे. धुळे शहराचे हित लक्षांत घेवून सदरचे काम गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी करारनाम्यात योग्य त्या अटी शर्तीचा समावेश करुन कंत्राटदार **श्री/मे. आर.ए.घुले** यांची अंदाजपत्रकीय शे.५.३७% कमीने आलेले दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत शासनाकडेस आवश्यक तो प्रस्ताव तात्काळ सादर करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०४ दिनांक १८/०९/२०१९**

धुळे शहराच्या पाणीपुरवठा साठी केंद्र शासन पुरस्कृत शासन निर्णय क्र. बैठक- २०१९ / प्र.क्र. ६३/ नवि-३३ दि. १४/०२/२०१९ नुसार अमृत अभियाना अंतर्गत अक्कलपाडा धरण ते हनुमान टेकडी पावेतो पाईप लाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणे कामी सुधारित प्रशासकीय मान्यता खर्च रु.१३३.८७ कोटी मात्र खर्चास शासनाकडून मंजुरी प्राप्त नुसार **केंद्र शासन निधी ५०%,राज्य शासन निधी २५% व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा हिस्सा) २५%** असे सदरचे काम अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग (PMC) मार्फत तयार करणेत आलेले आहे.सदर कामाचा अंदाजपत्रकास म. मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग , नाशिक यांनी ता.मा.क्र. /६१ माहे जुलै २०१९ नुसार देण्यात आला आहे.त्यानुसार सदर कामाची ई- निविदा जा.क्र. २० दि.१६/०८/२०१९ नुसार दि. १७/०८/२०१९ रोजीचा दै. Hindustan Times दै.लोकमत व दै. दिव्य मराठी ( राज्यस्तरीय ) या अंकात प्रसिद्ध केली होती.

सदरच्या निविदेबाबत दि.१३/९/२०१९ रोजी technical bid उघडण्यात आले असून त्यात ४ निविदा धारकांनी भाग घेतलेला आहे. त्याबाबत तांत्रिक तपासणी करून मनपाकडून कनिष्ठ अभियंता, अभियंता , मुख्यलेखाधिकारी , उपायुक्त तसेच आपल्या विभागाकडील उपविभागीय अधिकारी धुळे, कार्यकारी अभियंता ,म.जि.प्रा. जळगाव यांनी तांत्रिक तपासणी करून ३ निविदा धारकांना पात्र केलेले होते. त्यानुसार ३ निविदाधारकांचे कागदपत्र तपासणी साठी म.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांना जा.क्र./ ७४४ दि.१६/०९/२०१९अन्वये तपासणी बाबत पाठविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.१७/०९/२०१९ रोजी ३ निविदा उघडणे बाबत सहमती दर्शवली. सदरच्या ३ निविदाचे commercial bid दि.१७/०९/२०१९ रोजी उघडण्यात आले.आलेले दर खालील प्रमाणे

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आर.ए. घुले – पालघर | **शे.५.३७% कमीने** | **सर्वात कमी** |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | तेजस कन्सट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे | शे.०.९९% कमीने | |
| ३. | पी.पी. गोगड, नाशिक | शे.१.९९ कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री/मे. आर.ए. घुले** यांचे दर अंदाजपत्रकीय शे.५.३७% कमीने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षात घेवून अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनाही धुळे शहरासाठी वरदायिनी ठरणारी महत्वाची योजना आहे. या योजनेचे काम चांगल्यप्रकारे व्हावे यासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व मनपा नगरसेवक आग्रही आहोत. याकामाच्या निविदा दरात सर्वात कमी दर श्री. आर..ए. घुले या कंपनीचे आलेले आहे.सदर निविदा दर हे ई निविदा प्रक्रियेतून आवश्यक त्या निकर्षाची पूर्तता करुन सादर झालेले आहेत. सदर ठेकेदाराबाबत यापूर्वी तक्रारी निर्माण झालेल्या होत्या. तथापि सदर आलेले निविदा दर रद्द तथा तहकूब केल्यास याबाबत न्यायालयीन प्रक्रिया निर्माण होऊन सदर योजना प्रलंबीत राहू शकते. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करता धुळे शहराच्या हिताच्या दृष्टीने याबाबत तांतडीने निर्णय होणे आवश्यक आहे. धुळे शहराचे हित लक्षांत घेवून सदरचे काम गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी करारनाम्यात योग्य त्या अटी शर्तीचा समावेश करुन कंत्राटदार **श्री /मे.आर.ए.घुले** यांची अंदाजपत्रकीय शे.५.३७% कमीने आलेले दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत शासनाकडेस आवश्यक तो प्रस्ताव तात्काळ सादर करण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर २०१९**
**वेळ:- सकाळी १०-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज शुक्रवार दिनांक २०/०९/२०१९ रोजी सकाळी १०-०० वाजता **मा. श्री. युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री.पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उप.मुख्यलेखापरीक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. मधूकर पवार | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| ११ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निधारण अधिकरी |
| १४ | श्री. जगदीश सोंजे | विद्युत विभाग |
| १५ | श्री. एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. भटू महानर | लिपीक भांडार विभाग |
| १७ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १८ | श्रीमती कल्पना जाधव | लिपीक अभिलेख विभाग |
| १९ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| २० | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**विषय क्रमांक:- ९१** — **जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्र.क्र.२ मधील यशोदा हॉस्पीटल आग्रारोड पासून ते मरिमाता मंदिर ते निलेश चक्कीपर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्यात निगोसिएशन अंती आलेल्या दरास मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार — विकासाचे काम असल्याने विषय मंजुर करण्यात यावा.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यात यावा.

म. सभापती — **कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०५ दिनांक २०/०९/२०१९**

जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्र.क्र.२ मधील यशोदा हॉस्पिटल आग्रारोड पासुन ते मरिमाता मंदिर ते निलेश चक्की पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. २५(क) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२८,९८,८७७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त बाबत शहर अभियंता,मनपा धुळेयांचे पत्र क्र.१७७ दि.३१/७/२०१९ अन्वये रक्कम रु.२८,९८,८७७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर | वाटाघाटी नुसार आलेले दर |
|---|---|---|---|
| १ | श्री.प्रकाश पांडव | शे.२.२५ % जास्तीने | |
| २ | श्री.स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | शे.३.४७% जास्तीने | |
| ३ | **क्रिष्णा** कन्स्ट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **०.५० % कमीने** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्रअसून **मे.क्रिष्णा** कन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी नुसार आलेले **०.५०%कमीने** दरआहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार **मे.क्रिष्णा** कन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी नुसार आलेले **०.५०% कमीने** निगोसिएशन अंती आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक :- ९२** धुळे मनपा हद्दीत महाराणा प्रताप चौक येथे उद्यान विकसित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल सोनार — विकासाचे काम असल्याने विषय मंजुर करण्यात यावा.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यात यावा.

म. सभापती — कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक २०/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत महाराणा प्रताप चौक येथे उद्यान विकसित करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५(क) दि.२८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि. ०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.७०,००,१२४/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. १९५ दि. ०३/०८/२०१९ अन्वये रक्कम रु.७०,००,१२४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१७/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. स्वामी समर्थ **कन्स्ट्रक्शन** | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | ऋषिकेश व्ही. पाटील | शे ४% जास्तीने | |
| ३ | हिंद कन्सट्रक्शन | शे ३% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे. श्री. स्वामी समर्थ **कन्स्ट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री/ मे. श्री.स्वामी समर्थ **कन्स्ट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.तसेच उ.मु.ले.प. यांच्या अभिप्रायानुसार आवश्यक ती पुर्तता करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९३ धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत देवपूर भागात सर्वे नं. ५२ अ येथे हॉकर्स झोन विकसित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

| | |
|---|---|
| म.सुनिल सोनार | विकासाचे काम असल्याने विषय मंजुर करण्यात यावा. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्वात यावा. |
| म. सुभाष जगताप | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक २०/०९/२०१९**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत देवपूर भागात सर्वे नं. ५२ अ येथे हॉकर्स झोन विकसित करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. २५(क) दि. २८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.८०,००,३०१/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र. २०९ दि.०५/०८/२०१९अन्वये रक्कम रु.८०,००,३०१/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.०३/०९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजीचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१७/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ब | श्री. स्वामी समर्थ **कन्स्ट्रक्शन** | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | हिंद **कन्स्ट्रक्शन** | शे ३% जास्तीने | |
| ३ | ऋषिकेश व्हीं. पाटील | शे ४% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री मे. श्री. स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री/मे.श्री. स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ९४ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत विठ्ठलनगर चाळीसगांव रोड सर्व्हे नं.४७२/३ बी व ३ सी येथे उद्यान विकसीत करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सुनिल सोनार | विकासाचे काम असल्याने विषय मंजुर करण्यात यावा. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यात यावा. |
| म. सभापती | कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर कामी सर्वात कमी आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०८ दिनांक २०/०९/२०१९**

जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत विठ्ठल नगर चाळीसगाव रोड सर्व्हे नं.४७२/३ बी व ३ सी येथे उद्यान विकसित करणे या कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.२५ (क) दि. २८/०२/२०१९ मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०३/०९/२०१९अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२६,९५,००३ मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र.२१० दि.५/८/२०१९ अन्वये रक्कम रु. २६,९५,००३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१२/२०१९ दि.३/९/२०१९ अन्वये दि.०४/०९/२०१९ रोजींचे दै. दिव्य मराठी/ आपला नवराज्य या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.११/०९/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | गायत्री **कन्स्ट्रशन** | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | ए.के.सैफी | शे.१.०० % जास्तीने | |
| ३ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.गायत्री **कन्स्ट्रशन** यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कंत्राटदार श्री/ मे.गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने त्यांच्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २१ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ७ नोव्हेंबर २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०७/११/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १५ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री.शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. विजय रघुनाथ सनेर | प्र.सहा.आयुक्त तथा समाज विकास अधिकारी |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | डॉ. श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| १० | श्री. रजमान अन्सारी | व.स.आस्थापना |
| ११ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १२ | श्री. बी. एस. रनाळकर | सहा.कर. निर्धारण अधिकारी |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.एम. उगले | पा.पु.अभियंता |
| १५ | श्री. एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. भटू महानर | लिपीक भांडारपाल |
| १७ | कु. कल्पना जाधव | लिपीक अभिलेख विभाग |
| १८ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १९ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग लिपीक |
| २० | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

सभेच्या सुरुवातीस धुळे महानगरपालिकेत नव्याने रुजू झालेले श्री.विजय रघुनाथ सनेर,प्र.सहा.आयुक्त तथा समाज विकास अधिकारी यांचे सभागृहातर्फे पुष्पगुच्छ देऊन मा. सभापती यांनी सभागृहाच्या वतीने स्वागत व अभिनंदन केले.

म.नगरसचिव — स्वच्छ सर्वेक्षण २०१९ बाबत मा. सहा.आयुक्त यांनी स्वच्छ सर्वेक्षण ॲप संदर्भात सभागृहाला माहिती द्यावी.

म. सहा. आयुक्त — मा.नगरसचिव यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी सन्मा. स्थायी समिती सभागृहाला माहिती अवगत करु इच्छितो मा. सभापती महोदयांना विंनती करतो की मला ५ मिनीट बोलण्याची संधी दिली तर स्वच्छ सर्वेक्षणाबाबत सभागृहाला सविस्तर माहिती देता येईल. आपल्याला माहित आहे की केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी उपक्रम सुरु झाला आहे आणि या. या स्वच्छ सर्वेक्षणाचे जवळपास हे ४ वर्षे आहे.आपले पहिल्या वर्षी १३८ वी रँक आली होती संपुर्ण देशामध्ये नंतर ७८ झाले नंतर परत १०० झाले. आता त्या रँक मध्ये खुप काही काम करण्याची संधी आहे. तसेच आमचे सहकारी श्री. विजय सनेर साहेब मनपा मध्ये हजर झालेले आहेत यांना संपुर्ण राज्याचा अनुभव आहे परंतु मला खात्री आहे की आपल्या सर्वांच्या मदतीशीवाय हे अभियान पुर्ण होवु शकत नाही. गेल्या मागच्या २-३ वर्षात २-३ महीन्यांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत खुप नाराजी आपण आमच्या विभागामर्फत व्यक्त केली आणि ती रास्त आहे. परंतु आपली नाराजी दुर करण्यासाठी आमची संपुर्ण यंत्रणा जोमात कामाला लागली आहे. मध्यंतरी ठेकेदारांच्या काही अडचणी होत्या मा. आयुक्त साहेबांना विनंती करुन मा. महापौर साहेबांना मा. सभापतीसाहेबांना विनंती करुन आपण मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. मी म्हणत नाही आम्ही १०० टक्के समाधानी आहेत या कामामध्ये पण ६० ते ६५ टक्के ब-यापैकी गाडी रुळावर आलेली आहे. आणि जी ४० टक्के जी गाडी आहे ती आपल्या सहकार्यांने रुळावर येणार आहे. महत्वाचे असे आहे की आपल्या पालिकेत काम खुप होत पण त्या कामावर मॉनेटरींग करण खुप गरजेच असत. आणि मॉनेटरींग करण्यासाठी आपल्याकडे जे आज ज्या टेक्नोलॉजी आहेत त्या वापरणे गरजेच असत. आता समजा आपण सध्या ॲन्ड्रॉईड फोन

वापरतो आपल्याल माहिती आहे. मागच्या १० वर्षात आपल्याकडे अॅन्ड्रॉईड फोन नव्हता. पण ज्यावेळेस आपल्याकडे व्हाटसप लोकेशन, मॅसेज पाठविणे हे कठीण होते परंतु आता ते क्षणात होतात. त्यासाठीच आम्ही आता काय केले आहे आपल्या प्रभागात ज्या घंटा गाडया फिरतात त्या घंटा गाडीचे नेमके लोकेशन कुठे आहे आज आली का नाही ? आली असेल तर ती कोणत्या ट्रॅक मध्ये आहे या सगळया गोष्टी किंवा ती बंद पडली असेल तर ती कुठे आहे या सगळया गोष्टी आपल्याला मोबाईल जीपीएस प्रणाली सिस्टीम मध्ये आपल्याला मिळणार आहेत. आमचे सहकारी वाघ जे कम्प्युटर इंजीनीयर आहेत तुमच्या प्रभागामधील ज्या काही घंटा गाडया आहेत चालु आहेत त्यांचे ट्रॅकींग करण्यासाठी मोबाईल माध्यमातुन ते अॅप डाऊनलोड करणार आहेत. माझ्या मते त्यासाठी एसआय यांचे लॉगींन लागणार आहे. आपण ते अॅप डाऊनलोड करा. आणि आपणच न करता ते अॅप काही कार्यशिल कार्यकर्ते असतात त्यांनाही ते डाऊनलोड करायला सांगा जेणेकरुन लोकांना माहित झाले पाहीजे. आणि जो पर्यंत आपला दबाव या कामाबद्दल वाढत नाही तो पर्यंत यशाची जी परिसिमा आहे ती आपल्याला गाठता येणार नाही. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० चे जे काम करावयाचे आहे. त्या बोटावर मोजण्यासारख्या कामांसाठी आम्हांला आपले खुप सहकार्य लागणार आहे. पहिली गोष्ट अशी आहे की, ओला व सुका कचरा म्हणजे कार्य याबाबत जागेवर जाऊन त्याबाबत नागरिकांना प्रात्यक्षिक करुन दाखवायचे आहे.ते काही मोठे काम नाही किंवा मोठी कॉम्पेटेटीव्ह टेक्नोलॉजी नाहीय. याचा फायदा काय होतो आपल्याला ओला कचरा ज्यापासुन कंपोस्ट आणि सुक्या कचरा पासुन आपले जे काही कचरा वेचक  आहेत ते घेवुन जातात आणि उरलेला कचरा बाजुला होतो. जेणेकरुन आपली कचऱ्यामुळे कच-यांचे ढीग वाढत आहेत. त्यासाठी मदत होईल आणि शासनाला देखील हेच अपेक्षित आहे. यापुढे शासनाच्या येणाऱ्या ज्या काही वेगवेगळया निधी आहेत त्या सगळया ह्या गोष्टी आपण करतो की नाही यावर अवलंबुन आहेत. दुसरी गोष्ट अशी की होम कंपोस्टींग म्हणजे काय ? आपल्या घरी आपण रहायचो तर शेतात उखीरडा असायचा तेथे आपण जो घरातील किंवा शेतातील जो कचरा असायचा तो उखीरड्यावर टाकायचो ते कुजायचे आणि ते शेतात जायचे आणि शेतात पसरविले जायचे. हे शहर आहे याला मर्यादा आहेत कचऱ्याची विल्हेवाट लावणे. आम्ही जवळपास १३०० लोक आयडेन्टींफाय केलेले आहेत की त्या लोकांना त्यांच्या घरातुन जो काही ओला कचरा निघतो त्याची त्याच ठिकाणी कशी विल्हेवाट लावता येईल यासाठी आपली जनता आता क्रियाशील झाली आहे. आपल्याला विनंती करतो की, आपणही जर धुळेकर जनतेला प्रोत्साहीत केले सांगितले तर निश्चित ते आपल्या शब्दाचा सन्मान करतील. आणि आम्हांला ते काम करायला सोपे होईल. याच बरोबर आपले जे स्वच्छता अॅप आहे ते कशा प्रकारे आपल्याला अॅक्टीवेट करता येईल यासाठी आम्हांला खुप मदत लागणार आहे. आपले जे काही टॉयलेट आहेत त्या टॉयलेट आता आम्ही प्रत्येकाला टार्गेट केलेले आहे. एजन्सी काम करीत आहे तरी पण आम्ही समाधानी नाही जोपर्यंत आपण त्यांना ईसीस करीत नाही तो पर्यंत त्यांना तो प्रेशर येणार नाही. आम्ही आमच्या पध्दतीने खुप प्रयत्न करतो. अश्या बऱ्याच बाबी आहेत याबाबतचे बुकलेट इंग्रजी भाषेत आहेत पण मी ते मराठीत रुपांतर करुन सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांना देणार आहे. माझी विनंती असेल की आपला कालावधी फक्त दोन महिन्यांचा राहीलेला आहे. त्यामुळे हे काम आपल्याला जोमाने करावयाचे आहे. पुनश्च विनंती करतो की स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची जी काही तयारी आहे त्यासाठी आपण आम्हांसर्वांना मनापासुन शुभेच्छा दया, आशिर्वाद द्या आणि काम करण्याची आमची जी उमेद, इच्छा ही कशी बळकट होईल यासाठी

सर्वांनी आम्हांला सहकार्य करावे असे आवाहन व विनंती सहा.आयुक्त श्री. शांताराम गोसावी यांनी सभागृहात केली.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्या श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद यांची आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ दिनांक ०७/११/२०१९**

सन्मा.सदस्या श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद यांची आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९५ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(५/९/२०१९,१२/९/२०१९, १८/९/२०१९च्या दोन सभा, २०/९/२०१९)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सुभाष जगताप विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११० दिनांक ०७/११/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ५/९/२०१९ चे ठराव नंबर ७९ ते ८५ क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच समिती सभा दिनांक १२/९/२०१९ चे ठराव नंबर ८६ ते ९१ तसेच सन्मा. सदस्यांची उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच समिती सभा दिनांक १८/९/२०१९ च्या दोन सभेचे ठराव नंबर ९२ ते १०४ तसेच सन्मा.सदस्यांची उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक २०/९/२०१९ चे ठराव नंबर १०५ ते १०८ अखेर क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९६ सन २०१९-२० या वर्षात आरोग्य दवाखाना विभागाकडील दि.१/४/२०१९पासून आजपर्यंतचे रु.२५ लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो.यांचे मंजुरीचे विषय मे.स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुभाष जगताप विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती प्रशासनामार्फत सादर केलेल्या माहितीचे अवलोकन करण्यांत आले आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १११ दिनांक ०७/११/२०१९**

आरोग्य दवाखाना विभागाकडील सन २०१९-२० या वर्षात दि.१/४/२०१९ पासून आजपर्यंतचे रु.२५ लाखपर्यंतचे मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीचे खालील प्रमाणे विषय संबंधीतास कार्यादेश देण्यांत आले आहे.

१)सन २०१९-२० या वर्षासाठी नागरी हिवताप विभाग धुळे मनपा साठी लाणारे लार्व्हिसाईड ( आळीनाशके) खरेदी.

| अ.कं. | कार्यादेश क्रं. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | रक्कम | एकुणमंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १ | धुमपा/औ.भांडार/७६/ दि.२३/१०/१९ | मे.डॉल्फीनसेल्स कार्पोरेशन कल्याण | ३०७०००/- | रु.६०७२७०/- |
| २ | धुमपा/औ.भांडार/७७/ दि.२३/१०/१९ | मे.सुदर्शन फार्मा. इंडस्ट्रीज लि. मुंबई ४०००९२ | ११६०७०/- | |

सदर माहिती मे. स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-९७ तापी पाणी पुरवठा मुख्य पाईपलाईन वरील नरडाणा गावाजवळील (प्रिंपाड) लिकेजची दुरूस्ती तसेच दि.७/९/२०१९ रोजी नगाव,सोनगीर, दभाशी सुखवद येथील दुरूस्ती कामा करीता खर्च रु.५४,०१२/-व रु.३६,८४८/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुभाष जगताप विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११२ दिनांक ०७/११/२०१९**

दि.२१/८/२०१९ रोजी नरडाणा गावाच्या पुढे प्रिंपाड शिवार येथे raw water पाईपला तळाशी क्रॅक गेल्याने मोठया प्रमाणात लिकेज झाले होते याबाबत म.उपायुक्त सो.यांना माहिती देण्यात आली व आदेशान्वये दि.२१/८/०१९ रोजी रात्री सदर दुरूस्तीचे काम सुरु करण्यात आले.पाईप लाईनचा सुमारे २.५ ते ३ फुटाचा PORTION ला मोठा तडा असल्याने पॅचवर्क करणे आवश्यक असल्याने पाईपला cat घेउन ३ X २ Lear चे पॅचवर्क चे काम करणेत आले.सदर कामावर म.उपायुक्त सो.व अभियंता यांनी दि.२१/८/०१९ रोजी रात्री ११:३० ला समक्ष भेट देवून कामाची पाहाणी केली सदरचे काम दि.२१/८/०१९ व २२/८/०१९ संध्या.५:००

वाजेपर्यंत पुर्ण झाले.सदर कामाचे स्थळ फोटो सोबत जोडले आहेत. सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्याने म.उपायुक्त सो. यांचे सूचनेप्रमाणे आकाश एंटरप्रायजेस यांचेकडून करुन घेण्यात आले. सदर कामाचा खर्च रू.५४०१२/-मात्र असून सदरचे खर्च मागणी वाजवी असून कार्य योग्य प्रकारे पुर्ण करणेत आले आहे.

तसेच दि.७/९/०१९ रोजी बांभळेफाटा येथील तापी पाईप लाईनचा cross connection वरील ४.M M चा पाईप बदलचे काम तातडीने घेण्यात आले.या दिवशी २४ तासाचे shut down (पा.पु.बंद) ठेवणेत आल्याने या कामासोबत अन्य किरकोळ दुरुस्तीचे काम आकाश एंटरप्रायजेस यांचे कडून करुन घेण्यात आली आहेत.या मध्ये नगाव फटाका फॅक्टरी जवळील टेल पिस वरील लिकेज, सोनगीर गावाजवळील व्हॉल्व बदलणे गिरनार हॉटेल समोर, सोनगीर येथील लिकेज दुरुस्ती करणे व सुखवद पंप हाउस main hold पाईप वरील लिकेज दुरुस्ती करणेचे कामे करणेत आली आहेत.सदर कामा बाबत म.सभापती सो. स्थायी समिती, मनपा यांना माहितीस्तव सादर करणेत आली व कामे करणेसाठी पुर्व मान्यतेसाठी विनंती करणेत आली सदरची कामे तातडीची होती व वारंवार पा.पु.बंद न ठेवता उपलब्ध वेळेत करुन घेण्यात आली. सदर कामांसाठी एकत्रीत खर्च रु.३६८४८/- मात्र असून खर्च वाजवी व कामे योग्य रितीने मक्तेदाराने पुर्ण केली आहेत.

तरी वरील प्रमाणे दि.२१/८/०१९ व ७/९/०१९ रोजी तातडीने कामे पुर्ण आकाश एंटरप्राईजेस यांचेकडून करून घेण्यात आली आहेत. सदर कामी झालेल्या खर्च रु.५४०१२/- व रु.३६८४८/- मात्र कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२)नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-९८ — १४ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत धुळे मनपाच्या नव्याने समाविष्ठ झालेल्या १० गावांमध्ये (वलवाडी, भोकर ,अवधान, बाळापुर, पिंप्री , मोराणे, महिंदळे ,वरखेडी, नकाणे, चितोड) येथे १६ सिट चे १५ युनिट व १० सिट चे ८ युनिट सार्वजनिक शौचालय बांधणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्यात निगोसिएशन अंती आलेल्या दरास मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, सदरच्या विषयामध्ये माझ्या माहिती प्रमाणे १८ युनीटचे काम आहे. तर याची किंमत ३.५ कोटींच्या जवळपास आहे. याच्यामध्ये शौचालयाचे जे नॉम्स आहेत त्यात काही तरी कमी केलेले आहे इस्टीमेट मध्ये त्यामुळे स्टार रॅकींग मध्ये हे शौचालय बसत नाही. मागच्या वेळेस सन्मा. सदस्य जेवढे आपले नगरसेवक आहेत त्यांचे स्वच्छता अभियान मध्ये सद्या घेतल्या गेल्या होत्या एक फॉर्म भरला गेला होता. त्या फॉर्म मध्ये काही नॉम्स होत्या की संबंधित शौचालयामध्ये स्वच्छ सर्वेक्षणच्या निकषानुसार सुविधा व व्यवस्था करणे आवश्यक आहे. यात रोलींग शटर, वॉश बेसीन, युरोपीयन पॅन,पी.सी.सी. रॅम्प,फेब्रीकेशन, एक्सांट फॅन, सीएफएल, युनीयल फॉट, टाईल सेरेफिक,फ्लोवर बेड, एम.एस.इ.बी मीटर कनेक्हल इ सगळ्या गोष्टी असणे आवश्यक आहे. या सर्व बाबीसाठी इस्टीमेट कमीत कमी २७ लाखापर्यंत जाते. आणि १० सीट च मला वाटते २० ते २२ लाखाच्या जवळपास जाईल. तर इथे

ते १५ लाखांचे इस्टीमेट तयार होत आहे मग त्या सर्व सुविधा येथे पुरविल्या जातील का? ग्रामपंचायतींचे जे शौचालय होते त्यांच्यासारखे होईल का? आता स्टार रँकींग च्या हिशोबाने जे इस्टीमेट वाढत असेल ते का वाढविण्यात येवु नये. याबाबत माहिती द्यावी.

म. नगरसचिव — या इस्टीमेट मध्ये काय-काय अंतर्भुत आहे याची पहिले माहिती बांधकाम विभागाकडुन घेवु या त्यात काय आवश्यक आहे याबाबत बांधकाम विभागाने माहिती द्यावी.

म. अभियंता — १४ व्या वित्त आयोगातंर्गत जे १० गावे आहेत तेथे १६ सिटचे १५ व १० सिटचे ८ युनीट असे एकुण २३ युनीट घेतले आहेत आपण यामध्ये आपण बांधकाम घेतले आहे आणि हे जे इस्टीमेट केले आहे ते लोकॉस चे केलेले आहे लोकॉस चे यापध्दतीने की ग्रामीण भागाचे १० गावांचा जो निधी जमा झाला त्यात आपल्याल बसवायचे होते. आपल्याला ३ स्टार रँलीग मध्ये भाग घेतला असल्याने सदर अंदाजपत्रकात समावेश नसलेल्या रोलींग शटर, वॉश बेसीन, युरोपीयन पॅन,पी.सी.सी. रॅम्प,फेब्रीकेशन, एक्सांट फॅन, सीएफएल, युनीयल फॉट, टाईल सेरेफिक,फ्लोवर बेड, एम.एस.इ.बी मीटर कनेक्व्हल इ. बाबींची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रत्येक सीटसाठी रु २००००/- ते ३००००/- मात्रचा खर्च म्हणजेच रु ६० ते ७० लक्ष रु अंदाजपत्रकात वाढ होणार आहे.सदरची रक्कम १४व्या वित्त आयोगातंर्गत करता येऊ शकतो.

म. नागसेन बोरसे — किती रक्कम वाढेल?

म. अभियंता — ५५ ते ६० लाख रुपये यात वाढणार आहेत.

म. नागसेन बोरसे — हे ५५ ते ६० लाख रुपये आपण जर पालिकेच्या फंडातुन टाकले तर काय हरकत आहे. ग्रामीण चे कामे नाही करायचे का मागच्यावेळेस सारखेच हे पण शौचालय ठेवायचे का? स्वच्छ शौचालय राहतील तर लोक पण स्वच्छ ठेवतील नाहीतर ते पण खराबच करतील. ३ स्टार रॅकींग मध्ये जे नॉम्स बसत असेल जो काही खर्च असेल तो याच्यात टाकावा. जेणे करुन चांगले शौचालय ग्रामीण ला द्या. नाहीतर परत ग्रामीण वाले आम्हांला सांगतात ग्रामीण कामे होत नाही. त्यामुळे ५०-६० लाखरुपये जे काही वाढत असतील आणि ३ स्टार रँकींगचेच शौचालय झाले पाहिजेत.आणि नॉम्स मध्ये बसवुन सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. सुभाष जगताप — सभापती महोदय, सदरचा विषय त्यात काही अटी नसतील तर समजा आपल्याला ग्रील बसवायची असेल आणि अंदाजपत्रकात ती बाब नसेल तर आपल्याला ह्या अधिकच्या बाबींचे वेगळे टेंडर काढुन हे काम आपल्याला द्यावे लागेल.आता तर प्रशासकिय आणि तांत्रीक मंजुरी ही मिळाली आहे.

म. उपायुक्त — आहे त्या पोजीशन मध्ये काम करावयाचे आहे वाढ झाल्यावरही मला वाटते ते काम ५० लाखात येणार नाही. यापेक्षा कमी खर्चात काम होऊ शकेल. त्यामुळे ते काम प्रत्येक सीट ला नाही प्रत्येक युनीटला कमीत कमी खर्च येईल असे २३ युनीट आहेत तर ते १० लाखांच्याआसपास खर्च होईल असा अंदाज आहे. आपण त्याप्रमाणे कमीत कमी खर्चात आवश्यक त्या निकषाप्रमाणे काम करु. व यासाठी संभाव्य वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

म.नागसेन बोरसे — ३ स्टार रॅकीकसाठी जे वाढीव निकष आहेत त्यांनाही मान्यता देवुन विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षणाच्या निकषानुसार सदर ठिकाणी आवश्यक ती सुविधा करण्यासाठी येणा-या संभाव्य खर्चास व कामास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११३ दिनांक ०७/११/२०१९**

१४ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत धुळे मनपाच्या नव्याने समाविष्ठ झालेल्या १० गावांमध्ये (वलवाडी ,भोकर, अवधान, बाळापुर, पिंप्री, मोराणे, महिंदळे , वरखेडी, नकाणे ,

चितोड)येथे १६ सिट चे १५ युनिट व १० सिट चे ८ युनिट सार्वजनिक शौचालय बांधणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. २९/१०/२०१८अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३,४९,४५,३०३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२३/२०१८-१९ दिनांक १४/०१/२०१९अन्वये रक्कम रु.३,४९,४५,३०३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि/१८२ / २०१९-२० दि.०४/०६/२०१९अन्वये दि.०५/०६/२०१९ रोजी दैनिक पुण्य नगरी/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२६/०६/२०१९ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | निर्मल भरत फाउंडेशन | शे.७.२०% जास्तीने | |
| २ | जलकल्याण फाउंडेशन | शे.६.५०% जास्तीने | |
| ३ | सेवा फाउंडेशन | **शे.५% जास्तीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्रअसून **श्री/ मे.सेवा फाउंडेशन** यांचे दर अंदाजपत्रकीय **शे.५% जास्तीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार**श्री/ मे.सेवा फाउंडेशन** यांची अंदाजपत्रकीय **शे.५% जास्तीने** आलेले निविदा दर हे जास्तीचे असल्याने वाटाघाटीस बोलविणे योग्य राहील असे मत आहे. त्यानुसार सेवा फाउंडेशन यांना वाटाघाटीस बोलविण्यात आले त्यानुसार ठेकेदार यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २%जास्तीने काम करण्यास तयार असल्याबाबत कळविले.सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०१८-१९ या दरसूची नुसार करण्यात आलेले होते.

सन २०१९-२० हे अंदाजपत्रकीय दरानुसार सदरचे काम हे ८% ते ९% सन २०१८-१९ च्या दरापेक्षा जास्तीने आहे.

कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सेवा फाउंडेशन यांनी वाटाघाटी मध्ये २% जास्तीने दिलेल्या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच स्वच्छ सर्वेक्षणाच्या निकषानुसार सदर ठिकाणी आवश्यक ती सुविधा करण्यासाठी येणा-या संभाव्य खर्चास व कामास मान्यता देण्यांत येत आहे.**

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २२ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक १४/११/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती,स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ९ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १० | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ११ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १२ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १३ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १४ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| २ | श्री. विजय रघुनाथ सनेर | प्र.सहा.आयुक्त तथा समाज विकास अधिकारी |
| ३ | श्री.दिपकांत वाघ | उप मुख्य लेखापरीक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. नामदव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | डॉ. श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. भटू महानर | लिपीक भांडारपाल |
| १५ | श्री. रविकिरण पाटकरी | प्र. अभिलेखापाल |
| १६ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १७ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग लिपीक |
| १८ | श्री. राजेश वसावे | मलेरिया विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.सहा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज –**

सन्मा. सदस्या श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत, देवरे सुरेखा भागवत यांची आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ दिनांक १४/११/२०१९**

सन्मा. सदस्या श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत, देवरे सुरेखा भागवत यांची आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९९ — धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दि. ०१/०९/२०१९ ते ३१/१०/२०१९ अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी सोबत जोडली आहे. कृपया उक्त यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — बांधकाम विभागाकडील दि.१/९/२०१९ ते३१/१०/२०१९अखेर कार्यादेशाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११५ दिनांक १४/११/२०१९**

धुळे महानगरपालिका धुळे (बांधकाम विभाग)

दिनांक :-०१/०९/२०१९ ते ३१/१०/२०१९ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अनु. क्र. | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 49 | 06/09/2019 | प्र.क्र.4 डॉ पंकज देवरे ते श्री मिलिंद चौधरी ते श्री सुर्यकांत अजमेरा यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 9,92,960/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 2 | 50 | 06/09/2019 | प्रभाग क्र.20 मनोहर टॉकीज श्री सपकाळे यांच्या घरापासून ते सी करडक यांच्या घरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 23,45,704/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 3 | 52 | 11/09/2019 | प्र.क्र. 32 चितोड रोड उत्तरेकडील भागात वैजयंता सरदार ते सुरेश सोनावणे व कृष्णा दिनकर वाघ ते दिलीप झाल्टे पावेतो रस्ता कॉक्रीट करणे | 22,93,539/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 4 | 59 | 18/09/2019 | प्र.क्र.32 चितोड रोड भागातील उत्तरेकडील वैजयंता सरदार ते सुरेश सोनवणे ते कृष्ण दिनकर ते दिलीप झाल्टे यांच्या घरापर्यंत गटार करणे | 9,68,234 | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 5 | 60 | 18/09/2019 | प्र.क्र.16 मगर यांचे घर ते कैलास नगर बोर्ड पावेतो रस्ता कॉक्रीट करणे | 13,58,663/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 6 | 61 | 18/09/2019 | स.नं.536 /1 व तुळसाबाईचा माळा येथील श्री जैन ते रासकर नगर ते विनोद जगताप यांच्या घरापावेतो रस्ता डाबरीकारण करणे | 14,91,999/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 7 | 62 | 18/09/2019 | प्र.क्र.17 शांती नगर कॉर्नर ते भोईटे समता हायस्कूल पावेतो रस्ता डाबरीकारण करणे | 14,90,091/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 8 | 63 | 18/09/2019 | प्र.क्र.16 सूपनर यांचे घर ते खोडेकर यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीटकारण करणे | 7,66,738/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 9 | 64 | 19/09/2019 | 40 गाव रोड मोमीन कब्रस्थानला सरंक्षण भिंत बांधणे | 9,98,748/- | आमदार निधी अंतर्गत |
| 10 | 66 | 20/09/2019 | प्र.क्र.6 प्रमोद नगर भागात रस्ते खडीकरण व डाबरीकरण करणे | 9,96,095/- | खासदार निधी |
| 11 | 68 | 20/09/2019 | साक्री रोड महावीर नगर हो.सी.सो.येथील मोकळ्या जागेवर सरंक्षण भित बांधणे | 19,65,736/- | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण यो. |
| 12 | 69 | 20/09/2019 | प्र.क्र.4 महिंदळे येथे बुद्ध भूषण सोसा.येथे सी देवरे यांचे घर ते श्री कैलास दामोदर यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे | 9,55,532/- | खासदार निधी |
| 13 | 70 | 20/09/2019 | प्र.क्र.15 लक्ष्मिनगर श्री जगदीश गायकवाड यांच्या घरापासून ते श्री महादू गवळी यांच्या घरापर्यंत कॉक्रीट गटार व रस्ते करणे | 17,79,566/- | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना |
| 14 | 71 | 20/09/2019 | प्र.क्र.1 स.नं.23/1 (ओपन स्पेस )मधील मोकळ्या जागेत वाल कंपाउंड बांधणे | 15,00,081/- | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण यो. |
| 15 | 72 | 20/09/2019 | प्र.क्र.15 मोचीवाडा श्री बोरसे वकील यांच्या घरापासून श्री कमल भैया पिलीवा फायनेस्ट यांच्या घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे | 6,38,436/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 16 | 73 | 20/09/2019 | प्र.क्र. 17 साने गुरुजी सो. श्री देवकर ते डॉ ज्वाला राजपूत ते सतीश माळी ते भगवान पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डाबरीकरण करणे | 16,74,632/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 17 | 76 | 20/09/2019 | शनी मंदिराजवळील खुल्या जागेत उद्यान विकसित करणे | 9,80,788/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 18 | 77 | 20/09/2019 | प्र.क्र.8 सावित्रीबाई फुले पुतळा परिसरातील रवी बेलपाठक ऑफिस ते विजय फर्निचर व पंचवटी टॉवरते दीपक शिंदे यांचे घरापर्यंत रस्ते कॉक्रीट करणे | 24,44,224/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 19 | 78 | 20/09/2019 | विवेकानंद भागातील वलवाडी स.नं.27 मधील खुल्या जागेत सरंक्षण भित बांधणे पेव्हर ब्लॉक बसविणे ओपन जिम करणे | 14,23,000/- | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना |
| 20 | 79 | 20/09/2019 | प्र.क्र.17सप्तश्रृंगी कॉलनी भागात वॉल कंपाउंड करणे | 13,66,367/- | नागरी दलित वस्ती सुधार यो. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | 80 | 20/09/2019 | प्र.क्र.15 समतानगर श्री मुन्ना शेठ गुडीवाले ते चक्कीवले बौंडे यांच्या घरापासून ते कुमार नगर अमरधाम येथील नंदू लोंडे यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे | 8,86,087/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 22 | 81 | 20/09/2019 | प्र.क्र.8 रोहिदास महाराज चोकातील श्री योगेश चत्रे यांच्या घरापासून ते रामेश्वर चकोर यांच्या घरापर्यंत व विनोद पिंगळे यांच्या घरापासून ते मनी खेडकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | 24,55,597/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना |
| 23 | 82 | 20/09/2019 | प्र.क्र.17 नूतन कृषीनगर भागातील श्री वसंतराव डाकरे यांच्या घरासमोर मोकळ्या जागेत सरंक्षण भित बांधणे | 11,75,359/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 24 | 84 | 20/09/2019 | प्र.क्र.17 अरुण कुमार वैद्य नगर मधील पोप्तानी यांच्याघरापासून मित्रकुंज सो.मधील दिवरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | 8,76,807/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 25 | 85 | 20/09/2019 | जय बजरंग चोक ते पोस्त गल्ली पर्यंत बंदिस्त गटार व रोड करणे | 19,99,375/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 26 | 86 | 20/09/2019 | प्र.10 मध्ये 80 फुटी रोड ते जलाराम बाप्पा मंदिर नित्यानंद नगर पर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 21,24,087/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 27 | 87 | 20/09/2019 | प्र.10 पापा घारू ते बडगुजर प्लॉट येथे रस्ता कॉंक्रीट करणे | 24,97,402/- | रस्ता दुरुस्ती अंतर्गत |
| 28 | 88 | 20/09/2019 | प्र.10 सुभाषनगर बाबू गल्ली ते दुसाने कॉंक्रीट करणे | 24,91,544/- | रस्ता अनुदान निधी |
| 29 | 89 | 20/09/2019 | प्र.8 मध्ये साखला मेडिकल ते राणा हॉटेल पावेतो दोन्ही बाजूला कॉंक्रीट गटार करणे | 24,54,869/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 30 | 90 | 20/09/2019 | ग.नं.2 जैन मंदिराच्या मागील बोळीत ड्रेनेज व बंदिस्त गटार करणे | 20,03,757/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 31 | 91 | 20/09/2019 | प्र.10 बंजरंगबली मंदिर ते माऊली नगर पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | 9,99,102/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 32 | 92 | 20/09/2019 | प्र.10 वरखेडी रोड ते भोलेबाबा भवन ते भोलेबाबा मंदिर पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | 16,74,741/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 33 | 93 | 20/09/2019 | प्र.10 वेडू सोमा माळी ते निरंजन जोशी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | 6,98,22/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 34 | 94 | 20/09/2019 | प्र.10 मध्ये जुने धुळे फुले कॉलनी ते 80 फुटी रोड तेविजय नाना पाचपुरकर येथे रस्ता कॉन्क्रीट करणे | 19,72,467/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 35 | 95 | 20/09/2019 | प्र.9 पप्पू डापसे यांच्या घरापासून ते बंटी गोरे यांचे घरापासून ते मनोज पोलादे यांचे घरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 5,97,470/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 36 | 96 | 20/09/2019 | प्र.9 गुरवगल्ली जुने धुळे येथे समाज मंदिर बांधणे | 10,00,183/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 37 | 97 | 20/09/2019 | धुळे शहरातील महिलासाठी स्वच्छता गृह विविध ठिकाणी उभारणे बाबत | 24,15,984/- | 14 व्या वित्त आयोग |
| 38 | 98 | 20/09/2019 | धुळे शहरातील मुख्य रस्तावर वृक्ष लावलेल्या वृक्षाना पिंजरे बसविणे | 22,86,907/- | 14 व्या वित्त आयोग |
| 39 | 99 | 20/09/2019 | प्र.9 शांताबाई गोरख मोरे ते वराडे अंडेवाले यांच्या दुकान पावेतो रस्ता कॉन्क्रीट करणे | 6,53,293/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 40 | 100 | 20/09/2019 | पांझरा नदी किनारी गठी जवळील जागेत सभागृह बांधणे | 19,95,722/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 41 | 101 | 20/09/2019 | प्र.10 80 फुटी रोड जुने धुळे फुले कॉलनी ते युवराज करनकाळ रस्ता कॉंक्रीट करणे | 19,94,430/- | नागरी दलितेत्तर योजना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 42 | 102 | 20/09/2019 | प्र.9 पाटावर नगर पट्टी ते बजरंग वाडी साईबाबा मंदिर पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 24,89,519/- | रस्ता अनुदान अंतर्गत |
| 43 | 103 | 20/09/2019 | प्र.9 फुले कॉलनी महादेव मंदिरामागे व मोकळ्या जागेत कॉक्रीटकरण करणे | 9,88,301/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 44 | 105 | 20/09/2019 | राजहंस सो.श्री नगर स.नं.567 ए .बी येथे उद्यान विकसित करणे | 15,84,497/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 45 | 106 | 20/09/2019 | प्र.5समर्थ कॉलनी भागात श्री देशमुख ते पोते यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 12,97,181/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 46 | 107 | 20/09/2019 | प्र.3 लेंडी नाला पुला पासून ते मरिमाता मंदिरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 7,99,672/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 47 | 108 | 20/09/2019 | बोडवे यांचे दुकान ते चौधरी काका यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार करणे | 4,95,970/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 48 | 109 | 20/09/2019 | प्र.19 ग्रीन कॉलनीनाजीर पिंजारी अल खैर हायस्कूल जवळ कॉक्रीट गटार करणे | 9,87,712/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 49 | 110 | 20/09/2019 | प्र.2 बडगुजर कॉलनी भागातील ओपन स्पेस येथे उद्यान विकसित करणे | 14,98,441/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 50 | 111 | 20/09/2019 | प्र.8 कसाबवाडा ते सलीम प्रोफेसर पावेतो कॉन्क्रीट गटार करणे | 14,64,652/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 51 | 112 | 20/09/2019 | प्र.2 श्रीरंग कॉलनीत ओपेन स्पेस येथे उद्यान विकसित करणे | 10,30,637/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 52 | 113 | 20/09/2019 | प्र.3 राज चिकन सेंटर ते लोकेश वेल्डिंग पर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 7,99,682/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 53 | 114 | 20/09/2019 | प्र.13 धुलिया स्टील ते इस्लाम खाटवाला पर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 6,62,566/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 54 | 116 | 20/09/2019 | प्र.14 राजवाडे नगर श्री घाडगे यांच्या घरापासून ते दीपक शिंदे यांच्या घरापर्यंत चोगुले ते राहुल पांडे क्लिनिक ते बडके घरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 16,53,113/- | नागरी दलितेत्तर योजना |
| 55 | 117 | 20/09/2019 | प्र.6 महिंदले अजिंक्यतारा सोसा.अनिरुद्ध नगर राजेंद्र नगर मंदार सावंत ते जिभाऊ पाटील श्री कदम ते मरिमाता मंदिर्पर्यंत कॉक्रीट गटार करणे | 9,97,545/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 56 | 119 | 20/09/2019 | भगा मोहन नगर गांगुर्डे मावशी ते वीरेंद्र जैन यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 6,94,338/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 57 | 120 | 20/09/2019 | प्र.3 एव्हर स्मार्ट टेलर ते नितीन मेन्सपार्लर ते एल एम सरदार शाळे पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 9,97,169/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 58 | 122 | 20/09/2019 | प्र.1 वलवाडी भिलाटी भागात श्री गुलाब ठाकरे ते आसाराम मोरे यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार करणे | 14,95,327/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 59 | 123 | 20/09/2019 | प्र.3 आग्रारोड शिवसेना कार्यालय ते दुर्गामाता मंदिरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 14,99,376/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 60 | 124 | 20/09/2019 | .प्र.13 मोहम्मद सर यांच्या घरापासून ते इस्माईल माझारशेठ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 9,90,519/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 61 | 126 | 20/09/2019 | प्र.12 मस्जीद्‌ची गल्ली मुनाफ सोशल वर्कर यांच्या घरापासून ते फरीद टेलर यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 9,93,161/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 62 | 127 | 20/09/2019 | प्र7 मदनलाल अर्जुन यांचे घर ते दयानंद मेहता यांचे घर ते ब्लॉक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे | 9,99,905/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 63 | 128 | 20/09/2019 | प्र.6 किरण दोधा पाटील ते शालिग्राम आनंदा पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 9,89,,474/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 64 | 129 | 20/09/2019 | प्र.11 रत्नदीप प्रोव्हिजन ते रमेश मोरे यांचे घरापर्यंत स.नं. 394 पर्यंत बंदिस्त कॉक्रीट गटार करणे | 13,48,095/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 65 | 130 | 20/09/2019 | प्र.12 संजू चक्की वाले यांच्या घरापासून ते अकिल पैलवान यांच्या घरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 14,64,689/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 66 | 131 | 20/09/2019 | प्र.14 विशालनगर येथे रामेश्वर अग्रवाल यांच्या घरापासून ते शशिकांत अग्रवाल यांच्या घरापर्यंत डॉ संघवी ते महावीर संघवी रस्ता डाबरीकरण करणे | 14,94,939/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 67 | 132 | 20/09/2019 | प्र.11 नाना वाणी ते पवन नगर बोर्ड पर्यंत बंदिस्त गटार करणे | 10,30,890/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 68 | 133 | 20/09/2019 | प्र.5 शिवाजी नगर भागातील गणपती मंदिर जवळील खुल्या जागेत उद्यान विकसित करणे | 11,94,070/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 69 | 134 | 20/09/2019 | विजय आप्पा गवळी ते शाह &कंपनी पर्यंत रस्ता कॉक्रीटकरण करणे | 10,11,767/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 70 | 135 | 20/09/2019 | प्र.4 गुलमोहर बंगल्यापासून ते प्रियंका अपार्टमेंट व बिलायाम बंगला ते रघुनंदन बंगल्यापर्यंत रस्ते डाबरीकरण करणे | 16,58,787/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 71 | 136 | 20/09/2019 | प्र.वलवाडी देवमडी भिलाटी भागात श्री करवा गोंदूर रोड ते ठाकरे बंदिस्त गटार करणे | 14,89,053/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 72 | 137 | 20/09/2019 | देवपूर कदमबांडे नगरातील श्री जाधव जालिंदर सुदाम श्री कायते ते महाले श्री सोनार सोमनाथ पर्यंत ते नित्यानंद निवास ते येवलेकर गिरासे पाटील पावेतो रस्ता कॉक्रीटकरण करणे | 24,99,461/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 73 | 139 | 20/09/2019 | प्र.5 प्रमोदनगर स.नं. 3 भागात श्री आशिष सिसोदे ते भीमसिंग राजपूत यांच्या पर्यंत रस्ता डाबरी करण करणे | 9,97,719/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 74 | 141 | 20/09/2019 | प्र.4 यमुनासदन ते मयूर बंगला ते राजे संभाजी व्यायाम शाळा ते पेंढारकर यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकारण करणे | 14,97,579/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 75 | 142 | 20/09/2019 | प्र.12कबीरगंज जुना वडजीरोड आझादनगर भोई वाडा भागात अल्ताफ मंजूर ते चक्की व साजिद अन्सारी ते पब्लिकटॉयलेट ब्लॉक कॉक्रीट गटार करणे | 9,86,766/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 76 | 143 | 20/09/2019 | प्र.14 विशालनगर येथे रमेश जांभळे यांच्या घरापासून ते शिवाजी चौधरी यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 7,56 479/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 77 | 144 | 20/09/2019 | प्र.7 संत गाडगे बाबा मठ ते दीपक परदेशी यांचे घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे | 14,99,891/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 78 | 145 | 20/09/2019 | प्र.19 गरीब नवाज येथे बाटम दिन मस्जिद पासून ते जाहोर चष्माघर पर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 8,28,838/- | नागरी दलितेत्तर योजना |
| 79 | 146 | 20/09/2019 | प्र.13 फिरदोस नगर काझी प्लॉट भागात लियाकत पठाण ते अन्वान शेठ ते फिरोज भाई ते मुकादम कॉन्क्रीट गटार करणे | 9,87,062/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 80 | 147 | 20/09/2019 | प्र.12 कबीरगंज भागात मुक्ती असरार ते मुक्ती कमर व हबीब खाटिक ते केय्युम पानवाले घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 9,93,160/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 81 | 148 | 20/09/2019 | प्र.5 शाहू नगर भागात श्री प्रकाश भंडारी ते नाल्या पावेतो रस्ता डाबरीकरण करणे | 12,99,813/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 82 | 149 | 20/09/2019 | वीरशैव लिंगायत गवळी समाज पेठ विभाग धुळे स्मशान भूमी विकसित करणे (नदी किनारी सुधा डॉ हॉस्पिटल समोर ) | 16,68,682/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 83 | 150 | 20/09/2019 | देवपूर भागातील कदमबांडे नगर भागात श्री साहेबराव पाटील ते योगेश शिंपी यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 24,99,237/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 84 | 151 | 20/09/2019 | देवपूर विनायक नगर भागात वाडीभोकर रोड ते प्रकाश पाठक सर ते नाल्या पावेतो रस्ता डाबरीकरण करणे | 24,99,237/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 85 | 152 | 20/09/2019 | प्र.4 जयहिंद स्विमिंग ते सी पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 14,94,509/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 86 | 155 | 20/09/2019 | प्र.19 रेह्बर बाग येथे नोशाद कुरेशी ते शाहीद चक्कीवाले व सलीम पुढ्ढेवाले ते हुसेन दलाल यांच्या घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे | 9,87,712/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 87 | 157 | 20/09/2019 | प्र.3 शारदा नगर भागात डॉ अविनाश पिंगळे ते मंगेश खैरनार यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 9,94,579/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 88 | 158 | 20/09/2019 | प्र.2 गजानन कॉलनी भागात गजानन कॉलनी बोर्डापासून ते शशिकला सोनार यांच्या | 14,92,901/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 89 | 159 | 20/09/2019 | प्र.11 साहेबराव पाटील ते नाना पाटील ते भूषण चौधरी ते सुरेश पुंडलिक व नितीन फुलपगारे कुंभार यांच्या घरापर्यंत माणिक नगर येथे विविध ठिकाणी गटार करणे | 24,97,776/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 90 | 160 | 20/09/2019 | अग्रवाल नगर येथील गणेश अपार्टमेंट समोरील ओपन स्पेस येथे उद्यान विकसित करणे | 16,97,578/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 91 | 161 | 20/09/2019 | प्र.13 स्वेस हायस्कूल समोरील भागात स्वेस उर्दू हायस्कूल वडजाई रोड कॉक्रीट गटार करणे | 9,86,412/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 92 | 163 | 20/09/2019 | प्र.13 शिवाजी नगर येथे नूर मस्जिद पासून मधील सर्व गल्ली व आप्पा खताळ गल्लीपर्यंत कॉन्क्रीट गटार करणे | 9,87,062/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 93 | 164 | 20/09/2019 | प्र.5 सुशांत कॉलनी भागात श्री सुरेश पाटील यांच्या घरापासून ते डॉ पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 14,98,772/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 94 | 165 | 20/09/2019 | प्र.15 राधाकृष्ण मंदिर ते बानखेडे घर ते सोंदाणकर घरापावेतो रस्ता डाबरीकरण करणे | 14,86,790/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 95 | 166 | 20/09/2019 | धुळे शहरातील पांझरा नदीवरील सावरकर पुतळ्या समोरील पुलावर रेलिंग बसविणे व बिअरिंग कोट दुरुस्त करणे | 24,93,310/- | मनपा निधी |
| 96 | 167 | 20/09/2019 | धुळे शहरातील पांझरा नदीवरील गणपती मंदिरा समोरील पुलावर रेलिंग बसविणे बाबत | 22,96,865/- | मनपा निधी |
| 97 | 168 | 20/09/2019 | प्र.11 नाकोडा मेडिकल ते समता भवन ते जय किसन चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता डाबरीकरण करणे | 14,70,224/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 98 | 170 | 20/09/2019 | प्र.17 साक्री रोड गणेश कॉलनी सुरेशकुमार आहुजा ते महसूल कॉलनी श्री. पोपली यांचे घरापर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 21,53,183/- | नागरी दलित वस्ती योजना |
| 99 | 171 | 20/09/2019 | कुमारनगर नंदलाल वासवानी यांचे घर ते श्री गुलाब महाले यांचे घर ते कटारिया यांचे घर ब्लॉक एस ची फोटो स्टुडिओ पर्यंत रस्ता कॉन्क्रीट करणे | 14,90,585/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 100 | 176 | 20/09/2019 | प्र.17 शासकीय दुध डेअरी वॉल कंपाउंड श्री वसंत मराठे घर ते किरण शॉप पावेतो रस्ता डाबरीकरण करणे | 10,01,711/- | नागरी दलितेत्तर योजना |
| 101 | 177 | 20/09/2019 | प्र.15 स.नं.56/1+2+3 जवाहर नगर येथे देवरे क्लासेस जवळील जागेस संरक्षण भित बांधणे व उद्यान विकसित करणे | 15,99,531/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 102 | 178 | 20/09/2019 | प्र.5 श्रीकृष्ण नगर व शिवाजी नगर तसेच रेणुका नगर देवपूर भागात रस्ता कॉन्क्रीट करणे | 9,68,615/- | नागरी दलितेत्तर योजना |
| 103 | 179 | 20/09/2019 | प्र.7 आनंद नगर विजय कुलकर्णी ते सरला सोनवणे ते दिनेश खर्डीकर ते शेवाळे ते मिलिंद बोरसे ते सावंत स.नं.17/1 येथे रस्ता कॉक्रीट करणे | 24,94,183/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 104 | 180 | 20/09/2019 | प्र.17 सेवादास नगर भागात श्री संदीप पाटील ते रावण पाटील ते सराफ यांचे घरापावेतो भूमिगत गटार करणे | 20,69,587/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |
| 105 | 182 | 20/09/2019 | प्र.5 स.नं.87/1+2+2+2 व स.नं 87/456 ओपनस्पेस मधील मोकळ्या जागेस वॉल कंपाउंड बांधणे | 12,65,570/- | जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना |
| 106 | 185 | 20/09/2019 | प्र.19 सम्राट नगर सोसा.डॉ. तकाले ते दिलीप बडगुजर ते बराडे डॉ सचदेव ते रवींद्र मराठे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे | 20,08,239/- | नगरोत्थान योजने अंतर्गत |

उक्त कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- १०० धुळे म.न.पा.अंतर्गत प्र.क्र.०६ मध्ये साक्रीरोड परीसरातील विविध ठिकाणी जलवाहिनी लिकेज असल्याने लाखो लिटर शुध्द पाणी वाया जात असल्याने वितरणास अडचणी येत असल्याने पाईप लाईन लिकेजचे काम तांतडीने ठेकेदार श्री.जिग्नेश दिनेश चव्हाण यांचेकडुन करुन घेण्यांत आलेत, सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.७३,७३७/-खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.
म. सुभाष जगताप — विषय मंजुर करण्यांत यावा.
म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६ दिनांक १४/११/२०१९**

धुळे म.न.पा.अंतर्गत प्र.क्र.०६ मध्ये साक्रीरोड परीसरातील विविध ठिकाणी जलवाहिनी लिकेज असल्याने लाखो लिटर शुध्द पाणी वाया जात असल्याने वितरणास अडचणी येत असल्याने सदरचे काम करणे आवश्यक व त्वरित करावे लागणार असुन,उक्त काम मनपाने ठेकेदार श्री.जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे याचे कडुन करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.७३,७३७/- मात्र इतका करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांना विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने व नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.73,737/-खर्चास व कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक १०१ धुळे मनपा अंतर्गत हद्दवाढीत समावेश दहा गावांतील बोअरींग हातपंप रिपेअरिंग चे करणेचे काम तातडीने श्री. गजानन शिवराम गायकवाड यांचे कडून करुन घेण्यात आलेले आहे. सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२)(२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.१,१०,८३१/- खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यानी विषयांचे वाचन केले.

म. संजय भिल सभापती महोदय, हद्दवाढ गावांतील बोअरींग हातपंप रिपेअरिंग चे जे काम आहे त्यामध्ये कोण कोणते गावांचे काम झालेले आहे याबाबत माहिती देणेत यावी.

म. अमिन पटेल सभापती महोदय मी या आधीही तापी पाईपलाईन पुन्हा पुन्हा लिकेज होते त्या कामाच्या रिपेअरींगच्या कामाच्या वेळेस सुचविले होते की, ज्या ठिकाणी काम केले जाईल त्या जागेचा फोटो काढण्यात यावा.त्या भागातील नागरीकांची स्वाक्षरी घेण्यात यावी. परत—परत या विषयावर चर्चा होत असते.

म. सुनिल सोनार सभापती महोदय, याबाबत ३ लोकांची टिम तयार करा. यानंतर जर वाटले काम योग्य आहे तर करायला काही हरकत राहणार नाही

म. अभियंता सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, हा जो प्रस्ताव आलेला आहे यात अवधान आणि वलवाडी या दोन्ही गावांची बोअरिंग रिपेअरींग ची त्यांनी यादी दिलेली आहे. अवधान माहादेव मंदीराच्या मागे,पन्ना गल्ली अवधान येथे काम झालेले आहे. आणि तेथील नागरिकांच्या त्यांनी स्वाक्षऱ्या देखील घेतल्या आहेत आणि फोटो ही दिलेले आहेत.

म. संजय भिल सहा महिन्यांपासुन तक्रार दिलेली आहे, पत्र दिलेले आहे. तरीही काम होत नसेल तर उपयोगाचे. कामे होत नसतील तर दुसऱ्या ठेकेदाराला काम द्या.

म. संतोष खताळ सभापती महोदय, आमच्या चितोड गावात एकही बोअरिंग सुरु नाही.आणि दुरुस्ती केली तर महिन्याच्यावर ती टिकत नाही.आपण १,१०,८३१/- या व्यक्तीला देत आहोत.तर आपण यांच्याकडुन काही लेखी घेतले आहे का कि कीती दिवसात हे खराब होईल किंवा झाले तर आपण किती दिवसात परत रिपेअरिंग करुन देवु. हा विषय तहकुब करणेत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांनी केली चर्चा लक्षात घेता सदस्यांच्या प्रभागातील बोअरवेल रिपेअरींगचे कामेही होणे गरजेचे आहे. ६-६ महिने विनंती करुन कामे होत नाही अशा तक्रारी येत आहे. ठेकेदार जर कामे करीत नसेल तर ठेकेदार बदलविणेत यावा. सदस्यांच्या तीव्र भावना लक्षांत घेता सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११७ दिनांक १४/११/२०१९**

धुळे म.न.पा.अंतर्गत हद्दवाढ मध्ये समावेश दहा गावांतील हातपंप (बोअरिंग) दुरुस्ती करणे आवश्यक होते व उन्हाळ्याचे दिवस असल्याने त्या भागातील सन्माननीय सदस्यांच्या तक्रारी वरून त्या गावातील हातपंप दुरुस्तीचे कामे करणे आवश्यक व त्वरित करावे लागणार असुन.उक्त काम मनपाने ठेकेदार श्री.गजानन शिवराम गायकवाड याचे कडुन करून घेण्यात आलेले आहे.सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु. १,१०,८३१/-मात्र इतका करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांना विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने व नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने सदरचे काम वीना निविदा श्री. गजानन शिवराम गायकवाड यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु. १,१०,८३१/-खर्चास व कार्योत्तर मंजुरीसाठी सभागृहासमोर आला सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्यांनी केली चर्चा लक्षात घेता सदस्यांच्या प्रभागातील बोअरवेल रिपेअरींगचे कामेही होणे गरजेचे आहे. ६-६ महिने विनंती करुन कामे होत नाही अशा तक्रारी येत आहे. ठेकेदार जर कामे करीत नसेल तर ठेकेदार बदलविणेत यावा. सदस्यांच्या तीव्र भावना लक्षांत घेता सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १०२ हनुमान टेकडी पासून साक्रीरोड वरील मुख्य जलवाहिनी विविध ठिकाणी लिकेज दुरुस्ती करणेचे काम तांतडीने ठेकेदार श्री. जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे याचे कडून करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.२,९५,५५४/-खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यानी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल सोनार किती ठिकाणचे लिकेज काढण्यांत आले आहे. याचा टिपणीत उल्लेख नाही तसेच कोणत्या ठिकाणी कोणते लिकेज काढले कोणते साहित्य बदले याचा देखील टिपणी उल्लेख करण्यांत येत नाही.लिकेजेच्या संदर्भात ३ सदस्यांची समिती गठीत करण्यांत यावी.कामाची पाहणी करण्यांत यावी नंतर बिले अदा करावे तो पर्यत सदर विषय तहुकब करणेत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेवून सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११८ दिनांक १४/११/२०१९**

धुळे म.न.पा.अंतर्गत प्र.क्र.६ मध्ये हनुमान टेकडी पासून साक्रीरो वरील मुख्य जलवाहिनी विविध ठिकाणी लिकेज आल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून पाणी वितरणास अडथळा होत आहे.तरी सदरचे काम करणे आवश्यक व त्वरित करावे लागणार असुन.उक्त काम मनपाने ठेकेदार श्री.जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे याचे कडुन करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.२,९५,५५४ /-मात्र इतका करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांना विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने व नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने सदरचे काम वीना निविदा श्री. जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.२,९५,५५४/-खर्चास व कार्योत्तर मंजुरीसाठी सभागृहासमोर ठेवला असता सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेवून सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १०३ | धुळे मनपा अंतर्गत महात्मा गांधी पुतळा येथे मोठया पुलावर प्रवेशव्दार उभारणी करणेचे अंदाजित खर्च रु.७०,००,०००/-मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. संतोष खताळ | सभापती महोदय, आमच्या भागात मोठ मोठ्या खड्यांनमुळे रस्त्याची चाळण झालेली आहे. आमच्या भागात ५० हजार रुपयांचा जर मुरुम टाकायचा असेल तर पालिका मंजुरी देत नाही. याबाबत आपल्याकडे मुरुम द्यायची तरतुद आहे का? देत नाही. प्रवेशद्वारासाठी ७० लाख खर्चाची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. माझी विनंती आहे आपल्याला कमानी, पुतळे या कामांना थांबविण्यात यावे. माझा विरोध नोंदविण्यात यावा. आपल्याला विषय मंजुर करावयाचा असेल तर बाकीचे सदस्य मान्यता देवु शकतात. मागे आमच्या मिल परिसरात १२ वर्षाचा मुलगा रोड च्या खड्यात पडला याची जबाबदारी कोण घेणार? आपण खड्डे बुजवत नाही, मुरुम देत नाही. याबाबत फक्त मिल परिसराचीच तक्रार नाही तर संपुर्ण धुळे शहराची तक्रार आहे. आपण रोड दुरुस्ती साठी ७० हजार नाही तर ७० लाख जरी खर्च केले तरी आमचा विरोध राहणार नाही. पुतळे कमानी यापेक्षा असे पैसे शहरातील मुलभुत सेवा सुविधा व तक्रांरीवर खर्च करावे. |
| म. अमिन पटेल | सभापती महोदय, सन्मा. सदस्य श्री. संतोष खताळ यांच्या सांगण्याप्रमाणे शहरात खड्डे भरले जात नाही तसेच बरेच काही विकास कामे आहेत ते होत नाही. ज्यावेळे १० लाख रु. नगरसेवक निधीचे काम येते.तेव्हा आर्थिक परिस्थितीचे कारण सांगितले जाते. केवळ प्रवेशद्वारासाठी इतका खर्च करणे व्यवहारीक दृष्टया योग्य होणार नाही. |
| म. नागसेन बोरसे | सभापती महोदय, सदरच्या विषयाची अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. त्यात म्हटले होते एकविरा देवीचे जे स्वागत द्वार ते बनवायचे त्यानंतर धुळे शहरात प्रवेशद्वार असावे. या हिशोबाने याची अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. हा विषय आपल्याकडे फक्त आर्थिक व प्रशासकिय मान्यतेसाठी आलेला आहे.ज्यावेळेस शहराचा विकास होईल. तर विकास म्हणजे काय? तर ती संकल्पना म्हणजे विकासाचे सुंदर व स्वच्छ शहर हे दोन प्रकार आहेत. सुंदर शहर हे दिसण्यासाठी काहीतरी वेगळा भाग दिसला पाहिजे शहरामध्ये जेणेकरुन कुठलीतरी ओळख शहरात असली पाहिजे. महाराष्ट्रात ओळख असली पाहिजे. ज्याप्रमाणे आपण महात्मागांधी पुतळया जवळ १५० मीटरचा राष्ट्रध्वज उभारण्यासाठी ४७ लाखाला मंजुरी दिली त्यावेळस विरोध झाला नाही. आणि आता स्वागत कमान ही पण सुंदर आहे. म्हणजे नाशिकला शहराच्या चारही बाजुला प्रवेशद्वार आहेत. त्याप्रमाणे शहराच्या सौंदर्यात यामुळे भर पडणार आहे यासाठी अंदाजपत्रकातही तरतुद आहे. जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत १०० पेक्षा जास्त रस्त्यांची कामे मंजुर आहेत त्यामुळे सदर रस्ते नुतनीकरण होणारच आहेत. तसेच खड्डे दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकात ५० लक्ष मात्रची तरतुद आहे. परंतु आजची रस्त्यांची परिस्थिती पाहता सदर तरतुद अपुर्णच ठरणार आहे. त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतुद १ कोटी मात्र घेण्यात यावी. तसेच हद्दवाढीच्या भागात रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असल्याने त्याठिकाणी रस्ते तात्पुरता स्वरुपात खडी, मुरुमने रस्ते बुजविण्यासाठी ५ लाख मात्रचे अंदाजपत्रक तयार करुण त्याप्रमाणे दुरुस्ती करणे बाबत निर्णय |

घेण्यात आलेला होतो.यावर तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे.आणि शहराच्या सौंदर्यासाठी हा विषय मंजुर करावा.

म. अमिन पटेल — आमच्या विषयाला विरोध नाही. शहर सुदंर होण गरजेचे आहे. परंतु शहरात अन्य ठिकाणीही मोठे रस्ते आहेत. आमच्या १०० फुटी रस्त्यांवरील वडजाई रोड कडील मार्गास धर्मगुरु ईमामे अबु हलिफा मार्ग असे नामकरण करण्यात आलेले आहे. सदरही रस्ता शहरातील मोठा रस्ता आहे. या ठिकाणीही धर्मगुरुंच्यानावाने प्रवेशद्वार उभारण्यात यावे. शहराचा विकास सर्वदुर झाला पाहिजे. आम्ही शहराच्या विकासासाठी कोणत्याही पक्षाच्या नेत्याकडे जाण्यास तयार आहोत.

म. सुनिल सोनार — शहराच्या सौंदर्याच्या दृष्टीने विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११९ दिनांक १४/११/२०१९**

धुळे म.न.पा.अतर्गत महात्मा गांधी पुतळा आग्रारोड मोठया पुलावर प्रवेशव्दार उभारणी करणेबाबत म.महापौर सो.यांनी मागणी केलेली असल्याने सदरच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यांस अंदाजित खर्च रु.७०,००,०००/- मात्र अपेक्षित असून सदरचा खर्च हा सां.बां. विभाग यांचे दरसूची नुसार असून ती योग्य व वाजवी असा आहे.

तसेच सदरचा खर्चाची नोंद ही धुळे मनपाच्या सन २०१९-२० च्या आर्थिक वर्षाच्या तरतूद रजिस्टरला घेण्यांत आलेली आहे.

तरी रु.७०,००,०००/- मात्रच्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तसेच तांत्रिक मंजुरी देवून ई निविदा प्रक्रिया राबविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ५ डिसेंबर, २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०५/१२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १२ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १३ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १४ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री.शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री नारायण पंडीत सोनार | प्र.नगरसचिव तथा कार्यालयीन अधिक्षक |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. सी.ए. उगले | प्र. अभियंता |
| ८ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री.पी.डी. नाईक | लेखापाल |
| ११ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. ओव्हरसियर |
| १४ | श्री. राजेश गायकवाड | मुख्य लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १५ | श्री. भट् महानर | लिपीक भांडारपाल |
| १६ | श्री.रविकिरण पाटकरी | अभिलेखापाल |
| १७ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग लिपीक |
| १९ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन प्रमुख |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज –**

सन्मा.सदस्य श्री.संतोष छगन खताळ व श्री.मन्सुरी मुखतार कसिम यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२० दिनांक ०५/१२/२०१९**

सन्मा.सदस्य श्री.संतोष छगन खताळ व श्री.मन्सुरी मुखतार कसिम यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १०४ — धुळे म.न.पा.अंतर्गत हद्दवाढ वरखेडी गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करणे करिता स्लुईस व्हॉल व एअर व्हॉल टाकणे आवश्यक असल्याने तेथे तातडीने व त्वरित काम लागले. त्यासाठी झालेला खर्च रु.९५४९७/- मात्रला मुंबई प्रांतिक अधिनियम ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरी व खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. रावसाहेब नांद्रे — विषयाला मंजुरी देण्यात यावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन विषयाला मंजुरी देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२१ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे म.न.पा. अंतर्गत हद्दवाढ बरखेडी गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करणे करिता स्लुईस व्हॉल व एअर व्हॉल टाकणे आवश्यक असल्याने तेथे तातडीने व त्वरित काम लागले असून उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री. संजय दगडू गायकवाड यांच्या कडून करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु ९५,४९७/- मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबंधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे पाणीपुरवठाशी निगडीत असल्याने व पाणीपुरवठा सुरु करण्या करिता आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास व खर्चास कार्यालयीन अहवालास आधीन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १०५ — तापी पाणीपुरवठा योजनेवरील बडगुजर जलकुंभ भरणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे सदर जलकुंभ येथील पाणीपुरवठा बंद झाला होता सदर पाणीपुरवठा सुरु करणे साठी नवीन ९०० एम.एमची पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने तेथे तातडीने व त्वरित काम लागले त्यासाठी झालेला खर्च रु ६,६३,९३८/- मात्रला **मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरी व खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन** अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल सोनार — विषयाला मंजुरी देण्यात यावी.

म. सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन विषयाला मंजुरी** देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२२ दिनांक ०५/१२/२०१९**

तापी पाणीपुरवठा योजनेवरील बडगुजर जलकुंभ भरणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे सदर जलकुंभ येथील पाणीपुरवठा बंद झाला होता सदर पाणीपुरवठा सुरु करणे साठी नवीन ९०० एम.एम.ची पाईप लाईन टाकणे आवश्यक असल्याने तेथे तातडीने व त्वरित काम लागले असून उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री.संजय दगडू गायकवाड यांच्या कडून करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु६,६३,९३८/- मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबंधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे पाईपलाईनला गळती लागल्याने पाण्याची नासाडी होत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. संजय दगडू गायकवाड यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास व खर्चास कार्यालयीन अहवालास आधीन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १०६ हनुमान टेकडी पासून साक्रीरोड वरील मुख्य जलवाहिनी विविध ठिकाणी लिकेज दुरुस्ती करणेचे काम तातडीने ठेकेदार श्री. जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.२,९५,५५४/-खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल सोनार विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२३ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे म.न.पा.अंतर्गत प्र.क्र.६ मध्ये हनुमान टेकडी पासून साक्रीरोड वरील मुख्य जलवाहिनी विविध ठिकाणी लिकेज असल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून पाणी वितरणास अडथळा होत आहे. तरी सदरचे काम करणे आवश्यक व त्वरित करावे लागणार असुन.उक्त काम मनपाने ठेकेदार श्री.जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे याचे कडून करून घेण्यात आलेले आहे.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरचे काम केले असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.२,९५,५५४ /- मात्र इतका करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणे बाबत संबधित ठेकेदार यांना विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने व नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने सदरचे काम वीना निविदा श्री. जिग्नेश दिनेश चव्हाण रा.धुळे यांच्या कडून करून घेण्यात आलेले आहे.

उक्त काम प्रभाग क्रमांक ६ हनुमान टेकडी पासून साक्रीरोड वरील मुख्य जलवाहिनी विविध ठिकाणी लिकेज असल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून पाणी वितरणास अडथळा निर्माण होत असल्याने सदरचे काम हे विना निविदा श्री. जिग्नेश दिनेश चव्हाण यांचे कडुन तातडीने करुन घेण्यात आलेले असल्याने कार्यालयीन अहवालास अधीन राहुन व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदरच्या कामस महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमातील कलम ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास व खर्चास कार्यालयीन अहवालास आधीन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १०७ धुळे महानगरलिका आरोग्य विभागाने मा.महापौर यांनी सुचीत केल्यानुसार महा स्वच्छता अभियान दि.०६/०१/२०१९ ते १३/०१/२०१९ अखेर शहरात राबविण्यात आले त्याकामी विना भाडे तत्वावर फक्त इंधन पुरवठा या तत्वावर खाजगी वाहनांकरिता घेण्यात आलेल्या इंधनाचे

देयक रु.२,५८,०७१/- मात्रला मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२४ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाने स्वच्छतेकामी महा. स्वच्छता अभियान राबविण्यात आले त्याकामी इच्छुक खाजगी वाहनांकरिता घेण्यात आलेल्या इंधनाचे मे. समादेशक ,भारत पेट्रोलियम , पोलीस कल्याण अंतर्गत पंप क्र. १ रा.रा. पो.बल गट क्र.६ धुळे येथून दि.०६/०१/२०१९ ते १३/०१/२०१९ अखेर इंधन उधारी खातेवर घेण्यात आलेले आहे. सहा. सार्व. आरोग्याधिकारी यांनी इंधन वापर योग्य असल्याबाबत पत्र सादर केलेले आहे. इंधन वापर योग्य व नोंदी सादर केलेलया आहेत त्यानुसार इंधन वापराची नोंद घेण्यात आलेली असुन सदरचे वाहनांचा वापर मनपा कामाकरिताच झालेला असुन वापर योग्य व बरोबर आहे असे सहा. सार्व. आरोग्याधिकारी यांनी प्रमाणीत करुन स्वाक्षरी केलेली आहे.

महापौर सो. यांनी स्वच्छता अभियान राबविण्याकरिता स्वच्छेतेसाठी लावणेत आलेल्या जे.सी.बी. व इतर वाहनांना इंधन पुरवठा करणेत यावे असे पत्र दिले आहे.

त्यानुसार सदर इंधन खरेदी कामी झालेला खर्च एकुण रक्कम ₹.२,५८,०७१/- अक्षरी- दोन लक्ष अठ्ठावन्न हजार एकात्तर रुपये मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५(२)(२) अन्वये कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक:- १०८ — धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्रएम एच १८ एफ ०२५८ वाहनांची बॅटरी बदली कामी झालेला खर्च रु.१७२१०/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ के नुसार अनुसूची ड मधील ५ (२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सुनिल सोनार — विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२५ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे म. न. पा. अग्निशामक विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन १८ जी ०२५८ सेल स्टार्ट होत नसल्यामुळे वाहन चालक व मेकॅनिक यांचे अहवालानुसार वाहनांची बॅटरी निकमी झाल्याने वाहन हे सेल स्टार्ट होत नाही. तात्कालीन विभागाकडुन मे.उज्वल ॲटोमोटीव्ह , धुळे टाटा अधिकृत वितरक यांना पत्र देऊन कंपनी अभियंता यांचे मार्फत तपासणी केली असता वाहनांचे बॅटरी निकामी झालेली आहे सदरील बॅटरी बदलणे आवश्यक आहे असे सांगितले असता आगीच्या घटना वारंवार होत असल्याने व वाहन हे

अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांची जा.क्र.११०दि.१८/७/२०१९ अन्वये भांडार विभागाकडुन पत्र देऊन म.उपायुक्त सो.यांच्या आदेशाने तातडीने दुरूस्ती करणेत आली. इनव्हाईस नं.IUAUL1920004995 दि.२६/०७/२०१९ अधिकृत वितरक यांचे कडुन तात्काळ नविन बॅटरी खरेदी करणेत येऊन वाहन योग्यरीत्या कार्यरत करणेत आलेले आहे.

सदर दुरूस्ती ही शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिंसेबर २०१६ नियम ३.२.२ मधील परिच्छेद २ व नियम ४.३ मधील तरतुदी नुसार ₹.५०,०००/- पर्यंतची थेट खरेदी अधिकृत वितरक यांच्याकडुन करता येईल. अशी तरतुद आहे.

सदर करणेत आलेली खरेदी खालील प्रमाणे साहित्य

| अ.क्र | साहित्य | नग | दर ₹. | रक्कम ₹. | CGST ₹. | SGST ₹. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बॅटरी (एम एच डी - १३००) | २ | ६७२२.६६ | १३४४५.३१ | १८८२.३४ | १८८२.३४ | ₹.१७२१०=०० |
| | | | | | | एकुण रक्कम | १३४४५.०० |
| | | | | | | CGST | ₹.१३८२.३४ |
| | | | | | | SGST | ₹.१३८२.३४ |
| | | | | | | एकुण रक्कम सव करासहित | ₹.१७२१०=०० |

तरी वाहनाची दुरूस्ती मजुरीसह मे.उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे टाटा मोटर्स अधिकृत वितरक यांचे कडुन करुन घेणेत आली आहे.

तरी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम तरतुद नुसार ७३ खंड क प्रमाणे सदर खर्च रूपये ₹.१७२१०/- (अक्षरी-सतरा हजार दोनशे दहा )मात्रला कार्योत्तर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती कडेस सदर विषय ठेवणेस व खर्चास मा.आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे त्यानुसार [अनुसूची ड] प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ अन्वये कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक १०९ — धुळे अग्निशामक विभागकडील वाहन क्रएम एच १८ एफ ०२५८ वाहनाची बॅटरी बदली कामी झालेला खर्च रु. ७२८४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ के नुसार अनुसूची ड मधील ५(२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, धुळे शहरामध्ये ज्या मोठया स्लम झोपडपट्टया आहेत त्या ठिकाणी आपली फायर फायटरची गाडी जाऊ शकते का? तसेच जर जिवीत व वित्त हानी झाली तर त्या जबाबदार कोण असणार? कारण अशी परिस्थिती झालेली आहे झोपडपट्टी भागांमध्ये तिथे छोटा हत्ती गाडी देखील जाऊ शकत नाही. तर फायर फायटरची गाडी जाईल का? अश्या भागांमध्ये आग लागली तर आग विझवण्याची कॅपेसीटी गाडीची आहे का याबाबत माहिती मिळावी.

| | |
|---|---|
| म. तुषार ढाके | म. सभापती यांच्या वतीने खुलासा करतो की, आपण जे भाग सांगितले त्या भागांमध्ये आपली फायर फायटर घुसु शकत नाही. आपल्याकडे जी छोटी जीप गाडी आहे ती ही अन्यस्लम भागात जाऊ शकत नाही. |
| नागसेन बोरसे | धुळे शहरामध्ये जेवढे शॉपींग सेंटर,मोठ्या बिल्डींग असतील यांचे फायर ऑडीट केले आहे का? |
| म. तुषार ढाके | फायर ऑडीट सुरु आहे.आणि फायर ऑडीट बाबतचे पत्र आपण शाळा आणि महाविद्यालयांना ही आता दिले आहे. |
| म. नागसेन बोरसे | यावर काय कार्यवाही करण्यात येणार आहे. |
| म तुषार ढाके | आता त्यांना NOC साठी अर्ज करायला सांगीतले आहे. |
| म. नागसेन बोरसे | त्यांनी मनपा कडुन प्रमाणपत्र घेतले आहेत का? |
| म. तुषार ढाके | घेतले आहेत आता १ जानेवारी ला ते रिनीवल करावे लागतील. |
| म. नागसेन बोरसे | फायर ऑडीट साठी पालिकेने काय केले आहे. |
| म. तुषार ढाके | आपण फायर फायटर सर्व्हीसेस मुबंई यांच्याकडे आपण अर्ज केलेला आहे. आता ते सांगतील की कोणत्या माहितीची पुर्तता आपल्याला करावायाची आहे. |
| म. नागसेन बोरसे | ऑडीट झाले त्यामध्ये १९८७-८८ व १९९३-९४ चा जो ऑडीट रिपोर्ट आहे. माहिती मागविण्यासाठी मला चार महिने झाले ऑडीटची कुठलीही माहिती मला मिळालेली नाही. थोडक्यात माहिती पुरवीली जाते. मी परत अर्ज करतो पण पुर्ण माहिती पुरवीली जात नाही. हे किती दिवस चालणार आहे. |
| म. नगरसचिव | माहितीची पुर्तता दोन दिवसात करणेत येईल. |
| म. नागसेन बोरसे | दोन दिवस-दोन दिवस असे चार महिन्यापासुन मला सांगण्यात येत आहे परंतु माहिती देण्यात येत नाही. तसेच फंडाचे कर्मचारी अस्थापनेवर घेतले होते त्यांना कोणते कागदपत्रे पुरविली आहेत आणि त्यावेळेस ऑडीट ऑब्जेक्शन होत की नाही अनुपालन केले की नाही याचीही सविस्तर माहिती मला कळविण्यात यावी आणि मागितलेल्या माहितीचा खुसाला किती दिवसात करणेत येईल? |
| म. नगरसचिव | याबाबत माहितीची दोन दिवसात पुर्तता करणेत येईल. |
| म. नागसेन बोरसे | सदर मागितलेल्या माहितीची पुर्तता दोन दिवसाच्या आत करणेत यावी. |
| म. सभापती | सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी मागितलेल्या माहितीची पुर्तता दोन दिवसात संबधीत अधिकारी कडुन करणेत यावी. |
| म. नागसेन बोरसे | तसेच आठ दिवसात फायर ऑडीट करणेत यावे. आणि त्याबाबत माहितीची पुर्तता ही करणेत यावी. तसेच जर जिवीत व वित्त हानी झाली तर याबाबतची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येणार आहे याबाबतही खुलासा करणेत यावा. महाराष्ट्रात झोपडपट्टी भागांना आग लागुन किती जिवीत व वित्त हानी झाली याबाबत माहिती आहे का तुम्हांला. फायर ऑडीट अग्निशामन विभाग मुबंई कडुन माहिती मागवुन त्याबाबत त्वरीत कार्यवाही करणेत यावी. |
| म. अमिन पटेल | अग्निशामनच्या ज्या गाड्या आहेत त्यापैकी कोण-कोणत्या गाड्यांचे पासींग आपल्याकडे आहे? माझ्या माहिती प्रमाणे काही गाड्यांची पासींग आठ वर्षापासुन झालेली नाही. आणि जर काही घटना घडली तर त्याबाबत जबाबदारी कुणाची याबाबतही माहिती देणेत यावी. |
| म. तुषार ढाके | सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाप्रमाणे १८८,२५८,२५९,१८२८ या गाड्यांची पासिंग झालेली आहे. तसेच गाडी न.१८२८ चे पुढील महिन्यात रिनीवल करावे लागणार आहे.ओपन पासिंग असल्याने दोन वर्षाची मुदत असते. |

म. अमिन पटेल — माझ्या माहिती प्रमाणे पाण्याच्या ट्रॅक्टरची पासिंग झालेली नाही. तसेच पाण्याची पाईपलाईन वारंवार लिकेज होत तर पाण्याचे ट्रॅक्टर किती सुरु आहेत.

म. तुषार ढाके — सन २०१८ -१९ ला पाण्याच्या ट्रॅक्टर चे पासिंग केले आहे. आपल्याकडे पाण्याचे ट्रॅक्टर तर नाहीत पण ज्या फायर फायटच्या जुन्या ३ गाड्या आहेत त्या पाणीपुरविण्यासाठी आपण वापर करत आहोत.

म. अमिन पटेल — पुर्ण शहरात पाणी वाटप साठी एकच ट्रॅक्टर चालेल का? नविन ट्रॅक्टर यायला पाहिजे पुढे उन्हाळा सुरु उन्हाळयाच्या दिवसात एकच ट्रॅक्टर पाणी वाटपसाठी योग्य ठरणार नाही.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२६ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहनांसाठी नविन बॅटरी उपलब्ध करुन देणे संबंधीत विभाग मार्फत मोटार वाहन विभागाकडेस सादर केला असता सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामा बाबत मे. उज्वल ॲटोमोटिव्ह धुळे यांचे तातडीने करावयास सुचीत केल्यानुसार त्यांच्याकडुन काम करून घेण्यात आलेले असुन सदर कामाबाबत खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.क्र | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | बॅटरी (एम.एच.डी.१००) | ०१ | ५६६२.५० | ५६६२.५० |
| | | एकुण रक्कम | | ५६६२.५० |
| | | CGST 14% | | ७९२.७५ |
| | | SGST 14% | | ७९२.७५ |
| | | एकुण रक्कम सर्वकरासहित | | ७२४८/- |

तरी वरील प्रमाणे काम करून घेण्यात आलेले आहे. तरी त्यासाठी एकुण खर्च **७२४८/-** मात्र (अक्षरी- सात हजार दोनशे अठ्ठेचाळीस रुपये मात्र) करण्यात आलेला असुन सदरचा खर्च अदा करण्याकरीता महानगरपालिका अधीनियम १९४९ मधील ७३ क नुसार अनूसुची ड मधील ५ (२)२ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक ११० — धुळे मनपाचा मुलभूत सोई सुविधा अंतर्गत शासन निर्णय क्र. पूरक-२०१८/प्र.क्र. ९८(१०) नवि १६ दि. सप्टेंबर २०१९ अन्वये १) पांझरा नदी किनारी देवपूर येथे वॉटर फॉल शौचालय बांधणे,वॉचमन क्वार्टर बांधणे,रिटेनिंग वॉल,मल्टी परपज हॉल बांधणे व विद्युत व्यवस्था करणे २) सर्व्हे नं.१३/१ पांझरा नदी येथे बगीचा विकसित करणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. संजय भिल — विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२७ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे मनपाचा मुलभूत सोई सुविधा अंतर्गत शासन निर्णय क्र. पूरक-२०१८ /प्र.क्र. ९८(१०) नवि १६ दि. सप्टेंबर २०१९ अन्वये १) पांझरा नदी किनारी देवपूर येथे वॉटर फॉल शौचालय बांधणे,वॉचमन क्वार्टर बांधणे, रिटेनिंग वॉल, मल्टी परपज हॉल बांधणे व विद्युत व्यवस्था करणे २) सर्व्हे नं.१३/१ पांझरा नदी येथे बगीचा विकसित करणे रु.४,३७,१४,०७२.५९/- मात्र खर्चास मंजुरी प्राप्त आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु./७४१/२०१९ दि.१३/०९/२०१९ अन्वये दि.१४/०९/२०१९ रोजीचे दैनिक दै. पुण्य नगरी/वार्ता या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.३/१०/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | श्री.सचिन पी.सनेर<br>व | शे २% जास्तीने | |
| ३<br>री | श्री. ए.बी.वाघ | शे ५% जास्तीने | |

ल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री / मे. गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे गायत्री कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दरास व खर्चास कार्यालयीन अहवालास आधीन राहुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क अन्वये मान्यता देण्यत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे.**

विषय क्रमांक :-१११ — धुळे मनपा हद्दीतील साक्रीरोड छत्रपती मेडिकल ते कालिकादेवी मंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करणेसाठी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सुनिल सोनार — विषयाला मंजुरी देणेत यावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास व कार्यालयीन अहवालास अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२८ दिनांक ०५/१२/२०१९**

धुळे मनपा हद्दीतीलसाक्री रोड छत्रपती मेडिकल ते कालिका देवी मंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करण्या संदर्भात समक्ष पाहणी केली असता सदर रस्ता सुमारे ४० वर्षापूर्वीचा रस्ता असून रस्त्याची रुंदी फक्त ४.०० मी.असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला कच्चा रस्ता अस्तित्वात आहे.सदरील रस्ता हा फारच खराब झाला असून ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहेत. व डांबरीकरणाचा पृष्ठभाग हा फारच खराब झाला आहे. त्यामुळे संपूर्ण रस्त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

दि.४ऑगस्ट २०१९ रोजी पांझरा नदीला आलेल्या पुरामुळे लहान पुलाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने सदरचा पूल वाहतुकीसाठी २ महिने बंद करण्यात आला होता. त्यामुळे संपूर्ण वाहतूक विषयांकित रस्त्यावर वळविण्यात आली होती. त्यामुळे रहदारीस मोठ्या प्रमाणात अडचणी येत होत्या. सदरील रस्त्या समुख मा.जिल्हाधिकारी, मा. उपजिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी वर्ग १ व २ चे निवासस्थाने, जिल्हा परिषद कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्टेट बँक, सिव्हील हॉस्पिटल, खाजगी दवाखाने इ.महत्वाच्या वास्तू आहेत. तसेच सदरील रस्ता हा देवपूर व शहर भागाला जोडणारा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

यावाबत दिनांक १९/११/२०१९ रोजी मा. उपायुक्त श्री. गणेश गिरी तसेच श्री.सी.एम. उगले, ओव्हरसिअर श्री. पी.डी. चव्हाण, यांच्या समवेत प्रत्यक्ष पहाणी व मोजणी केल्याप्रमाणे फक्त ९ मिटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित केला असून जेल कॉर्नर जवळ ३.५ मिटर रुंदीचे पेव्हींग ब्लॉक बसविण्यांत येणार आहे. या कामी शासकीय दरसूची एकुण ५६,३०,२३७/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातून प्रि-बजेट मधून करण्यात येणार असून सदर काम तातडीने करणेबाबत मा.महापौर यांनी आदेशित केले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहुन धुळे मनपा हद्दीतील साक्रीरोड छत्रपती मेडिकल ते कालिका देवी मंदिरापावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत रक्कम रुपये ५६,३०,२३७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यात येत आहे. संबंधित विभागाने उपमुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेल्या अभिप्राय नुसार आवश्यक ती उचित पूर्तता करावी

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ११२ — सुलवाडे कनोली जामफळ उपसा सिंचन योजने अंतर्गत येणारी (९६५ एमएम डीआय पाईपलाईन) तापी योजनेची जलवाहिनी स्थलांतरित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले

म. अमिन पटेल — सभापती महोदय, सदरच्या कामबाबत शासनासाठी निधी मिळाला आहे का ?सदरच्या कामाची निविदा ही १८ टक्के जास्तीने आलेली आहे. यासाठी आपल्याला जवळ-जवळ १ कोटी ५० लाख रु. जास्तीने द्यावे लागणार आहेत. माझ्या मते पैसे जास्त जात आहेत त्यामुळे सदरचा विषय तहकुब करणेत यावा.

म.नागसेन बोरसे — सभापती महोदय, सन्मा. सदस्यांनी शंका उपस्थित केलेली आहे तर माझी विनंती आहे. १८ टक्के जास्तीने सदर निविदा देण आपल्याला परवडणारे आहे का? इस्टीमेट कशात नेमले आहे याची माहिती मिळाली तर योग्य होईल. दोन दिवसात सभापती साहेबांच्या दालनात याबाबत एम.जी.पी.च्या अधिकाऱ्यांची मिटींग घेवुन परवडणारे आहे का? याची माहिती घेवुन निर्णय घेवु. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेत यावे.

म. सभापती — सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२९ दिनांक ०५/१२/२०१९**

सुलवाडे कनोली जामफळ उपसा सिंचन योजने अंतर्गत येणारी (९६५ एमएम डीआय पाईपलाईन) तापी योजनेची जलवाहिनी स्थलांतरित करणे.(३ री वेळ) कामाबाबत म.आयुक्त

यांचे टिपणी मंजुरीने अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६,४७,१३,१८२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्तबाबत मुख्य अभियंता,मजिप्रा विभाग,नाशिक यांचे पत्र क्र.२६.दि. २७/१२/२०१८ अन्वये रक्कम रु. ६,४७,१३,१८२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./८२२/२०१९ दि.११/१०/२०१९ अन्वये दि.१२/१०/२०१९ रोजीचे दै. लोकमत/ पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२४/१०/२०१९ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे

| अ.क्र. | कंत्राटदार/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| १ | मे.पी.पी.गोगड | शे.१८% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे. पी.पी. गोगड यांचे दर शे.१८% जास्तीनेआहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.मे.पी.पी.गोगडयांचीशे.१८% जास्तीने आलेली आहे.ठेकेदार यांना इकडील कार्यालय जाक्र./८८८/दि.१५/११/२०१९ रोजी दर वाटाघाटी साठी कळविले असता ठेकेदार यांनी दि.१६/११/२०१९ रोजी निविदेत भरलेले दर हे सन २०१९-२० च्या शासकीय दरसूची नुसार तुलना केल्यास अंदाजपत्रकीय दर येत आहे असे कळविले आहे.

उक्त बाबत निविदेतील दर सन २०१८-१९ म.जि.प्रा विभागाकडील शासकीय दरसूचीनुसार असून सध्यस्थितीत सन २०१९-२० वर्षातील म.जि.प्रा विभागाची शासकीय दरसूची लागू झालेली असून सदर दरसूचीनुसार अंदाजपत्रकाची तुलना केली असता सदरचे अंदाजपत्रक रक्कम रु.६,८३,३५,४७२/- मात्रचे आहे.त्यामुळे आपण निविदेत नमूद केलेली रक्कम रु.५,७७,७९,६२६/- असून शासकीय दरसूची रक्कम रु.१,०५,५५,८४६/- मात्रची वाढ झालेली आहे.म्हणजेच शे.१८.२६% सन २०१८-१९ व २०१९-२० च्या दरसूचीनुसार सदरच्या अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे.संबधित ठेकेदाराने दिलेले दर शे.१८%जास्तीचे सन २०१९-२० च्या शासकीय दरसूची अंदाजपत्रकीय दराने येत आहे.

उक्त विषय मान्यतेसाठी सभागृहासमोर आला असता सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर निविदा धारकांने सादर केलेल्या दराची महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाकडील दरसूचीनुसार तुलनात्मक तपासणी करावी. व पुनश्च प्रस्ताव सादर करावा तोपावेतो सदरप्रस्ताव तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे.**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर, २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शुक्रवार दिनांक १३/१२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १४ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ५ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के.एन.शिंदे | प्र. अभियंता |
| ७ | डॉ. श्री महेश मोर | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. रमजान अन्सारी | व.स. आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १४ | श्री. भटू महानर | लिपीक भांडारपाल |
| १५ | श्री.रविकिरण पाटकरी | अभिलेखापाल |
| १६ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म. सभापती — स्थायी समितीच्या सभेस अधिकारी वेळेवर उपस्थित रहात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. यापूर्वीही या संदर्भात सुचना देण्यांत आलेल्या आहेत. याबाबत गंभीरतेने नोंद घ्यावी व यापुढे बैठकीस अनुपस्थित व वेळेवर न येणा-या अधिकारी तथा कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत म. उपायुक्त यांना आदेशित करीत आहोत.

**सन्मा. सभापती यांचेकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

धुळे महानगरपालिकेचे सभागृह नेते श्री. कांतीलाल माणिक दाळवाले यांचे वडिल व माजी नगराध्यक्ष माणिकराव दाळवाले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे.त्यांना आजच्या स्थायी समिती सभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

**सुचक :- श्री. युवराज चैत्राम पाटील,**
**सभापती, स्थायी समिती मनपा धुळे**

**अनुमोदक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे , श्री सुनिल वसंतराव सोनार**

म. सभापती. — मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३० दिनांक १३/१२/२०१९**

धुळे महानगरपालिकेचे सभागृह नेते श्री.कांतीलाल माणिक दाळवाले यांचे वडिल व माजी नगराध्यक्ष माणिकराव दाळवाले यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे.

वरील सर्व मान्वरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतिव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे दु:खद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन राहून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्या श्रीमती उदासी कशीश गुलशन यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३१ दिनांक 13/12/2019**

सन्मा.सदस्या श्रीमती उदासी कशीश गुलशन यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ११३ | मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (7/11/2019, 14/11/2019) |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ दिनांक १३/१२/२०१९**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ७/११/२०१९ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ ते ११३ तसेच सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच स्थायी समिती सभा दिनांक१४/११/२०१९ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ ते ११९ क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ११४ | आरोग्य विभागाकडील सन २०१९-२० या वर्षात दि. ०१/४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु. २५ लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो.यांचे मंजुरीचे विषय मे. स्थायी समिती समोर अवलोकणार्थ सादर. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने आरोग्या विभागाकडील सन २०१९-२० या वर्षातील दि. १-४-२०१९ पासून आज पर्यतचे रु. २५ लाखापर्यतचे मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेले विषयांची अवलोकन करुन माहिती देण्यांत येईल. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३३ दिनांक १३/१२/२०१९**

सन २०१९-२० या वर्षाकरिता धुळे म.न.पा. औषध भांडार विभागाकडील दि.०१/४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु.२५ लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो. यांचे मंजुरीचे खालीलप्रमाणे विषय संबधीतास कार्यादेश देण्यात आले आहे.

1) सन 2019-20 या वर्षासाठी आयुर्वेद पंचकर्म दवाखानेसाठी आयुर्वेद औषध खरेदी.

| अ.क्रं | कार्यादेश क्रं व दिनांक | पुरवठादाराचे नाव | रक्कम. | एकुण मंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| 1 | धुमपा/औ.भांडार/102/दि.29/11/19 | मे.नागार्जुन मार्केटींग सर्व्हीस, नाशीक | 46,680/- | रु.1,21,930/- |
| २ | धुमपा/औ.भांडार/103/दि.29/11/19 | मे.नवशक्ती वितरक संघ, भुसावळ | 75,250/- | |

2) दोन प्रयोगशाळेसाठी लागणारे रसायन व साहित्य खरेदी.

| अ.क्रं | कार्यादेश क्रं व दिनांक | पुरवठादाराचे नाव | रक्कम. | एकुण मंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| 1 | धुमपा/औ.भांडार/104/दि.29/11/19 | मे.राजनिल डिस्ट्रीब्युटर, | 79,199/- | रु.3,25,704/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नाशिक | | |
| २ | धुमपा/औ.भांडार/105/दि.29/11/19 | सरीता डिस्ट्रीब्युटर, भाईंदर (ठाणे) | 1,03,518 | |

३) धुळे मनपा चे १५ ॲलोपॅथी दवाखानेसाठी सन 19-20 साठी सर्जिकल व साहित्य खरेदी.

| अ.क्रं | कार्यादेश क्रं व दिनांक | पुरवठादाराचे नाव | रक्कम. | एकुण मंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| 1 | धुमपा/औ.भांडार/106/दि.29/11/19 | मे.राजनिल डिस्ट्रीब्युटर, नाशिक | 209840/- | रु.11,20,331/- |
| 2 | धुमपा/औ.भांडार/107/दि.29/11/19 | मे.गुंजन सर्जिकल ॲण्ड सायंटिफीक कंपनी, मुंबई | 55,698/- | |
| 3 | धुमपा/औ.भांडार/108/दि.29/11/19 | मे.सरीता डिस्ट्रीब्युटर, भायंदर (ठाणे) | 246673/- | |
| 4 | धुमपा/औ.भांडार/109/दि.29/11/19 | मे. ए. एस. डिस्ट्रीब्युटर धुळे | 160762/- | |
| 5 | धुमपा/औ.भांडार/92/दि.04/11/19 | मे.गेटवेलडिस्ट्रीब्युटर,नाशिक | 28,678/- | |

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११५ स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत नागरी भागातील शौचालयाच्या सेप्टी टॅंक मधील मैल्याचे सुरक्षित व नियमित व्यवस्थापन करून मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) स्लज ड्रॉईंग बेड (एस.डी.बी) बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ सभापती महोदय FSTP बाबत संपुर्ण माहिती देण्यात यावी.

म. अभियंता महाराष्ट्र शासनाने स्वच्छ महाराष्ट्र योजनेअंतर्गत या योजना आहेत ज्या शहरांमध्ये भुमिगत गटारी योजना कार्यन्वीत नाहीत त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात FSTP या प्रकल्पांचे बांधकाम करुन तातडीने प्रकल्प पुर्ण करणेबाबत आदेशीत केलेले आहे. या योजनेअंतर्गत शौचालयांचे डिझाईन एकाच प्रकारचे स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत म.जि. प्र. मार्फत तयार करुन व त्यासाठीचे संपुर्ण अनुदान सुध्दा या प्रकल्पासाठी शासनाने दिलेले आहे.

म. संतोष खताळ टॅंक येईल का?

म. अभियंता सुरवातीला यामध्ये आपण४टॅंक भरणार आहोत.सुरवातील एक टॅंक खाली होईल. एकाखाली एक ३ हजार लिटरचा टॅंक याप्रमाणे राहील.

म. नागसेन बोरसे टॅंक वरुन बंद राहिल का?

म. अभियंता नाही वरुन टॅंक उघडे राहील.

म. अमिन पटेल ड्रेनेज लाईन ला जोडलेले राहील का?

म. अभियंता नाही आपण आज सेप्टी टॅंक खाली करण्यासाठी गाडी येते ती जशी येते तेव्हा आपण टॅंक खाली करतो आपण सॅन्टीफीक करत नाही आता ते पाणी टॅंक मध्ये खाली होईल असे चार टॅंक राहतील. पहिल्या टॅंक मध्ये खाली होईल नंतर पुढचा त्यामध्ये पाईपलाईनचा आर्धा भागापर्यंत येईल त्यानंतर त्याच्या पुढच्या टॅंक मध्ये जाईल. आणि याच्यात जो केक बनेल ते आपल्या शेतासाठी कामात येईल.

| | |
|---|---|
| म. अमिन पटेल | स्वच्छता अभियान अंतर्गत जे शौचालयांचे काम नागरीकांनी केलेले होते. त्यामधील कमीत-कमी ८०० लोकांचे पैसे बाकी आहेत. मंजुर झाले आहेत पण अजुन पर्यंत पैसे मिळाले नाहीत. |
| म. अभियंता | याबाबत माहिती बघुन सांगता येईल. कारण स्वच्छता अभियान अंतर्गत शौचालयांचे साधारण: सहा हजार लोकांना पैसे दिले. पण त्यापैकी साधारण: आठशे लोकांनी बांधकामच केले नाही. त्यामुळे शासन स्तरावरुन विचारणा होवुन पुढचे अनुदान आलेले नाही. |
| म. अमिन पटेल | माझ्या प्रभागातील काही लोकांचे प्रकरण मंजुर झाले त्याबाबत फोन आले पण निधीचा पहिला टप्पा ही अजुन मिळाला नाही. |
| म. अभियंता | सहा हजार लोकांना पैसे दिले पण ८०० ते ९०० लोकांना पहिल्या टप्याचेही बांधकाम केले नाही. म्हणुन त्यांना पैसे मिळाले नाहीत. आणि शासनाचे युटीलायजेश प्रमाणपत्र ते देवु शकले नाही त्यामुळे ते अनुदान आले नाही आणि पैसे वाटप झाले नाहीत. हे काम त्वरीत करणेसाठी सब इंजिनीयर्सला नोटीसा दिल्या आहेत. |
| म. उपायुक्त | प्रकरणे मंजुर आहेत का ? |
| म. अमिन पटेल | ज्या लोकांचे प्रकरण मंजुर आहेत त्यांना पैसे देण्यात यावे ही विनंती. |
| म.उप.मु.ले.प. | सभापती महोदय, विषय क्रमांक ११५व ११७ हे जे लेखापरिक्षण विभागकडुन प्रशासकिय मंजुरीसाठी प्रस्तावित झाले किंवा कसे याबाबत आपण विभागाला विचारावे. |
| म. अभियंता | सदरच्या विषय आमच्या विभागाकडुन म.उपायुक्त साहेब यांचेकडेस सादर करण्यात येतो त्यावर म. उपायुक्त पुढील आदेश करतात. |
| म. उपायुक्त | याबाबत वाटाघाटीसाठी टिपणी ठेवा असा शेरा होता. त्यानंतर विभागाने स्थायी समितीकडे पाठवा अशी टिपणी आली. सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे व मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीने विषय मे. स्थायी समिती पुढे सादर करणेत आला. आपण मंजुर करा त्यांनतर आपण तपासणी करुन पुढील कार्यवाही करणेत येईल. |
| म. उप.मु.ले.प. | मे.स्थायी समितीने अधिनियमाच्या अनुषंगाने मुख्यलेखापरीक्षकांचे सभापतींचे ऑडीनर्स लागतात.म्हणुन मंजुरीच्या अगोदर ही बाब मी निदर्शनास आणुन देत आहे. नंतर कुणी म्हणायला नको की, याबाबत आम्हांला माहिती नव्हते. सदरचा विषय आपण मंजुर करत असणार तर त्यात नमुद करुन आपण मान्यता देवु शकतात. |
| म. नागसेन बोरसे | सभापती महोदय,ऑडीटर साहेबांनी जो विषय उपस्थित केला आहे यावर माझी विनंती आहे हा विषय मंजुर केला नंतर त्यावर त्रुटी निघाली तर काय? परत तोच प्रश्न उपस्थित होईल. त्यामुळे ऑडीटर साहेबांचे यावर मत काय हे स्पष्ट झाल्याशिवाय हा ठराव मंजुर करु नये. कारण यानंतरही असाच एक प्रश्न परत आमच्याकडे मंजुरीला येईल त्यामध्ये मे. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही घेतलेल नाहीय. जवळ-जवळ ४७लाखांचा विषय आहे. या विषयाची निविदा काढताना ४० लाखांची काढली गेली आहे. आणि मंजुरी फिरतेय ४७ लाखांची ती कोणत्या आधारावर घेतली आहे ते ही आम्ही तपासणार आहोत. तसेच आयुक्त साहेबांना प्रशासकिय मान्यतेचे किती लाखांची परवानगी आहे याचीही माहिती मिळावी. |
| म. उपायुक्त | २५लाखापर्यंत अधिकार आहेत. मे.स्थायी समितीच्या मंजुरी शिवाय जरी ती निविदा काढली गेली असेल तरी मे. स्थायी समितीची परवानगी घेतल्यानंतरच आपण त्यांना कार्यादेश देवु. |
| म. नागसेन बोरसे | २५ लाखांपेक्षा जास्त अश्या किती विषयांवर आयुक्त साहेबांनी परवाणग्या दिल्या आहेत याबाबतही माहिती मला पुढच्या सभेत मिळावी.तसेच या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट झाले आहे का? या इमारतींचे कुढयाही प्रकारे थर्डपार्टी झालेले नाही.जर १० लाखांचे जरी प्रशासकिय |

प्रकरण असेल तरी आपण त्या कामाचे थर्डपार्टी करतो. ही १६-१७ कोटी रुपयांची इमारत झाली आहे तर यामध्ये थर्डपार्टी केले आहे का?

म. उपायुक्त — याबाबतच्या फाईल्स चेक करुन त्याबाबतची माहिती पुढच्या सभेत कळवतो.

म. नागसेन बोरसे — तसेच अग्नीशामन विभागाचीही माहिती मला मिळालेली नाही. मागच्या वेळेस जे दोन प्रश्न मी उपस्थित केले होते ४३ लोक दिल्लीत मरण पावले काल-परवा ६ लोक जळुन खाक झाले ११ तारखेला १०.३० ला पुर्ण मुंबई शहरात याच विषयावर रिपोर्ट सादर केला गेला आणि तो काल दाखविण्यात आला. आपण धुळे शहरात काय केले आठ दिवसात? याचीही माहिती मिळावी. तसेच मी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे संबधीत अधिकारी उपस्थित नाहीत.

म. सभापती — संबंधीतांना लेखी समज द्यावी.

म. नागसेन बोरसे — त्याचे सी.आर.खराब करा किंवा दंड लावण्यात यावा. तो पर्यंत विषय तहकुब ठेवणेत यावा. प्रशासन जर जबाबदार असेल तर मंजुरी देण्यास आमची हरकत नाही.

म. उपायुक्त — माझी विनंती आहे. आपण तो विषय मंजुर करावा सभापती साहेबांना विनंती राहील जो पर्यंत लेखापरीक्षण याचा अभिप्राय घेतला जात नाही तोपर्यंत आम्ही कार्यादेश देणार नाहीत. आठ दिवस द्या कार्यवाही पुर्ण करु.

म. सुनिल सोनार — साहेबांनी परवानगी घेतली आहे विषय मंजुर करणेत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास निगोसिएशन अंती आलेल्या दरास मान्यता देण्यांत येत असून खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्तावावर लेखापरीक्षण यांचे अभिप्राय घेऊनच संबंधित ठेकेदारास कार्यादेश देण्यांत यावा.

### धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१३४ दिनांक १३/१२/२०१९

धुळे शहरात मैला प्रक्रिया केंद्र (FSTP) स्लज ड्रॉईंग बेड बांधणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.25,84,520/-बाबतच्या कामाची इकडील कार्यलयामार्फत ई-निविदा सूचना क्र.43/दि.11/11/2019 रोजी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.तसेच दै.लोकमत/ पथदर्शी या वर्तमान पत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती.सदर ई-निविदेत दि.22/11/2019 रोजी तांत्रिक लिफाफा उघडणे निश्चित होते.त्यानुसार सदर कामी तांत्रिक लिफाफा उघडला असता एकूण 4 निविदा धारक यांनी विहित मुदतीत निविदा सादर केली आहे.उक्त 4 हि निविदा धारक पात्र असल्याने त्यांचे व्यापारी लिफाफा उघडला असता उक्त 4 निविदा धारक यांनी खालीलप्रमाणे निविदा दर सादर केले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारठेकेदराचे नाव/ | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | विराज कन्सट्रक्शन | शे.0.99 %कमीने | |
| 2 | आशिष एम.पटवारी | शे.0.99 %कमीने | |
| 3 | श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.1 जास्तीने% | |
| 4 | ऋषिकेश व्ही.पाटील | शे.4 जास्तीने% | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.विराज कन्सट्रक्शन व श्री.आशिष एम.पटवारीया दोनही निविदा धारकांचे दर सर्वात कमी म्हणजेचशे.0.99 % कमीनेआहे.सबब कंत्राटदार मे.विराज कन्सट्रक्शन व श्री.आशिष एम.पटवारीया दोनही निविदा धारकांचे दर सारखे असल्याने दोनही निविदा धारकांना दर वाटाघाटीस म.उपायुक्त यांच्या दालनात दरवाटाघाटीसाठी बोलविले असता ठेकेदार मे.विराज कन्सट्रक्शन यांनी दर वाटाघाटीस नकार दिला आहे.तसे पत्र त्यांनी दिले आहे.तसेच ठेकेदारश्री.आशिष एम.पटवारी

यांनी शे.1.50 % कमीने काम करण्यास तयार असल्याबाबत पत्र दिले आहे.तरी ठेकेदार श्री.आशिष एम.पटवारी यांचे दर मंजुरी करिता व अंदाजपत्रकीय दर रक्कम रु.29,48,710/- मात्रस मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास निगोसिएशन अंती आलेल्या दरास मान्यता देण्यांत येत असून खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्तावावर लेखापरीक्षण यांचे अभिप्राय घेऊनच संबंधित ठेकेदारास कार्यादेश देण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ११६ तापी पाणी पुरवठा मुख्य पाईप लाईन वरील 1) बांभळे फाटा ते मंदिरा कडील जुना महामार्ग क्र.3, 2) जामफळ तलाव जवळ 3) नगाव फटाका फॅक्टरी जवळील लिकेजेस दुरुस्ती करणेचे कामे तांतडीने करुन घेण्यांत आले. त्यासाठी झालेला खर्च रु. ५२,०२४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम (२) (२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१३५ दिनांक १३/१२/२०१९**

तापी पाणी पुरवठा योजनेचा ९६५ mm एम.एस. पाईप लाईन वरील तिन ठिकाणी लिकेजेस दुरुस्ती ची कामे करण्यात आली आहेत. दि.२५/९/२०१९ रोजी सोनगीर ते बाभळे जुना महामार्ग रस्त्यालगत व जामफळ तलाव च्या पुढे मंदिरा जवळील पाईप लाईन लिकेजेस काम रात्री पुर्ण करण्यात आले.

तसेच दि.५/१०/२०१९ रोजी नगाव येथील गंगामाई कॉलेज व फॉर्मसी कॉलेजच्या दरम्यान फटाका फॅक्टरी जवळील बटरफलाय व्हॉल च्या तळाशी असलेले मोठे लिकेज दुरूस्ती करण्यात आली.या ठिकाणी m.s.पाईप गंजण्यामुळे नवीन १०×१६ इंच १०mm पॅचवर्क चे काम करणेत आले आहे.

वरील प्रमाणे कामे तातडीच्या स्वरुपाची असल्याने आकारा एंटरप्राइझेस,धुळे यांचेकडून करणेत आले आहे. याकामी दि.२५/९/२०१९ व ५/१०/ २०१९ रोजीच्या दोन दिवसांचे कामाचे बिल रू.४६४५०/ +१२%GST असे रु.५२०२४/-मात्र आहे.सदरच्या खर्चात जनरेटरसेट भाडे डिझल सह, JCB पॅचवर्क व वेल्डींग इ. कामांचा समावेश आहे. सोबत कामांचे दिनांकित फोटो सादर आहे. सदरील खर्च योग्य व वाजवी असून सदरील खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ११७ | सुलवाडे कनोली जामफळ उपसा सिंचन योजने अंतर्गत येणारी (९६५ एमएम डीआय पाईपलाईन) तापी योजनेची जलवाहिनी स्थलांतरित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. अमिन पटेल | सदरच्या विषयाचे रेट हे १८ टक्के जास्तीने आलेले आहेत. आणि म.जि.प्र. चे अधिकारी ही आलेले नाहीत. रेट १८ टक्के जास्तीने का आलेला आहे. हे २०१८-१९ चे अंदाजपत्राकानुसार डी.एस.आर दर होते. आणि २०१९-२० चे डी.एस.आर आहेत. परंतु हे जास्तीने येत आहे. याला जबाबदार कोण? आज आपण टिपणीमध्ये लिहतो पंरतु हे जास्तीने आहे ते एक कोटीने जास्त जात आहेत. |
| म. अभियंता | सदरचे काम पाटबंधरी विभागाकडुन महानगरपालिकेमार्फत केले जाणार आहे. याकामासाठी जो निधी उपलब्ध होणार आहे तो पाटबंधारे विभागामार्फत होणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी सन २०१८-१९ च्या डी.एस.आर नुसार केलेले होते. आजच्या परिस्थीतीनुसार हे अंदाजपत्रक साधारण: ६ कोटी ८३ लाखांचे आहे. आणि आपली निविदा ६ कोटी ८१ लाखासाठी दिलेली आहे. त्यामुळे सदरची निविदा अंदाजपत्रकीय दराने आहे. शेवटी निर्णय समितीने घ्यावा. |
| म. अमिन पटेल | विषय मंजुर करणेत यावा. |
| म. नागसेन बोरसे | अभियंता साहेबांच्या खुलासा नुसार विषय मंजुर करणेत यावा. कारण हे पैसे जामफळ धरणाचे पैसे आलेले आहेत. त्यामुळे पालिकेवर आर्थिक बोजा येणार नाही. म्हणुन विषय मंजुर करण्यास हरकत नाही. तसेच स्टार रँकींगचा जो स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम चालु आहे धुळे शहरामध्ये जे शौचालय आहेत त्यांचे दुरुस्तीची आपण टेंडर काढले पाहीजे ते पण कामाचे होते ते का काढले गेले नाही. दीड महिन्यांनंतर स्टार रँकींग ची कार्यवाही संपणार आहे तर स्वच्छतेसाठी आपण काय केले फक्त ठेकेदाराला आपण आदेश दिले आहे काम करा. जर उद्या वर्तमान पत्रात बातमी आली कोणत्याही निविदा न काढता कामे झाली आज १५ दिवस झाले तर कोणत्या प्रकारची कार्यवाही केली दुरुस्तीसाठी यावर. |
| म. उपायुक्त | अभियंता यांनी खात्री करुन आठ दिवसाच्या आत निविदा काढा. |
| म. नागसेन बोरसे | आजच्या परिस्थीतीला जवळ-जवळ प्रत्येक शौचालयामध्ये ७० ते ८० हजारांच्यापुढे कामे आहेत. पुर्ण धुळे शहराचे एक कोटी रुपयांचा खर्च आहे. म्हणजे काम यांनी करायचे आणि निविदा दुसऱ्याने घ्यायची असा प्रकार झाला तर काय करायचे. |
| म. उपायुक्त | जे किरकोळ कामे आहेत ते त्यांनी करावी. सेप्टी टँक ज्या फुटलेल्या आहेत असे काम निविदा काढुन करावी. |
| म. नागसेन बोरसे | याबाबत सर्व्हे केला आहे का? |
| म. उपायुक्त | याबाबत आयुक्त साहेबांसोबत चर्चा झाली. आयुक्त साहेबांनी याबाबत आदेश दिले आहेत ४ दिवसांपुर्वी मिटींग झाली. लवकरात लवकर निविदा काढु. यावर चर्चा झाली सर्व डॅमेज शौचालयांचे काम तात्काळ करु. |
| म. नागसेन बोरसे | ज्यानी शौचालय चालवायला घेतले त्यांनातुम्ही आदेश देवुन टाकले शौचालय रिपेअरिंग बाबतचे. |
| म. उपायुक्त | त्यांना फक्त किरकोळ दुरुस्ती सांगितली आहे. |
| म. नागसेन बोरसे | किरकोळ म्हणजे १००० रु. खालची ना फक्त. दर महिन्याला १००० रु. मेन्टंनंस जाते त्यांचे बिल चेक करुन घ्या. त्याचे एक तरी बिल दाखवा की त्यांनी एका महिन्याला मेन्टंनंस दाखविले नाहीत. मग कोणते १२००० रु. होता ते दर महिन्याला बिल काढुन घेत आहेत |

आपल्याकडून तुम्ही कोणत्या आधारावर सांगत आहात की वर्ष भराचा आपण १२००० रु. मेन्टंनंस देतो असे. त्यांनी बिले घतले आहेत पण काम केले नाही. आठ दिवसाच्या आत निविदा काढा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३६ दिनांक १३/१२/२०१९**

सुलवाडे कनोली जामफळ उपसा सिंचन योजने अंतर्गत येणारी ( 965 एम.एम. डीआय पाईप लाईन ) तापी योजनेची जलवाहिनी स्थलांतरित करणे ( 3 री वेळ ) कामाबाबत म. आयुक्त सो.,यांचे टिपणी मंजुरीने अन्वये कामा बाबत रक्कम रु.6,47,13,182/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत अभियंता , मजीप्रा विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.26 दि.27/12/2018 अन्वये रक्कम रु.6,47,13,182/- मात्र खर्चास तांत्रिक मन्जुरू मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./ 822 दि.11/10/2019 अन्वये दै. लोकमत /पुण्य नागरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.24/10/2019 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.पी.पी. गोगड | शे.18% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून त्यात श्री/ मे.पी.पी. गोगड यांचे 18% जास्तीने दराने आलेले होते. त्यानुसार दि.05/12/2019 रोजी मे.स्थायी समिती पुढे दर मंजुरी साठी विषय सादर करण्यात आला होता. या बाबत चर्चा होवून सदरचे दर महा. जी.प्रा.विभागाकडील सन 2019-20 च्या शासकीय दरसूचीनुसार तुलना करून सादर करणे बाबत म.सभापती सो., यांनी आदेशित केलेले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शासकीय दरसूचीनुसार तपासणी केली असता उक्त कामाची निविदा रक्कम रु.5,77,79,626/- मात्रची सन2018-19 च्या महा. जी.प्रा. विभागाच्या शासकीय दरसूचीनुसार असून सन2019-20 च्या महा.जी.प्रा. दरसूचीनुसार सदरचे अंदाजपत्रक रु.6,83,35,472/- मात्रचे आहे. म्हणजेच सदर दरांमध्ये रक्कम रु.1,05,55,846/-मात्र म्हणजेच शे.18.26% मात्रची वाढ झालेली आहे.निविदा धारकाने भरलेले दर शे.18%जास्तीचे सध्या अस्तित्वात असलेले सन2019-20 च्या दरसूचीनुसार विचार करता अंदाजपत्रकीय दराने आहे. यामुळे श्री.पी.पी.गोगड यांचे आलेले दर रक्कम रु.6,81,79,958/- (18% जास्तीने) मात्रला म. अभियंता यांच्या अभिप्रायानुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 क अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. `

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शनिवार दिनांक २१ डिसेंबर, २०१९**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शनिवार दिनांक २१/१२/२०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री.सोनार सुनिल वसंतराव | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ५ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ६ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ७ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ८ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ९ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| १० | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ११ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| १२ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १३ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १४ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १५ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १६ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री. दिपकांत वाघ | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ३ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ५ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के.एन.शिंदे | अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. प्रदीप नाईक | लेखापाल |
| १० | श्री. युवराज बाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १३ | श्री. भटू महानर | लिपीक भांडारपाल |
| १४ | कु. कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १५ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १६ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |
| १७ | श्री. विशाल निंबाळकर | वृक्ष समिती विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — या बैठकीत स्थायी समितीच्या पुढील नियुक्त तथा रचनेबाबत सदस्यांना माहिती देण्यांत येते की.विद्यमान स्थायी समिती सभापतीची निवड दिनांक 18/2/2019 रोजी झालेली होती. त्यामुळे नियमानुसार सद्यस्थितीतील सदस्यांची मुदत दिनांक 1/2/2020 रोजी दुपार पर्यत राहणार आहे. नियमानुसार जानेवारी महिन्यांच्या पहिल्या स्थायी समितीच्या विशेष बैठकीत 8 सदस्य चिठ्ठी काढून निवृत्त करावे लागतील. व ज्या गटाचे सदस्य निवृत्त होतील त्या गटाच्या सदस्यांची निवड जानेवारी महिन्यांच्या पहिल्या महासभेत गट नेत्यांकडून नांवे मागवून केली जाईल.तदनंतर सभापती पदाच्या निवडीसाठी प्रस्ताव म.विभागीय आयुक्त नाशिक यांच्या कडेस सादर करण्यांत येईल व त्यांच्या निर्देशानुसार सभापती निवडीची बैठक घेण्यांत येईल.

म. नागसेन बोरसे — मागील बैठकीत अनुपस्थित अधिका-यांवर कारवाई करण्यांचा निर्णय घेण्यांत आला होता. सदरची बाब दर बैठकीस चर्चेसाठी येते परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. मग स्थायी समितीच्या बैठका घेवून उपयोग काय ? जर उपायुक्तांना कारवाई करण्यांचे अधिकार नसतील तर आयुक्तांना स्थायी समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यांसाठी कळवावे. या आधीही आस्थापना प्रमुख श्री. नारायण सोनार यांच्या अनुपस्थितीबाबत मी मुद्दा उपस्थित केला होता.त्यावेळेस ते न्यायालयीन कामकाजानिमित्त बाहेर असल्याची माहिती देण्यांत आली होती. तथापि मी स्वत: सी.सी. टी.व्हीचे फुटेज चेक केले असता ते मनपा कार्यालयात उपस्थित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.माझ्याकडे सर्व पुरावे आहेत.श्री. सोनार हे जाणून बुजून बैठकीस अनुपस्थित असतात. मी त्यांना मागितलेली माहिती देण्यांस देखील टाळाटाळ करीत आहेत. मी ऑडीट रिपोर्ट तसेच त्यांच्या नियुक्ती संदर्भातील कागदपत्रे मागितली होती परंतु ती देखील मला मिळालेली नाहीत. त्यांची नियुक्ती बेकायदेशीर आहे. त्यांच्या नियुक्तीबाबत लेखा आक्षेप आहेत. मी या विरुध्द कोर्टात जाणार आहे.श्री. सोनार जोपर्यत त्या पदावर आहेत. तोपर्यत मला कागदपत्रे व माहिती मिळणे शक्य नाही. त्यांची ताबडतोब त्या विभागातून बदली करावी व त्यांच्या अनुपस्थितीबाबत कडक कार्यवाही करावी.तसेच मी यापूवी अग्नीशमन विभागाची माहिती मागितली होती सदर माहितीही मला मिळालेली नाही तसेच मनपा वाहनांना डिझेल किती लागते याची माहिती मला देण्यांत यावी.

म. उपायुक्त — श्री. सोनार यांच्या अनुपस्थितीबाबत आपण त्यांना नियमानुसार नोटीस देऊन खुलासा मागवू व त्यांना बैठकीस उपस्थिती देणेबाबत आदेशित करु. तसेच अग्नीशमन विभागाबाबत आम्ही संबधितांशी चर्चा केलेली असून लवकरच त्याबाबत कार्यवाही करण्यांत येत आहे. आणि डिझेल बाबत विचारलेली माहिती आपणास लेखी स्वरुपात देण्यांत येईल.

म.अमिन पटेल — आपण झालेल्या लोक अदालत मध्ये शास्ती माफीची योजना राबविली होती. परंतु अद्यापही अनेक मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कराची थकबाकी प्रलंबीत आहे. आपण त्यावेळेस एकाच दिवसाची मुदत दिल्याने अनेकाकडे आर्थिक सोय नसल्याने थकीत मालमत्ता कर भरता आला नाही. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे ठरावीक मुदत देऊन थकीत मालमत्ता कर धारकासाठी पुनश्च शास्ती अभय योजना लागू करावी त्यामुळे मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच वाढीव मालमत्ता धारकांसाठी 6 वर्षांची कर आकारणी करण्यांत येते त्या ऐवजी प्रशासनाने 2 किंवा 3 वर्षाची कर आकारणी केल्यास महानगरपालिकेचा फायदा होणार आहे.तसेच शहरात व आमच्या प्रभागात घंटागाडी वेळेवर येत नाही. शहरातील कचरा संकलनाची स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याबाबत यापूर्वी चर्चा झालेली आहे. तथापि त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यावर कार्यवाही करावी व शहराचे चार भाग करुन चार वेगवेगळे ठेकेदार नियुक्त करावे. तसेच आमच्या प्रभागात आजही 10 ते 12 दिवसानंतर पाणी येते. व पथदिवेही मोठया प्रमाणा बंद आहेत. यावर तांतडीने कार्यवाही करावी.

म. संजय भिल — कचरा ठेकेदाराने कचरा वाहतूक व संकलनासाठी टॅक्टर व वाहने लावलेली आहेत. त्या वाहनांचा विमा काढलेला आहे का?त्यांच्या एकाही वाहनाचा विमा नाही. तसेच टॅक्टरवर असलेल्या टॉलीचे पार्सीग नाही.व वाहनावर नंबर नाही.तसेच रेडीयम देखील लावलेले नाही. नुकताच वरखेडी येथील एका युवकाचा मोठा अपघात झाला. कचरा ठेकेदाराच्या बेजबाबदार पणामुळे महानगरपालिकेची बदनामी झाली यावर तातंडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे.

म. रावसाहेब पाटील — यापूर्वी स्थायी समितीच्या बैठकीत मोकाट जनावरांवर कार्यवाही करण्यांचा निर्णय घेण्यांत आला होता. परंतु कोणतीही कार्यवाही दिसून येत नाही. आमच्या मोराणे गावातही मोकाट जनावरांचा मोठा प्रश्न आहे. यावर कार्यवाही करावी.तसेच स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिकांना मालमत्ता करात सुट देण्यांचा शासन निर्णय आहे. परंतु महानगरपालिकेमार्फत यावर कोणतीही कार्यवाही केली गेलेली नाही. याचा निर्णय कधी होणार याची माहिती द्यावी.

म. संतोष खताळ — माजी सैनिकांना व सैनिकांना मालमत्ता करात सुट देण्यांबाबतचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.आपले जवान देशाच्या सिमेवर आपले रक्षण करीत आहेत. त्यामुळे सदर बाबतीत प्रशासनाने तांतडीने कार्यवाही करावी.तसेच शहरातील मोकाट कुत्रयांचा प्रश्नही गंभीर होत आहे. आमच्या प्रभागात शाळा नं.28जवळ कुत्रयांचे टोळके फिरत आहेत. यावरही तांतडीने प्रशासनाने कार्यवाही करावी.

म. उपायुक्त — कचरा ठेकेदाराला निष्काळजीपणाबद्दल दंड आकारलेला असून त्यांना नियमाप्रमाणे नोटीस देऊन त्यांच्यावर कारवाई करण्यांत येत आहे. तसेच मोकाट जनावरांवर कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यांना पकडून पांझरा पोळ येथे जमा करण्यांत येत आहे.गुरे मालकानी दंड भरुन गुरे सोडवून नेलेली आहेत.आपल्या मोराणे गावांतही याबाबत कार्यवाही करण्यांची दक्षता सहा.आरोग्याधिकारी यांनी घ्यावी व त्याप्रमाणे पथक नियुक्त करावे. व मोकाट कुत्रयांबाबतही कार्यवाही करावी. तसेच माजी सैनिकांच्या मालमत्ता करात सुट देण्याबाबत शासन निर्णय तपासून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**सही/- x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ( ५/१२/२०१९ )

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील सभेचे इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर१३७ दिनांक २१/१२/२०१९**

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर 120 ते 129 दिनांक05/12/2019 अखेर क्रमशः वाचून तसेच स्थायी समिती सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११९ आरोग्य विभागाकडील सन २०१९-२० या वर्षात दि. ०१/४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु. २५ लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो.यांचे मंजुरीचे विषय मे. स्थायी समिती समोर अवलोकणार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने आरोग्य विभागाकडील सन २०१९-२० या वर्षात दि. ०१/४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु.२५ लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेले कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

**धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर१३८ दिनांक २१/१२/२०१९**

सन २०१९-२० या वर्षाकरिता धुळे म.न.पा. औषध भांडार विभागाकडील दि. १/०४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु. २५ लाखपर्यंतचे मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने खालीलप्रमाणे संबधीत ई-निविदाधारकास कार्यादेश देण्यात आले आहे.सदर माहिती मे.स्थायी समिती समोर अवलोकणार्थ

१)सन २०१९-२० या वर्षासाठी धुळे मनपाचे १६ॲलोपॅथी दवाखान्यांसाठी दैनंदिन लागणारी औषधे खरेदी.

| अ.क्रं | कार्यादेश क्रं व दिनांक | पुरवठादाराचे नाव | रक्कम. | एकुणमंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| 1 | धुमपा/औ.भांडार/116/दि.11/12/19 | मे.सरीता डिस्ट्रीब्युटर,भायंदर (ठाणे) | 274932/- | रु. 7,65,506/- |
| 2 | धुमपा/औ.भांडार/117/दि.11/12/19 | मे. गेटवेल डिस्ट्रीब्युटर, नाशिक | 63,403/- | |
| 3 | धुमपा/औ.भांडार/118/दि.11/12/19 | मे. ए. एस. डिस्ट्रीब्युटर धुळे | 98,380/- | |

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १२० धुळे म.न.पा.अंतर्गत हद्दवाढीत समावेश दहा गावांतील बोअरींग हातपंप रीपेअरिंग करणेचे काम तांतडीने श्री.गजानन शिवराम गायकवाड याचे कडुन करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास

मंजुरीसाठी व रु.१,१०,८३१/-खर्चास व कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर१३९ दिनांक २१/१२/२०१९**

धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत समावेश दहा गावातील हातपंप दुरुस्ती करणेचे काम हे श्री. गजानन गायकवाड यांनी केलेली होती. त्यास मा.आयुक्त साहेब यांनी दि. १९/१०/२०१९ रोजी आर्थिक मान्यता दिलेली होती.

तसेच त्या कामास मा. उपायुक्तसाहेब यांनी दि. १/१०२०१९ रोजी जा.कं. धुमपा/ पा.पु.वि/ ३९ दि१/१०/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली होती.

त्यानुसार सदरचा विषय मे. थायी समितीकडे ५(२)(२) अन्वये कार्योत्तर मंजुरीस ठेवण्यांत आले व सदरचा विषय धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. ११७ दि. १४/११/२०१९ अन्वये तहकूब करण्यांत आलेला होता.

परंतु सदरचा विषय पुन्हा मे. स्थायी समितीत ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार त्या ठेकेदाराने ज्या ज्या गावात हातपंपाचे कामे केलेली आहे. त्यांचे फोटो व यादी दिलेली असून त्यानुसार चितोड,अवधान, पिंप्री, मोराणे, वलवाडी अशा गावात एकुण १८ हातपंप दुरुस्त झालेले आहे. त्याबाबतची संपूर्ण माहिती, तेथील नागरीकांच्या सहया,फोटो वगैरे जोडले आहे.

सदरचे काम वीना निविदा श्री. गजानन शिवराम गायकवाड यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२) (२)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व रु.१,१०,८३१/- खर्चास व कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १२१ — धुळे शहरात महात्मा गांधी चौक चेथे ४५मिटर हायमस्ट पोल व राष्ट्रध्वज बसविणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर १४० दिनांक २१/१२/२०१९**

मनपा निधी अंतर्गत धुळे शहरातील महात्मा गांधी चौक येथे 45 मीटर पोल उभारून त्यावर राष्ट्रध्वज बसविणे,कामी अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.48,74,400/-मात्रला मे.स्थायी समिती ठराव क्र.76. दि.29-8-2019 नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार म.अभियंता यांची जा.क्र /ता.मा./323.दि.5-11-2019 नुसार तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार सदर कामी ई-निविदा कार्यवाही करण्यात आली असून,सदर निविदेत तीन मक्तेदारांनी ऑनलाईन सहभाग घेतला आहे.सदर मक्तेदारांचे कागदपत्र

पळताळणी केली असता,त्यामधील एक मक्तेदाराचे "A class" PWD लायसन्स नसल्याने त्यांना अपात्र करण्यात आले.महाराष्ट्र शासन/ सा.बा.विभाग/ शासन निर्णय/ सिएटी/2017/ प्र.क्र.08/इमा-2.दि.27-9-2018 मधील 4.3 नुसार दोन निविदा प्राप्त ठरत असतील तर कालापव्यय होऊ नये म्हणून,दोन प्राप्त निविदा उघडण्यात यावीत असे निर्देश आहेत.त्यानुसार उर्वरित दोन मक्तेदारांचे दर उघडण्यात आलेअसून,त्यात सर्वात कमी दराची निविदा मे.यश इलेक्ट्रोलाईन, पुणे यांची म्हणजेच अंदाजपत्रकाच्या 0.75% ने कमी असून सदर निविदेत L१ मक्तेदार मे.यश इलेक्ट्रोलाईन,पुणे हे आहेत. याबाबत म. उप. मु.ले. यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे.यश इलेक्ट्रोलाईन, पुणे यांचे आलेले दर अंदाजपत्रकाच्या 0.75%ने कमी दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 क अन्वये कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २ जानेवारी, २०२०**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक०२/०१/२०२०रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ६ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ७ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ८ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ९ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १० | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ११ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १२ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन.शिंदे | प्र. अभियंता |
| ८ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. प्रदीप नाईक | लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १४ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १५ | श्री. पराग प्रदीप ठाकरे | क.अभियंता |
| १६ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १७ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. विशाल निंबाळकर | अभिलेखापाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| २० | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| २१ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |
| २२ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्या श्री सुनिल वसंतराव सोनार व सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४१ दिनांक ०२/०१/२०२०**

सन्मा.सदस्या श्री. सुनिल वसंतराव सोनार व सौ.सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १२२ — सन २०१९-२० या वर्षात दि.०१/०४/२०१९ पासुन आजपर्यंतचे रु.२५ लाखापर्यंतचे मा.आयुक्त सो. यांचे मंजुरीचे विषय मे. स्थायी समिती समोर अवलोकणार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमीन पटेल — 2 महिन्यापूर्वी शहरात डेग्युची साथ सुरु असतांना आम्ही स्थायी समिती सभेत प्रश्न उपस्थित करुन प्लेट लेट मशिन खरेदी करणेबाबत सुचना केल्या होत्या. शहरात अनेक गोरगरीब नागरीकांना सदर तपासण्याकरण्यासाठी मोठया प्रमाणावर पैसे मोजावे लागत होते.मनपाने सदर मशिन खरेदी केल्यामुळे अनेक गोरगरीब जनतेचा पैसा वाचत आहे. याबद्दल मा. आयुक्त साहेब,आरोग्याधिकारी यांचे मी अभिनंदन करतो.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या वतीने प्रस्तावास सहमती आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४२ दिनांक ०२/०१/२०२०**

सन २०१९-२०या वर्षाकरिता धुळे म.न.पा. औषध भांडार विभागाकडील दि. 01/04/2019 पासुन आजपर्यंतचे रु.25 लाखपर्यंतचे मा.आयुक्त सो. यांचे मंजुरीने खालीलप्रमाणे शासनाचे GeMपोर्टलवरील संबधीत निविदाधारकास कार्यादेश देण्यात आले आहे.

1) शासनाचे GeM पोर्टल वरुन डेंग्यु आजार व इतर आजाराचे रक्त तपासणीसाठी आवश्यक Automated Haematology Analyser (3 Part) 3 नग खरेदी.

| अ.क्र | कार्यादेश क्रं व दिनांक | पुरवठादाराचे नाव | रक्कम. | एकुण मंजुर रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १ | धुमपा/औ.भांडार/१२२/दि.१८/१२/१९ | मे.ट्रान्सएशीयाबायो-मेडिकल लिमि. | ६,९३,०००/- | **रु.६,९३,०००/-** |

सदर माहिती मे. स्थायी समिती समोर अवलोकणार्थ सादर करण्यांत आलेला आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १२३ धुळे म.न.पा.अंतर्गत सन २०१९-२० या वर्षा करिता जलशुद्धीकरण केंद्रावर ॲलमचा पुरवठा करणेचे कामाबाबत ई निविदा दर मागविण्यात आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्यासहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४३ दिनांक ०२/०१/२०२०**

धुळे म.न.पा.अंतर्गत सन २०१९-२० या वर्षा करिता जलशुद्धीकरण केंद्रावर ॲलमचा पुरवठा करणेचे कामाबाबत ई निविदा क्रमांक ०३ जा. क्र. धुमपा / पापुवी / १२६ दिनांक १०/०५/२०१९अन्वये दिनांक ११/०५/२०१९ रोजी दैनिक मर्डर या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.त्या नुसार दि. २७/०५/२०१९पर्यंत निविदा दर मागविण्यात येऊन त्यात तीन (३) निविदा धारकांनी भाग घेऊन खालील प्रमाणे दर सादर केलेले आहे.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | ॲलम ग्रेड-1 | ॲलम ग्रेड -4 | ॲलम लिक्विड |
|---|---|---|---|---|
| 1) | विक्रम केमिकल्स | रु. 7,350/- प्रतीमेटन | 9,980/- प्रतीमेटन | 8,570/- प्रतिमेटन |
| 2) | अलमाटी केमिकल्स | रु. 7,299/- प्रतीमेटन | 9,900/- प्रतीमेटन | 8,500/- प्रतीमेटन |
| 3) | मे.महालक्ष्मी ट्रेडिंग कंपनी | रु. 6,450/- प्रतीमेटन | 9,100/- प्रतीमेटन | 4,200/- प्रतीमेटन |

वरील तकत्यानुसार सर्वात कमी निविदा दर महालक्ष्मी ट्रेडिंग कंपनी यांचे असून मा. तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.रेखाराव साहेब यांनी चांगल्या प्रतिचे ग्रेड-4ॲलम खरेदी करणेबाबत सूचना केल्यानुसार, महाशय उपायुक्त साहेब यांनी 17/10/2019 रोजी मंजुरी दिली होती. त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांनी दि.20/11/2019 रोजी उक्त दराबाबत वाटाघाटीसाठी आदेशित केल्याप्रमाणे जा.क्र./धुमपा/पापुवी/895 /दि.21/11/2019 अन्वये मे.महालक्ष्मी ट्रेडिंग कंपनी यांना पत्र देण्यात आले.

त्यानुसार त्यांनी दिनांक21/11/2019 रोजी मा.आयुक्त साहेब यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे ॲलमचे दर सूचित केलेले आहे.

१) ॲलम ग्रेड-१—रु.५,९०० प्रति मे टन

२) ॲलम ग्रेड-४--रु.८,८०० प्रती मे टन

३) ॲलम लिक्विड रु.४,१०० प्रती मे टन

उक्त प्रमाणे आलेल्या कार्यालयीनअहवालासअधिन राहून मे. महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी यांनी निगोसिएशन अंती सादर केलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ क अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २ जानेवारी, २०२०**
**वेळ दुपारी १२-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज गुरुवार दिनांक ०२/०१/२०२० रोजी दुपारी १२-०० वाजता **मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ६ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ७ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ८ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| ९ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १० | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ११ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १२ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिपकांत वाघ | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन.शिंदे | प्र. अभियंता |
| ८ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. प्रदीप नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १४ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १५ | श्री. पराग प्रदीप ठाकरे | क.अभियंता |
| १६ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १७ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. विशाल निंबाळकर | अभिलेखापाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| २० | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| २१ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |
| २२ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्या श्री सुनिल वसंतराव सोनार व सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४४ दिनांक ०२/०१/२०२०**

सन्मा.सदस्या श्री. सुनिल वसंतराव सोनार व सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय कमांक:- १२४ धुळे महानगरपालिकेच्या हद्द (वाढीव हद्दवाढसह)मधील सर्व प्रकारच्या मालमत्ता यांचे मालमत्ताधारक यांचे मालमत्ता कर व इतर अनुषंगिक सर्व प्रकारचे कर यांचे पुर्नमुल्यांकनाचे काम बाहय यंत्रणेकडून करुन घेण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नगरसचिव याबाबत मा. उपायुक्त साहेबांना विनंती करेल की त्यांनी या विषयाची पार्श्वभुमी पहिले सभागृहाला विषद करावी.

म. उपायुक्त सन्मा. सभागृह धुळे शहरात २००१-०२ पासुन पुर्ण चर्तुवाढ ची आकारणी अजुन झालेली नाही. याबाबत २००७-०८ मध्येही प्रयत्न करण्यात आलेला होता परंतु त्यावेळेस प्रयत्न असफल झाला. म्हणुन यावेळेस संपुर्ण शहर हद्दवाढीसह सर्व मालमत्ता करांचे सर्वेक्षण

मोजमाप जी.आय.एस पध्दतीने करणार आहोत असे आमचे धोरण आहे. हे काम आपण एका संस्थेमार्फत करणार आहोत आणि संस्थेमार्फत सर्व घरांचे मोजमाप करणार आहोत ते संपुर्ण संगणकीय पध्दतीने करणार आहोत जेणेकरुन यात कोणतीही मालमत्ता सुटायला नको. यामध्ये जर दुमली बांधकाम असेल आणि खाली दुकान आणि वर रहिवास तर या सगळयागोष्टींचा विचार करुन मोजमाप करण्यात येणार आहे. यासाठीचा शासन निर्णय आपल्याकडे आलेला आहे त्यानुसार आपण निविदा काढणार आहोत.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, यामध्ये आपण ज्या संस्थेला कामाचे पैसे देणार आहोत ते पैसे मालमत्तेच्या आधारावर देणार आहोत की चौरस फुटाच्या आधारावर पेमेंन्ट करणार आहोत.

म. उपायुक्त — सन्मा. सभागृहाने जर विषयाला मान्यता दिली तर त्यानुसार आपण निविदा काढणार आहोत. परंतु बहुतेक ते पर प्रॉपर्टी राहणार आहे.

म. नागसेन बोरसे — तसेच कार्यालयीन टिपणीत सगळया गोष्टींचा उल्लेख आहे परंतु निविदा धारकाने निविदा भरावयाची कशी याबाबत माहिती दिलेली नाही.

म. उपायुक्त — आपण निविदा काढतांना पर प्रॉपर्टी चे दर मागविणार आहोत. यामध्ये शासकिय रेट नाहीत.

म. नागसेन बोरसे — समजा आपल्या शहरात एकुण मालमत्ता धारक ९० हजार तर आपण संस्थेला पैसे देतांना प्रॉपर्टीच्या हिशोबाने देणार आहोत की चौरसफुटाच्या हिशोबाने देणार आहोत याबाबत निविदेत नमुद करावे व सदरचा विषय मंजुर करणेत यावा.

म. उपायुक्त — आपण पर प्रॉपर्टीची निविदा काढणार आहोत. यामध्ये निविदा भरतांना निविदाधारक दर देणार आहे.आता पर्यंत मी इतर नगरपालिकेच्या निविदांचाअभ्यास केला तर त्या महापालिकांमध्येही पर प्रॉपर्टीच निविदा काढण्यात आल्या आहेत.

म. सुभाष जगताप — सभापती महोदय,असाच विषय सन २०१५-१६ मध्येही तत्कालीन आयुक्त भोंगळे साहेब असतांना झाला होता. माझी एक सुचना आहे हा विषय चांगला आहे यामुळे वसुलीही चांगली होणार आहे परंतु गेल्या वेळेस जी संस्था होती तिच्याकडुन गैरप्रकार होत होते.म्हणुन नविन संस्थेला निविदा देतांना आपण १०० घरांचे मुल्यांकन केल्या नंतर त्या मालमत्तांची फेर तपासणी मनपाच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी. विषय मंजुर करणेत यावे.

म. उपायुक्त — याबाबतच्या अटी शर्ती आपण निविदेत समाविष्ट केल्या आहेत. त्यानुसार मागील अनुभव लक्षात घेवुन त्यात आवश्यक ती सुधारणा व दुरुस्ती करणेबाबत आपण दक्षता घेणार आहोत.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४५ दिनांक ०२/०१/२०२०**

सन २००७-०८ या वर्षात शासन निर्णयानुसार शहरातील सन १९९२-९३ पासुन पुर्नमुल्यांकन न झालेल्या पुर्वीच्या सर्व जुन्या मालतत्तांवर ४०% वाढ करुन मालमत्ताधारकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ते तरतदीनुसार कार्यवाही पुर्ण करुन मागणी देयके देणेत आलेले होते.

सन १९९२-९३ पासुन शहरातील संपुर्ण मालमत्तांचे फेर आकारणीची कार्यवाही करणेत आलेली नाही. सन १९९६-९७ व सन २००१-०२ या वर्षात संपुर्ण शहरातील फेर आकारणीचे काम हाती घेणेत आले असता तत्कालीन प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी उपलब्ध न झाल्याने फक्त नविन मालमत्तांचे कर आकारणीची कार्यवाही करणेत आलेली आहे. तसेच सन २००४-२००५ या वर्षात फक्त नवीन मालमत्तांचे कर निर्धारणाचे काम करणेत आलेले आहे.

धुळे शहरात सदयस्थितीत जवळ-जवळ १५ ते २० हजार नविन मालमत्तांची वाढ झालेली असुन त्यांचेवर कर आकारणी टप्या टप्याने प्रचलीत दराने आकारणी सुरु आहे.

तसेच सन २००७-०८ या वर्षात सन १९९२-९३ नंतरच्या व २००१-०२ पुर्वीच्या मालमत्तांचे पुर्नमुल्यांकन करणेत येवुन ४०% कर आकारणीत वाढ करणेत आलेली आहे. तथापी धुळे शहरातील ब-याच जुन्या मालमत्तांवर नव्याने वाढीव बांधकाम करणेत आले आहे. व येत आहे त्यावर ११ कलमी कार्यक्रमांतर्गत प्रचलीत दराने सदयस्थितीत आकारणी करणेचे काम सद्यस्थित चालु आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(२) चे स्पष्टीकरणामध्ये महानगरपालिकेने भांडवली मुल्य हा आधार, समजुन मालमत्ता कर बसविण्याचा स्विकार केल्यानंतर , करयोग्य इमारतीच्या संबंधातील मालमत्ता करामधे, प्रत्येक पाच वर्षानंतर सुधारणा करण्यात येईल आणि अश्याप्रत्येक सुधारणेनंतर , अशी मालतत्ता कराची रक्कम, कोणत्याही बाबतीत सुधारणा केल्याच्या वर्षाच्या लगतपुर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ताकराच्या रकमेच्या ४० टक्क्याहुन अधिक असणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे.

तथापी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमात दर चार वर्षांनी रिव्हीजन करणे बाबत अशी कोणतीही तरतुद अधिनियमात नाही.

त्यानुसार धुळे महानगरपालिका ठराव क्रमांक ९४ दि.२०/०२/२०१५ अन्वये ४०% पेक्षा जास्त वाढ करता येणार नाही. कर योग्य मुल्य २६% वरुन ३६% करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही सद्यस्थितीत सुरु आहे.

त्यानुसार सन २०१५-१६ पासुन नवीन व वाढीव बांधकाम तसेच जुने पाडुन नविन बांधकाम करणेत आलेल्या मिळकतींना वरील प्रमाणे दर आकारुन सद्दस्थितीत आकारणी सुरु आहे.

सद्यपरिस्थीती मालमत्ता कर विभाग एकुण ६१ डिमांड असुन प्रत्येकी चार डिमांड प्रमाणे १५ मालमत्ता कर लिपीकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या पुर्वी जनरल पुर्नमुल्याकंन / रिव्हीजन करतांना शहराचे एकुण ४ भाग पाडुन दर वर्षाला १ भागाचे रिव्हीजन करण्यात येते असे आजच्या स्थितीत जनरल रिव्हीजन करावयाचे असल्यास शहराचा झालेला विस्तार बघता तसेच शासनाच्या आदेशानुसार हद्दवाढ होऊन नविन ११ गावांचा समावेश झाल्याने सदर गावंातील मालमत्ताचे सर्व्हेक्षण हि करावे लागणार आहे. त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असणार आहे. सद्यस्थितीत मालमत्ता कर विभागातील मनुष्यबळ लक्षात घेता जनरल रिव्हीजन करणेसाठी बराच अवधी लागेल. फक्त शहराचे रिव्हीजन करावयाचे झाल्यास आजच्या ६१ डिमांड प्रमाणे प्रत्येकी डिमांड रजिस्टरला साधारणत: ३ कर्मचारी प्रमाणे १८३ कर्मचारी आवश्यकता आसणार आहे.

मालमत्ता कराचे चर्तुथ वाषिक कर पुर्ननिधारणाची कार्यवाही करणेबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे क्रं.नप्राप/2019/E GOV/GIS/ शुध्दीपत्रक / कक्ष 08 /532 दिनांक 20/12/2019 रोजीचे म.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई 30 यांचे परिपत्रकानुसार सदर निविदा प्रक्रिया फक्त सर्व्हेक्षण व मॅपींग बाबत असल्याने ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कर पुर्न निर्धारण प्रलंबीत आहे, तसेच जीआरएस आधारीत सर्व्हेक्षण व मॅपींग करण्यांचे काम सुरु झालेले नाही, किंवा अपूर्ण आहे, त्यांनी त्यांच्या प्रचलीत पध्दतीने मालमत्ता सर्व्हेक्षण करुन (जीआरएस पध्दतीचा वापर न करता ) कर पुर्ननिर्धारण करणेस काही हरकत नाही.

याबाबत उपमुख्यलेखापरिक्षक यांनी प्रस्तावासंदर्भात १ ते १७ मुद्दे निहाय अभिप्राय नोंदविलेले असून सदर अभिप्रायांतील नमूद मार्गदर्शक निर्देशाप्रमाणे कार्यवाहीची पूर्तता करुन धुळे महानगरपालिकेच्या हद्दी मधील (वाढीव हद्दीसह) सर्व प्रकारच्या मालमत्ता यांचे मालमत्ताधारक यांचे मालमत्ता कर व अनुषंगिक बाबी यांचे पुर्नमुल्यांकनाचे काम बाहय यंत्रणेकडून करुन घेण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच याबाबत पुढील निविदा प्रक्रिया तथा कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे अवगत करावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ९ जानेवारी, २०२०**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक ०९/०१/२०२० रोजी सकाळी ११-००वाजता मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्रीमती बागुल लक्ष्मी दिनेश | सदस्या |
| ६ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ७ | श्रीमती उगले सुरेखा चंद्रकांत | सदस्या |
| ८ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ९ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| १० | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ११ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १२ | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| १३ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| १४ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १५ | श्री.पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के.एन.शिंदे | प्र. अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ८ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. विशाल निंबाळकर | अभिलेखापाल |
| १७ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्या श्री सुनिल बसंतराव सोनार यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४६ दिनांक ०९/०१/२०२०**

सन्मा.सदस्या श्री. सुनिल बसंतराव सोनार यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-१२५ — धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्यांची दिनांक ०१/०२/२०२० रोजी एक वर्षाची मुदत पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(४) अन्वये निम्मे (आठ) सदस्य चिठ्ठी टाकून निवृत्त करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन करुन कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.तदनंतर सोळा सदस्यांच्या नावांच्या चिठ्ठयांचे वाचन करुन एक एक चिठ्ठीची सर्वासमक्ष घडी करुन पारदर्शक असलेल्या कांचेच्या बरणी मध्ये 16 चिठ्ठया टाकण्यांत आल्या. सर्व चिठ्ठयांचे एकत्रित भरणी हलविण्यांत आली.तदनंतर लहान मुलगा चि.शौर्य गिरीष चव्हाण यांचे हातून एक- एक आठ चिठी याप्रमाणे 8 वेळा चिठ्ठया काढण्यांत आल्यांत व ज्यांच्या नावाच्या चिठ्ठया निघाल्या त्यांची नांवे सभागृहात वाचून दाखविली ती याप्रमाणे आहेत.

| अ.क्रं | नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | उगले सुरेखा चंद्रकांत | भारतीय जनता पार्टी |
| २ | बोरसे नागसेन दामोदर | भारतीय जनता पार्टी |
| ३ | भिल संजय शत्रुघ्न | भारतीय जनता पार्टी |
| ४ | अन्सारी सईदा म. इकबाल | एमआयएम |
| ५ | शेख शाहजहान बी बिसमिल्ला | नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ६ | बागुल लक्ष्मी दिनेश | भारतीय जनता पार्टी |
| ७ | पाटील रावसाहेब आनंदराव | भारतीय जनता पार्टी |
| ८ | जगताप सुभाष सुकलाल | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |

म. सभापती अधिनियमातील तरतुदीनुसार सद्यस्थितीत असलेल्या स्थायी समिती सदस्यांची एक वर्षाची मुदत दिनांक ०१/०२/२०२० रोजी दुपारी पूर्ण होत आहे. सदर सदस्यापैकी नियमाप्रमाणे वरील निम्मे सदस्य म्हणजे 8 सदस्य निवृत्त होत आहेत.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७ दिनांक ०९/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीनंतर पहिली सभा दिनांक २/२/२०१९ रोजी झालेली होती. सदर सभेतील धुळे मनपा ठराव नं. २ दिनांक २/२/२०१९ अन्वये स्थायी समितीवर १६ सदस्यांची कलम २०(२)नुसार नेमणूक करण्यांत आलेली होती.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३)अन्वये खालील प्रमाणे तरतूद आहे.

स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिला सभा ज्या महिन्यांत भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.

तसेच पोट कलम २०(४) प्रमाणे पोट कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोट कलम (२) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोट कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीच्या सभापती ठरवील अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यांत येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील याप्रमाणे तरतूद आहे.

उक्त तरतूदीनुसार सत्र सन्मा.सदस्यांच्या उपस्थितीत आवश्यक त्या प्रक्रियाव्दारे आठ सदस्यांच्या नांवाची चिठ्ठी निघाल्यामुळे खालील सदस्य स्थायी समिती मधून दिनांक १/२/२०२० रोजी दुपारी निवृत्त होत आहेत.


| अ.क्रं | नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | उगले सुरेखा चंद्रकांत | भारतीय जनता पार्टी |
| २ | बोरसे नागसेन दामोदर | भारतीय जनता पार्टी |
| ३ | भिल संजय शत्रुघ्न | भारतीय जनता पार्टी |
| ४ | अन्सारी सईदा म. इकबाल | एमआयएम |
| ५ | शेख शाहजहान बी बिसमिल्ला | नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ६ | बागुल लक्ष्मी दिनेश | भारतीय जनता पार्टी |
| ७ | पाटील रावसाहेब आनंदराव | भारतीय जनता पार्टी |
| ८ | जगताप सुभाष सुकलाल | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |

तसेच स्थायी समितीत कायम राहिलेल्या ८ सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्रं | नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | पाटील विमलबाई गोपीचंद | भारतीय जनता पार्टी |
| २ | सोनार सुनिल वसंतराव | भारतीय जनता पार्टी |
| ३ | खताळ संतोष छगन | भारतीय जनता पार्टी |
| ४ | देवरे सुरेखा भागवत | भारतीय जनता पार्टी |
| ५ | पाटील युवराज चैत्राम | भारतीय जनता पार्टी |
| ६ | उदासी कशिश गुलशन | भारतीय जनता पार्टी |
| ७ | मन्सुरी मुख्तार कासिम | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ८ | पटेल अमीन अब्दुल करीम | समाजवादी पार्टी |

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १२६ धुळे महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन बाजार फी वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे सभापती महोदय, संबंधीत विषय आम्हांला समजुन घ्यावयाचा आहे की काय आहे याबाबत माहिती द्यावी.

म. किशोर सुडके बाजार वि. सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, सदर विषय हा सन २०१८-१९ मध्ये स्थायी समितीने निश्चीत केलेल्या ३२ लाख ५० हजार रकमेवर ३ वेळेस निविदा काढली होती. परंतु तीन वेळेस निविदा काढुनही प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे महापौर व आयुक्त साहेबांशी चर्चा झाली परत विषय निविदे पर्यंत आला परंतु याबाबत इतर मनपाची मंजुरी घेतली असता अहमदनगर, मालेगाव, जळगाव या ठिकाणी येथे १० रु. ऐवजी २० रु. फी आहे तेथे १ कोटी ५४ लाखाला सदर ठेका देण्यात आलेला आहे. नगरला ३६ लाखात दिलेला होता परंतु तांत्रिक अडचणी मुळे तो रद्द होवुन कर्मचारी वसुल करीत आहेत. आपण उत्पन्न वाढीसाठी १०रु. ऐवजी १५ किंवा २० रु. करणेबाबत स्थायी समितीने निर्णय घ्यावयाचा आहे. आणि जी रक्कम निश्चित होईल त्यानंतर ऑनलाईन सर्व्हेक्षणाचे काम सुरु होईल. ती संख्या निश्चित झाल्यानंतर प्रकल्प विभागामार्फत संपुर्ण फेरीवाल्यांचे ११ हद्दवाढ क्षेत्रासह सर्व्हेक्षण होणार आहे. फक्त दरवाढी संदर्भात हा विषय आलेला आहे.

म. नागसेन बोरसे मनपाला यामधुन दर महा किती उत्पन्न मिळते?

म. किशोर सुडके बाजार वि. मनपाला यामधुन दरमहा साधारणता १.७५ ते २ लाखापर्यंत उत्पन्न मिळते.

म. नागसेन बोरसे आपल्याकडे किती लोकांची नोंदणी केलेली आहे.

म. किशोर सुडके बाजार वि. १५०० लोकांचे अर्ज आलेले होते.

म. नागसेन बोरसे म्हणजे १५ हजार रु. उत्पन्न रोजचे अपेक्षित आहे. आपण कर्मचाऱ्यांना रोजचे किती वेतन देतो.

म.किशोर सुडके बाजार वि.कर्मचाऱ्यांना रोजचे ४ ते ५ हजार वेतन देतो आणि आपले रोजचे उत्पन्न ६ ते ७ हजार आहे.

म. नागसेन बोरसे तुम्ही किती वेळेस या कर्मचाऱ्यांनी वसुली केल्यानंतर क्रॉस चेकींग केली?

म. किशोर सुडके बाजार वि. अधुन मधुन महिन्यातुन किंवा दोन महिन्यातुन करीत असतो. माझ्या विभागात मी आणि अजुन दोन लिपीक कर्मचारी कार्यालयीन कामकाजासाठी आहेत आणि मुळात ७ कर्मचारी आवश्यक आहेत. याबाबत वारंवार आस्थापना विभागाकडे कर्मचारी वर्गाची मागणी करुन सुध्दा आम्हांला कर्मचारी मिळत नाहीत. बाजार विभागात विविध सहा प्रकारच्या योजना आहेत.

म. नागसेन बोरसे या मध्ये कोणत्या सहा योजना आहेत.

म. किशोर सुडके.बाजार वि. १.कॅबीन जागा भाडे २. दुकान भाडे ३. IDMST भाडे४.स्लम जागा भाडे ५. स्लम खोली भाडे ६. दैनंदिन बाजार फी या सहा योजना बाजार विभागात आहे.

म. नागसेन बोरसे आपल्याकडे एकुण गाळे किती?

म. किशोर सुडके बाजार वि. एकुण ६०० गाळे आहेत त्यात काही घरे ही आहेत स्लम वस्ती मध्ये दिलेले असे एकुण १८०० आहेत.

म. नागसेन बोरसे यांच्याकडुन आपण कर वसुल करीत असतो का? प्रति दिवस की वार्षीक

म. किशोर सुडके बाजार वि. वार्षिक कर वसुली करत असतो.

म. नागसेन बोरसे देवपुर आणि मोगलाई परिसरात वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव काय?

म. किशोर सुडके बाजार वि. भामरे नावाचा कर्मचारी आधी कार्यरत होत आता सद्यस्थितीत दुसरा कर्मचारी देण्यात आला आहे.

म. नागसेन बोरसे आपण सभा संपल्यावर जावुन देवपुर भागातील लॉरी धारक व पथारी वाले मोजु.

म. किशोर सुडके बाजार वि. याबाबत आपण त्यांना वेळोवेळी नोटीसा काढल्या आहेत मागच्या वर्षी देवुपर भागातील एका कर्मचाऱ्याला निलंबीतही केले होते. आणि वेळोवेळी मी अहवाल वरिष्ठांकडे सादर करीत असतो.

म. नागसेन बोरसे मी सगळयासमोर आरोप करीत आहे धुळे शहरात जुने धुळे भागात राहणारा माणुस पुर्ण धुळे शहरात कलेक्शन करीत असतो आणि माजी नगरसेवकांकडे आर्धी रक्कम जाते आणि आर्धी रक्कम मनपाकडे येते. मी पत्रकार बांधवांना आवाहन करतो की जो बाजार विभागाकडुन वसुली करायला कर्मचारी येईल त्याचे आयकार्ड चेके करुनच पैसे द्यायचे. ही जाहिरात वर्तमान पत्राच्या माध्यमातुन प्रसिध्द व्हायला पाहिजे. १५ रु. फी करण्यात यावी आणि विषय मंजुर करण्यात यावा.

म. अमिन पटेल सभापती महोदय, हॉकर्स झोन कोठे निश्चित करण्यात आले आहेत उदा. पाचकंदील, देवपुर जेथे मनपाची मंजुरी आहे असे कोणते आहेत. जेथे फेरीवाले बसु शकतील आणि मनपाची परवानगी असेल ते भाग कोणते?

म. किशोर सुडके बाजार वि. हॉकर्स झोन संदर्भात नगरपथ समितीची स्थापना केली होती नगरपथ समितीने उपसमिती नेमली उपसमितीने मे. महासभेपुढे अहवाल सादर केला मे. महासभेने अहवालास मान्यता दिली त्याप्रमाणे बैठक झाली त्यात झोन ठरविले होते परंतु त्यात काही फेरीवाले लोकांनी आक्षेप घेतले म्हणुन पुन्हा बैठक झाली त्याच संदर्भात २ जानेवारीलाही बैठक झाली संपुर्ण धुळे शहरात हॉकर्स नो हॉकर्स करण्याबाबत काही अर्ज येतील शिवाय आपले फेरीवाल्यांबाबत सर्व्हेक्षण अपुर्ण आहे. याबाबत २ जानेवारी रोजी निर्णय घेण्यात आला

की, देवपुर विभागापासुन सुरुवात करायची त्यात जसे होईल त्याप्रमाणे इतर विभागात कार्यवाही होईल.

म. अमिन पटेल — महासभेत जो ठराव मंजुर केला आहे त्यात मामलेदार कचेरी पासुन ते मच्छिबाजार पर्यंत हॉकर्स झोन मंजुर आहेत तेथे लोक ब-याच दिवसापासुन व्यवसाय करीत आहेत आता तुम्ही दर वाढीचा विषय करीत आहात जर कुणाच्या दुकानासमोर यांनी गाडी लावली तर ते हकलावुन लावतात मनपाचे अतिक्रमण विभाग सामान जप्त करते तर फक्त कर घ्यायचा आणि सुविधा द्यावयाच्या नाहीत का? आज धुळे शहरात उद्योग नाहीत जे अतिक्रमण आहे त्यांना उठविलेच पाहिजे परंतु कमीत कमी जे हॉकर्स झोन निश्चित केलेले आहेत त्यांना तेथे जागा द्या. मुंबई शहरात मोठ मोठया बाजारात दुकानांच्या पुढे भाजीवाल्यांची दुकाने आहेत. धुळे एवढे मोठे शहर नाहीय ज्यांना रोजगार नाही ते लोक आपला उदरनिर्वाह कसा भागवतील जर दुकानदाराला त्रास होत असेल तर त्यांचे मत एकले पाहिजे.

म. किशोर सुडके बाजार वि. — सदर समितीमध्ये आयुक्त साहेब, उपायुक्त, व्यापारी असोशिएशन चे अध्यक्ष, पोलिस अधिक्षक, पोलिस निरिक्षक, नगररचनाकार यांचाही समितीमध्ये समावेश आहे आणि हे सर्व अधिकारीवर्ग याबाबत निर्णय घेतात.

म. अमिन पटेल — फेरीवाले आणि दुकानदारांचा विचार करुन जे हॉकर्स झोन मंजुर झालेले आहेत त्यांना एक पट्टा बांधण्यात यावा. फेरीवाले किंवा दुकानदार याचे पालन करणार नाही त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच मच्छिबाजारातील जे मच्छिमार्केट तुटलेले आहे ते लोक कर भरत होते. मच्छिबाजारा संदर्भात जे कोटेशन तयार केले होते त्यामध्ये पुढे जे १५ फुटाच्या ओट्याची जागा पोलिस खात्याने घेतली आहे. मनपाने याबाबत जो अहवाल तयार केलेला आहे त्यात ओटा बनवुन त्यांना ८०० रु.भाडे असेल तर मी एकहजार वसुल करेल परंतु त्यांचा रोजगार संपवु नका. महापालिकेने त्यांना जागा दिलेली आहे त्यांच्यावर अन्याय करु नका. दुस-या शहरांमध्ये बाजाराच्या बाजुला मच्छिबाजार आहेत असे खुप शहर आहेत. जर सहा महिन्यात मच्छि बाजारातील लोकांना तेथे ओटा बनवुन देण्यात आला नाही तर मी धरणे आंदोलन महानगरपालिकेत करणार आहे.जे ५०-६० लोक मच्छी विकरणारे बसतात ते वर्षानुवर्ष कर भरत आहेत तरी ओटा बांधण्यात येत नाहीत याबाबत खुलासा करणेत यावा.

म. उपायुक्त — हा हॉकर्सझोन चा विषय आहे. याबाबत अभियंता यांनी चौकशी केल्यानंतर कार्यवाही करु.

म. सभापती — अभियंता यांनी जागा बघुन कार्यवाही करावी.

म. अभियंता — म. सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, जे मच्छिबाजार पोलिसस्टेशन आहे तेथील पुर्ण जागा शासकिय जागा आहे महासभेच्या ठरावानुसार ती जागा हस्तांतरण करण्यात आलेली आहे. व उर्वरीत जागा रस्त्यांपैकी जागा असल्याने आपल्याला ओटे बांधता येणार नाहीत. यासाठी आपले शिष्ट मंडळ तत्कालीन आपले जिल्हाधिकारी, तत्कालीन पोलिस अधिक्षक यांच्याकडे समक्ष तीन वेळेस बैठका पण झाल्या याबाबत पर्यायी व्यवस्था म्हणुन समोरच्या मार्केटमध्ये ओटे करुन देणेबाबत ठरले होते परंतु त्या

लोकांची तेथे सहमती नसल्याने ते काम झालेले नाही. पुढील कार्यवाही सभागृह ठरवेल त्या प्रमाणे निर्णय घेवु.

म. अमिन पटेल — महानगरपालिकेची जागा आहे त्यांना ओटे बनवुन देण्यात यावेत.जर मध्ये त्यांना ओटे बांधुन दिले तर त्यांचा व्यवसाय चालणार नाही. मामलेदार कचेरी तर मच्छिबाजारापर्यंत होकर्स झोन ला महासभेने मंजुरी दिलेली आहे. तेथे त्यांना ओट बनवुन मिळावे. तसेच फेरीवाल्यांचा सर्व्हे करा ४ ते ५ हजार फेरीवाले आहेत जो पर्यंत हॉकर्स झोन घोषित झालेल्या जागांवर सुविधा देत नाहीत तो पर्यंत फी वाढ करण्यात येवु नये माझा या विषयाला विरोध आहे.

म. नागसेन बोरसे — १५ रुपयांची वाढ करुन व ४×६ पेक्षा जास्त गाळे असेल तर दुप्पट कर लावण्यात यावा विषय मंजुर करावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा लक्षात घेता सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रति दिन ४ x ६ च्या जागेस रु. १५/- व ४ x ६ पेक्षा जास्त जागा व्यापली असल्यास त्यास दुप्पट दर लागू करणेच्या प्रस्तावास श्री. अमीन पटेल यांनी विरोध दर्शविला असल्याने सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४८ दिनांक ०९/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ नुसार स्थायी समिती ठराव क्र.१४० दि.३०-१२-२०११ अन्वये वसुली जा.क्र./ १६४/ दि.२५-१-२०१२, दि. १-२-२०१२ नुसार निश्चित केलेल्या प्रती रू. १०/- मात्र दराप्रमाणे बाजार फी वसुली करीत आहे.

बाजार विभागात कर्मचारी संख्या कमी आहे. फेरीवाले सकाळ, दुपार, रात्रीच्या सत्रात असतात. म.न.पा. हद्दवाढ सह संपुर्ण क्षेत्रात कर्मचारी वसुली करीता वेळेत जाऊ शकत नाही, काही ठिकाणी फेरीवाले अपशब्द वापरतात, दादागिरी करून फी देत नाही.

बाजार फी वसुलीचा ठेका दिल्यास उत्पन्न ही वाढेल तसेच सध्या कार्यरत कर्मचारी ईतर विभागात वर्ग करण्यांत येईल.स्टेशनरी सह ईतर खर्च कमी होईल म्हणुन सन २०१५-१६ मधील फेरीवाला सर्व्हेक्षण संख्या १५०० X १०, कर्मचारी पगार व ईतर खर्च वजा करून रू.३६.९८ मात्र ह्या रकमेस सन २०१८-१९ मध्ये स्थायी समितीने निश्चित केली व म. आयुक्त सो. यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निविदा रक्कम रू. ३२.५० लक्ष ३ वेळा ई ऑक्शन निविदा काढण्यांत आली. मात्र कोणीही निविदेत भाग घेतला नाही.

यावर्षी देखील निविदा काढणे प्रस्तावित आहे.तसेच उत्पन्न वाढ देखील आवश्यक आहे म्हणुन सहा.आयुक्त यांचे निर्देशानुसार नगर.मालेगाव, जळगांव (लोकसंख्या जवळपास सारखी आहे) चौकशी केली असता,

**अ**. जळगाव महानगरपलिकेने बाजार शुल्क दर प्रति विक्रेता ४ बाय ६ साठी रू. २० प्रमाणे व पुढे त्या पटीत अशी आहे त्यानुसार दै.बाजार ई निविदा २ वर्षासाठी रू. १,५४,००,०००/- मात्र रकमेस दिली आहे.पुढील वर्षी १०%वाढ रू.१,६९,४०,००० मात्र रकमेवर दिला आहे.

**ब.** मालेगांव महानगरपालिकेने प्रती दिवस रू. १०दराप्रमाणे एक वर्षासाठी रू.४७,००,००० मात्र ची देकार निविदा स्थायी समिती ठराव क्र.६० दि.२२-१-२०१८नुसार मंजुरी दिली त्यानुसार एका वर्षासाठी ठेका दिला आहे.

**क.**अहमदनगर येथे दै.फी वसुली ठेका रू.३६लाख मात्र दिला असता काही तांत्रिक कारणामुळे ठेका रद्द करण्यांत आला. सध्या कर्मचारी मार्फत वसुली करित आहे.तेथे दिवसा दै. फी प्रत्येकी रू. १० व रात्रीसाठी प्रती रू. १५ अशी आहे.

धुळे म.न.पा.ने सन २०१५-१६ मध्ये खाजगी कंपनी मार्फत सर्व्हेक्षण केले त्यात १५०० नोंदणी झाली मात्र अपुर्ण सर्व्हे झालेला आहे.सध्या हद्दवाढ गावासह म.न.पा.प्रकल्प विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने सर्व्हेक्षणाचे काम प्रस्तावित आहे त्यामुळे फेरीवाले संख्या निश्चित होईल मात्र त्यास कालावधी लागेल.

इतर महानगरपालिके प्रमाणे धुळे म.न.पा. चे देखील उत्पन्नवाढीसाठी व दै. बाजार फी निविदा काढणेसाठी रक्कम निश्चित होणेकरिता धुळे म.न.पा.हद्दीतील बाजार शुल्क महानगरपालिकेच्या जागेवरती त्यांच्या दुकानासमोर किंवा ओटयावरून किंवा ओट्याबाहेर मात्र ठेऊन जे दुकानदार विक्री करतील त्यांचेकडुन बाजार शुल्क आकारतांना जळगांव म.न.पा. प्रमाणे फी वसुल करतांना हातगाडीच्या तसेच जागांचे क्षेत्र चार बाय सहा (४ X६) या सुत्रानुसार वसुल करण्यांत यावी तसेच काही विक्रेत्यांनी जागा त्यापेक्षा जास्त प्रमाणात व्यापली असल्यास त्या पटीनुसार ते बाजार शुल्क आकारणी बाबत प्रस्ताव सभा पटलावर आला असता उपस्थित सदस्यांची केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल यांचा विचार करता सन्मा. सदस्य श्री. अमिन पटेल यांनी शुल्क वाढीबाबत विरोध नोंदविलेला असून त्यांचा विरोध नोंदवून दैनंदिन बाजार फी चार बाय सहा क्षेत्रासाठी (४ X६) साठी दररोज रुपये १५/- अक्षरी पंधरा रुपये व त्यापेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रासाठी प्रत्येकी रु.३०/- मात्र बाजार फी शुल्क आकारणी करणेस बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**बहुमताने मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक २९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी, २०२०**
**वेळ दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शुक्रवार दिनांक ३१/०१/२०२० रोजी दुपारी ४-०० वाजता मा.श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ६ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ७ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ८ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ९ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १० | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| ११ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १२ | श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ३ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ४ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| ५ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. रमजान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| ८ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| ९ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ११ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. विशाल निंबाळकर | अभिलेखापाल |
| १३ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १४ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १५ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |
| १६ | श्री. सुक्राम आत्या राऊत | मोटार वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार, श्री. सुभाष सुकलाल जगताप, सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१४९ दिनांक ३१/०१/२०२०**

सन्मा.सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार, श्री. सुभाष सुकलाल जगताप, सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१२७ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(१३/१२/२०१९, २१/१२/२०१९,२/१/२०२०, ९/१/२०२०)

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, गेल्या वर्ष भरात आम्ही ज्या मागण्या केल्या आहेत त्यांची कुठलीही पुर्तता झाली नाही. नारायण सोनार यांच्या बदली व्यतिरिक्त एकही मागणी आमची पुर्ण झालेली नाही. इतिवृत्त वाचुन कायम करणे हा विषय आहे परंतु एकही इतिवृत्त वाचले जात नाही.

म. नगरसचिव — सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करितो की, इतिवृत्त वाचुन कायम करणे याचा अर्थ इतिवृत्त प्रत्येक सदस्याला विषय पत्रीकेसोबत देण्यात येते ते तुम्ही वाचले असे गृहीत धरण्यात येते .

म. नागसेन बोरसे — मी नारायण सोनार यांच्या निलंबनाची मागणी केलेली होती त्यांची फक्त बदली करण्यात आलेली आहे. कामामध्ये हलगर्जी पणा केल्यामुळे निलंबीत करण्यात यावे अशी मागणी केली होती. परंतु प्रशासनाने फक्त त्यांची बदली केलेली आहे. त्यांची बदली का करण्यात आली आणि जी चौकशी सुरु आहे त्याबाबतची माहिती मिळावी.

म. उपायुक्त — आपण मागीतलेली माहिती त्यांच्या अधिपत्याखाली होती व त्यामुळे ते सदर पदावर असतांना चौकशी करता आली नसती म्हणुन त्यांची बदली करण्यात आली आहे. आणि आता आपल्या तक्रारी बाबत चौकशी करण्यात येणार आहे. व त्यानंतर नियमाप्रमाणे निलंबणाची कार्यवाही करण्यात येईल.

| | |
|---|---|
| म. नागसेन बोरसे | चौकशी कोणत्या आधारावर आणि कोणत्या अधिकाऱ्या मार्फत करण्यात येणार आहे? |
| म. उपायुक्त | आपले जे अर्ज आले आहेत त्यावर म.आयुक्त साहेब अधिकाऱ्याची नेमणुक करणार आहेत. |
| म. नागसेन बोरसे | दि.०४/०१ ला मी पत्र दिलेले आहे आज पर्यंत मला त्याबाबत माहिती मिळाली नाही. तसेच ३०/११ ला जे महापालिकेचे कांड केलेले आहे त्याबाबत मी पत्र दिले आहे त्याचीही चौकशी लावण्यात यावी. तसेच मागासवर्गीय कक्षाला नोटीस देण्यात आली आहे. त्यांचे मत आहे की ज्या दिवशी आर.व्ही. पाटील निवृत्त झाले त्यादिवसापासुन त्यांची नियुक्ती झाली. त्यांनतर त्यांनी स्थायी समितीमध्ये विषय घेतला होता की भोगंळे साहेबांच्या काळात मलेरिया फिल्ड वर्कर जागेसाठी ३ जागांची जाहिरात काढुन ४ लोकांची नियुक्ती करण्यात आली होती त्यामध्ये श्रीमती निकम मॅडम बेकायदेशीर आहेत असे त्यांचे मत आहे परंतु ज्यावेळेस चौकशी सुरु होती त्यावेळस त्यांनी शासनाला काय शासीत केले याबाबतची माहिती मिळावी आणि इतिवृत्त कायम करावे. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५० दिनांक ३१/०१/२०२०**

मागील स्थायी समिती ठराव नंबर १३० ते १३६ दिनांक १३/१२/२०१९ अखेर इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती ठराव नंबर १३७ ते १४० दिनांक २१/१२/२०१९ अखेर इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती ठराव नंबर १४१ ते १४५ दिनांक ०२/०१/२०२० अखेर इतिवृत्त तसेच सभागृहात सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती ठराव नंबर १४६ ते १४८ दिनांक ०९/०१/२०२० अखेर इतिवृत्त तसेच सभागृहात सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१२८ | तापी पाणी पुरवठा मुख्यवाहिनी वरील तापी पाणी पुरवठा मुख्य वाहिनी वरील दि. २७/११/२०१९,दि.३०/११/२०१९,दि.४/१२/२०१९,दि.१५ व दि.१६/१२/२०१९ रोजी केलेल्या दुरुस्ती कामाकरीता व खर्च रू.३,४१,३८४/- मात्र कार्योत्तर मंजुरी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. रावसाहेब पाटील | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५१ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे शहर तापी पाणी पुरवठा योजनेच्या सुखवद रॉ.वॉटर पंपींग ते एम.बी.आर पर्यंत च्या रॉ वॉटर प्युअर वॉटर पाईप लाईन (१०००mm) वर आकस्मित उद्भवलेल्या गळती दुरुस्तीची कामे तातडीने लगेच करून घेण्यात आली आहेत.सदरील लिकेजेस दुरूस्तीचा त्या कामी खर्चाचा तपशील प्राथमिक बिलासह सोबत सादर आहे.तसेच या कामांचे फोटो ही जोडले आहेत.

उक्त बाबत तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | दिनांक | दुरुस्ती कामाचा तपशिल | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दि.२७/११/२०१९ | १) सारवे गावाजवळ (राम मंदिरा जवळ)<br>२) जुनी हिरा हॉटेल जामफळ तलाव ठेकेदार यांचे घराजवळ लिकेजेस वेल्डींग करणे. | रु.३३,३२०/- |
| २ | दि.३०/११/२०१९ | १) स्वोजस डेअरी जवळ,सरवड फाटा,मॅन्होल नवीन बसविणे | रु.५८,९१२/- |
| ३ | दि.४/१२/२०१९ | १) दिलीप पाटील यांचे शेता मध्ये सावळदे गाव,येथे भुमिगत पाईप लाईन दुरुस्ती.<br>२) सुखवद पंपींग पासून ३००,मीटर अंतरावर मॅन्होल वेल्डींग करणे | रू.५१,८००/- |
| ४ | दि.१५/१२/२०१९<br>दि.१६/१२/२०१९ | १) सत्तार सेठ यांचे शेताजवळ, सोनगीर जुना आग्रारोड<br>२) जुना आग्रारोड,जामचा मळा व्हॉल्व वरील टेलपिस.<br>३) सोनगीर बारी जवळ लिकेज.<br>४) जामफळ तलाव रस्त्यावर चेंबर मधील जॉईंट वरील लिकेज.<br>५) चुना फॅक्टरी जवळ,भुमिगत पाईप वरील दुरुस्ती.आग्रारोड सोनगीर लिकेज दुरुस्ती करणे.तसेच या जिर्ण पाईप लाईनवर ४.५मी लांबीचे कॉक्रीट फिलींग ब्लॉक टाकणे. | रु.१,९७,६५२/- |

वरील प्रमाणे तापी पाणी पुरवठा मुख्य लाईन वरील आकस्मित उदभवलेल्या लिकेजस् दुरुस्तीची कामे करणेत आली आहेत. सदर कामे तातडीच्या स्वरूपाची असल्याने कालमर्यादेत करण्यात आली आहेत. सदर कामे आकाश एंटरप्रायजेस, धुळे यांचे कडून योग्य रित्या पुर्ण करुन घेण्यात आली असून याकामी एकत्रीत खर्च **रु.3,41,384 /-**आहे.

पाणी पुरवठा केंद्र येथील निगा व दुरुस्ती कामी रक्कम रु.२ कोटी मात्र तरतूद सन २०१९-२०२० चे अंदाज पत्रकानुसार आहे.सद्यास्थितीत लेखा शिर्षावरील तरतूद संपली असून सन २०१९-२०२०चे सुधारीत अंदाजपत्रकात रु.५०लक्ष वाढ सुचविली आहे. तथापी सदर काम तातडीचे असल्याने करवून घेण्यात आली असून या १ ते ४ दिनांकात खर्च **रु.3,41,384 /-** करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५(२)(२) प्रमाणे खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१२९ अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे योजने अंतर्गत नविन अग्निशमन वाहन फोम टेंडर खरेदी करणे करीता आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देणे व सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो.यांचे कडेस सादर करणेस व तांत्रीक मंजुरी देणे तसेच प्रस्ताव मा.संचालक सो.

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,मुंबई यांचे कडेस सादर करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

| | |
|---|---|
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. संतोष खताळ | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५२ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका,धुळे सन २००३या वर्षात अस्तित्वात आलेली असुन सद्यास्थितीत धुळे शहराची लोक संख्या ४ लक्ष आहे. शहराचा विस्तार -१०१.०८ चौ. कि.मी. आहे. धुळे महानगरपालिका अग्निशमन विभागा कडेस सद्यास्थितीत एकुण ०६अग्निशमन वाहने आहेत. शहराचा वाढता विस्तार व वाढती लोकसंख्या लक्षात घेता एक नविन अग्निशमन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. शिरपुर वाघाडी येथील केमिकल कंपनीत आग विझविणे करीता फोम टेंडरची आवश्यता असल्याने धुळे मनपा येथे फोम टेंडर उपलब्ध नसल्याने एच.ए.एल., नाशीक ओझर येथुन फोम टेंडर मागविण्यात आले होते. सदर आगीची घटना बघता धुळे शहरा करीता १ फोम टेंडर खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच संदर्भ (१) शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय विभागांना तसेच महानगरपालिका /नगरपालिका / जिल्हापरिषद /अंगिकृत व्यवसाय / स्वायत्त संस्था व शासनाच्या मालकीची व नियंत्रणा खालील असलेली कोणतीही संस्था यांना गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस या वेब पोर्टलच्या माध्यमातुन दि.०१/१२/२०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी धोरणातील तरतुदींचा अवलंब करुन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस या वेब पोर्टल नुसार टाटा मोटर्स लि.,मुबई मॉडेल एल.पी.टी. १६१८वाहन चेसीस खरेदी करणे करीता रुपये १६,२०,०००/-मात्रचा (जि.एस. टी. करासह) खर्च येणार आहे.सदर चेसिस वर अग्निशमन वाहन फोम टेंडर बॉडी बांधणी करीता रुपये८५,४९,०००/-मात्रचा अंदाजीत खर्च येणार असुन महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भा.ख. स. २०१४ प्र .क्र.८३ भाग ३ उद्योग / ४ दि. १ डिसेंबर २०१६ मधील ९ (३.२.३.) मध्ये नमुद नुसार अग्निशमन वाहन फोम टेंडर बॉडी बांधणी करीता ई निविदा पध्दतीचा अवलंब करावा लागणार आहे.नविन अग्निशमन वाहन फोम टेंडर खरेदी करणे करीता एकुण रुपये१,०१,६९,०००/- मात्रचा खर्च येणार आहे. संदर्भ पत्र क्र. ०२ नुसार अग्निशमन योजना (जिल्हा वार्षीक योजना)अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता रुपये १,०२,००,०००/- मात्रची अर्थ संकल्पीय तरतुद नमुद आहे.

अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे योजने अंतर्गत नविन अग्निशमन वाहन फोम टेंडर खरेदी करणे करीता कार्यालयीन अहवालास अधिन राहून आर्थीक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो. यांचे कडेस सादर करणेस व तांत्रीक मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मा.संचालक सो.महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे कडेस सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-१३० धुळे महानगरपालिका मालमत्ता कर विभागाकडील थकबाकी वसुल करणे करीता राष्ट्रीय लोक अदालत भरविणे करीता नियोजन करणे झालेला खर्च रू६०,२९८/- मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५(२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. संतोष खताळ विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५३ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका मालमत्ता विभागकडील थकबाकी कर संदर्भात जिल्हा न्यायालयात यांचे संयुक्तीने दि.१४/०९/२०१९ रोजी राष्ट्रीस लोक अदालत भरविणे करीता म.उपायुक्त सो यांनी सुचित केलेले आहे.

सदरचे नियोजन संदर्भात म.उपायुक्त सो यांचे सुचने नुसार तातडीने असल्याने त्वरीत साहित्य उपलब्ध् करून दयावे लागणार असुन सदर साहित्य स्थानिक सेवा धारक मे. ए.एम.डी जी.बी.एस.एस.धुळे सामाजिक संस्था यांचे कडुन करून घेऊन म.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेऊन बिल अदा करणेत येईल या चर्चे अंती काम करून घेण्यात आले आहे. सदर कामी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | ए.एम.डी.जी. बी.एस, धुळे, | एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप १५ x ३०वॉटर प्रुफ | ०१ | - | १४०००/- | १४०००/- |
| २ | मॅट १५x ३० | ०१ | - | २५००/- | २५००/- |
| ३ | खुर्ची हातवाली | २०० | १०/- | २०००/- | २०००/- |
| ४ | पाणी जार | ३० | ३०/- | ९००/- | ९००/- |
| ५ | टेबल | २० | ५०/- | १०००/- | १०००/- |
| ६ | जेवण (पुलाव,पनीर भाजी, भेंडी, पोळी ,गुलाव जामुन, फरसान, कोशिंबीर | २०० | १४५/- | २९०००/- | २९०००/- |
| ७ | कनात १०x ७० | १५ | ६०/- | १०००/- | ९००/- |
| ८ | फुलांचे झाडे (सत्कार करीता) = ८० प्रति नग | १० | ८०/- | ८००/- | ८००/- |
| | | **एकुण खर्च रुपये** | | | **५११००/-** |
| | **GST/CGST १८ %** | | | | **९१९८/-** |
| **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | | | | | **६०२९८/-** |

कार्यालयीन अहवालास अधिन राहून राष्ट्रीय लोक अदालत भरविणे करीता झालेला खर्च रू६०,२९८/- मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५(२) २ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३१ धुळे महानगर पालिका दि.०३ऑक्टोबर २०१९ रोजी आयोजित सन्मान कार्यक्रम व स्वच्छता माहिमे अंतर्गत कार्यक्रम राबविणेसाठी झालेला खर्च रू३७,४७५/- मात्र कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भिल संजय शत्रुघ्न विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५४ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका दि.०१ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबर या कालवधीत स्वच्छता ही सेवा उपक्रमातंर्गत विविध कार्यक्रम आयोजीत करणेत आले होते. त्यानुसार नियोजन करणे करीता म.उपयुक्त सो यांनी भांडार विभागाकडेस कार्यवाही करावी अशी टिपणी सादर केलेली आहे.

त्यानुसार नियोजन करणेत येऊन साहित्य खरेदी करण्याकरीता झालेला खर्च रू. **३७,४७५/-** मात्र मंजुरीकरीता प्रकरण सादर करणेत आले आहे.

त्यानुसार सदरचे नोंद स्टॉक पा.नं. वर घेण्यात आलेली आहे. म.मु.ले.अ सो यांचे कडेस प्रकरण सादर केले असता काम तातडीचे असल्याने के.दुर्गादास,धुळे व अरिहंत पेन्टस ॲण्ड हार्डवेअर, धुळे यांचे कडुन साहित्य खरेदी करून घेण्यात आले असुन कार्योत्तर मंजुरी करीता पुढे सादर केले आहे.

म.मु.ले.प यांचे कडेस प्रकरण सादर केले असता खर्च मान्यते करीता शिफारस करणेत आलेली आहे. त्यानुसार प्रकरण म.आयुक्त सो यांचे कडेस सादर केले असता कार्यत्तर मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका दि.०१ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबर या कालवधीत स्वच्छता ही सेवा उपक्रमातंर्गत विविध कार्यक्रम आयोजीत करणेसाठी झालेला खर्च रुपये ३७,४७५/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३२ धुळे मनपातील रोजंदारी/ बदली कामगार यांना म. सरकारी कामगार अधिकारी धुळे यांच्याकडील दिनांक१७/७/२०१९रोजीच्या पत्रानुसार रोजंदारी दरवाढ लागू करणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे सभापाती महोदय,सदरचा विषय कुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे पगारवाढ देणेबाबत.याबाबत कोणती कर्मचारी समन्वय समिती कोणती होती ज्यांनी मागणी केलेली होती.

म. नगरसचिव धुळे महानगरपालिका कर्मचारी समन्वय समिती धुळे संलग्न सचिव भानुदास बगदे अध्यक्ष सुनिल तात्या देवरे यांनी दिलेले आहे.

म. नागसेन बोरसे वेळोवेळी मी मागणी केलेली आहे कि किमान वेतन कायद्याचे उल्लंघन होवु नये. किमान वेतन कायद्याच्या संदर्भात मी आपल्याला सांगु इच्छितो २००८ मध्ये ज्यावेळेस मी

पहिल्यांदा निवडुन आलो तेव्हा बदली कामगारांना ५७ रुपये रोज होता मी वेळोवेळी कामगार अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यानंतर कामगार अधिका-यांनी ४ दा नोटीस काढली होती की फौजदारी स्वरुपाचे गुन्हे का दाखल करण्यात येवु नयेत. तरी सुध्दा नारायण सोनार त्या मिटींगला हजर राहत नव्हते.शेवटी महासभेत हा विषय घेतला त्यावेळेस आयुक्त भोगंळे साहेब होते त्यांना महासभेत प्रश्न विचाराला तुम्हांला जेलीत जावयाचे आहे का? त्यावेळेस भोगंळे साहेबांनी सांगीतले होते की, याविषयाबाबत मला माहिती नाही. त्यावेळेस ५७ रुपये रोजाचे मी १५१ रु केले होते. जाकीर ने ज्या पध्दतीने टेंडर घेतले आणि टेंडर मंजुर करतानाउल्लेख केला होता कारण किमान वेतन कायद्याच्या आधीन राहुन जर टेंडर काढत असाल तर मग दर मंजुर का करतात त्याचीही माहिती मिळावी यानंतर आता जो विषय आलेला आहे २४ रु. वाढीचा वाढ करण्यास काही हरकत नाही कारण किमान वेतन कायद्याचे पालन झाले पाहिजे. तसेच पुढच्या मिटींगला विषय येणार आहे आपल्या संगणक कर्मचाऱ्यांचा तसेच जे वॉलमन आहेत त्यांनाही तुटपुंज्या पगारावर काम करावे लागते. जर किमान वेतन कायद्याचे उल्लंघंन होत असेल तर का म्हणुन त्यांना आपण ठेवले पाहिजे. त्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणेच वेतन दिले गेले पाहिजे. कुशल असो किंवा अकुशल. कुशल कामगारांना वेगळा रोज आहे आणि अकुशल यांनाही वेगळा रेट आहे.परंतु आपल्याकडे किमान वेतन कायद्याचे पालन होत नाही माझी विनंती आहे प्रशासनाला किमान वेतन कायद्याचे उल्लंघन करु नका नाहीतर या पुढची तक्रार माझी किमान वेतन कायद्याबाबत असेल आणि हा विषय मंजुर करण्यात यावा.

म. सभापती — कायार्लयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून दरवाढ लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदरची दरवाढ ठरावाच्या दिनांकापासून लागू करण्यांत यावी. तसेच म. मु.ले.प. यांच्या अभिप्रायानुसार उचित पूर्तता तथा कार्यवाही करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५५ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे महानगरपालिका कर्मचारी समन्वय सामिती अध्यक्ष यांचे दिनांक 8/7/2019 रोजी निवेदनानुसार रोजंदारी कर्मचा-यांना महागाई भत्ता दर लागु करण्यासंदर्भात नविन दर म.सरकारी कामगार अधिकारी धुळे यांच्याकडुन मागविण्यात आलेले आहे.

त्यानुसार म.सरकारी कामगार, अधिकारी, धुळे यांचे जा.क्र /सकाअ /धुळे / किवेअ / 680 / 2019 दि.17/07/2019 अन्वये उदयोग व उर्जा कामगार विभाग मुंबई यांचे दि 24 फेबब्रुवारी 2015 च्या अधिसूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या उदयोगातील किमान वेतनाचे दर निश्चित केलेले आहे.दर खालीलप्रमाणेदेणेत आल्लेले आहे त्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत नमूद केलेले आहे.

| अ.क्र | वर्गवारी | परिमंडळ 1 | परिमंडळ 2 | परिमंडळ 3 | महागाई भत्ता दि.1/1/2019 ते दि.30/6/2019 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कुशल | 14,000 | 12,000 | 11,000 | 4235 |
| 2 | अर्धकुशल | 13,000 | 11,000 | 10,000 | 4235 |
| 3 | अकुशल | 11,500 | 10,000 | 8,500 | 4235 |

1.परीमंडळ-1 हा झोन सर्व महानगरपालिका क्षेत्रासाठी.

2.परीमंडळ-2 हा झोन अ व ब नगरपालिका क्षेत्रासाठी

3.परीमंडळ -3 हा झोन परीमंडळ -2 मध्ये लागु नसलेल्या इतर भागासाठी लागु होतो.

सदर पत्रामध्ये मुळवेतन + महागाई भत्ता एकूण वेतनाला 26 ने भागीतल्यावर एक दिवसाचा पगार मिळतो त्यानुसार खालील प्रमाणे एक दिवसाचे वेतन येते. तसेच महागाई भत्याचे दर (जानेवारी ते जुन व जुलै ते डिसेंबर) हे दर सहा महिन्यानी बदल होत असतात. असे नमुद केलेले आहे.

1.कुशल - मुळ वेतन रु.14000 + म.भत्ता रु.4235 = रु 18235 भागीले 26 दिवस = 701/- 1 दिवसाचा रोजंदारी दर

2.अकुशल - मुळ वेतन रु.11500 + म.भत्ता रु.4235 = रु 15735 भागीले 26 दिवस = 605/- 1 दिवसाचा रोजंदारी दर

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी वर्ग 3कर्मचारी (कुशल)/रोजंदारी वर्ग 4 कर्मचारी (अकुशल) / बदली सफाई कामगार यांना सद्यस्थितीत खालील प्रमाणे रोजंदारी दरानुसार वेतन अदा केले जाते.

1.कुशल प्रमाणे - रुपये 677/-

2.अकुशल प्रमाणे - रुपये 581/-

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी कर्मचारी व आरोग्य विभागाकडील बदली सफाई कामगार यादीनुसार खालील प्रमाणे विभागात कार्यरत आहे. सोबत कर्मचाऱ्यांचे नाव, विभाग व पदनिहाय यादी सोबत सादर केलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|
| 1 | लिपीक , फिटर, वाहन चालक इ. | वर्ग -3 | 12 |
| 2 | बिगारी, मुकादम, शिपाई, सफाई कामगार, दाई इ. | वर्ग-4 | 114 |
| 3 | बदली सफाई कामगार | वर्ग -4 | 176 |

सद्यस्थितीत रोजंदारी वर्ग 3 कर्मचारी यांना रोजंदारी दर कुशल वर्गवारी नुसार वेतन अदा केले जाते. तसेच रोजंदारी वर्ग 4 कर्मचारी यांना अकुशल दरानुसार वेतन अदा केले जाते.

त्या अनुषंगाने वरील तक्तात नमुद नुसार रोजंदारी वर्ग 3 कर्मचारी हे कुशल व वर्ग 4 कर्मचारी अकुशल वर्गवारी मध्ये येतात.

म.सरकारी कामगार अधिकारी यांच्या पत्रानुसार धुळे म.न.पा.कडील कुशल कर्मचारी / अर्धकुशल कर्मचारी यांना नविन रोजंदारी दर लागु केल्यास एक कर्मचाऱ्यांच्या वेतनात खालील प्रमाणे वाढ होणार आहे.

1.कुशल - रुपये 701 नवीन रोजंदारी दर - रुपये 677 /- जुना रोजंदारी दर = रुपये 24 वाढ.

2.अकुशल - रुपये 605 नविन रोजंदारी दर - रुपये 581/- जुना रोजंदारी दर = रुपये 24 वाढ.

सद्यस्थितीत आरोग्य विभाग व इतर विभागामंध्ये कुशल/अकुशल (वर्ग 3 व वर्ग 4 ) रोजंदारी कर्मचारी किती कार्यरत आहे. तसेच आरोग्य विभागात बदली कामगार किती कार्यरत आहेत याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे.त्यानुसार खालील प्रमाणे रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहेत.

1.कुशल (वर्ग 3) -12 X 24 रुपये 1 दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ X26 दिवस = रु.7,488/- दरमहा वाढ X 12 महिने = रु.89,856/- 12 महिन्याची वाढ

2.अकुशल (वर्ग 4 ) - 114 X 24 रुपये 1 दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ X 26 दिवस = रु.71,136/- दरमहा वाढ X 12 महिने = रु.8,53,632/- 12 महिन्याची वाढ

3.बदली कामगार (अकुशल ) - 176 X 24 दिवसाच्या रोजंदारी दरात वाढ X 26 दिवस = रु.109824/- दरमहा वाढ X 12 महिने = रु.13,17,888/-12 महिन्याची वाढ

बरील प्रमाणे रोजंदारी दरवाढीबाबत खर्चाच्या तपशीलामध्ये सरासरी 26 दिवस गृहीत धरुन रोजंदारी वाढ काढण्यात आलेला आहे.

कायार्लयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून दरवाढ लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदरची दरवाढ ठरावाच्या दिनांकापासून लागू करण्यांत यावी. तसेच म. मु.ले.प. यांच्या अभिप्रायानुसार उचित पूर्तता तथा कार्यवाही करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३३ — धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत बाळापुर गावातील जलवाहिनीस पारोळा रोड वरील १५०० एम.एम. मुख्य जल वाहिनीस जोडणी करणे आवश्यक असल्याने व नागरिकांच्या पिण्याचा पाणी प्रश्न निर्माण झालेला असल्याने सदरचे तांतडीने अंदाजपत्रकीयदराने तांतडीने करुन घेण्यांत आले,त्यासाठी झालेला खर्च रु.२,९८,४९९/- मात्र नियम ५(२)(२) अन्वये विना निविदा देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. रावसाहेब पाटील — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५६ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे मनपा हद्दवाढ अंतर्गत बाळापुर गावातील जलवाहिनीस पारोळा रोड वरील १५०० एम.एम. मुख्य जल वाहिनीस जोडणी करणे आवश्यक असल्याने व नागरिकांच्या पिण्याचा पाणी प्रश्न निर्माण झालेला असल्याने सदरचे काम श्री.संजय गायकवाड, ठेकेदार यांचे कडून विना निविदा करून घेणेत आलेले आहे.

तरी सदरचे कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.२,९८,४९९/- मात्र आलेला असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास व झालेल्या खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३४ — धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम. एच.१८ एफ. २५८ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.५७००/- मात्रला म.मनपा अधि. १९४९ मधील ७३ खंड (क)

प्रकरण ४ वर्ग २ व प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ नुसार खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५७ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे म. न. पा. अग्निशामक विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन १८ जी ०२५८ सेल स्टार्ट होत नसल्यामुळे वाहन चालक व मेकॅनिक यांचे अहवालानुसार अल्टिनेटर बंद पडल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे वाहनांची बॅटरी चार्ज होत नाही. दोंडाईचा येथे आग लागली असता जाणेसाठी पेट्रोल पंपावर इंधन भरल्यानंतर वाहन नादुरूस्त झाल्याने वाहन हे पेट्रोल पंपाजवळच उभे होते त्यामुळे वाहन तातडीने बॅटरी चार्जींग करून जा.क्र.४ दि.५/९/२०१९ मो. वाहन विभागाकडुन मे.उज्वल ॲटोमोटीव्ह , धुळे टाटा अधिकृत वितरक यांना पत्र देऊन कंपनी अभियंता यांचे मार्फत तपासणी केली असता वाहनांचे अल्टिनेटर दुरूस्ती करावे लागेल असे सांगितले असता आगीच्या घटना वारंवार होत असल्याने व वाहन हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने वाहनांची जा.क्र.७ दि.७/७/२०१९ अन्वये पत्र देऊन म.उपायुक्त सो.यांच्या कायारदेशाने तातडीने दुरूस्ती करणेत आली. इनव्हाईस नं. IUAUL1920006789 दि.०८/०९/२०१९ अधिकृत वितरक यांचे कडुन दुरूस्ती तात्काळ करण्यात येऊन वाहन योग्यरीत्या कार्यरत करणेत आलेले आहे.

सदर दुरूस्ती ही शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिंसेबर २०१६ नियम ३.२.२ मधील परिच्छेद २ व नियम ४.३ मधील तरतुदी नुसार ₹.५०,०००/- पर्यंतची थेट खरेदी अधिकृत वितरक यांच्याकडुन करता येईल. अशी तरतुद आहे.

तरी वाहनाची दुरूस्ती मजुरीसह मे.उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे टाटा मोटर्स अधिकृत वितरक यांचे कडून करुन घेणेत आली आहे. त्यासाठी रुपये ५७००/- मात्र खर्च झालेला आहे.

तरी कार्यालयीन अहवालानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ नुसार सदर खर्च रूपये ₹.५७००/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३५ — धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील अग्निशामक वाहन क्र.एम.एच.१८ एम. ८२८८ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.२५१४५/-मात्रला म.मनपा अधि.१९४९ मधील ७३ खंड प्रकरण ४ वर्ग २ व प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ नुसार खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५८ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे म. न. पा. अग्निशामक विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन १८ एम. ८२८८ अग्निशामक वाहन रेस होत असुन जागेवरून पिकअप घेत नाही असा चालक व मेकॅनिक यांचे अहवालानुसार दिसुन येत आहे. त्यानुसार मो. वाहन विभागाकडुन जा.क्र.७ दि.९/९/२०१९ मो. वाहन विभागाकडुन मे.उज्वल ॲटोमोटीव्ह , धुळे टाटा अधिकृत वितरक यांना पत्र देऊन कंपनी अभियंता यांचे मार्फत वाहन तपासणी करुन इस्टीमेट देणेचे करावे असे पत्र देण्यात आले होते त्यानुसार कंपनी कर्मचारी यांनी मनपा कार्यालयात येऊन बिल सादर केलेले आहे वाहन चालक यांनी कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण न करता वाहन दुरूस्ती खर्च ₹.२५१४५/-मात्रची दुरुस्ती केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे इनव्हाईस नं. IUAUL१९२०००६९३५ दि.१२/०९/२०१९ अधिकृत वितरक यांचे कडुन दुरूस्ती बिल सादर करणेत आलेले आहे.

तरी वाहनाची दुरूस्ती मजुरीसह मे.उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे अधिकृत वितरक टाटा मोटर्स यांचे कडुन करुन घेणेत आली आहे. दुरूस्ती कामांची नोंद हिस्ट्री शिट पान क्र.१७ मध्ये घेणेत आली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून अग्निशामक वाहन क्र.एम.एच.१८ एम.८२८८ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.२५१४५/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५नियम २ पोटनियम २ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३६ — धुळे महानगरपालिका मुख्य कार्यालयाकडील एक्सेंट वाहन क्र. एम.एच १८ बी. सी ३३६४ म.उपायुक्त सो. यांचे सेवेतील वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.६२९१/-+₹.३७१२/- = ₹.१०,००३/- मात्रला म.मनपा अधि.१९४९ मधील कलम ७३ खंड (क) अधिन राहुन अनुसूची ड प्रकरण ५ नियम २ पोटनियम २ नुसार खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

| | |
|---|---|
| म. नगरसचिव | **नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.** |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | **सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.** |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५९ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे म. न. पा. मुख्य कार्यालयाकडील म.उपायुक्त सो. यांचे सेवेतील वाहन क्र. एम एच १८ बी.सी.३३६४ या वाहनांची दुरुस्ती **अधिकृत वितरक** यांचे कडुन वाहन चालक व मेकॅनिक यांचे अहवालानुसार जा.क्र./धुमपा/मोवावि/४६ दि.११/११/२०१९ मो. वाहन विभागाकडुन नवकार ॲटोमोटिव्ह, धुळे अधिकृत वितरक यांना पत्र देऊन नवकार ॲटोमोटिव्ह, येथे वाहन कंपनी अभियंता यांचे मार्फत तपासणी केली असता त्यांचे अहवालानुसार वाहनात खालीलप्रमाणे नियमीत सर्व्हीसींग व दुरूस्ती करावे लागेल तसा इस्टीमेट देणेत आले होते त्यानुसार वाहन हे म.उपायुक्त सो सेवेतील असल्याने व पर्यायी वाहन उपलब्ध् नसल्याने वाहनांची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते. त्यानुसार जा.क्र./धुमपा/मोवावि/४७ दि.२०/११/२०१९ नुसार अधिकृत वितरक यांना म.उपायुक्त सो यांच्या मान्यतेने कार्यादेश देउन दुरूस्ती कामे करण्यात आली.

तरी वाहनाची दुरूस्ती मजुरीसह अधिकृत वितरक नवकार ॲटो धुळे ह्युन्दाई मोटर्स अधिकृत यांचे कडून करुन घेण्यात आले आहे.

कार्यालयीन अहवालानुसार वाहन क्र.एम.एच.१८ बी.सी.३३६४ या वाहनांचे या बिजकातील स्पेअर पार्ट व मजुरी दुरूस्ती खर्च रूपये **₹.६२९१/-+३७१२/- = एकुण ₹.१०,००३/- (अक्षरी- दहा हजार तीन रूपये )** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५नियम २ पोटनियम २ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १३७ | तापी पाणीपुरवठा पाईप लाईन वरील सोनगीर गावाजवळ चुना फॅक्टरी लगतचे लिकेचे दुरुस्तीचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत,त्यासाठी झालेला खर्च रुपये ७२४०८/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ कलम २(२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. संतोष खताळ | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६० दिनांक ३१/०१/२०२०**

तापी पाणीपुरवठा पाईपलाईनच्या मुख्य ९६५ M.M.(१००० M.M.) पाईप लाईनला सोनगीर गावाजवळ चुना फॅक्टरीलगत मोठी गळती दिनांक २५/१०/२०१९ रोजी झाली. सदरची गळती असल्याने तांतडीने करणेबाबत आदेशान्वये गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे यांचेकडून तांतडीने काम करुन घेणेत आले

सदरचे लिकेज भूमिगत असल्याने व दोन्ही बाजूने उतार असल्याने डिवॉटरींग करुन नंतर पॅच वेल्डींगचे काम करणेत आले. सदर कामासाठी खर्च बिल रु. ७२४०८/- मात्र आहे.

कार्यालयीन अहवालाप्रमाणे तापी पाईप लाईन लिकेज दुरुस्ती कामासाठी खर्च रु. ७२४०८/- करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ कलम २(२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- १३८ | तापी पाणीपुरवठा रॉ वॉटर पाईप लाईन वरील दभाशी फाटा येथील लिकेज दुरुस्ती करणेचे दि. २५/१२/१९ व दि.२९/१२/१९ रोजी तांतडीने करुन घेण्यांत आलेत त्यासाठी झालेला एकत्रित खर्च रुपये १,१३,४६६/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ कलम २(२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. तथापि स्थायी समितीपुढे तापी वितरण वाहिनीवरील लिकेजेसंचे प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी येत असतात. सदर जलवाहिनी जुनी असल्याने ७ ते ८ दिवसांत त्यांसाठी लिकेजेस होतात. व तातंडीने कामे करुन घ्यावी लागतात. |

वारंवार ठराविक ठेकेदार लिकेजेसचे कामे करतात. सदर बाबतीत लेखा आक्षेपही येऊ शकतो. यासाठी तापी पाणीपुरवठा वितरण वाहिनीवरील लिकेजेस काढण्यांसाठी वार्षिक निविदा दर मागविणे मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने योग्य राहील. तरी याबाबत निर्णय घ्यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच तापी पाणीपुरवठा वितरण वाहिनीवरील लिकेजेस काढण्यांसाठी वार्षिक निविदा काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६१ दिनांक ३१/०१/२०२०**

दिनांक २५/१२/२०१९ रोजी संध्याकाळी सुखवद पाणीपुरवठा केंद्र भागात वादळी वा-यासह पाऊस झाला. विजपुरवठा खंडीत झाल्यामुळे दभाशी फाटा येथे शेतामधील भूमिगत पाईप लाईन फूटली सदर पाईप लाईन दि. २५/१२/२०१९ रोजी संध्याकाळी ६ च्या सुमारास फूटल्याने पाणीपुरवठा बंद पडला. याबाबत म. आयुक्त सो. म. अभियंता सो. यांना अवगत करुन सदर काम तांतडीने करणे आवश्यक असल्याने रात्री लगेचच दुरुस्ती करणेत आली आहे.

सदर पाईप लाईन भूमिगत असल्याने व त्यातील मॅन व्होल आकस्मित उखडल्यामुळे पूर्ण बेंड झाल्याने नवीन राऊंडेड प्लेटचे पॅचवर्क करणेत आले आहे. सदरचे कामासाठी आकाश एंटरप्राईजेस यांचे खर्च बिल रु ५१८७२/- मात्र आहे.

दि.२९/१२/२०१९ रोजी सकाळी श्री.दिलीप पाटील उभाशी फाटा ते सुखवद रस्त्या वरील शेतात पाईप लाईन लिकेज झाली. सदरचे कामी शेतजमीन JCB व्दारे लिकेज स्पॉटवर माती काढून साईड क्लिअर करणेत आली. दि. २९/१२/२०१९ रोजी रात्री पर्यंत सदर काम पूर्ण करणेत आले. सदर कामी मे.आकाश एंटरप्राईजेस यांनी केलेल्या कामाचे बिल रु. ६१,५९४/- मात्र आहे.

वरील प्रमाणे दोन्ही कामे तांतडीने असल्याने तात्काळ करणेत आले आहे. सदर कामी मक्तेदार मे. आकाश एंटरप्राईजेस यांनी कामे पूर्ण केली असून त्यांचे कामाचे देयक रु. ५१८७२/- + ६१५९४/- मात्रयोग्य व उचित आहेत.

कार्यालयीन अहवालाप्रमाणे उक्त प्रमाणे दि.२५/१२/२०१९ व दि.२९/१२/२०१९ रोजी तापी पाणीपुरवठा योजनेच्या पाईप लाईन दुरुस्ती करिता झालेल्या कामी रु.५१,८७२/- + ६१५९४/- च्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ कलम २ (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच तापी पाणीपुरवठा वितरण वाहिनीवरील लिकेजेस काढण्यांसाठी वार्षिक निविदा काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी, २०२०**
**वेळ दुपारी ५-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज शुक्रवार दिनांक ३१/०१/२०२० रोजी दुपारी ५-००वाजता **मा. श्री.युवराज चैत्राम पाटील सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.न | सदस्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.पाटील युवराज चैत्राम | सभापती |
| २ | श्रीमती. पाटील विमलबाई गोपीचंद | सदस्या |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. पाटील रावसाहेब आनंदराव | सदस्य |
| ५ | श्री. खताळ संतोष छगन | सदस्य |
| ६ | श्रीमती देवरे सुरेखा भागवत | सदस्या |
| ७ | श्रीमती उदासी कशीश गुलशन | सदस्या |
| ८ | श्री. भिल संजय शत्रुघ्न | सदस्य |
| ९ | श्री. मन्सुरी मुख्तार कासिम | सदस्य |
| १० | श्रीमती. शेख शहाजहान बी. बिस्मील्ला | सदस्या |
| ११ | श्रीमती अन्सारी सईदा म. इकबाल | सदस्या |
| १२ | श्रीमती अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| २ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ३ | श्री. नामदेव भामरे | मुख्य लेखाधिकारी |
| ४ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| ५ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. रमजान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| ८ | श्री. युवराज वाघ | अधिक्षक परवाना विभाग |
| ९ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ११ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १२ | श्री. विशाल निंबाळकर | अभिलेखापाल |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. किशोर सुडके | प्रमुख बाजार विभाग |
| १४ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १५ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |
| १६ | श्री. सुक्राम आत्या राऊत | मोटार वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.उपायुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज —**

सन्मा.सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार, श्री. सुभाष सुकलाल जगताप, सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

म. सभापती. — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६२ दिनांक ३१/०१/२०२०**

सन्मा.सदस्य श्री. सुनिल वसंतराव सोनार, श्री. सुभाष सुकलाल जगताप, सौ. सुरेखा चंद्रकांत उगले यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय कमांक:-१३९ — मनपा निधी अंतर्गत साक्रीरोड छत्रपती मेडिकल ते कालिकादेवी मंदिरापर्यत रस्ता डांबरीकरण करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. तसेच कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — संबंधित एल 1 ठेकेदार श्री. देवेंद्र भटू बागुल यांनी फक्त टेंडर भरले आहे. मात्र नवीन शासन परिपत्रकानुसार निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने भरल्यास नियमानुसार सुरक्षा अनामत विहीत मुदतीत भरणे बंधनकारक आहे. संबंधित एल 1 ठेकेदाराने सुरक्षा अनामत भरलेली नाही. संबंधित ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे पुनश्च टेंडर प्रक्रिया राबविणे व अन्य कार्यवाहीसाठी मनपाचे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे सदर ठेकेदारांचे अनामत जप्त करण्यांत यावे तसेच त्यांना महानगरपालिकेच्या कोणत्याही अन्य निविदा प्रक्रियेत सहभागी करुन घेवू नये यासाठी संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यांसाठी नियमानुसार कार्यवाही करावी. व एल. 2 निविदा धारक श्री. भूषण एल. चौधरी यांनी एल. 1 च्या दरात काम करण्यांस मान्यता दिल्याने त्यांचे निविदा दर मंजुर करण्यांत यावे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६३ दिनांक ३१/०१/२०२०**

मनपा निधी अंतर्गत साक्रीरोड छत्रपती मेडिकल ते कालिकादेवी मंदिरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबत कामास धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.128 दि. 5/12/2019 मा. आयुक्त सो.महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दिनांक25/11/2019अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रुपये 56,30,237/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्रं. धुमपा/ बांवि/130/2019 दि. 7/12/2019 अन्वये दि.7/12/2019 रोजी दैनिक नवशक्ती / राजरंग टाईम्स या वृत्तपत्रातून जाहीर निविदा प्रसिध्द करणेत येवून दि. 31/12/2019 रोजी निविदा दर मागविण्यांत आले आहेत.

पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पध्दतीने बयाना रक्कम भरुन निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | देवेंद्र भटू बागुल | शे. 3.45%कमीने | **सर्वात कमी दर** |
| 2 | ए.के. सैफी | शे. 2.00% जास्तीने | |
| 3 | गायत्री कंन्स्ट्रक्शन | शे. 5.00 % जास्तीने | |
| 4 | भूषण एल. चौधरी | अंदाजपत्रकीय दराने | |

निविदा दर दिनांक 23/1/2020 रोजी उघ्डण्यांत आली होती. त्यात देवेंद्र भटू बागुल यांचे दर सर्वात कमी शेकडा 3.45% कमी दराने L - १ आलेले आहेत.

शासन निर्णय 26 नोव्हेंबर 2018 सुधारीत अधिसुचना 1 नुसार L-१ या निविदा धारकांने 8 दिवसांच्या आंत सुरक्षा रकमेच्या डी.डी. जमा करणे आवश्यक असतांना सदर डी.डी. जमा झालेला दिसून येत नाही.

L-२ श्री. भूषण चौधरी यांनी श्री. बागुल यांच्या आलेल्या शेकडा 3.४५% कमी दराने काम करण्यांस तयार असल्याने त्यांचे दर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर व L-१ यांची अनामत रक्कम जप्त करणेस मान्यतेस्तव सादर झाला आहे.

यावर उपस्थित सदस्यांनी चर्चेनुसार संबंधित एल 1 ठेकेदार श्री. देवेंद्र भटू बागुल यांनी फक्त टेंडर भरले आहे. मात्र नवीन शासन परिपत्रकानुसार निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने भरल्यास नियमानुसार सुरक्षा अनामत विहीत मुदतीत भरणे बंधनकारक आहे. संबंधित एल 1 ठेकेदाराने सुरक्षा अनामत भरलेली नाही. सदर कामी पुनश्च निविदा प्रक्रिया राबविणे हे मनपाच्या आर्थिक हिताविरुध्द आहे.तसेच सदरचे काम रहदारीच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व अत्यावश्यक असल्याने काम तांतडीने करणे आवश्यक आहे. संबंधित ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे पुनश्च टेंडर प्रक्रिया राबविणे व अन्य कार्यवाही करणे यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान तसेच विलंब होऊ शकते. त्यामुळे सदर ठेकेदारांचे अनामत रक्कम जप्त करण्यांत यावे. तसेच त्यांना महानगरपालिकेच्या कोणत्याही अन्य निविदा प्रक्रियेत सहभागी करुन घेवू नये यासाठी संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यांसाठी नियमानुसार कार्यवाही करावी. व एल. 2 निविदा धारक श्री. भूषण एल. चौधरी यांनी एल. 1 च्या दरात शेकडा 3. 45 % कमीने काम करण्यांस मान्यता दिल्याने त्यांचे निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.

उक्त प्रस्तावाबाबत म.सहा.आयुक्त,मा.उपायुक्त, व म. मु. ले. प. यांच्या अभिप्राया नुसार उचित पूर्तता व कार्यवाही करणेची जबाबादारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१४० | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राष्ट्रीय संत श्री.रमेशभाई ओझा यांच्या कार्यक्रमासाठी आलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5(2)(2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. संतोष खताळ | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६४ दिनांक ३१/०१/२०२०**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राष्ट्रीय संत रमेशभाई ओझा यांच्या कार्यक्रमासाठी दिनांक 18/6/2019रोजी धुळे महानगरपालिका आवारात आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात राष्ट्रीय संत श्री. रमेशभाई ओझा यांनी मनपाचे सर्व स्त्री व पुरुष सफाई कामगार यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले होते. सदर कार्यक्रमात मनपाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात वाटरप्रुफ मंडप, खुर्च्या,स्टेज,फुलाची सजावट, लाईटींग, फोकस जनरेटर, कुलर, साऊंड इ. लाईट विभागामार्फत मे. धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांच्यामार्फत लावण्यांत आले होते. त्याअनुषंगाने दिनांक 16/7/2019 रोजी टिपणी सादर करुन सदर कार्यक्रमाचे मे. धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांचे एकुण बिल रु. 3,16,476/- अदा करणे बाबत आरोग्य विभागामार्फत कार्यवाही होणेबाबत कळविले आहे.

तसेच सदर कार्यक्रमानिमित्त व्हिडिओ शुटींग व फोटो काढणे आवश्यक असल्याने व्दारका कम्युनिकेशन यांच्याकडून शुटींग व फोटो काढण्यांत आले आहे. त्यांचे बिल रुपये 8260/- मात्र सादर झालेले आहे.

तरी मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांचे रुपये 3,16,476/- व व्दारका कम्युनिकेशन यांचे रुपये 8260/- असे एकुण रु.3,24,736/- खर्च झालेला आहे.तरी उक्त खर्च हा घनकचरा व्यवस्थापन आराखडा (DPR) IECअंतर्गत रु. 1,00,00,000/-तरतूद करण्यांत आली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कार्यक्रमासाठी झालेला खर्च रु.3,24,736/- मात्रला महारा ष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5 (2)(2) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४१ मा. महापौर सो. मनपा धुळे यांच्या पत्रानुसार व मा. सभापती स्थायी समिती यांच्या आदेशाने श्री.छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने शिव चरित्र व्याख्यानमालाआयोजनासाठी येणा-या संभाव्य खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. सदर कार्यक्रम मा. महापौर तसेच मा. आयुक्त यांनी चर्चा करुन निश्चित केलेला असून साधारणत: फ्रेबुवारी महिन्यांच्या अखेरीस व्याख्यानमाला आयोजित करावयाचे नियोजन आहे. त्यासाठी प्रमुख वक्त्यांचे मानधन, निवास व्यवस्था, मंडप,स्टेज, ध्वनी, लाईट निमंत्रण पत्रिका इत्यादी बाबींसाठी विना निविदा तांतडीने कामे करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर घेण्यांत आलेला आहे.

म. नागसेन बोरसे सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.तसेच दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवजयंती असल्याने पुतळा परिसर सजावट तसेच शोभायात्रा मार्गावर विद्युत व्यवस्था व अन्य अनुषंगिक बाबींसाठीही येणा-या खर्चास मान्यता देण्यांत यावी.

म. सभापती मा. महापौर साहेब यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच छत्रपती शिवराय जयंती निमित्त होणा-या अनुषंगिक व्यवस्थेच्या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६५ दिनांक ३१/०१/२०२०**

मा. महापौर श्री. चंद्रकांत मधुकर सोनार सो. मनपा धुळे मा. सभापती स्थायी समिती यांना पत्र देऊन मे. स्थायी समितीच्या विषय पटलावर खालील विषय घेणेबाबत सूचित केले आहे.

त्यांच्या पत्रानुसार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती असून त्यानिमित्ताने धुळे शहरातील सर्व नागरीकांसाठी व शिवप्रेमीसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चारित्रयावरील नामांकित वक्त्यांचे व्याख्यान धुळे मनपा मार्फत आयोजित करावयाचे आहे.

त्याअनुषंगानेअल्प कालावधी लक्षांत घेता सदर व्याख्यानासाठी व्याख्या मानधन, मंडप,स्टेज,बैठक व ध्वनी तसेच विद्युत व्यवस्था व अनुषंगीक कार्यवाही तांतडीने विना निविदा करण्यांस व त्यासाठी येणा-या संभाव्य खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच छत्रपती शिवराय जयंती निमित्त पुतळा परिसर सजावट तसेच शोभायात्रा मार्गावर विद्युत व ध्वनी व्यवस्था तसेचशहरातील महापुरुषांचे पुतळासभोवती सजावट व अन्य अनुषंगिक बाबींसाठीही येणा-या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४२ मानधनावरील संगणक लिपीक यांच्या मानधनात वाढ करणे व नवीन जाहिरात प्रक्रिया करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव म. नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे सभापती महोदय सदरचा विषय किमान वेतन कायद्याच्या आधीन राहुन मंजुर करणेत यावा. किमान वेतन कायद्याच्या आधारे जर या कर्मचाऱ्यांना मानधन देण्याचे ठरविले तर हे कर्मचारी कुशल कामगारांमध्ये येतात तर कुशल कामगारांप्रमाणे मानधन का देण्यात येत नाही. परत किमान वेतन कायद्याचे उल्लंघंन आपण करत आहोत.

| | |
|---|---|
| म. कार्या. अधिक्षक | सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करतो की, याबाबत आपण शासन निर्णय मागविला होता सरकारी कामगार अधिकारींकडुन त्यांच्या शासन निर्णयामध्ये १२ हजार रुपये दाखविण्यात आले आहे. |
| म. नागसेन बोरसे | परिमंडळ ३ मध्ये येतात.आणि महानगरपालिका १ मध्ये येते. मध्ये १४ हजार रुपये आणि महागाई भत्ता ४२३५ रुपये. माझी विनंती आहे जर १२ हजार मानधन केले तर त्याला ४२३५ रुपये महागाई भत्ता दिला गेला पाहिजे म्हणजेच १६ हजार रुपये दिले गेले पाहिजे. आपण १० हजारासाठी प्रस्ताव दिलेला आहे यामध्ये किमान वेतन कायद्याचे उल्लंघन होत आहे. आहेत त्याच कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देवुन हा विषय मंजुर करण्यात यावा. |
| म.कार्या अधिक्षक | नविन दर लागु केले तर नविन जाहीरात काढावी लागेल. |
| म. नागसेन बोरसे | नविन जाहीरात काढणार असाल तर १६ हजार मानधनाची काढा.आणि सद्यस्थितीत काम करीत आलेल्या मानधनावरील कर्मचा-यांना प्रथम प्राधान्य द्या कारण ते दिवस भर कायम कर्मचा-यापेक्षाही जास्त काम करतात. |
| म. उपायुक्त | कार्यालयीन प्रस्तावानुसार मानधनात वाढ करुन सद्यस्थितीतीलमानधन तत्वावरील कर्मचा-यांना लागू करता येईल. |
| म. सभापती | कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६६ दिनांक ३१/०१/२०२०**

धुळे महानगरपालिकेतील मानधनावर संगणक ऑपरेटर 1 ते 20 यांनी दि. 3/01/2020 रोजी विनंती अर्ज सादर करुन लिपिक/टंकलेखक (कॉम्पुटर ऑपरेटर) या पदावर 8,000 मात्र एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. असंख्य प्रसंगी आम्ही आमची विश्वासहर्ता सिध्द केली आहे आणि सर्व घटनांवर कठोर परिश्रम केले आहेत. आम्हाला 8000/- मात्र वेतन दिले जाते परंतु त्या क्षणी ही खूप कमी असल्याचे दिसत आहे. सदर मानधनातून ई.पी.एफ. व व्यवसाय कर वजा करुन 6865 मात्र इतके वेतन दिले जात असल्याने आजच्या धकाधकीच्या व महागाईच्या जिवनात हे खुप कमी आहे. इतर विभागात जसे की,सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्र.सकआ 2015/प्र.क्र.338/आस्था/ - 2 दि. 26/2/2016 मध्ये संगणक ऑपरेटर पदाचे मानधन 8,000 वरुन 12,000 मात्र करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णयाप्रमाणे 4,000 मात्रची पगारवाढ देणेबाबतची विनंती केलेली आहे.

धुळे महानगरपालिकेने अंतर्गत विविध विभागासाठी संगणकावर काम करण्यासाठी एकूण 23 संगणक ऑपरेटर जाहिरात देऊन मुलाखत घेऊन रु. 8,000/- मात्र मानधन तत्वावर 6 महिनेकरीता नियुक्ती करण्यात आली आहे.उक्त 23 संगणक ऑपरेटरपैकी सद्यस्थितीत 20 संगणक ऑपरेटर कार्यरत आहे.

उक्त संगणक ऑपरेटरांना 6 महिण्यानंतर त्याच मानधनावर मुदतवाढ देण्यात येते. तसेच मुदतवाढ देतांना सदर संगणक ऑपरेटर यांच्या मानधनात कुठलीही वाढ करण्यात आलेली नाही.

अर्जदार यांनी अर्जासोबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडील शासन निर्णय सकआ 2015/प्र.क्र. 338/आस्था- 2 दि. 26/2/2016 अन्वये विधी अधिकारी (गट - अ) (गट- ब) विधी सहायक जनसंपर्क अधिकारी व संगणक ऑपरेटर या पदांचे मानधन वाढविणेबाबत शासन निर्णयानुसार संगणक ऑपरेटर यांना सुधारीत दरमहा मानधन रु. 12,000/- मात्र दि. 01/04/2016 पासून लागू करण्यात आलेले आहे. तथापी सदर शासन

निर्णय महानगरपालिकेसाठी लागू नसल्याने त्यानुसार संगणक ऑपरेटर पदाचे मानधन वाढ करता येणार नाही.

तसेच अर्जदार यांनी महाराष्ट्र किमान वेतन अधिनियम 1948 नुसार उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे दि. 24 जुलै 2019 ची अधिसूचनेनुसार अनुसुचि कुशल, अर्धकुशल, अकुशल, परिमंडळ 1,2,3 मध्ये मूळ किमान वेतन दर दरमहा नमूद केले असून त्यामधील स्पष्टीकरण (क) परिमंडळ 1 मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीतील सर्व क्षेत्र तसेच महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रापासून 20 किमीपर्यंत औद्योगिक क्षेत्र व छावणी क्षेत्र मिळून उक्त कुशल,अर्धकुशल,अकुशल, वर्गासाठी वेतनाचे किमान दर निर्धारीत केलेले आहे. तथापी सदर अधिसुचनेमध्ये रोजंदारी किंवा मानधन वाढीबाबत दर नमूद केलेले नाही.

तरी अर्जदार यांनी मागणी केल्यानुसार रु.8,000 वरुन12,000 रु. मानधन वाढीबाबत विनंती केलेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार धुळे महानगरपालिकेतील संगणक ऑपरेटर यांना रु. 8,000 वरुन 10,000 रु. वाढ करणे योग्य होईल त्याबाबत खालील प्रमाणे खर्चात वाढ होईल.

1. संगणक ऑपरेटर 20 पदे कार्यरत X रु. 8,000 - दरमहा मानधन = 1,60,000 दरमहा वेतनाचा खर्च

2. संगणक ऑपरेटर 20 पदे कार्यरत X रु. 10,000 - दरमहा मानधन = 2,00,000 दरमहा वेतनाचा खर्च

वरील प्रमाणे दरमहा 40,000 खर्चात वाढ होणार आहे.

40,000 X 12 महिने = रु. 4,80,000 वार्षिक खर्चात वाढ होणार आहे.

याबाबत मा. आयुक्त सो. यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविलेले आहेत.

१) सद्यस्थितीत ८००० रु प्रमाणे मानधन अदा करावे.

२) नवीन दराप्रमाणे ( रु.१००००) नवीन जाहिरात प्रसिध्द करुन मे. स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेने विहीत प्रक्रिया पार पाडावी.

३)अ.क्रं. २ प्रमाणे कार्यवाही पूर्ण होईतो मुदतवाढ देण्यांत येत आहे

उक्तअभिप्रायानुसार सद्यस्थितीतील मानधनावरील संगणक लिपीक यांना रु. ८०००/- मात्र मानधन अनुज्ञेय आहे. नवीन भरती प्रक्रिया राबवितांना रुपये ८००० ऐवजी रु. १००००/- मात्र मानधनात वाढ करणेस मान्यता देण्यांत येत आहे व त्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. सदर प्रक्रिया संबंधित मानधनावरील संगणक लिपीक यांची मुदत संपण्यापूर्वी राबविण्यांत यावी. तसेच सद्यस्थितीतील पात्र अनुभव धारक संगणक लिपीकांना योग्य त्या विहीत पक्रियेत नियुक्ती करतांना प्राधान्य देण्यांत यावे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**